सन १९४४

भारतीय
शिक्षणाचा इतिहास
(१८०० ते १९४४)

म. ग्रं. सं. ठाणे
इतिहास
नं. ८५८
सन १९४४

लेखक
बा. ग. जगताप, बी. ए., बी. टी.,
सुपरिंटेंडंट,
श्रीशिवाजी मराठा सोसायटी स्कूल्स, पुणें.

[श्री. सय्यद नुरुल्ला व श्री. जे. पी नाईक यांच्या
A Students' History of Education
in India या ग्रंथाचें रूपांतर]

रुपये १४ आणे

REFBK-0006549

आणि कंपनी लि.,
मुंबई, कलकत्ता, मद्रास, लंडन.
१९४८

भारतीय
शिक्षणाचा इतिहास
(१८०० ते १९४७)

लेखक

बा. ग. जगताप, बी. ए., बी. टी., डी. दि. ...

सुपरिंटेंडेंट,

श्रीशिवाजी मराठा सोसायटी स्कूल्स, पुणे.

ग्रंथ संग्रहालय
अनुक्रमांक
विभाग
क्रमांक
मराठी
बा. ग.

[श्री. सय्यद नुरुल्ला व श्री. जे. पी. नाईक यांच्या
A Students' History of Education in India या ग्रंथाचें रूपांतर]

REFBK-0006549

मॅकमिलन आणि कंपनी लि.,
मुंबई, कलकत्ता, मद्रास, लंडन.

१९४८

Printed by V. H. Barve, at the Aryabhushan Press,
915/1 Shivajinagar, Poona 4.

Published by S. C. Fillmore, for Macmillan & Co. Ltd.
276 Hornby Road, Fort, Bombay.

प्रस्तावना

पांच वर्षांपूर्वी मेसर्स **सय्यद नुरुल्ला** व **जे. पी. नाईक** यांनीं History of Education in India during the British Period हें पुस्तक लिहिलें. पुढें कांहीं दिवसांनीं याच पुस्तकाची छोटी आवृत्ति, विशेषतः ट्रेनिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त व्हावी म्हणून, काढण्यांत आली. गेल्या दीडशें वर्षांत शिक्षण-क्षेत्रांत कसकशा हालचाली झाल्या यांचा सायंत इतिहास या पुस्तकांत दिल्यामुळें या विषयामध्यें आजवर भासणारी मोठी उणीव दूर झाली आहे.

शिक्षणाचें क्षेत्र आज वाढत असल्यानें व शिक्षणांचा विचार सर्वत्र होत असल्यानें, सर्वसाधारण नागरिक, प्राथमिक ट्रेनिंग कॉलेजचे विद्यार्थी व मराठी शाळांचे शिक्षक, यांना या विषयाचें ज्ञान असणें जरूर वाटल्यावरून, वरील इंग्रजी पुस्तकाचें रूपांतर या ग्रंथांत करण्यांत आलें आहे.

हें रूपांतर करतांना अनेक इंग्रजी शब्दांना मराठींत प्रतिशब्द निवडणें कठीण झालें. परंतु पुण्याचे **महाराष्ट्र साहित्य परिषदेनें** या कामीं बरेंच सहाय्य केल्यामुळें हें कार्य सुलभ झालें. परिषदेचे उत्साही सेक्रेटरी **रा. वा. दा. गोखले**, यांनीं परिषदेच्या सद-स्यांची तीन चार वेळां सभा भरवून बरेच पारिभाषिक शब्द सुचविले.

यापुढें बहुतेक सर्व ज्ञान देशी भाषांतून देण्यांत येणार असल्यानें, प्रांतिक व मध्यवर्ती सरकारचा पारिभाषिक शब्द निश्चित करण्याचा प्रयत्न चालू आहे. कदाचित् पुढच्या आवृत्तींत सर्वमान्य पारिभाषिक शब्दांचा अवलंब करण्याचा योग येईल अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकांत वापरलेले पारिभाषिक शब्द शेवटीं परिशिष्टांत दिले आहेत.

हा ग्रंथ मराठी भाषा जाणणारे शिक्षक, विद्यार्थी व सर्वसाधारण नागरिक यांचे आदरास पात्र होईल अशी आशा वाटते.

पुणें, ता. २२।६।४८ — बा. ग. जगताप

अनुक्रमणिका

	प्रकरण			पृष्ठ
१	प्रस्तावना			
२	विषय – प्रवेश	...	...	१
३	प्रकरण पहिलें – एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं		...	१७
४	प्रकरण दुसरें – कंपनीची शिक्षणविषयक जबाबदारी.		...	४०
५	प्रकरण तिसरें – प्रयोगाचा काळ		...	५४
६	प्रकरण चवथें – आधुनिक शिक्षण – पद्धतीचा उदय.	...	...	६५
७	प्रकरण पांचवें – वुडसाहेबाचा खलिता			८८
८	प्रकरण सहावें – शिक्षण खात्यांचे कार्यास प्रारंभ		...	१०१
९	प्रकरण सातवें – हन्टर कमिशन व त्यानंतर.		...	१२६
१०	प्रकरण आठवें – लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द		...	१५५
११	प्रकरण नववें – द्विदल राज्यपद्धतीचा प्रारंभ.		...	१७५
१२	प्रकरण दहावें – हिंदी लोकांकडे सत्ता.		...	१९६
१३	प्रकरण आकरावें – प्रांतिय स्वायत्तता		...	२२५
	परिशिष्ट–पारिभाषिक शब्द	...	..	२६७

ग्रंथालय अने
दा. क्र. ६५१
संग्रह शाखा (पुणे)
१८३२०
दा. इतिहास
३०१२५५

भारतीय शिक्षणाचा इतिहास

विषय–प्रवेश

नाटककार नाटक लिहितांना एक विशेष तत्त्व प्रेक्षकांपुढें ठेवीत असतो. हें तत्त्व लोकांचे मनावर बिंबावें यासाठीं तो योग्य प्रसंगाची सजावट करतो. हिऱ्याचें तेज विशेष खुलून दिसावें म्हणून तो जसा विशिष्ट कोंदणामध्यें बसविला जातो, तींच स्थिति सजावटीची आहे. सजावट हें प्रतिपाद्य विषयाचें कोंदण आहे. योग्य पात्रांची निवड हाही महत्त्वाचा भाग असल्यानें नाटककारास ही निवड योग्यप्रकारें करावी लागते. नाटक सामाजिक असो किंवा ऐतिहासिक असो, नाटकाचें तंत्र एकच. ऐतिहासिक नाटकांत एकाद्या विशिष्ट तत्त्वाचें प्रतिपादन केलें न जातां विशिष्ट काळाचें प्रदर्शन घडवून आणावयाचें असतें, एवढेंच. (१) प्रतिपाद्य विषय (२) सजावट व (३) पात्रें हीं नाटकाचीं तीन प्रमुख अंगें होत.

गेल्या दीडशें वर्षांत शिक्षणाची प्रगति कशी झाली या विषयाचा आपणांस विचार करावयाचा आहे. दीडशें वर्षांच्या कालखंडाचें एक नाटकच आपणांस पाहावयाचें आहे, अशी आपण कल्पना केल्यास, हिंदुस्थानांतील या काळांतील, सामाजिक, राजकीय व राज्यव्यवस्थेचा इतिहास व याच काळांत इंग्लंडमध्यें घडून आलेल्या सामाजिक, राजकीय व शिक्षणविषयक उलाढाली, ह्या आपल्या विषयाचें कोंदण होणार आहेत. इंग्लंडमध्यें जशा प्रकारच्या संस्था होत्या, तशा संस्था हिंदुस्थानांत निर्माण करण्याचें ठरलें; इंग्लंडमध्यें शिक्षण-विषयक वाद जसे निर्माण झाले, तसेच वाद हिंदुस्थानांतही निर्माण झाले; इतकेंच नव्हे तर, इंग्लंड-

मध्यें शिक्षण-योजनेंत कांहीं फरक घडून आले तर त्याची प्रतिक्रिया म्हणून तसेच फरक हिंदुस्थानांतही घडून आले. म्हणून इंग्लंडची परिस्थिति लक्षांत न घेतां हिंदुस्थानांतील शिक्षणाच्या इतिहासाचा अभ्यास करणें, म्हणजे कारण न पाहतां कार्याचा विचार करण्यासारखें होणार अहे आणि म्हणून दोन्ही देशांतील घडामोडींचा विचार करून, परिस्थितीचें यथार्थ ज्ञान करून देण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे.

नाटकांत प्रतिपाद्य विषयाचा दोन्ही बाजूंनीं विचार केलेला असतो. या दोन्ही बाजू रंगविल्यामुळें प्रेक्षकाचेही विचार जागृत होतात, व तो योग्य तत्त्व ग्रहण करण्यास समर्थ होतो. या दोन्ही बाजू व त्यांतील विरोध या नाटकांत दाखविण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. येथें आपणांस नव्या-जुन्याचा झगडा दिसेल. ब्रिटिश शिक्षणपद्धतीचा एक कुठला तरी छोटासा नमुना घेऊन तो हिंदुस्थानावर लादण्याचा परकीयांचा एकीकडे प्रयत्न, तर दुसरीकडे आपल्या अडीअडचणींचा विचार करून नवीनच शिक्षणपद्धति निर्माण करण्याची स्वकीयांची तळमळ, आपणांस येथें पाहावयास सांपडेल. एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस देशी शिक्षण-पद्धति सर्वत्र सुरू होती. लवकरच मिशनरी लोकांनीं पाश्चिमात्य ज्ञान पसरविण्यास व इंग्रजी भाषा व वाङ्मय यांना प्रोत्साहन देण्यास सुरवात केली. या त्यांचे प्रयत्नास सरकारी अधिकारी व नवीन पद्धतीनें शिकलेले व तिचे फायदे ओळखणारे हिंदी लोक यांनीं मदत केली. या तिन्ही प्रकारच्या लोकांच्या संघटित प्रयत्नानें नवीन शिक्षण-पद्धति अमलांत आली, व अनेक कारणांमुळें ती फोफावली. पहिलें कारण--त्या वेळच्या ब्रिटिश लोकांची अशी प्रामाणिक समजूत होती कीं त्यांची भाषा, त्यांचें वाङ्मय व त्यांची शिक्षण-पद्धति हीं सर्व जगांत श्रेष्ठ आहेत. दुसरें कारण--पाश्चिमात्यांच्या संसर्गामुळें हिंदी लोक इतके दिपून गेले होते कीं, पाश्चिमात्यांचें अनुकरण केल्याशिवाय देशाचा तरणोपाय नाहीं, अशी त्यांची ठाम समजूत झाली होती. तिसरें

कारण—या पद्धतीनें शिकलेली मंडळी सरकारी नोकऱ्यांवर लागलेली होती, म्हणून या पद्धतीस महत्त्व प्राप्त होऊन तिचा बोलबाला झाला होता. या सर्व कारणांमुळें एकोणिसाव्या शतकाचे शेवटीं देशी शिक्षण-पद्धतीचें उच्चाटन होऊन तिचे ठिकाणीं, इंग्रजी भाषेचें माध्यम स्वीकारून पाश्चिमात्य ज्ञानाचा फैलाव करणारी शिक्षणपद्धति प्रस्थापित झाली.

परंतु लवकरच प्रतिक्रियेस प्रारंभ झाला. रूसो–जपान लढाईनंतर जपानसारखा देश लोकांचे नजरेपुढें चमकून दिसूं लागला व असमाधानकारक रीतीनें चाललेल्या हिंदी शिक्षणाकडे संशयित दृष्टीनें पाहाण्यास सुरवात झाली. लोकांमध्यें नवीन दृष्टि उदयास आली व विसाव्या शतकांतील लोक आपल्या इतिहासाचा अभ्यास मोठ्या श्रद्धेनें करूं लागले. १९१४–१८ मधील पहिल्या महायुद्धानें पाश्चिमात्य संस्कृतीमध्यें मूलतः कांहींतरी दोष आहेत, ही जाणीव लोकांत निर्माण केली, व पाश्चिमात्यांचे पूर्णतः अनुकरणानें आपलें हित साधेल का, अशी शंका त्यांचे ठिकाणीं उत्पन्न झाली. याचा परिणाम असा झाला कीं, हिंदी लोकांनीं पाश्चिमात्यांचें सर्व बाबतींत अनुकरण करण्याचें सोडून दिलें व आपल्या परिस्थितीस अधिक उपयोगी पडणारी अशी शिक्षणपद्धति हुडकून काढण्याचा ते विचार करूं लागले. विश्वभारती किंवा जामिया–मिलिया सारख्या स्वतंत्र शिक्षणसंस्था कांहीं ठिकाणीं निघाल्या तर कांहीं ठिकाणीं जुन्या पद्धतीचा आधार घेऊन, बनारस व अलिगड विद्यापीठांसारख्या संस्था अस्तित्वांत येऊं लागल्या. या दोन्ही प्रकारच्या संस्थांमधून एकच गोष्ट आपल्या प्रत्ययाला येते आणि ती हीच कीं, अनुकरण टाकून स्वतंत्रपणें कांहीं करण्याची इच्छा लोकांमध्यें निर्माण झाली होती. हा जुन्या–नव्यांतील झगडा या पुस्तकांत दाखविण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे.

या नाटकांतील पात्रांचे तीन भाग पाडतां येतील. मिशनरी लोक, शिक्षण खात्याचे युरोपिअन अधिकारी व हिंदी लोक. आधुनिक शिक्षणपद्धतीचा पुरस्कार मिशनरी लोकांनीं केला. आजही लोकहिताच्या अनेक

चळवळींमध्यें, जेथें पुरेसे हिंदी लोक कार्य करण्यास मिळाले नाहींत तेथें, मिशनरी लोक आपण पाहातों. इ. स. १८५५ मध्यें इंग्लिश अधिकारी प्रथमतः शिक्षणक्षेत्रांत चमकूं लागले व परवां परवांपर्यंत त्यांचें या क्षेत्रांत प्रभुत्व होतें. हिंदी लोकांचा या क्षेत्रांत फार उशिरां प्रवेश झाला. एकोणिसाव्या शतकाचे सुरवातीस आधुनिक पद्धतीच्या शिक्षणसंस्था स्थापण्यासाठीं त्यांनीं पैसा गोळा करण्यास सुरवात केली व नंतर संस्था स्थापून त्या ते चालवूं लागले. एकोणिसाव्या शतकांत शिक्षण खात्याचें हिंदीकरण व्हावें म्हणून त्यांनीं प्रयत्न केला. पुढें पुढें तर, राजकीय दृष्टि प्राप्त झाल्यापुळें, शिक्षणविषयक योजनांवर आमचें नियंत्रण असावें, अशी मागणी करण्यांत आली. १९२१ मध्यें अंशतः व १९३७ मध्यें पूर्णतः ही मागणी ब्रिटिश सरकारकडून मान्य करण्यांत आली. आज शिक्षणखात्याचें पूर्णांशानें हिंदीकरण झालें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. परदेशीय मिशनरी लोक आपल्या संस्थांचा कारभार हिंदी मिशनऱ्यांचे ताब्यांत देत आहेत. शिक्षणखात्यांत ब्रिटिश लोकांना नोकऱ्या देण्याची प्रथा बंद झाली असून, आज या खात्यांत बहुतेक अधिकारी हिंदीच आहेत. पुष्कळ शिक्षणसंस्था लोकांनीं स्वप्रयत्नांनीं चालविल्या आहेत; व शिक्षणाची दिशा कोणती असावी हें ठरविण्याचे अधिकार देशी मंत्र्यांकडे आले आहेत. हिंदी शिक्षणामध्यें ही जी क्रांति आपण पाहातों आहोंत, तिचा इतिहास या पुस्तकामध्यें आपणांस पाहावयास सांपडेल.

या नाटकाचे सहा अंक किंवा भाग कल्पिले आहेत. पहिला अंक अठराव्या शतकाचे सुरवातीपासून १८१३ पर्यंत आहे. १८१३ मध्यें सरकारी शिक्षणविषयक सनदेचा कायदा प्रसिद्ध झाला. ईस्ट इंडिया कंपनी जरी १६०० मध्यें स्थापन झाली तरी एक शतकपर्यंत तिनें कोणत्याहि शिक्षण-विषयक चळवळी केल्या नाहींत. ब्रिटिश सरकारच्या १६९८ चे सनदी कायद्यानें तिचें लक्ष शिक्षणविषयक जबाबदारीकडे

अथम वेधण्यांत आलें. या खलित्यानें कंपनीला आपल्या नोकरांसाठीं पाद्री नेमण्यास व शाळा काढण्यास भाग पाडिलें. ही योजना कंपनींतील युरोपिअन लोकांच्या मुलांसाठीं प्रामुख्यानें होती. हिंदी लोकांच्या मुलांना शिक्षण देण्यास कंपनी तयार नव्हती, ही गोष्ट कांहीं विशेष आश्चर्य करण्यासारखी नाहीं. ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापार करण्याकरतां आलेली कंपनी होती व ज्या लोकांबरोबर व्यापार करावयाचा त्यांना शिकविण्याची जबाबदारी नियमानें तिच्यावर पडत नव्हती.

अठराव्या शतकाच्या मध्यकाळीं मात्र परिस्थिति बदलली. पोर्तुगीज, डच् व फ्रेंच या लोकांवर विजय मिळवून ही इंग्रज कंपनी यशस्वी झाली होती; व १७६५ मध्यें इंगलंड सरकारकडून दिवाणी हक्क मिळाल्यामुळें इंग्लिश कंपनीचा कारभार सुरू झाला होता. ज्याप्रमाणें पूर्वी मुसलमान व हिंदी राजांनीं केलें, त्याप्रमाणें प्रजेला शिक्षण देण्याची जबाबदारी कंपनीवर लादण्यांत आली. या कामीं कंपनीची व्यवस्था पाहणाऱ्या डायरेक्टरांनीं पूर्वीच्या हिंदू किंवा मुसलमान परंपरेस धरून असलेली एकादी शिक्षणपद्धति न स्वीकारतां, ब्रिटिश पद्धतीचा अवलंब केला. ब्रिटिश पार्लमेंटनें ज्याप्रमाणें इंग्लिश लोकांना सुशिक्षित करण्याचा प्रयत्न केला नाहीं, त्याप्रमाणें कंपनी सरकारनेंही हिंदी लोकांना सुशिक्षित करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचें कबूल केलें नाहीं.

या नाटकामध्यें दोन प्रश्नांसंबंधीं तेढ निर्माण झाल्याचें दिसून येईल. (१) एकीकडे कंपनीचे व्यवस्थापक हिंदी लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारण्यास कबूल नव्हते, तर दुसरीकडे कंपनीचे हिंदुस्थानांतील अधिकारी, राजकीयदृष्ट्या ही जबाबदारी स्वीकारणें जरूर आहे म्हणून, कंपनीचे व्यवस्थापकांची मनधरणी करीत होते. (२) इंग्लंडमधील मिशनरी लोकांचे मनांत, आपण हिंदुस्थानाला जाऊन ख्रिस्ती धर्माचा फैलाव करावा अशी इच्छा उत्पन्न झाली; परंतु कंपनीचे व्यवस्थापक हिंदुस्थानांत त्यांना येऊं देण्यास तयार नव्हते, कारण

त्यांच्या धर्मप्रसारामुळें लोकांचा आपणास विरोध होईल, अशी साधार भीति त्यांना वाटत होती. बऱ्याच वाटाघाटीनंतर १८१३ च्या कायद्यानें कंपनीला, (१) हिंदी लोकांना शिक्षण देण्याची आपली जबाबदारी स्वीकारणें, (२) त्यासाठीं पैसा खर्च करणें, व (३) ख्रिस्ती लोकांना पाश्चिमात्य देशांतील ज्ञान व संस्कृति यांचा प्रसार करण्यास परवानगी देणें भाग पडलें. ब्रिटिश अंमलाखालीं हिंदुस्थानांत सरकारच्या शिक्षण-योजनेस अशा रीतीनें सुरवात झाली.

या नाटकाचा दुसरा अंक १८१३ ला सुरू होऊन १८५४ सालीं वुड साहेबांनीं प्रसिद्ध केलेल्या खलित्यानें समाप्त होतो. हा काल म्हणजे अनेक मतमतांतरांचा व प्रयोगांचा काल म्हणतां येईल.

येथें दोन विचारप्रणालींमध्यें विरोध दिसून येतो. एका प्रणालीचे अध्वर्यू मेकॉलेसाहेब होते. त्यांचें मत हिंदी संस्कृति नष्ट करून त्या ठिकाणीं पाश्चिमात्य संस्कृति निर्माण करावी, असें होतें. जे रक्तानें किंवा रंगानें हिंदी आहेत, परंतु विचारानें व मनानें इंग्लिश आहेत, अशा हिंदी लोकांचा एक वर्ग निर्माण करण्याची त्यांची इच्छा होती. या प्रणालीमध्यें ज्यांना ख्रिस्ती धर्माचा प्रसार करावयाचा होता अशा ख्रिस्ती लोकांचा व कंपनीच्या तरुण नोकरांचा विशेष भरणा होता. दुसऱ्या विचारप्रणालींतील लोकांचा हेतु पूर्व व पश्चिम संस्कृतींचा समन्वय करण्याचा होता. या पक्षामध्यें कंपनीचे जुने अधिकारी व शिक्षणा-विषयीं ज्यांना कळकळ वाटत होती असे हिंदी लोक होते. दुर्दैवानें या प्रणालीच्या लोकांमध्यें फूट होती. एका पक्षाला असें वाटे कीं पाश्चिमात्य ज्ञानाचा व संस्कृतीचा जर फैलाव करावयाचा असेल तर संस्कृत, अरेबिकसारख्या महित (classical) भाषांच्या द्वारें तो होणें अपायकर आहे. या पक्षाचे लोक बंगालमध्यें होते. दुसऱ्या पक्षाला असें वाटे कीं, हें ज्ञान व ही संस्कृति लोक ज्या भाषा आज बोलताहेत त्या भाषांतून पसरली जावी. या पक्षाचे लोक मुंबईमध्यें होते.

या काळांत निर्माण झालेल्या भांडणामुळें वरील महत्त्वाच्या प्रश्नांची गल्लत झाली व या विचाराच्या गोंधळामुळें इंग्रजी-विषय व इंग्रजी-माध्यम या दोन गोष्टी भिन्न आहेत, हेंही विसरलें गेलें. त्यामुळें खालील प्रश्नांवर बरेंच वादळ निर्माण झालें.

(१) पाश्चिमात्य ज्ञानाचा प्रसार करण्यासाठीं व पौर्वात्य ज्ञानाचें रक्षण करण्यासाठीं कोणती शिक्षण-योजना असावी व तिचें ध्येय काय असावें ?

(२) शिक्षणाचें माध्यम काय असावें-इंग्रजी, संस्कृत कीं अरेबिक; किंवा हिंदुस्थानांतील चालू देशी भाषा ?

(३) हें शिक्षण कोणत्या साधनांनीं द्यावें-ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळा, कंपनीच्या नियंत्रणाखालीं असलेल्या शाळा किंवा हिंदी लोकांनीं चालविलेल्या देशी शाळा ?

(४) हें ज्ञान पसरविण्याची पद्धत काय असावी ? — सरकारनें शिक्षणदानाचें काम प्रत्यक्ष आपल्या हातीं घ्यावें किंवा कांहीं निवडक लोकांना शिकवून नंतर त्यांच्याकरवी हा शिक्षण-प्रसार घडवून आणावा ?

१८५४ च्या खलित्यानें हें वादळ तात्पुरतें शांत झालें. या खलित्यानें असें जाहीर केलें कीं, (१) महाविद्यालयामध्यें दिल्या जाणाऱ्या पौर्वात्य उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देणें, हा जरी एक हेतु असला तरी शिक्षण योजनेचा मुख्य उद्देश पाश्चिमात्य ज्ञानाचा व शास्त्राचा प्रसार करणें हा होय. (२) इंग्रजी व देशी भाषा हीं माध्यमिक शाळांमधून शिक्षणाचीं माध्यमें असावींत. (३) ज्या अर्थीं शिक्षणाकरतां लागणारा सर्व पैसा सरकार खर्च करूं शकणार नाहीं त्याअर्थीं बऱ्याचशा शिक्षण-संस्था मिशनरी व हिंदी लोकांनीं चालवाव्यात. (४) केवळ निवडक लोकांना शिक्षण न देतां बहुजन समाजास शिक्षण देणें हें सरकारचें कर्तव्य आहे.

या खलित्यानंतर आपल्या नाटकाचा दुसरा अंक समाप्त होतो.

१८५४ मध्यें तिसऱ्या अंकाला सुरवात होते, व तो १९०० सालीं समाप्त होतो. या कालांत शिक्षणाचा कल पाश्चिमात्य पद्धतीकडे झुकला असला तरी, तें शिक्षण देण्याचें कार्य हिंदी लोकांनीं बरेचसें आपल्या हातीं घेतलें.

या अंकांत दोन वाद आपल्यापुढें येतील. वुडसाहेबांचे खलित्यानें निर्माण केलेली नवीन योजना व शिक्षणाची देशी पद्धति, यांमध्यें एक वाद निर्माण झाला. प्रथमतः अशी कल्पना होती कीं हा वाद उत्पन्न होणार नाहीं व देशी शाळांना योग्य प्रोत्साहन मिळून त्यांचा समावेश सरकारच्या शिक्षण योजनेंत केला जाईल. परंतु अनेक कारणांमुळें ही आशा सफल झाली नाहीं. अधिकाऱ्यांनीं या संस्थांकडे दुर्लक्ष केलें. कांहीं ठिकाणीं त्या सुधारण्याचा प्रयत्न झाला, परंतु मनांतील हेतु चांगला असला तरी योग्य मार्ग चुकल्यानें संस्था सुधारण्याचे ऐवजीं त्या जास्त बिघडल्या. कित्येक ठिकाणीं खाजगी शाळांतून आपलीं मुलें काढून तीं सरकारी शाळेंत घालण्याबद्दल पालकांवर दडपण आणण्यांत आल. नवीन पद्धतीनें शिक्षण घेतलेल्या लोकांना सरकारी नोकऱ्या मिळूं लागल्यामुळें तर खाजगी शिक्षण पद्धति जवळजवळ नष्ट झाली, आणि १९०० सालांत बहुतेक सर्व शाळांतून पाश्चिमात्य शिक्षण इंग्रजीमधून देण्याची सरकारास सुरवात झाली.

या काळांतील दुसरा लहानसा वाद पाश्चिमात्य ज्ञान पसरविणाऱ्या संस्थांमध्यें निर्माण झाला. १८५४ मध्यें हें ज्ञानप्रसाराचें कार्य मिशनरी म्हणून किंवा कंपनीचे नोकर म्हणून आलेल्या युरोपिअन लोकांकडे होतें. पाश्चिमात्य पद्धतीनें शिकलेले हिंदी लोक पुरेसे नव्हते व शिक्षणाचें कार्य करण्यास ते लायकही समजले गेले नाहींत म्हणून हिंदी लोकांचें कार्य म्हणजे पैसा गोळा करावयाचा व परदेशांतून बोलावून आणलेल्या हेडमास्तरा-

कडून किंवा प्रिन्सिपालकडून शाळा व महाविद्यालयें चालवावयाचीं, एवढ्यापुरतेंच मर्यादित राहिलें.

१८८० मध्यें हीं परिस्थिति बदलली. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं खालीलप्रमाणें तीन वेगवेगळ्या संस्था निर्माण झाल्या व त्यांच्यामध्यें एक प्रकारची चढाओढ सुरू झाली:--मिशनरी लोकांच्या शाळा व कॉलेजें, शिक्षणखात्यानें चालविलेल्या शिक्षणसंस्था, आणि हिंदी लोकांनीं आपल्या पायावर उभे राहून काढलेल्या शाळा. हिंदुस्थानांत ज्ञानाचा प्रसार कोणत्या साधनानें चांगला होईल व वरील तीन साधनांपैकीं कोणतें साधन श्रेयस्कर आहे, याचा विचार करण्याकरतां एक समिति नेमली गेली. तिचे मतानें मिशनरी लोकांचे प्रयत्न हे दुय्यम प्रतिचे ठरले. सरकारी संस्था ह्या खर्चाच्या असल्यानें त्यांची वाढ करणें इष्ट नाहीं. त्या बंद तरी कराव्यात, किंवा त्या चालविण्यासाठीं लोकांच्या स्वाधीन तरी कराव्यात. शिक्षणप्रसार हा खाजगी हिंदी संस्थांमार्फत झपाट्यानें होऊं शकेल व सरकारनें अशा संस्थांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा, असे निर्णय घेण्यांत आले.

प्रांतिक सरकारनें वरील सूचनेप्रमाणें आपलें धोरण ठेविलें व त्याचा परिणाम असा झाला कीं १८८० ते १९०० पर्यंतच्या वीस वर्षांचे काळांत हिंदी लोकांनीं चालविलेल्या शाळा, कॉलेजांमध्यें पुष्कळच वाढ झाली. विसाव्या शतकाचे सुरवातीस, हिंदी शिक्षण संस्था अशा रीतीनें पाश्चिमात्य शिक्षणप्रसाराचें मुख्य साधन बनल्या.

१९०१ सालीं कर्झनसाहेबांनीं शिक्षणखात्यांचे डायरेक्टरांची एक परिषद सिमला येथें बोलाविली व येथें नाटकाच्या चवथ्या अंकास सुरवात झाली. १९२१ सालीं शिक्षणखातें शिक्षण-मंत्र्याचे ताब्यांत दिलें गेलें व चवथा अंक समाप्त झाला.

१९०१ ते १९२० हा राजकीय दृष्ट्या अत्यंत धामधुमीचा काळ होता. बंगालची फाळणी, मोर्ले-मिंटो सुधारणा, पहिलें जागतिक युद्ध,

असहकार चळवळ वगैरे गोष्टींमुळें लोकांमध्यें राजकीय जागृति व त्याचबरोबर असंतोष निर्माण झाला. या राजकीय उलाढालीबरोबर शिक्षणाविषयक बाबतींतही संघर्ष उत्पन्न झाला.

दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या काळांत हिंदी व युरोपिअन दोन्ही प्रकारच्या शिक्षणतज्ज्ञांमध्यें शिक्षण-पद्धतीबद्दल एक प्रकारचा असंतोष निर्माण झाला होता. कांहीं विचारी माणसांना—यांत सरकारी अधिकाऱ्यांचा विशेष समावेश होतो—असें वाटूं लागलें कीं १८८० पासून शिक्षणाचा कस फारच कमी झाला. खाजगी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या शाळा व कॉलेजें यांमध्यें शिस्त ठेवणें कठीण होऊं लागलें. बाहेरून लादलेली संस्कृति हिंदी सुशिक्षितांना पचवितां येत नाहीं. पाश्चिमात्य ज्ञान व शास्त्र यांचा प्रसार करण्याचें ध्येय आतां निरुपयोगी आहे. शिक्षणाचें ध्येय शीलवान माणसें निर्माण करणें हें असलें पाहिजे व त्या दृष्टीनें शिक्षणाची मांडणी पुनः करावयास पाहिजे. या लोकांची अशी कल्पना होती कीं, वाटेल त्याला शिक्षण-संस्था काढण्याची परवानगी **हिंदी शिक्षण समितीनें** (Indian Education Commission) दिली गेल्यामुळें, हे वरील दोष शिक्षणामध्यें उत्पन्न झाले व यापुढें सरकारनें शाळा-कॉलेजें यांची संख्या न वाढवितां, त्यांचेवर नियंत्रण ठेवावें.

या उलट, ज्यांत सुशिक्षित हिंदी लोकांचा विशेष भरणा होता अशा दुसऱ्या प्रकारच्या लोकांचा हिंदी शिक्षण समितीच्या धोरणावर पूर्ण विश्वास होता. शिक्षणाचा कस कमी झाला हें मान्य करण्यास त्यांची तयारी होती, परंतु नुसत्या कसाकडे पहात बसणें, त्यांना पसंत नव्हतें. राष्ट्रीय जीवनामध्यें इंग्रजी शिक्षणानें जागृति निर्माण होते म्हणून खाजगी शिक्षण संस्थांकरवीं, मोठ्या प्रमाणावर, या माध्यमिक शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे, व प्राथमिक शिक्षण बहुजन समाजाला सक्तीनें दिलें गेलें पाहिजे; अशी त्यांची शिफारस होती. खाजगी संस्थांना पूर्ण

स्वातंत्र्य देऊन त्यांना वाढूं देणें इष्ट असून, शिक्षणाचा कस सुधारण्या-साठीं नियंत्रण लागूं करण्यास त्यांचा जोराचा विरोध होता.

घर दाखविलेल्या दोन पक्षांतील विरोध म्हणजे या आपल्या नाटकाचा चवथा अंक होय. विद्यापीठ शिक्षणाचे बाबतींत हें भांडण सुरू झालें. १९०२ ची विद्यापीठ-समिति व १९०४ चा विद्यापीठ-कायदा यांवर खडाजंगी होऊन नियंत्रण असावें, असें म्हणणाऱ्या पक्षाचा विजय झाला. हें भांडण उच्च शिक्षणाकडून माध्यमिक शिक्षणाकडे आलें व येथेंही पुनः याच पक्षाचा विजय होऊन १९०४ ते १९०८ चे काळांत ग्रँट-इन-कोडामध्यें फरक करण्यांत आला. हा कलह येथेंच न थांबतां प्राथमिक शिक्षणापर्यंत गेला; व कै. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या प्राथमिक शिक्षणाच्या बिलावर रणें माजलीं. या पक्षाला येथेंही तिसरा विजय मिळाला व गोखल्यांचें बिल फेटाळलें गेलें. या विजयांमुळें एक चांगली गोष्ट साध्य झाली व ती म्हणजे, लोकांचीं मनें चालूं कटकटींमुळें विटून गेलीं व त्यांनीं शिक्षण-खातें लोकांच्या ताब्यांत देण्याबद्दल जोराची मागणी सुरू केली. त्याचा परिणाम असा झाला कीं १९२० सालीं हें खातें लोकांचे ताब्यांत देण्यांत आलें.

नाटकाचा पांचवा अंक १९२१ सालीं सुरू होऊन १९३७ सालीं समाप्त होतो. १९३७ मध्यें हिंदुस्थान सरकारच्या १९३५ च्या कायद्यानें अकरा प्रांतांना स्वायत्तता देण्यांत आली व अशा रीतीनें हिंदी लोकांचे कारभारास सुरवात झाली.

लोकांच्या हातीं कारभार आल्यानें लोकांमध्यें नवा उत्साह निर्माण झाला व ज्या सुधारणा करण्याची तळमळ आजवर लागून राहिली होती, त्या सुधारणा या काळाचे सुरवातीस दिसूं लागल्या. पूर्वीच्या राजकीय मारामाऱ्या थंडावल्या. शिक्षणखात्यामध्यें वरच्या जागीं युरोपिअन अधिकाऱ्यांच्या नेमणुका होण्याचें बंद पडलें, व प्रत्येक प्रांताला आपले अधिकारी नेमण्याची सत्ता देण्यांत आली. प्रांतिक सरकारनें ही नवीन

योजना हातीं घेतली. शिक्षणसंस्थांना जास्त मदत मिळूं लागली व विद्यार्थ्यांच्या संख्येंत वाढ झाली.

दुर्दैवानें अनेक अडचणी या काळांत निर्माण झाल्या. १९१९ च्या हिंदुस्थानच्या कायद्यानें मध्यवर्ती सरकारला पैशाचा मुबलक पुरवठा होऊं लागला होता व त्यामुळें १९०१ ते १९२१ च्या काळांत शिक्षणासाठीं मध्यवर्ती सरकार भरपूर मदत देऊं शकत होतें, ही मदत नवीन घटनेमुळें बंद पडली. जागतिक आर्थिक परिस्थिति खालावल्यामुळें पैशाची टंचाई बरीच भासूं लागली व त्यामुळें शिक्षणाच्या योजना पडून राहिल्या; इतकेंच नव्हे तर चालूं खर्चामध्यें काटकसर करणें भाग पडलें.

नवीन कायद्यानें लोकांमध्यें निर्माण झालेल्या उत्साहाला पायबंद बसला. देशाच्या ध्येयामध्येंही बदल झाल्यानें तर हा उत्साह अधिकच मावळला. कांहीं लोकांना वाटलें कीं शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करून बहुजनसमाजामध्यें साक्षरता वाढवावी, तर कांहींच्या मतें, केवळ प्रसार न करतां शिक्षणाचा कस वाढविणें श्रेयस्कर ठरलें. या विरोधाचे काळांतच हारटॉग कमिटीचा अहवाल बाहेर पडला, व १९३७ सालांत हे वाद विकोपास गेले.

प्रांतिक सरकारास स्वायत्तता मिळाली व आपल्या नाटकाचे सहावे अंकास सुरवात झाली. अकरा प्रांतांत स्वतंत्र कारभार सुरू झाला. लोकांनीं निवडून दिलेल्या मंत्र्यांचे हातांत अधिक सत्ता व पैसा आला. मंत्र्यांनींही शिक्षणाच्या नवीन योजना जोरानें पुढें आणिल्या. १९३७ ते १९४० चा काळ, हा शिक्षणाच्या इतिहासांत अधिक गर्दीचा काळ ठरला. सक्तीचे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, प्रौढांची साक्षरता, वर्धा योजना, शारीरिक शिक्षण व धंदे शिक्षण यांना चालना मिळाली. दुर्दैवानें दुसरें महायुद्ध सुरू झालें व त्यामुळें वरील सर्व योजना मंदावल्या. ज्या कॉंग्रेस सरकारनें अधिकार ग्रहण केला होता, त्यानें आपआपल्या जागांचे राजीनामे दिले. १९३५ च्या मध्यवर्ती

सरकारच्या कायद्याच्या ९३ कलमान्वयें, आहे त्या परिस्थितींत कोणताही बदल न करतां राज्यकारभार हाकण्याचें जरी ठरविण्यांत आलें होतें, तरी लढाईच्या परिस्थितीमुळें फारशी प्रगति होऊं शकली नाहीं. ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. विजयाचीं चिन्हें दिसूं लागलीं व युद्धोत्तर काळांतील योजना पुढें येऊं लागल्या. मध्यवर्ती सरकारच्या शिक्षण-विषयक सल्लागार मंडळानें तयार केलेली **सार्जंट योजना** ही त्यांपैकीं एक प्रमुख योजना होय. आज सर्व देशभर या योजनेचा लोक विचार करीत आहेत.

कलकत्त्यांत प्रथम शाळा १७८१ मध्यें स्थापन झाली. तेथपासून १९४४ मध्यें प्रसिद्ध झालेल्या सार्जंट-रिपोर्टापर्यंत, शिक्षण क्षेत्रांतील सर्व हालचालींचा इतिहास या सहा अंकी नाटकाचे रूपानें या पुस्तकांत देण्याचें आम्हीं ठरविलें आहे. या पुस्तकाचा हेतु हिंदूंचा आर्यसमाज किंवा मुसलमानांची अलिगड संस्था यासारख्या खाजगी संस्थांचा इतिहास देण्याचा नाहीं. त्याचप्रमाणें स्त्रियांमध्यें, मुसलमानांमध्यें, किंवा मागासलेल्या समाजामध्यें शिक्षण प्रसार क्रमशः कसा झाला, हेंही येथें देण्यांत येणार नाहीं. परंतु वेगवेगळ्या कालखंडांत शिक्षणाचा प्रसार कसा झाला, वेळोवेळीं कोणते निर्णय घेण्यांत आले व त्याचा परिणाम काय झाला व आजची शिक्षण-विषयक योजना कशी बनत गेली, या गोष्टींचा सांगोपांग विचार करण्यांत येईल.

हा विचार करतांना ज्या योजना अजून पडून राहिल्या आहेत, त्यांचा निर्देश केला जाईल. उदाहरणार्थ—अधिक विद्यापीठांची स्थापना, शिक्षणाचें माध्यम, महाविद्यालयांतून दिसून येणारी नालायक विद्यार्थ्यांची भरमसाट वाढ, परीक्षांचा अतिरेक, उद्योगधंद्याचें शिक्षण, उच्च शिक्षणाची योजना, विद्यापीठास भासणारी पैशाची नड, सुशिक्षितांची बेकारी, लष्करी शिक्षण, वगैरे प्रश्नांचा उहापोह उच्च शिक्षणाचा विचार करतांना आपणास करावा लागेल. तसेंच माध्यमिक शिक्षणाचा

विचार करतांना, धंदेशिक्षण, मुलींच्यासाठीं व खेड्यांतील शाळांसाठीं स्वतंत्र अभ्यासक्रम, मॅट्रिक परीक्षेचा डोईजडपणा, माध्यमिक शिक्षण संस्थांवर सरकारचा व विद्यापीठाचा ताबा, सरकारी मदत (ग्रँट-इन्-एड), शिक्षकांचें ट्रेनिंग, मदत घेणाऱ्या शाळांची व त्यांतील शिक्षकांची आर्थिक स्थिति, वगैरे प्रश्न हाताळावे लागतील. तसेंच प्राथमिक शिक्षणाचा विचार करतांना खालील गोष्टींची चर्चा करावी लागेल :— खेड्यांची शैक्षणिक दृष्ट्या पाहणी; लहानांत लहान किती वस्तीच्या खेड्यांत व कशा शाळा स्थापन करतां येतील; प्राथमिक शिक्षकांचें शिक्षण, ट्रेनिंग व पगार; प्रौढांची निरक्षरता; वाचनालयें व पुस्तकालयें; शिक्षणांत होणारा अपव्यय व कुचंबणा; सक्तीचें प्राथमिक शिक्षण व त्यास लागणारा पैसा; खेड्यांना सोयीस्कर अशा शाळांच्या वेळा, सुट्या व योग्य अभ्यासक्रम; बालाकरतां व शिशूकरतां शाळा वगैरे वगैरे. त्याचप्रमाणें स्त्रियांचें शिक्षण, मुसलमानांचें शिक्षण, मागासलेल्यांचें शिक्षण, पंगु व गुन्हेगार मुलांचें शिक्षण, शारीरिक शिक्षण, वैद्यकीय तपासणी, याही प्रश्नांचा खल होणें जरूर आहे. या प्रश्नांशिवाय आणखी कितीतरी प्रश्न विचारांत घेण्यासारखे आहेत, हें पाहिलें म्हणजे भारतीय शिक्षणाचा प्रश्न किती व्यापक, गुंतागुंतीचा व अडचणींचा आहे, हें सहज ध्यानांत येईल.

हे सर्व प्रश्न समाधानकारक सोडविणें म्हणजे अत्यंत कठीण गोष्ट आहे. परंतु काम कठीण आहे म्हणून हातपाय गाळण्यांत अर्थ नाहीं. रशियानें नुकतेंच जें इष्ट साध्य केलें त्याकडे जर नजर दिली तर, आपल्यापेक्षांही कठीण प्रश्न त्यानें सोडविल्याचें आपल्या प्रत्ययास येईल. आपलीं ध्येयें काय आहेत, हें ओळखून जर आपण एकजुटीनें कार्यास लागलों तर तीं साध्य झाल्याशिवाय रहाणार नाहींत. मात्र खालीं दर्शविलेल्या चार गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे.

पहिली गोष्ट–शैक्षणिक प्रश्न एकांत एक गुंतलेले आहेत. त्यांचा अलग असा विचार करतां येणार नाहीं; आणि म्हणून ज्या योगानें आपल्या राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सुटेल व आपण इतर राष्ट्रांबरोबर मानानें बसूं शकूं अशी शिक्षणाची व्यापक योजना हिंदी शिक्षण–तज्ज्ञांनीं आंखली पाहिजे. दुसरी गोष्ट–आजवर जेवढा पैसा लागला नाहीं तेवढा पैसा सरकारला शिक्षणावर खर्च करावा लागेल. राष्ट्राच्या उभारणीसाठीं शिक्षण हें अत्यंत आवश्यक आहे व म्हणून प्रत्येक सरकारनें त्यासाठीं लागणाऱ्या पैशाची सोय केली पाहिजे. बऱ्याच ठिकाणीं काटाकाट करून जादा लागणाऱ्या पैशाची उभारणी करावी लागेल; व लोकांनींही हा पैसा आपल्या उन्नतीसाठीं खर्च होणार आहे, हें ओळखून शिक्षणाप्रीत्यर्थ लादण्यांत येणाऱ्या कराचा बोजा उचलला पाहिजे. तिसरी गोष्ट–– देशांतील धनिक, सुखवस्तु, व्यापारी किंवा धंदेवाले यांना आपल्या दातृत्वाचा ओघ शिक्षणाकडे, पूर्वीपेक्षां मोठ्या प्रमाणावर, वळविण्यास विनंती केली पाहिजे. अशा प्रकारच्या जादा मदतीची आपणास अत्यंत आवश्यकता आहे, कारण कोणत्याही प्रगतिपर देशाला केवळ आपल्या उत्पन्नावर अवलंबून राहून शिक्षणाचा खर्च भागवितां आलेला नाहीं. मग हिंदुस्थानासारख्या मोठ्या लोकसंख्येच्या व गरीब देशाची स्थिति तर सोडूनच द्या. चवथी व शेवटची गोष्ट–शिक्षणाची पुनर्रचना करण्यासाठीं शिक्षणाची योजना तयार करणें व त्या योजना सत्य कोटींत उतरविणारे

टीप:—हिंदुस्थानचे राजकीय दृष्ट्या दोन भाग पडतात, एक ब्रिटिश हिंदुस्थान व दुसरा हिंदी हिंदुस्थान. पहिल्या भागांत अकरा मोठे प्रांत व कांहीं लहान विभाग मोडतात. दुसऱ्या भागांत ७०० लहान-मोठ्या संस्थानांचा समावेश होतो. या संस्थानांमध्यें हैद्राबाद, ग्वाल्हेर, बडोदा. म्हैसूर, काश्मीर, त्रावणकोर, कोचीन आणि इंदूर हीं प्रमुख संस्थानें आहेत. विश्वविद्यालयीन शिक्षणाचे बाबतींत सर्व हिंदुस्थानचा एकत्र विचार करण्यांत आला आहे. इतर शिक्षणाचे बाबतींत केवळ ब्रिटिश हिंदुस्थानचाच विचार केला आहे.

(पुढील पान पहा)

कर्तव्यदक्ष शिक्षणतज्ज्ञ, ज्यांना देशाची नाडी कळली आहे, असे आपणास पाहिजे आहेत. या बाबतींत परकीय तज्ज्ञांवर आपण फार काळ अवलंबून राहिलों आहोंत. वेळ अशी आली आहे कीं यापुढें हिंदुस्थाननें आपले शिक्षणविषयक प्रश्न सोडविण्यासाठीं आपल्या सुपुत्रांवर अवलंबून राहिलें पाहिजे. या कार्यासाठीं आजच्या शिक्षणसंस्थांनीं अंतःकरणपूर्वक शिक्षण कार्यास वाहून घेतलें पाहिजे.

(मागील पानावरून चालू)

कांहीं संस्थानांनीं शिक्षणविषयक प्रयोग चालविले असून कांहीं संस्थानें ब्रिटिश हिंदुस्थानपेक्षां जास्त प्रगतिपर आहेत. उदाहरणार्थ, हैद्राबादमध्यें उर्दू बोधभाषेंतून शिक्षण देणारें विद्यापीठ आहे. बडोदा संस्थानानें १९०६ सालीं प्राथमिक शिक्षण सक्तीचें केलें आहे; बहुजनसमाजाचे शिक्षणाचे दृष्टीनें त्रावणकोर व कोचीन हीं अधिक प्रगतिपर संस्थानें आहेत. हे अपवाद सोडल्यास इतर सर्व संस्थानांची प्रगति ब्रिटिश हिंदुस्थानचे प्रगतीचे अनुरोधानें चाललेली आहे.

संस्थानचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे बाबतींत आंकडेवार माहिती देणें आम्हांस शक्य झालें नाहीं, कारण ती उपलब्ध नाहीं. १९११–१२ पर्यंत ही माहिती मध्यवर्ती सरकारनें पंचवार्षिक रिपोर्टांतून प्रसिद्ध केलेली आहे. परंतु पुढें ती देण्याचें बंद करण्यांत आलें आहे. यामुळें सर्व हिंदुस्थानचे असे आंकडे मिळूं शकत नाहींत व म्हणून केवळ ब्रिटिश हिंदुस्थानची प्रगति कसकशी झाली हें दाखविणें शक्य होत आहे. परंतु यायोगें सर्व हिंदुस्थानची शैक्षणिक प्रगति समजून येण्यास अडचण पडत नाहीं.

शिक्षणाचा इतिहास १९४४ पर्यंतचाच असल्यानें, त्यानंतर पडलेल्या देशाच्या विभागांचा विचार या पुस्तकांत करण्यांत आला नाहीं, हें सांगणें नकोच.

मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर
दा. क्र.
ग्रंथ
प्रत)

प्रकरण पहिलें

एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं—हिंदुस्थानांत देशी पद्धतीनें दिलें जाणारें शिक्षण

या पुस्तकाचा हेतु आधुनिक शिक्षण पद्धतीची वाढ कशी होत गेली, हें दाखविण्याचा आहे. कांहीं अपवाद सोडल्यास ही शिक्षण पद्धति इ. स. १८१३ सालीं पास झालेल्या सनदी कायद्यानें सुरू केली गेली. "या कायद्यानें हिंदुस्थानांतील ब्रिटिशहद्दीमध्यें वाङ्मयाची सुधारणा; देशांतील विद्वान लोकांना उत्तेजन व शास्त्रीय ज्ञानाची वाढ, यांकरतां प्रत्येक वर्षीं एक लाख रुपये खर्च करण्याचें सरकारनें ठरविलें.


परंतु या विषयाकडे वळण्यापूर्वीं देशामध्यें एकोणिसावे शतकाचे प्रारंभीं शिक्षण कशाप्रकारें दिलें जात होतें याचा आपण विचार करूं. या योगें चालू शिक्षणामध्यें गुण कोणते होतें व दोष कोणते होते, हें आपणास कळून येईल, इतकेंच नव्हे तर, या शिक्षण पद्धतीमध्यें योग्य सुधारणा व वाढ केल्यानंतर शिक्षणाची राष्ट्रीय योजना तीमधून निर्माण होऊं शकेल किंवा नाहीं, हेंही आपणास आजमावतां येईल.

२. उपलब्ध माहिती:—मद्रास प्रांतांत १८२२ सालीं **सर थॉमस मनरो**, मुंबई प्रांतांत १८२३ सालीं **एल्फिन्स्टन साहेब**, त्याचप्रमाणें बंगाल—बिहार प्रांतांत १८३५—३६ सालीं मिशनरी **विल्यम् ॲडॅम्**, यांनीं जें संशोधन केलें, त्यावरून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं देशांत शिक्षणाची स्थिति कशाप्रकारची होती, हें कळून येणार आहे. हिंदुस्थानसारख्या वैचित्र्यपूर्ण व अवाढव्य देशाचे मानानें ही माहिती अगदींच तुटपुंजी ठरावी हें उघड आहे. मद्रास व मुंबई या प्रांतांतून मिळालेली माहिती अपूर्ण व

चुकीची असल्यानें ती असमाधानकारक होती, असें मानण्यास सबळ पुरावा आहे; व तो पुढें ओघानें येईलच.

त्यावेळीं जेवढ्या शाळा अस्तित्वांत होत्या व त्या शाळेंत जेवढीं मुलें होतीं, तेवढ्या शाळा व तेवढीं मुलें त्या प्रांतांचे माहितीमध्यें दाखविण्यांत आलीं नाहींत. त्या मानानें **ॲडॅमसाहेबांची** माहिती पूर्ण व निर्दोष होती. परंतु ही माहिती ज्या प्रांतांत बरींच वर्षें अराजकता माजली होती त्या प्रांतांची होती. तेथें देशी पद्धतीनें दिलें गेलेलें शिक्षण अगदीं खालावलेलें होतें. **ॲडॅमसाहेबांनीं** या प्रांताविषयीं व्यक्त केलेलें मत किंवा निर्णय, सुदैवानें ज्या प्रांतांची स्थिति समाधानकारक होती त्यांसही लागूं करणें चुकीचें होणार आहे. म्हणून एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं देशी शिक्षण पद्धति कशा स्वरूपाची होती, याचा विचार करतांना, वरील प्रकारचीं चुकीचीं अनुमानें निघणार नाहींत, याकडे आपण लक्ष दिलें पाहिजे.

३. शाळांचे प्रकार:—त्या वेळच्या देशी पद्धतीच्या शाळांचे पुढील-प्रमाणें चार मुख्य प्रकार कल्पितां येतील.



या शाळांविषयीं आतां आपण जास्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न करूं.

४. उच्च शिक्षणाच्या शाळा:—जरी हिंदु व मुसलमान मुलांसाठीं वेगवेगळ्या शाळा होत्या, तरी दोन्ही प्रकारच्या शाळांमध्यें साधर्म्य पुष्कळ होतें. उदाहरणार्थ दोन्ही शाळांना राजाकडून, वरिष्ठांकडून किंवा धनिक व धार्मिक नागरिकांकडून मदत मिळत असे. लेखक म्हणून जे नांवाजलेले होते, परंतु ज्यांना फारच थोडें वेतन मिळे, असे पंडित या शाळांवर शिक्षकाचें काम करीत असत. दोन्ही शाळांतून शिक्षण मोफत दिलें जात असे. आज जशी फी द्यावी लागते तशी फी द्यावी लागत नसे. दोन्ही मध्ययुगीन काळांतील जुन्या पद्धतीच्या शाळा होत्या व संस्कृत, पर्शियन किंवा अरेबिक या महित भाषांतून जुन्या पद्धतीनें शिक्षण दिलें जात असे. दोन्ही शाळांतील शिक्षकांना मुशाहिरा म्हणून राजाकडून जामिनी, श्रीमंत नागरिकांकडून किंवा विद्यार्थ्यांकडून पैसे, धान्य, कपडे किंवा इतर पदार्थ मिळत असत.

सर्वसाधारणत: शाळांना स्वतंत्र इमारती नसत. कांहीं ठिकाणीं लोकांच्या मदतीनें शिक्षकांनीं शाळा बांधलेल्या असत. पुष्कळ ठिकाणीं देवळांतून किंवा मशिदींतून शाळा भरविण्यांत येत असत. कित्येक वेळां एकाद्या श्रीमंत गृहस्थाचे किंवा शिक्षकाचे घरांतही शाळा भरविल्या जात.

विद्यार्थी लहानपणींच शाळेंत येत असत व आवडेल तितकीं वर्षें—कधीं कधीं बारा वर्षेंपर्यंत—ते शाळेंत शिकत असत.

रोज चाललेल्या शिक्षणाशीं सरकारचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नसे. विद्वान लोकांकडून आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर, पैसा मिळविण्याकरितां नव्हे तर, एक धार्मिक कार्य म्हणून, त्या चालविल्या जात असत.

हिंदूंच्या शाळा ब्राह्मण वर्गाचे शिक्षकांकडून चालविल्या जात असत, व त्यांमध्यें येणारे विद्यार्थीही बहुतेक ब्राह्मण असत. विद्यार्थी वर्गांत स्त्रिया किंवा ज्या जातींना धर्म—शिक्षण वर्ज्य असे अशा जातींतील विद्यार्थी नसत. पर्शियन व अरेबिक शाळांवर जरी बहुधा मुसलमान

शिक्षक असत, तरी कधीं कधीं पर्शियन शिकविणारे हिंदूही तेथें दिसत. पर्शियन ही राजभाषा असल्यानें पर्शियन शाळेंतून कित्येक हिंदू विद्यार्थी असत. बंगालमध्यें तर **ॲडॅमसाहेबांचे** मतें पर्शियन शाळांमध्यें हिंदूंचीच जास्त संख्या असे.

५. देशी प्राथमिक शाळा:—जेवढें उच्च शिक्षण असे—व हें बहुतेक धार्मिक शिक्षणच असे—तें सर्व कांहीं ज्ञानमंदिरांतून दिलें जात असे. हीं ज्ञानमंदिरें म्हणजे त्यावेळचीं महाविद्यालयें होत. शिक्षणाचा हेतु मौलवी किंवा शास्त्री पंडित निर्माण करण्याचा होता. शिक्षकांचा पगार जरी अत्यंत अल्प होता, तरी त्यांना समाजांत मोठा दर्जा असे; इतकेंच नव्हे तर, त्यांच्या विद्यार्थ्यांनाही एक प्रकारचा मान मिळे.

परंतु प्राथामिक शाळांची स्थिति वेगळी होती. बहुजन समाजामध्यें शिक्षणाचा प्रसार या शाळांकडून होत असे. येथें व्यवहारोपयोगी शिक्षण—ज्यांत लिहिणें, वाचणें व हिशेब ठेवणें याचा अंतर्भाव होतो—दिलें जात असे. शास्त्री पंडितांची सोय येथें नसे. लहानसा जमिनदार, व्यापारी किंवा सुखवस्तू शेतकरी यांचे मुलांसाठीं या शाळा असत. धार्मिक शिक्षणाचा गंध येथें नसल्यानें राजाकडून किंवा नागरिकांकडून या शाळांना देणग्या मिळत असत. ज्यांचें बेताचें शिक्षण झालें आहे, असेच शिक्षक येथें शिक्षकाचें काम करीत. उच्च शिक्षणाच्या शाळेंतील शिक्षकाचे मानानें या शाळांतील शिक्षकांना प्राप्ति फारच कमी असे. श्रीमंताचें आश्रयाला असलेला एकादा शिक्षक सोडल्यास बहुतेकांना मुलांच्या पालकांकडून मिळालेल्या लहानशा साहाय्यावर किंवा ठराविक प्रसंगीं मिळालेल्या देणग्यांवर आपलें भागवावें लागे. कधीं कधीं या शाळेंतील शिक्षकांना आपल्या प्रपंचासाठीं एकादा धंदाही करावा लागे; शाळा हा एक दुय्यम उद्योग म्हणून ते समजत. या शाळांमधून मुली व कनिष्ठ जातीचीं मुलें असत; परंतु बहुसंख्य मुलें वरच्या वर्गांचींच असत.

या शाळांतील कांहीं गोष्टी मनोरंजक आहेत. (१) ज्यांचें शिक्षण-साहित्य फारच अल्प असे. त्यांना इमारती नव्हत्या. शिक्षकांच्या घरीं किंवा श्रीमंत पालकांच्या घरीं, देवळांत किंवा कधीं कधीं झाडाखालींही शाळा भरत. मुलांना पाठ्य पुस्तकें नव्हतीं. इतकेंच नव्हे तर पाटी पेन्सील मुलांना आपल्या घरीं करतां येईल अशा स्वरूपाची ती असत. (२) अभ्यासाचे दिवस व शाळांच्या वेळा लोकांच्या सोयी पाहून ठरविलेल्या असत. (३) शाळांतील मुलांची संख्या १० ते १५ अशी अल्प असे. त्यामुळें शाळेचे निरनिराळे वर्ग नसत व ठराविक वेळींच मुलांना दाखल करून घेण्याचीही पद्धत नसे. विद्यार्थी शाळेंत केव्हांहि दाखल होत असे. त्याच्या स्वतःचा जणूं स्वतंत्र वर्गच बनत असे व तो आपल्या कुवतीप्रमाणें शिक्षणक्रम पार पाडीत असे. त्याची इच्छा असेल तितकें, किंवा शाळेंत जितकें शिकण्याची सोय असेल तेवढें, शिकल्यानंतर तो बाहेर पडत असे. मोठ्या शाळांमधून अशी पद्धत असे कीं मोठ्या मुलांनीं लहान मुलांना शिकवावयाचें. मद्रास इलाख्याचे पाद्री डॉ. बेल यांना ही पद्धत फार आवडली. गरिबांना शिक्षण देण्याचा हा स्वस्त व सोपा उपाय म्हणून, या पद्धतीचा त्यांनीं इंग्लंडमध्यें अवलंब केला. (४) लिहिणें, वाचणें व तोंडी आणि लेखी हिशेब करणें, एवढाच अभ्यासक्रम असे. (५) शाळांतून जबर शिक्षा दिली जात असे. (६) सध्यांप्रमाणें नियमित फी नसे, पण पालक पैशाच्या किंवा धान्याच्या रूपानें शिक्षकांना कांहीं मदत करीत. किती मदत द्यावयाची व ती केव्हां व कशी द्यावयाची, हें दात्याच्या शक्तीवर व सोयीवर अवलंबून रहात असे.

बेलरीचे कलेक्टरांचे दप्तरांतील खालील उताऱ्यावरून प्राथमिक शाळांच्या कार्यपद्धतीची साधारण कल्पना येण्यासारखी आहे.

" हिंदु मुलाचें शिक्षण पांचव्या वर्षापासून सुरूं होतें. मुलाला पांचवें वर्ष लागलें, म्हणजे ज्या शाळेंत त्याला घालावयाचें आहे, त्या शाळेंतील शिक्षकाला व विद्यार्थ्यांना त्या मुलाच्या घरीं बोलावण्यांत येतें. सर्व मुलें वर्तुळाकार बसतात. मध्यें

गणेशाची मूर्ति ठेवतात. तीपुढें नवीन विद्यार्थ्यास बसवितात. शिक्षक विद्यार्थ्या-जवळ बसतो. गणेशाला धूपदीप नैवद्य दाखविल्यावर बुद्धि देण्याबद्दल गणेशाची प्रार्थना केली जाते. नंतर पसरलेल्या तांदुळावर शिक्षक मुलाचें बोट धरून गणेशाचें नांव काढतो. मुलाचें पालक आपल्या शक्तीप्रमाणें शिक्षकाला दक्षणा देतो व दुसऱ्या दिवसापासून मुलाचें शिक्षणाला सुरवात होई.

" कांही मुलें पांचच वर्षें शाळा शिकतात. गरिबीमुळें पालकांना जास्त दिवस मुलांना शाळेंत ठेवतां येत नाहीं व त्यामुळें मुलांना तुटपुंजें शिक्षण मिळतें. ज्या पालकांची सांपत्तिक स्थिति बरी आहे, ते आपलीं मुलें चवदा पंधरा वर्षांचीं होई-पर्यंत शाळेंत ठेवतात.

" शाळेंतील रोजचा अभ्यास एकाच घडणीचा आहे. सहसा त्यांत फरक व्हावयाचा नाहीं. सकाळीं सहा वाजतां अभ्यासास सुरवात होते. शाळेला पहिल्या येणाऱ्या मुलाचे हातावर विद्यादेवी सरस्वतीचें नांव लिहितात. दुसऱ्याचें हातावर शून्य काढतात —यानें निंदा किंवा स्तुति कोणतीच दर्शविली जात नाहीं. तिसऱ्या मुलाला हातावर एक छडी मिळते; चवथ्याला दोन, पांचव्याला तीन, या प्रमाणें चढत्या क्रमानें नंतर येणाऱ्या विद्यार्थ्यांना छड्या मिळत. देशी शाळांतून कडक शिक्षा करण्याची पद्धत आहे. कित्येकांना छडीनें झोडपण्यांत येतें, तर कित्येकांना घोडीवर टांगलें जातें. कांहीं मुलांना उठाबशा काढण्याची—शरीर-पोषक—शिक्षा देण्यांत येते.

"जेव्हां सर्व मुलें एकत्र येतात, त्यावेळीं त्यांच्या अभ्यासाप्रमाणें त्यांचे चार वर्ग पाडले जातात. वरच्या वर्गांतील मुलांवर शिक्षक लक्ष देतात. या मुलांपैकीं कांहीं मुलांना खालच्या वर्गाचे वर्ग-प्रमुख निवडण्यांत येतें. अशारीतीनें खालच्या वर्गांतील मुलांवर या थोर मुलांचें व शिक्षकांचें लक्ष असतें. मुलगा शाळेंत येऊं लागला म्हणजे तो प्रथम मुळाक्षरें लिहावयास शिकतो. जमिनीवर पसरलेल्या बारीक वाळूवर बोटानें तो अक्षरें काढतो, नंतर तीं अक्षरें तो वाचावयास शिकतो. मुलगा बोटानें लिहूं लागला म्हणजे ताडपत्रावर लोखंडी खिऱ्यानें, किंवा कागदावर किंवा ताडपत्रावर बोरूनें, किंवा धूळपाटीवर एक प्रकारचे पेन्सीलीनें त्याला अक्षरें काढण्याची संधि मिळते. धूळपाटी खालील प्रमाणें तयार करतात. एक फूट रुंद व तीन फूट लांब लाकडाची फळी घेऊन ती रंधावयाची. त्यावर कोळशाची बारीक

पूड टाकून ती तांदळाचे खळींनें त्या लाकडावर घट्ट बसवावयाची, म्हणजे पाटी तयार होते. दुसऱ्या तऱ्हेनेंही पाटी तयार होते. एक कापडाचा तुकडा घेऊन तांदळाच्या खळीमध्यें तो भिजवावयाचा, नंतर त्याची घडी करावयाची व त्यावर खळींनें कोळशाची पूड घट्ट बसवावयाची. या दोन तऱ्हेनीं तयार केलेल्या पाटीवर पांढऱ्या चिकण मातीच्या कांडीनें किंवा पेन्सीलीनें लिहावयाचें. लिहिलेलें पुसण्याकरतां ओल्या फडक्याचा उपयोग करावयाचा.

"मुलगा अक्षरें काढूं लागला म्हणजे तो शब्द लिहूं लागतो. नंतर माणसांचीं, जनावरांचीं नांवें तो लिहितो. यानंतर अंक लिहिण्यास सुरवात होते. एक ते शंभर अंक मोजणी, पाढे, बेरीज, वजाबाकी, गुणाकार इत्यादि शिकविलें जातें. अपूर्णांकाची कल्पना त्याला नंतर दिली जाते; वजनें, मापें, व महत्वमापन हें शिकविलें जातें. या सर्व अभ्यासाची उजळणी चांगली व्हावी यासाठीं मुलांना रांगेनें उभें करून दिवसांतून दोनदां परवचा घेतला जातो.

" देशी शिक्षणाच्या इतर गोष्टी म्हणजे, शिक्षकांनीं निरनिराळ्या ठिकाणाहून गोळा केलेलीं पत्रें वाचणें, व यारीतीनें लोकांच्या वेगवेगळ्या हस्ताक्षरांचा अभ्यास करणें; सर्व साधारण पत्रें, कबुलायती लिहिणें, गोष्टी वाचणें, उच्चार व वाणी सुधारण्याकरतां अनेक तऱ्हेच्या कविता पाठ करणें, वगैरे.

" देशी शाळांतून मुलांना थोड्या वेळांत लिहिण्यास शिकविण्याची आणि जास्त शिकलेल्या मुलांनीं कमी शिकलेल्या मुलांना मदत करण्याची व अशा रीतीनें आपले अभ्यास पक्के करण्याची जी पद्धत आहे, ती खरोखर वाखाणण्यासारखी आहे व तिचा अवलंब इंग्लंडमध्यें होणें जरूर आहे."

६. **देशी पद्धतीचें शिक्षण:**—बहुजन समाजांत शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठीं देशी शिक्षणाच्या शाळांबरोबर घरगुती शिक्षणाचेंही एक साधन उपलब्ध होतें. हें शिक्षण हिंदुस्थानांत सर्वत्र पाहावयास सांपडतें. १८२२ सालीं कानराचे कलेक्टरानें असें मत दिलें आहे कीं, कानरा जिल्ह्यांत घरगुती शिक्षण हें शिक्षण प्रसाराचें महत्त्वाचें साधन आहे. मद्रास शहरांत **मनरोसाहेबांचे** माहितीवरून, सर्वसाधारण शाळांतील एक मुलाबरोबर घरगुती शिक्षण घेणारीं पांच मुलें निघूं

शकतील. बंगाल व बिहारमध्यें मोठ्या प्रमाणावर अशा पद्धतीनें शिक्षण दिलें जाई असें **ॲडॅमसाहेबांचें** म्हणणें आहे. त्यांच्या दुसऱ्या रिपोर्टांतील खालील उताऱ्यावरून या गोष्टीची कल्पना येणार आहे.

" जे घरगुती पद्धतीनें आपल्या मुलास शिकवितात अशा लोकांमध्यें जमीनदार, तालुकदार, दुकानदार, धंदेवाले, जमीनदारांचे गुमास्ते, ज्यांना लिहिण्यावाचण्याचें महत्त्व पटलेलें आहे, असे खेड्यांतील प्रमुख, थोर कुळांतील लोक—ज्यांच्या पदरीं गरिबी आहे परंतु आपल्या मुलास उपजीविकेचें कांहींतरी साधन असावें अशी ज्यांची इच्छा आहे असे, आपल्या मुलांनीं पुढें संस्कृतचा अभ्यास करावा असा संकल्प करणारे पंडित, व ज्यांना थोडें बहुत संस्कृत येतें असे ब्राह्मण यांचा समावेश होतो.

" शाळेंतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षां हें घरगुती शिक्षण थोडके असे. कित्येकवेळीं मूळाक्षरें काढणें किंवा शब्द लिहिणें एवढीच त्याची व्याप्ति असे. ज्यांची स्थिति बेताची आहे, असे पंडित किंवा शास्त्री आपल्या मुलांना लिहिणें-वाचणें व बेरीज वजाबाकी शिकवीत. शेतीच्या कामांत किंवा व्यवहारांत या शिक्षणाचा उपयोग मुलांना करतां येत नसे. शेतकरी व व्यापारी आपल्या धंद्याला उपयोगी पडेल असे हिशेब व माप शिकवीत. धंदेवाल्या शिक्षकाकडून जें शिक्षण मिळूं शकतें तसें शिक्षण या घरगुती पद्धतीनें मिळत नाहीं, अशीच बहुतेक पालकांची समजूत झाली असल्यानें ते या शिक्षणास फारसें महत्त्व देत नसत.

"यावरून असें दिसतें कीं शाळांतून दिल्या जाणाऱ्या प्राथमिक शिक्षणाचेच घरांतून वंशपरंपरा लिहिण्याचें व हिशेब करण्याचें शिक्षण चालूं होतें. हें शिक्षण जरी पुष्कळ ठिकाणीं दिलें जात असे तरी त्याला शाळेंतील शिक्षणापेक्षां जास्त महत्त्व देत नसत. ज्याला कमी किंमत दिली जाते असेंच शिक्षण सर्वत्र पसरलेलें दिसतें. याला कारणें काय आहेत हें पूर्णांशानें शोधून काढणें कठीण आहे. शाळेंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणासाठीं फी देण्याइतकी लोकांची स्थिति समाधानकारक नव्हती, हें एक प्रमुख कारण होतें. ज्या सहा खेड्यांस मी भेटी दिल्या, तेथें मला असें दिसून आलें कीं, शिक्षकांना आपल्या चरितार्थाला लागणारें न मिळाल्यामुळें किंवा शिक्षक होण्यापेक्षां दुसरें कांहीं करणें त्यांना फायद्याचें वाटल्यानें, शाळा

उघडूनही त्या बंद कराव्या लागल्या. या परिस्थितीवरून वरील विधानास चळकटी येते. धरेल गांवच्या लोकांना आपल्या शाळेंतील शिक्षकांसाठीं लहानशी रक्कम गोळा करणेंही कठीण जातें, यावरूनही तीच गोष्ट सिद्ध होते. जें मी या जिल्ह्यांत पाहिलें त्यावरून मला असें म्हणतां येईल कीं या जिल्ह्यांत प्राथमिक शिक्षण खालावलें आहे. घरगुती कां होईना परंतु लोक शिक्षण घेतात यावरून एवढेंच अनुमान निघतें कीं, पदरीं दारिद्र्य असतांही जुन्या जमान्यांतून वर येण्याचा लोक प्रयत्न करीत आहेत."

७. स्त्री–शिक्षण :– मिळालेल्या माहितीवरून स्त्री–शिक्षण अगदींच नव्हतें असें जरी म्हणतां येत नाहीं तरी स्त्री–शिक्षणाची पुष्कळच आबाळ होत होती. पंजाबांत कांहीं मुली शाळेंत जात असल्याचें आढळून आलें. कांहीं स्त्री–शिक्षिकाही दिसतात. मुंबई व मद्रास प्रांतांतून मुली प्राथमिक शाळेंत जातात, परंतु शाळेंत जाणाऱ्या मुलांच्या मानानें त्यांचें प्रमाण फारच अल्प आहे. बंगालमध्यें स्त्री–शिक्षण फारच कमी आहे. **ॲडॅमसाहेब** म्हणतात:—

" स्त्रियांच्या लोकसंख्येमध्यें ५ ते १४ वर्षांच्या मुलींची संख्या १६,७९२ आहे. या वयाच्या मुलींना दिलें जाणारें शिक्षण कमी प्रतीचें आहे, असें म्हणण्याचे ऐवजीं—थोडे अपवाद सोडल्यास—त्यांना शिक्षणच मिळत नाहीं, असें म्हणणें जास्त शोभेल. मुलींचे ठिकाणीं भयंकर अज्ञान दिसून येतें. जें घरगुती शिक्षण कांहीं मुलांना मिळतें तेवढेंही मुलींना मिळत नाहीं. बऱ्याच हिंदु कुटुंबांतील स्त्रियांमध्यें असा एक गैरसमज आहे कीं मुलींना शिक्षण दिलें म्हणजे त्या विधवा होतात. मुलींचे बाबतींत विधवा होण्याइतकी वाईट गोष्ट दुसरी कोणतीच मानली जात नाहीं. हा समज दूर करण्याचा पुरुष मंडळी कधींच प्रयत्न करीत नाहींत. मुलीं शिकल्या म्हणजे बिघडतात, असा एक दुसरा गैरसमज दिसून येतो. या समजामुळें मुलींना शिक्षण दिलें जात नाहीं, इतकेंच नव्हे तर शिक्षणाकडे मुलींचा कल दिसून आला तर ही मोठी आपत्ति ओढवली, असें पालकांना वाटावयास लागतें. यामुळें ज्या मुलींचें शिकण्याचें वय आहे, अशा ५ ते १४ वर्षांच्या मुलींना साधें लिहितां वाचतांहि येत नाहीं. "

८ बहुजन समाजाचें शिक्षण:—या बाबतींत प्रथम मद्रास प्रांतामध्यें माहिती गोळा करण्यांत आली. **मनरोसाहेबांनीं** ही माहिती थोडक्यांत खालीलप्रमाणें दिली आहे:—

"(१) प्रांतांतील लोकसंख्या १२,८५,०४१ आहे व शाळांची संख्या—ज्यामध्यें उच्च प्रकारच्या शाळांचाही समावेश होतो—१२,४९८ आहे. म्हणजे एक हजार लोकवस्तीस एक शाळा पडते. मुली शाळांतून बहुतेक नाहींतच, हें लक्षांत घेतल्यास ५०० लोकवस्तीस एक शाळा पडते.

(२) महसूल समितीनं असें म्हटलें आहे कीं, १२५ लाखांमध्यें १८८०००, किंवा ६७ मध्यें १ या प्रमाणांत लोक शिक्षण घेतात. सर्व लोकसंख्येचा विचार करतां हें प्रमाण पडतें. पुरुषांचें शिक्षणाचें प्रमाण थोडें जास्त आहे. पुरुषांमध्यें $\frac{1}{7}$ ते $\frac{1}{5}$ लोक शिक्षण घेतात. कांहीं जातींमध्यें तें $\frac{1}{5}$ आहे तर कांहींमध्यें तें पुरें $\frac{1}{10}$ ही सांपडत नाहीं.

(३) आपल्या देशाचे मानानें शिक्षण जरी मागासलेलें दिसत असलें तरी युरोपांतील देशांमध्यें परवां परवांपर्यंत जी परिस्थिति होती, तीपेक्षां ही पुष्कळ चरी आहे. या पूर्वीच्या काळांत तर ही परिस्थिति अधिक समाधानकारक होती."

आपली माहिती सदोष असून, आहे त्यापेक्षां शिक्षणप्रसार कमी असल्याचें दाखविण्यांत आलें आहे, हें **मनरोसाहेबांनीं** कबूल केलें आहे. त्यांनीं जी माहिती दिली आहे, ती खरी आहे असें गृहीत धरून चाललें तरी, १८२२ मध्यें युरोपांतील त्या वेळच्या देशांमध्यें शिक्षणाचें जें प्रमाण होतें त्यापेक्षां मद्रासमध्यें जास्त होतें, असें दिसून येतें.

मुंबई:—१८२९ सालचे मुंबई प्रांताचे जे आंकडे उपलब्ध आहेत त्यावरून असें दिसतें कीं, ४६,८१,७२५ लोकवस्तीच्या या प्रांतामध्यें १,७०५ शाळा असून त्यांतील विद्यार्थ्यांची संख्या ३५१४३ होती. हे

आंकडे खरे मानल्यास मुंबई प्रांताची प्रगति मद्रासच्या तिसऱ्या हिस्स्यानें होती, असें मानावें लागेल.

वर दिलेले आंकडे कितपत बरोबर आहेत याबद्दल बरीच शंका येते. त्यावेळच्या अधिकाऱ्यांचें मत, हा एक महत्त्वाचा पुरावा आहे. मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे एक सभासद जी. एल्. प्रेन्डरगास्ट १८२१ सालीं लिहितात—

"लहान किंवा मोठें असें खेडें नाहीं कीं जेथें एकही शाळा नाहीं, हें मला जसें माहीत आहे तसें बोर्डाचेही सभासदास माहीत आहे. मोठ्या खेड्यांत तर एकापेक्षां अधिक शाळा आहेत. प्रत्येक विभागांतील शहरामध्यें अनेक शाळा आहेत. या शाळांतून विद्यार्थ्यांना लिहिणें, वाचणें व हिशेब ठेवणें हें अगदीं थोड्या खर्चांत शिकतां येतें. पालकांच्या परिस्थितीप्रमाणें महिन्याचे काठीं एक दोन मुठी धान्यापासून ते एक रुपयापर्यंत कांहींही शिक्षकास देतां येतें. शिक्षण अगदीं सोपें व इतकें परिणामकारक आहे कीं, जो आपला हिशेब स्वतः ठेवीत नाहीं असा शेतकरी सांपडणें कठीण. ही परिस्थिति आमच्याकडे—विलायतेंत—खालच्या समाजांत दिसत नाहीं. व्यापारी लोक तर ब्रिटिश व्यापाऱ्यांची बरोबरी करतील, अशा व्यवस्थित रीतीनें आपले हिशेब ठेवतात."

या प्रकारचें मत त्यावेळच्या इतर अधिकाऱ्यांनींही व्यक्त केलें आहे. यावरून वर जे आंकडे दिले आहेत ते बरोबर आहेत असें म्हणवत नाहीं. शिवाय वरील आंकड्यामध्यें घरगुती शिक्षण घेणाऱ्यांचा समावेश केलेला दिसत नाहीं. हें शिक्षण इतर प्रांताप्रमाणें मुंबई प्रांतांतही त्यावेळीं पसरलेलें होतें.

प्रत्यक्ष पुरावा फार थोडा असल्यानें या मुद्यावर निश्चित मत देणें कठीण आहे. १८२९ च्या रिपोर्टाला मान द्यावयाचा कीं प्रेन्डरगास्ट किंवा त्याच्यासारख्या इतरांचें म्हणणें गृहीत धरावयाचें हा ज्याच्या त्याच्या खुशीचा प्रश्न आहे. अप्रत्यक्ष पुरावा जो गोळा केला जात आहे

त्यावरून १८२९ चा रिपोर्ट बरोबर आहे असें म्हणतां येत नाहीं. उदाहरणार्थ मुंबईच्या शिक्षणखात्यानें देशी शाळा विचारांतच घेतल्या नाहींत. १८२९ ते १८८२ यामधील काळांत या खाजगी शाळांना सरकारनें व लोकल बोर्डानें चालविलेल्या शाळांशीं स्पर्धा करावी लागल्यामुळें, त्यांची संख्या बरीच घटली असली पाहिजे. असें असून देखील १८८१–२ चे हिंदी शिक्षण कमिशननें खाजगी ३९५४ शाळांमधून ७८,२०५ मुलें शिकत असल्याचें दिलें आहे. हा पुरावा आपल्यापुढें असतांना १८२९ सालीं केवळ १७०५ च शाळा होत्या व त्यामध्यें ३५१४३ मुलें शिकत होतीं, हें विधान ग्राह्य मानतां येत नाहीं. उघड्या डोळ्यांनीं जर आपण सर्व गोष्टी पाहूं लागलों तर आपणांस असें दिसून येईल कीं मुंबई प्रांतासंबंधीं मिळविलेले आंकडे चुकीचे असून, होते त्यापेक्षां शिक्षणाचें मान फारच कमी धरण्यांत आलें. या आंकड्यावरून खरी वस्तुस्थिति अजमावतां येणार नाहीं.

बंगाल:—बंगालसंबंधीं माहिती **विल्यम ॲडॅम** यांच्याकडून मिळते. त्यांनीं बंगाल व बिहारमध्यें १८३५ ते १८३८ मध्यें खाजगी शाळांविषयीं माहिती गोळा करून तीन अहवाल प्रसिद्ध केले. पहिला अहवाल हा पूर्वी जमा केलेल्या माहितीचा गोषवारा असल्यानें तो, एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं शिक्षणाची काय स्थिति होती हें ताडण्यासाठीं, पुरावा म्हणून मान्य करतां येत नाहीं.

दुसऱ्या अहवालांत **ॲडॅमसाहेबांनीं** राजशाही जिल्ह्यांतील नाट्टोर तालुक्यांतील शिक्षणाचा उहापोह सांगोपांग केला आहे. अहवालाचा गोषवारा खालीलप्रमाणें आहे.

नाट्टोर तालुक्याची लोकसंख्या १,९५,२९६ असून त्यांत मुसलमान १,२९,६४० आहेत व ६५,६५६ हिंदु आहेत. खेड्यांची संख्या ४८५

आहे. प्राथमिक शाळा २७ असून त्यांत १६७ मुलें शिकतात. चार पार्शियन शाळा असून त्यांत २३ मुलें शिक्षण घेतात. जेथें कुराण शिकविलें जातें अशा अरेबिक शाळा ११ असून त्यामध्यें ४२ मुलें आहेत. दोन बंगाली–पर्शियन शाळा असून त्यांत ३० मुलें आहेत. २३८ खेड्यांतील १५८८ कुटुंबांमधून २३८२ मुलांना शिक्षण दिलें जातें. यावरून शाळांतून शिकणाऱ्या मुलांच्या जवळजवळ नऊपट मुलें घरगुती शिक्षण घेत आहेत. सरकारी शाळेंत प्रथम येणाऱ्या मुलाचें वय सरासरी ८ आहे, व या शाळांतून शिकून जाणाऱ्या मुलाचें वय १४ आहे. प्राथमिक शाळांतील शिक्षकाचें मासिक वेतन सरासरी ५॥ रुपये आहे.

मुसलमानांनीं चालविलेलीं खाजगी महाविद्यालयें नव्हतीं. परंतु **ॲडॅमसाहेबांना** २८ संस्कृत महाविद्यालयें दिसून आलीं. यामध्यें ३९७ विद्यार्थी शिकत होते. मुलें आकराव्या वर्षीं या शाळांत येत असत व २७ व्या वर्षीं त्यांचा अभ्यास पुरा होत असे. ३९७ मुलांपैकीं १३६ मुलें, ज्या गांवीं ह्या शाळा होत्या त्या गांवचीं होतीं. त्यांना मोफत शिक्षण मिळत असे. राहिलेल्या २६१ बाहेर गांवच्या मुलांना शिक्षकांकडून शिक्षण मोफत दिलें जात असे व त्यांची रहाण्याची व जेवणाची सोय फुकट केली जात असे.

स्त्री–शिक्षण जवळ जवळ नव्हतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. मात्र नाडोर तालुक्यांत ६१२१ प्रौढ साक्षर होते. यावरून पुरुषवर्गाचें शिक्षणाचें शेंकडा प्रमाण ६·१ व सर्वसाधारण लोकसंख्येमध्यें हें प्रमाण ३·१ पडत आहे.

तिसऱ्या अहवालांत **ॲडॅमसाहेबांनीं** बंगाल व बिहार प्रांतांतिल पांच जिल्ह्यांतून गोळा केलेली माहिती पुढें दिली आहे. ती थोडक्यांत खालीलप्रमाणें आहे:—

	मशिदाबाद शहर	औलनबजार जिल्हा	नांगिल्या जिल्हा	कालना जिल्हा	जेहानाबाद जिल्हा	मैंवार जिल्हा	एकण
१ ज्या प्रौढांना उच्च शिक्षण मिळालें व ज्यानी शिक्षकाचा पेशा पत्करला	३३	—	२	३८	६	७	८६
२ ज्या प्रौढांना उच्च शिक्षण मिळालें परतु ज्यांनीं शिक्षकाचा धदा पत्करला नाहीं	७१	१३	१२	९९	१९	१७	२०५
३ ज्या प्रौढांना उच्च शिक्षण मिळालें नाही, परंतु लिहिण्यावाचण्यापुरतें शिक्षण मिळून ज्यानीं शिक्षकाचें काम अगिकारलें	६०	२५	३४	९३	५३	६	२७१
४ ज्या प्रौढाना उच्च शिक्षण मिळालें नाही, जे लिहिण्यावाचण्यापुरतें शिक्षण मिळूनही शिक्षकाच्या धद्यांत पडले नाहीत	४,७६८	५५५	३५२	२,४२४	९९२	८२५	९,५१५
५ ज्यांना फक्त लिहितां वाचतां येतें असे प्रौढ ...	१७००	६१४	५९३	२,३०४	७६१	३०३	६,२७५
६ ज्यांना अक्षरओळख आहे व आपली सही करतां येते असे प्रौढ	७१५	५६५	६२०	२,३५०	१,००४	२६५	५,५१९
एकूण	७,३५०	१७७२	१६९३	७३०८	२८३५	१,०३३	२१,९११

पत्रक १–शाळा

जिल्हा	शाळांची संख्या							एकूण
	बंगाली	हिंदी	संस्कृत	पर्शियन	अरेबिक	इंग्लिश	मुली	
मुर्शिदाबाद	६२	५	२४	१७	२	२	१	११३
बीरभूम	४०७	५	५६	७१	२	२	१	५४४
बरद्वान	६३०	—	१९०	९३	११	३	४	९३१
दक्षिण बिहार	—	२८६	२७	२७९	१२	१	—	६०५
टिरहून	—	८०	५६	२३४	४	—	—	३७४
एकूण	१०९९	३७६	३५३	६९४	३१	८	६	२५६७

पत्रक २–विद्यार्थी

जिल्हा	विद्यार्थ्यांची संख्या					एकूण
	बंगाली व हिंदी	संस्कृत	पर्शियन व अरेबिक	इंग्लिश	मुली	
मुर्शिदाबाद	१,०३०	१५३	१०९	२६	२८	१,३९६
बीरभूम	६,३८३	३९३	४९०	७३	११	७,३५०
बरद्वान	१३,१९०	१,३५८	९७१	१२०	१७५	१५,८१४
दक्षिण बिहार	३,०९०	४३७	१,४८६	२३	—	५,०३६
टिरहून	५०७	२१४	५९८	—	—	१,३१९
एकूण	२४,२५०	२,५५५	३,६५४	२४२	२१४	३०,९१५

सहा ठाण्यांत किंवा तालुक्यांत **ॲडॅमसाहेबांनीं** सखोल परीक्षण करून घरगुती शाळा व साक्षर माणसें किती यांचे आंकडे गोळा केले. हीं माहिती खालील तक्त्यांत दिली आहे.

२–घरगुती शिक्षण

	लोकसंख्या	शाळेंत शिकणारे विद्यार्थी	घरीं शिकणारे विद्यार्थी	शाळेंत व. घरीं शिक्षण घेणारे विद्यार्थी
मुर्शिदाबाद शहर	१,२४,८०४	९५९	३००	१,२५९
दौलतबझार जिल्हा	६२,०३७	३०५	३२६	६३१
नांग्लिया जिल्हा	४६,४१६	४३९	२८५	७२४
कालना जिल्हा	१,१६,४२५	२,२४३	६७६	२,९१९
जेहनाबाद जिल्हा	८१,४८०	३६६	५३९	९०५
मँवार जिल्हा	६५,८१२	६०	२८८	३४८
एकूण	४,९६,९७४	४,३७२	२,४१४	६७८६

ॲडॅमसाहेबांनीं सहा तालुक्यांतून गोळा केलेली माहिती व १९२१–२२ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानची शैक्षणिक परिस्थिति खालील आंकड्यांमध्यें तुलनात्मक दृष्टीनें मांडतां येईल.

	ॲडॅमसाहेबांचे आंकडे	१९२१–२२ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानची (ब्रह्मदेश सोडून) स्थिति
(अ) शिक्षणाचीं केंद्रें— ॲडॅमसाहेबांनीं दाखविलेल्या घरगुती व सार्वजनिक शाळा व शिक्षणखात्याच्या दप्तरांत नमूद असणाऱ्या मंजूर व नामंजूर शाळा.	२२१० (२२५ माणसामागें १)	१८२७५२ (१२८० माणसामागें १)
(ब) शिकणारीं मुलें—	६७८६	७८,१८,७२५

	ॲडमसाहेबांचे आंकडे	१९२१-२२ सालीं ब्रिटिश हिंदुस्थानची (ब्रह्मदेश सोडून) स्थिति
(क) लोकसंख्येंच्या मानानें शाळेंत जाणाऱ्यांचें शेंकडा प्रमाण (शाळकरी मुलामुलींचें लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण १५ असतें.)	१·४	३·३
(ड) १५ वर्षांचे वरील साक्षर प्रौढ.* (ॲडमसाहेबांचे आंकडे १४ वर्षांच्या वरील प्रौढांचे आहेत.)	२१,९११.	१,२४,६०,१७०
(इ) लोकसंख्येशीं प्रौढ साक्षरतेचें शेंकडा प्रमाण.	४·४	५·३

८. **हारटॉग व परुळेकर मतभेद**:—एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं बहुजनसमाजांत शिक्षणाचा प्रसार किती होता या प्रश्नावर **हारटॉग-साहेब** व **प्रि. परुळेकर** यांचेमध्यें मतभेद आहे. १९३१ मध्यें **महात्मा गांधींनीं** असे उद्गार काढिले कीं, 'शंभर वर्षांपूर्वी हिंदुस्थान जितका साक्षर होता तितका तो आज नाहीं.' या विधानास 'फिलिप् हारटॉग यांनीं हरकत घेतली व 'हिंदुस्थानांतील आजकालचे कांहीं प्रश्न' या आपल्या पुस्तकांत त्यास उत्तर दिलें. **प्रि. परुळेकरांनींही** या उत्तरास प्रत्युतर दिलें.‡ हा वाद अजूनही मिटलेला नसल्यानें त्याविषयीं विचार करणें जरूर आहे.

* हे आंकडे ब्रिटिश हिंदुस्थानचे असून त्यांतून अजमीर, मेरवाडा, अंदामन व निकोबार, ब्रिटिश चलुचिस्तान, कुर्ग व दिल्ली यांची माहिती न मिळाल्यानें, ती गाळण्यांत आली आहेत.

‡ जुलै १९४० चा प्रोग्रेस ऑफ एज्युकेशनचा अंक पहा.

अनुक्रमांक १९३९०
विभाग नं. ३१७
क्रमांक ८८८
नौ. हि. पु. [illegible]

या मांडणाचा विचार करतांना दोन मुद्दे उत्पन्न होतात. पहिला मुद्दा असा कीं, एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं बंगालमध्यें एक लाख शाळा होत्या, किंवा ४०० लोकांमागें एक शाळा होती, असें जें मत **ॲडॅम**-साहेबांनीं दिलें आहे, तें मत, किंवा प्रत्येक खेड्याला एक शाळा होती, हा जो सार्वत्रिक समज होता तो समज बरोबर होता का? **मनरो, एल्फिन्स्टन** किंवा **ॲडॅम** यांनीं गोळा केलेल्या माहितीचा आधार घेऊन, शैक्षणिक इतिहासाच्या अभ्यासूंनीं असें प्रतिपादन केलें आहे कीं, वर दिलेलें **ॲडॅमसाहेबाचें** मत व सर्वसाधारण लोकांचा समज, हीं दोन्ही चुकीचीं आहेत-उदाहरणार्थ ज्या भागाचें निरीक्षण **ॲडॅमसाहेबांनीं** केलें त्याविषयीं खालीलप्रमाणें आंकडे सर **फिलिप्, हारटॉग** यांनीं दिले आहेत.

क्षेत्र	लोकसंख्या	प्रत्यक्ष अस्तित्वांत असणाऱ्या शाळा	४०० लोकवस्तीस एक शाळा याप्रमाणें किती शाळा असूं शकतील ती संख्या
मुर्शिदाबाद	१,८६,८४१	११३	४६७
वीरभूम	१२,६७,०६७	५४४	३,१६८
बरद्वान	११,८७,५८०	९३१	२,९६९
दक्षिण बिहार	१३,४०,६१०	६०५	३,३५२
टिरहुन	१६,९७,७००	३७४	४,२४४

या माहितीवरून असें दिसतें कीं या विभागांत लोकसंख्येच्या मानानें १४२०० शाळा जेथें असावयास पाहिजेत तेथें प्रत्यक्ष २५६७ च शाळा होत्या. म्हणून असें मानण्यांत येतें कीं **ॲडॅमसाहेबांचें** मत चुकीचें आहे. दुसरा पक्ष हें मत मान्य करीत नाहीं. येथें 'शाळा' म्हणजे काय हें स्पष्ट होणें अगत्याचें आहे. **सर फिलिप् हारटॉग** व त्यांचे विचारांतीं

जीं माणसें आहेत त्यांच्या दृष्टीनें शाळा म्हणजे 'समाजाकडून किंवा पालकांकडून कांहीं मुशाहिरा घेऊन ठराविक विद्यार्थ्यांना शिकविण्याचें काम जेथें शिक्षक करतो, अशी कमी-अधिक कायम स्वरूपाची शिक्षण संस्था'. 'शाळा' याचा अर्थ वरीलप्रमाणें घेतल्यास बंगालमध्यें एक लाख शाळा होत्या, असें म्हणणें चुकीचें ठरेल. परंतु दुसऱ्या बाजूच्या लोकांचा 'शाळा' या शब्दाचा अर्थ वेगळा आहे. त्यांचे मतें 'ज्या ठिकाणीं शिक्षण दिलें जातें ती शाळा.' घरगुती शिक्षण केंद्राचाही यांत समावेश होतो. या व्याख्येवरून ज्या कुटुंबामध्यें कांहीं वेतनावर शिक्षक काम करतो, किंवा जेथें वडील आपल्या मुलांना, शक्य असल्यास शेजारची मुलें घेऊन, शिक्षण देतो, ती शाळा होऊं शकते. हा 'शाळा' या शब्दाचा अर्थ स्वीकारल्यास ॲडॅमसाहेबांनीं केलेलें विधान बरोबर असून त्यांनीं गोळा केलेली माहिती बरोबर आहे असें म्हणावें लागतें.

क्षेत्र	लोक-संख्या	शहर व खेडीं यांची संख्या	शाळांची संख्या				एकूण	२०० लोकवस्तीस एक याप्रमाणें निघणारी शाळांची संख्या
			प्राथमिक शाळा (पाठशाला धरून)	सर्वसाधारण शाळा	इतर शाळा	घरगुती शिक्षणाच्या शाळा		
मुर्शिदाबाद शहर	१,२४,८०४	—	५१	२९	३	२१६	३०४	३१२
दौलतबझार जिल्हा	६२,०३७	१८३	२५	—	—	२५४	२७९	१५१
नांग्लिया "	४६,४१९	२६७	३४	२	—	२०७	२४३	११९
कालना "	१,१६,४२५	२८८	७१	३८	२	४७५	५९४	२९१
जेहनाचाद "	८१,४८०	८०३	८५	७	—	३६०	४५२	२०३
भँवार "	६५,८१२	४०२	६	७	—	२३५	२४८	१६४
एकूण	८,१६,१७४	१,९४३	२८८	८०	५	१,७४७	२,२१०	१,२४१

दुसरी गोष्ट अशी कीं एक लाख शाळांचें गुपित ॲडॅमसाहेबांनींच कां उघड केलें नाहीं, असा प्रश्न उपस्थित होतो. ॲडॅमसाहेबांच्या प्रामाणिकपणाबद्दल कोणीही शंका घेणार नाहीं. एक तर त्यांनीं गोळा केलेली माहिती त्यांना नीट मांडतां आली नाहीं, किंवा एक लाख शाळेचें जें थोतांड समजलें जातें, तें त्या वेळच्या अधिकाऱ्यांना वाटत नसल्यानें या सत्य गोष्टीवर पुन्हां प्रकाश पाडण्याची जरूर त्यांना भासली नसावी. कै. एम्. आर. परांजपे या वाबतींत लिहितातः—

" आधुनिक शिक्षण खात्याला ज्या खेड्यांतून शाळा चालविणें आज कठीण जातें, तेथें एकोणिसाव्या शतकांत शाळा होत्या, या गोष्टीवर चालू शतकांतील अधिकारी व प्रकाशक यांचा विश्वास बसत नाहीं; कारण त्यांना त्या शतकांतील वस्तुस्थितीची कल्पना नाहीं. शिक्षकांस धान्याची मदत देऊन खेडेगांवच्या संघटनेनें किंवा श्रीमंतांच्या व्यक्तिशः मदतीनें शाळा चालूं शकते, हें त्यांना शक्य वाटत नाहीं. परंतु १८५०–६० सालांतील अधिकारी व बिन–अधिकारी लोकांनीं ॲडॅम-साहेबाप्रमाणें प्रत्येक खेड्यांत शाळा असल्याचें मान्य केलें आहे. एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत प्राथमिक शाळांचा प्रसार झाला होता. मद्रास इलाख्यांत **सर टॉमस् मनरो** यांना ' प्रत्येक खेड्यांत एक शाळा ' असल्याचें दिसून आलें.* बंगालमध्यें वार्ड यांचे असें प्रत्ययास आलें कीं, लिहिणें, वाचणें व हिशेब शिकविणाऱ्या शाळा बहुतेक खेड्यांतून आहेत.‡ ज्या माळव्यांत अर्ध अधिक शतक अराजकता माजून राहिली होती तेथें **मालकम** साहेबांना ' शंभर उंबरा असणाऱ्या प्रत्येक खेडचांत प्राथमिक शाळा असल्याचें दिसून आलें.'†

---

* पाहा–मिल–ब्रिटिश हिंदुस्थानचा इतिहास पु. १ पान ४५२ आ. ४ थी.

‡ पाहा–वार्ड–व्यू ऑफ दि हिंदूज. पु. १ पान १६०.

† पाहा–मालकम–मेमॉअर्स ऑफ सेंट्रल इंडिया अँड माळवा. पु. २ पान १५८

भांडणाचा दुसरा मुद्दा म्हणजे साक्षरतेच्या शेंकडा प्रमाणाविषयींचा आहे. **ॲडॅमसाहेबांनीं** पांच तालुक्यांची व मुर्शिदाबाद शहराची माहिती गोळा केली त्यांना असें दिसून आलें कीं ४९६९७४ लोक संख्येंत १४ वर्षाचे वरील प्रौढ साक्षर २१९११ आहेत यावरून साक्षरतेचें प्रमाण ४·४ पडतें. १९२१ च्या खानेसुमारीवरून १५ वयाच्या वरील प्रौढांचें साक्षरतेचें प्रमाण ५·३ आहे. **ॲडॅमसाहेबांनीं** जें प्रमाण दिलें आहे, तें कमी आहे. त्यास कदाचित खालील दोन कारणें असूं शकतील. त्यांनीं ज्यावेळीं हें संशोधन केलें त्यावेळीं त्या तालुक्यांची स्थिति खालावलेली असावी किंवा इतर देशाचे मानानें त्या भागांत अराजकता जास्त माजून राहिली. असावी व म्हणून इतर भागांपेक्षां तो भाग शिक्षणांत जास्त मागासलेला असावा. हीं दोन कारणें गृहीत धरून आपणास असें म्हणतां येईल कीं १९२१ सालीं प्रौढ शिक्षणाचें जें प्रमाण होतें, तेंच किंवा त्यापेक्षां जास्त १८२१ सालीं होतें; व हेंच वादांतील एका पक्षानें प्रतिपादलें आहे.

दुसरा पक्ष हें म्हणणें मान्य करावयास तयार नाहीं. **ॲडॅमसाहेबांनीं** प्रौढ-साक्षरांचे सहा वर्ग कल्पिले आहेत. त्यांचा सहावा वर्ग–'ज्यांना र,ट, फ करतां येतें व सही करतां येते अशांचा'–आहे. अशा वर्गाची संख्या, एकूण साक्षर २१९११ चे लोकसंख्येंत ५५१९ आहे. 'ज्याला लिहितां वाचतां येते तो साक्षर' अशी साक्षर या शब्दाची व्याख्या १९२१ च्या शिरगणतीनें केली असल्यानें या सहाव्या वर्गाला साक्षर समजण्यांत आलें नाहीं. ५५१९ हा आंकडा साक्षर २१९११ यांतून वजा केल्यास १६३९२ साक्षर रहातात; व अशारीतीनें ४९६९७४ लोकसंख्येंत १६३९२ साक्षर म्हणजे शेंकडा प्रमाण ३·२ असें पडतें. म्हणून **महात्मा गांधीजींचें** विधान चुकीचें आहे, असा हा पक्ष म्हणतो.

ज्याला फक्त अक्षर ओळख आहे व सही करतां येते, अशांना साक्षर म्हणावयाचें कीं नाहीं हा एक मताचा प्रश्न आहे. सध्यांचे मापानें आपण

मोजूं लागलों तर यांना साक्षर म्हणतां यावयाचें नाहीं; परंतु एकोणिसाव्या शतकांतील परिस्थितीचें मापन विसाव्या शतकांतील प्रमाणानें करणें चुकीचें होणार आहे. त्यावेळीं वर्तमानपत्रें नव्हतीं, छापील पुस्तकें नव्हतीं, पोस्ट ऑफीसें नव्हतीं, व म्हणून साक्षरतेचीं साधनें तुटपुंजी होतीं. कोणत्याहि काळांतील साक्षरतेचें प्रमाण त्या काळांतील साधनानेंच निश्चित करावयास पाहिजे. ज्या काळांत **ॲडॅमसाहेबां**नीं संशोधन केलें, त्या काळांत ज्यांना वाचतां येत होतें व सही करतां येत होती, त्यांना साक्षर समजण्यांत येत होतें. असें नसतें तर स्वतः **ॲडॅमनें** अशा लोकांची गणना साक्षर लोकांमध्यें केली नसती. म्हणून एकोणिसाव्या शतकाचें मापन विसाव्या शतकाचा दंडक घेऊन करणारांचें मत आम्हांस ग्राह्य वाटत नाहीं.

१०. **शेवट:**—एकोणिसाव्या शतकाचे प्रारंभीं खाजगी शिक्षणाची परिस्थिति वर दर्शविल्याप्रमाणें होती. या युगांतिल उच्च शिक्षणाच्या शाळा म्हणजे चालू घडीशीं विसंगत असा मध्ययुगाचा एक अवशेष होता. बहुजनसमाजामध्यें शिक्षण प्रसाराचें मोठें कार्य प्राथमिक शाळा—त्यांमध्यें अनेक दोष असले तरी—करीत होत्या. या शाळांमधून चालू असलेलीं—प्रौढ विद्यार्थ्यांच्या मदतीनें शिक्षण देण्याची पद्धत—इंग्लंडनें उचलली व एकोणिसाव्या शतकांत त्यानें शिक्षणाचा प्रसार केला. 'युरोपांतील कित्येक देशांपेक्षां हिंदुस्थानांत शिक्षणाचा प्रसार बरा होता,' हें **मनरोसाहेबां**चें मत किंवा **प्रेन्डरगॉस्ट** साहेबांनीं केलेली मुंबईची स्तुति, हें या शाळांच्या कर्तबगारीचेंच फळ होय.

या शाळांच्या पायावर आधुनिक शिक्षण पद्धति आधारावयास पाहिजे होती. परंतु तसें करण्यांत आलें नाहीं. याचे उलट कमी उपयुक्त अशा उच्च शिक्षणाच्या शाळांना मदत देण्यांत आली व त्याही शाळा पुढें टिकल्या नाहींत. सर्व देशभर ज्या प्राथमिक शाळांचें जाळें पसरलें होतें त्यांना सरकारकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाहीं. ॲडॅम.

एल्फिन्स्टन, १८५४ चा सरकारी खलिता, व हिंदी शिक्षण कमिशन ओरडून सांगत असतांही, केवळ निष्काळजीपणामुळें, जाणूनबुजून निर्माण केलेल्या चढाओढीमुळें किंवा सुधारणाचे नांवाखालीं तयार झालेल्या चुकीच्या योजनांमुळें या शाळांचा नाश झाला.

याचा परिणाम वाईट झाला. हिंदुस्थानांत ईस्ट-इंडिया-कंपनीनें व नंतर शिक्षणखात्यानें शाळांची सुधारणा करण्याचे प्रयत्न केले; परंतु अनेक कारणांमुळें ही प्रगति अत्यंत मंद ठरली व खाजगी शाळा नष्ट झाल्यामुळें झालेलें नुकसान भरून निघालें नाहीं. यामुळेंच १९२१ मध्यें शिक्षणाची स्थिति १८२१ सारखीच जवळ जवळ होती. १८२१ सालीं ज्या पूर्वेकडील किंवा पश्चिमेकडील देशांची शैक्षणिक परिस्थिति हिंदुस्थानपेक्षां चांगली नव्हती, त्यांनीं इतक्या झपाट्यानें आपली प्रगति केली कीं, हिंदुस्थानचें पुढारीपण नष्ट होऊन तो एक शैक्षणिक बाबतींत मागासलेला देश म्हणून गणण्यांत येऊं लागला.

प्रकरण दुसरें

ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदी लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी स्वीकारली

(१८१३)

प्रथमच्या धर्मांतराच्या चळवळी :—३१ डिसेंबर १६०० मध्यें ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. पूर्वेकडील देशांशीं व्यापार करणें, हा जरी तिचा मुख्य हेतु होता, तरी तिच्या प्रथमच्या अवस्थेमध्यें ख्रिस्ती धर्माच्या प्रसारास मदत करण्याचा तिनें प्रयत्न केला. कंपनीच्या ख्रिस्ती नोकरांना अध्यात्मिक बाबतींत सहाय्य करण्यासाठीं व पर्यायानें ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं पाद्री लोक हिंदुस्थानांत पाठविण्यांत आले. परधर्मीयांना ख्रिश्चन धर्मांत आणावें या हेतूनें हिंदी ख्रिश्चन लोकांना मिशनरी कामाचें शिक्षण देण्याचेही तिनें प्रयत्न केले. कंपनीचे खर्चानें मिशनरी कामाचें शिक्षण घेण्यासाठीं एका हिंदी तरुणास इंग्लंडला पाठविलें होतें, असें मिस्टर एन्. एन्. लो यांनीं म्हटलें आहे. १६५९ सालीं कंपनीच्या व्यवस्थापक मंडळांनीं (**कोर्ट-ऑफ डायरेक्टरांनीं**) असें स्पष्ट प्रतिपादन केलें आहे कीं, शक्य त्या प्रयत्नांनीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणें हा आमचा हेतु आहे. या धोरणास अनुसरून कंपनीनें मिशनरी लोकांना हिंदुस्थानांत आणिलें. परंतु कंपनीच्या सुदैवानें हें धोरण तिला बदलावें लागलें, व धर्माच्या बाबतींत तिनें अलिप्त राहाण्याचें ठरविलें. याचा परिणाम असा झाला कीं, लोकांच्या प्रतिकारास तोंड देण्याची आपत्ति निर्माण झाली नाहीं. ही प्रथमची धार्मिक चळवळ म्हणजे शिक्षणाची सुरवात, असें जे कांहीं लोक समजतात

तें चुकीचें आहे. कंपनीच्या नोकरांची अशी समजूत होणें हें स्वाभाविक आहे. कारण इंग्लंडमध्यें—आणि हें कोणत्याही देशाबद्दल म्हणतां येईल—शिक्षण म्हणजेच धार्मिक शिक्षण, असा अर्थ त्यावेळीं लोक करीत असत. परंतु हें मत आज धरून चालणें चुकीचें होणार आहे. खरें पाहतां, कंपनीनें आपल्या हयातींत शंभर वर्षेपर्यंत तरी, शिक्षणाचें कोणतेंही कार्य हातीं घेतलें नाहीं.

२. मोफत शाळा:—आठराव्या शतकाचें सुरवातीस कंपनीनें शैक्षणिक चळवळीस प्रारंभ केला. १६९८ सालच्या ब्रिटिश सरकारच्या सनदेमध्यें हिंदुस्थानांतील आपल्या वखारींत पाद्री लोक ठेवण्याबद्दल व ५०० टनाच्या किंवा तीपेक्षां मोठ्या बोटीवर एक तरी पाद्री दाखल करून घेण्याबद्दल, सुचविलें आहे. वखारींतील नोकरवर्गामध्यें पोर्तुगीज भाषा बोलली जात असे, म्हणून पाद्र्यांना पोर्तुगीज भाषेचें शिक्षण दिलें जाई. इतकेंच नव्हे तर, धर्माचा प्रसार करतां यावा म्हणून, ज्या भागांत हे पाद्री रहात असत त्या भागांतील लोकांची भाषा शिकणें हेंही त्यांचें कर्तव्य होऊन बसलें होतें. जेथें शक्य असेल तेथें, मोठमोठ्या वखारींत व आपल्या वस्तीमध्यें, शाळा स्थापन करण्याची जबाबदारी, सनदेनें कंपनीवर लादली होती. या हुकुमामध्यें असा अर्थ ध्वनित होतो कीं, सर्वसाधारण लोकांमध्यें जरी नाहीं तरी, कंपनीच्या नोकर वर्गामध्यें—ज्यामध्यें हिंदी लोकांचा समावेश होता—धर्माचा प्रसार करण्याची जबाबदारी कंपनीवर आहे. परंतु थोड्याच दिवसांनीं, धार्मिक बाबतीपासून अलिप्त रहाणें राजकीयदृष्ट्या श्रेयस्कर आहे, असें कंपनीस वाटूं लागलें व धार्मिक चळवळीपासून ती परावृत्त झाली.

सनदेच्या दुसऱ्या भागांकडे मात्र कंपनीनें पूर्ण लक्ष पुरविलें. कंपनीनें आपल्या भागांतील मुख्य मुख्य शहरीं शाळा स्थापून त्यांना सढळ हातानें मदत दिली. यामुळें १७१५ मध्यें मद्रास येथें सेंट मेरीची मोफत शाळा स्थापन झाली. डॅनिश मिशनऱ्यानें १७१७ मध्यें एक पोर्तुगीज

मुलांसाठीं व दुसरें तामील मुलांसाठीं, अशा दोन शाळा त्याच शहरीं सुरू केल्या. १७१८ मध्यें रे. रिचर्ड कोबे यांनीं मुंबईस व १७२१ सालीं ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणाऱ्या संस्थेनें कलकत्त्यास, मोफत शाळा उघडल्या. या शाळा मुख्यत: कंपनीच्या इंग्रज नोकर वर्गाकरतां होत्या परंतु त्यामध्यें कांहीं गरीबांचीं मुलें घेतलीं जात असत. लिहिणें, वाचणें व हिशेब ठेवणें एवढाच अभ्यासक्रम असे. शाळा चालविण्यासाठीं कंपनी मदत देत असे; शिवाय धनिक लोकांकडून वर्गणीचें रूपानेंही पैसा गोळा केला जाई.

अठराव्या शतकांत ईस्ट इंडिया कंपनीची शैक्षणिक कामगिरी म्हणजे, वरील प्रकारच्या शाळांना शिक्षण देणें, एवढीच होती, असें समजण्यास हरकत नाहीं. परंतु या शाळा कंपनीच्या युरोपिअन नोकर वर्गाकरतां प्रामुख्यानें होत्या व हिंदी प्रजेकरतां आपण असें कांहीं करावयास बांधिले आहोंत, ही जाणीव कंपनीची झाली नव्हती, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

३. कलकत्त्यांतील मद्रासा व बनारसचें संस्कृत महाविद्यालय—सतराव्या शतकांतील धर्म-प्रसाराच्या शाळा किंवा अठराव्या शतकांतील मोफत शाळा, यांमधून पुढें लोकशिक्षणाचें कार्य निर्माण झालें. असें म्हणतां यावयाचें नाहीं. १७८१ ते १७९१ चे काळांत कलकत्त्यास मद्रासा व बनारसमध्यें संस्कृत महाविद्यालय स्थापन झालें व यांत लोकशिक्षणाचा खरा उगम आहे. १७८१ मध्यें **वॉरन् हेस्टिंगज्**—हिंदुस्थानचा पहिला गव्हर्नर जनरल—यांनीं अरेबिक व पर्शियन भाषेचें शिक्षणासाठीं कलकत्त्यास मद्रासा उघडला व १७९१ मध्यें **जोनाथन डंकन** यांनीं बनारस येथें संस्कृतच्या शिक्षणासाठीं महाविद्यालय उघडिलें. या दोन्हीं विद्यालयांचा उद्देश, मुस्लीम व हिंदु कायदा इंग्रज अधिकाऱ्यांना समजून देण्यासाठीं, मदतगार तयार करण्याचा होता. १७७३ सालच्या रेग्युलेटिंग ॲक्टानें वरिष्ठ कोर्ट जरी

निर्माण झालें असलें तरी, १७८१ पर्यंत इंग्रजी कायद्याप्रमाणें सर्व कोर्टांचें निकाल लावले जात असत. हिंदी लोकांच्या चालीरीती भिन्न असल्यानें इंग्रजी कायद्याप्रमाणें दिल्या जाणाऱ्या न्यायानें त्यांचे ठिकाणीं असंतोष निर्माण झाला. म्हणून १७८१ सालीं कायद्यांत दुरुस्ती करण्यांत आली. इस्टेटीच्या व इतर दिवाणी दाव्यामध्यें मुसलमान वादी प्रतिवादी असतील तर, मुसलमानी कायद्याप्रमाणें; व हिंदु असतील तर हिंदु कायद्याप्रमाणें निकाल देण्याचें ठरविण्यांत आलें. जेथें एक पक्ष हिंदु किंवा मुसलमान असेल, तेथें प्रतिवादीच्या कायद्याप्रमाणें न्याय दिला जाईल, असें ठरविण्यांत आलें. इंग्रजी न्यायाधिशांना हिंदु किंवा मुसलमानी कायदा अवगत नसल्यानें व हिंदी लोकांची नेमणूक न्यायाधिश म्हणून करण्यास कंपनी सरकार तयार नसल्यानें, इंग्रज न्यायाधिशास मदत करण्यासाठीं हिंदु किंवा मुसलमान मदतगार म्हणून देण्याची जरूर भासूं लागली व म्हणून मुस्लीम–मद्रासा व हिंदु–महाविद्यालय यांचीं आवश्यकता वाटूं लागली.

राज्यकारभार सुलभ व्हावा म्हणून मुख्यतः जरी या दोन प्रकारच्या शिक्षण–संस्था स्थापण्यांत आल्या, तरी त्यांच्या अस्तित्वास दुसरींही कारणें झालीं. कंपनीच्या कारभारापूर्वी राजे लोकांनीं जें केलें तें आपणही करावें, असें कंपनीला वाटलें. त्याचप्रमाणें देशांतील वरच्या वर्गास खूष करण्याचाही तिचा हेतु होता. मागें होऊन गेलेल्या लोकप्रिय राजेलोकांची कार्यपरंपरा चालविल्याशिवाय आणि वरचे वर्गाचे लोकांना शिक्षण व नोकऱ्या देऊन खूष ठेविल्याशिवाय हिंदुस्थानांतील आपलें बस्तान नीट बसणार नाहीं, असें कंपनीस वाटलें. या शिक्षण-संस्था स्थापन करून वरील दोन्ही गोष्टी साध्य होणार होत्या. उदाहरणार्थ कलकत्ता–मद्रासा स्थापन करण्याचा हेतु 'कलकत्त्याचे मुसलमानांना आपलेसें करणें, त्यांचीं मुलें मोठ्या पगाराच्या व जबाबदारीच्या जागा चालविण्यास लायक होतील असें शिक्षण त्यांना देणें, आणि जशा जागा रिकाम्या होतील तशा

मद्रासामधून पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना देऊन, न्यायखात्यामध्यें त्यांना लायक अधिकारी बनविणें, हा होता. त्याचप्रमाणें लॉर्ड कॉर्नवालिस यांना जोनाथन डंकन लिहितात कीं, बनारस महाविद्यालयामुळें 'हिंदुलोकांना ब्रिटिश सत्तेबद्दल आपुलकी वाटेल व युरोपिअन न्यायाधिकाऱ्यांना मदत देणाऱ्या कायदेपंडितांचें तें माहेरघर बनेल.' पुढें वीस वर्षें या दोन्ही संस्था कशा तरी जीव धरून चालल्या. या काळांत कंपनीची शिक्षण विषयक कामगिरी म्हणजे मुंबई, मद्रास व कलकत्ता या तिन्ही शांतांत निघणाऱ्या मोफत शाळा चालविणें व त्यांना मदत देणें हींच होती.

४. १८१३ पूर्वीच्या मिशनरी लोकांच्या हालचाली :—कंपनीनें स्थापिलेल्या या शिक्षण–संस्थांबरोबर मिशनरी लोकांच्या दुसऱ्या प्रकारच्या शाळा उदयास आल्या. कंपनीनें आपल्या शाळा चालविल्या त्यांत त्यांची राजकीय व राज्यकारभाराची दृष्टि होती. मिशनरी लोकांनीं मात्र धार्मिक भावनेनें व परोपकारबुद्धीनें आपल्या शाळा काढिल्या होत्या. समाजांतील वरच्या थराच्या लोकांना कंपनीनें हाताशीं धरलें, तर मिशनरी लोकांनीं हिंदी ख्रिस्ती लोकांच्या अडचणी दूर करण्यासाठीं, देशी भाषांतून शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा, तशाच अँग्लोइंडियन लोकांना शिक्षण देण्यासाठीं इंग्रजी शाळा, स्थापन केल्या. या काळांत त्यांच्या कार्याचा विस्तार फार मोठा नव्हता. परंतु हें नवीन प्रकारचें कार्य असल्यानें व कार्यामधूनच आधुनिक काळची शिक्षण–पद्धति जन्मास आल्यानें, त्यास विशेष महत्त्व आहे.

मिशनरी लोकांचा हिंदुस्थानशीं कधीं संबंध आला, हा एक ऐतिहासिक वादग्रस्त प्रश्न आहे. कांहींच्या मतें मिशनरी लोक इसवी सनाच्या पहिल्या शतकांत हिंदुस्थानांत आले. तात्त्विक वाद सोडून दिल्यास पोर्तुगीज सत्तेच्या पाठोपाठ रोमन कॅथोलिक मिशनस् हिंदुस्थानांत आलीं, असें मानावयास हरकत नाहीं. या मिशनऱ्यांचें पहिलें कार्य म्हणजे

परधर्मीयांना बाटवून ख्रिस्ती धर्मांत आणणें हें होतें; त्यांचा प्रचार विशेषतः हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावर झाला. कांहीं इतिहासकारांचें असें मत आहे कीं, या धार्मिक जाचामुळें हिंदी लोकांचीं मनें प्रक्षुब्ध झालीं व त्याचा परिणाम हिंदुस्थानांतील पोर्तुगीजांची सत्ता उलथून पाडण्यांत झाला. कांहींही असलें तरी या मिशनरी लोकांनीं आधुनिक शिक्षण पद्धतीची उभारणी करण्यास कोणत्याही प्रकारची मदत केली नाहीं, हें निर्विवाद आहे.

यानंतर डेन्स लोकांनीं आपल्या वखारी हिंदुस्थानांत स्थापिल्या. १७०६ सालीं मद्रास इलाख्यांत ट्रान्क्वेबार येथें डेन्स लोकांच्या झिगेन्-बाल्ग व प्लुशचाऊ या दोघा आद्य-मिशनऱ्यांनीं शिक्षणाचें कार्य सुरू केलें. परंतु या लोकांना हिंदुस्थानांत पाय रोवतां आला नाहीं. शेवटीं दक्षिण हिंदुस्थानांतील इंग्रज लोकांच्या वसाहतींमध्यें ते मिळून गेले. त्यांचे मागून जे इतर मिशनरी आले त्यांचीही तीच अवस्था झाली. या सर्व मिशनरी लोकांचें ध्येय अँग्लो-इंडियन समाजास उपयोगी पडावें एवढेंच होतें.

झिगेन् बाल्ग व त्यांचे मदतनीस यांनीं शिक्षण विषयक व धार्मिक बरीच कामगिरी केली. त्यांनीं १७१३ मध्यें तामीळ भाषेचा एक छापखाना उघडला. १७१६ मध्यें ट्रान्क्वेबार येथें शिक्षकांना विनीत करण्यासाठीं-ट्रेनिंग देण्यासाठीं-एक संस्था स्थापन केली, व त्याच्या पुढच्या वर्षीं मद्रासमध्यें, एक पोर्तुगीज मुलांसाठीं व दुसरी तामीळ मुलांसाठीं, अशा दोन मोफत शाळा स्थापन केल्या. १७१९ मध्यें **झिगेन् बाल्ग** मरण पावला, परंतु त्याच्या सहकाऱ्यांनीं व विशेषतः **श्वार्टझ्** यांनीं त्याचें कार्य पुढें चालूं ठेविलें. मद्रास प्रांतामध्यें **श्वार्टझ्** हा शिक्षणाचा आद्य-प्रवर्तक समजला जातो.

प्रथम प्रथम ईस्ट इंडिया कंपनीचें धोरण मिशनरी लोकांना मदत करण्याचें होतें; परंतु कंपनीचा विस्तार जसा वाढूं लागला तसें तिचें

धोरण बदललें व त्यामुळें मागाहून येणाऱ्या मिशनऱ्यांना श्वार्टझ्सारखें पाठबळ मिळालें नाहीं. धार्मिक बाबतींत उदासीन राहण्याचें धोरण कंपनीला काटेकोरपणें पाळावें लागलें. या धोरणाविरुद्ध बंगालमधील मिशनऱ्यांनीं चढाई केली. त्यामध्यें कॅरे, मार्शमन् व वार्ड या तिघांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल. १७९३ मध्यें सेरामपूरच्या डॅनिश वसाहतीमध्यें त्यांनीं कार्यास प्रारंभ केला. सेरामपूरच्या त्रिमूर्ति म्हणून त्यांची ख्याति आहे. मिशनरी या नात्यानें त्यांना एकमेकांचें साहचर्य फारच चांगलें लाभलें. कॅरे प्रचारक, वार्ड प्रकाशक व मार्शमन् हा शाळा मास्तर होता. परंतु त्यांचा उत्साह उतास आला, त्यांचा विवेक सुटला व १८०८ मध्यें प्रसिद्ध केलेल्या 'हिंदु व मुस्लीम यांना सवाल' या पुस्तकानें तर हिंदी लोकांचे डोळे खाडकन उघडले. कंपनीला पुनः मध्यस्ती होणें भाग पडलें व धर्मापासून अलिप्त असल्याचें आपलें धोरण त्यांना पुनः जाहीर करावें लागलें. याचा परिणाम असा झाला कीं, सेरामपूरच्या त्रिमूर्तींना त्यांच्या कार्यांत पाहिलीं वीस वर्षें कोणतेंच साहाय्य मिळालें नाहीं.

याची प्रतिक्रिया म्हणून मिशनरी लोकांनीं व त्यांच्या मित्रांनीं इंग्लंडमध्यें चळवळ सुरू केली. कंपनीचा कारभार मिशनऱ्यांना पोषक नाहीं, तो ख्रिस्ताच्या शिकवणीविरुद्ध आहे व हिंदी लोकांना शिक्षण न देण्याचें तिचें धोरण असमर्थनीय आहे, अशी हाकाटी पिटण्यास सुरवात झाली. या चळवळीस लोकांचें पाठबळ मिळालें व त्याचा परिणाम म्हणून १८१३ च्या सनदी कायद्यामध्यें शिक्षण विषयक कलमें घालण्यांत आलीं.

५. इंग्लंडमधील या चळवळीच्या उलाढाली:—१७९१ मध्यें संस्कृत महाविद्यालय स्थापन झाल्यापासून ते १८१३ मध्यें सनदी कायदा पास होईपर्यंतच्या वीस वर्षांचा काळ, हिंदी शिक्षणाच्या इतिहासांत महत्त्वाचा आहे. या काळांतील मुख्य गोष्ट म्हणजे

कंपनीनें जनतेला शिक्षण देण्याचें आपलें कर्तव्य मान्य केलें, ही होय. या गोष्टीला तिनें बराच विरोध केला. या विषयीचा इतिहास त्या वेळची इंग्लंडची परिस्थिति समजावून घेतली म्हणजे सहजच कळून येणार आहे.

१७९० ते १८२० हा काळ इंग्लंडमध्यें शैक्षणिक व परोपकारी चळवळीचा होता. धंद्यानें क्रांति उडवून दिली होती. कांहीं थोडे लोक श्रीमंत होत होते व मजुरांची संख्या वाढत होती. शहरें वाढत होतीं व त्याबरोबर कारखान्यांमध्यें काम करणाऱ्या गरीब मजुरांची दुःखद स्थिति पाहून, धार्मिक भावना आणि परोपकार बुद्धि लोकांमध्यें जागृत होत होती. समाजवादाचीं तत्त्वें लोकांना अजून समजत नव्हतीं व त्यामुळें मजुरांच्या या हलाकीच्या स्थितीला भांडवलशाही कारण आहे, हें लोकांना कळत नव्हतें. शील आणि शिक्षण यांच्या अभावामुळें मजुरांची स्थिति बिघडली आहे, अशी लोकांची प्रामाणिक समजूत होती आणि म्हणून त्यांची स्थिति सुधारण्यासाठीं (१) धंद्याचे निरनिराळे मार्ग खुले करणें, (२) काटकसर करण्यास शिकविणें, व (३) धार्मिक शिक्षणाचा फैलाव करणें, हे तीन मार्ग सुचविण्यांत आले.

मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं अनेक संस्था निर्माण झाल्या. गरिबांना शिक्षण देण्याची जबाबदारी पार्लमेंटवर लादण्याचे प्रयत्न झाले. १८०७ मध्यें व्हिटब्रेड यांनीं स्थानिक कर बसवून त्यांतून शाळांची स्थापना करावी, असें प्रतिपादणारें बिल पुढें आणिलें. ७ ते १४ वर्षांच्या मुलांना लिहिणें, वाचणें व हिशेब ठेवणें एवढें मोफत शिक्षण दिलें जावें, हा त्यांचे बिलाचा आशय होता. हें बिल कॉमन्स् सभेमध्यें पास झालें, परंतु लॉर्डाच्या सभेंत तें पास न झाल्यानें त्याचा अम्मल होऊं शकला नाहीं.

१८१५ मध्यें **व्हिटब्रेड** वारला. त्यांचे मागून लोकशिक्षणाची बाजू उचलून धरणारा **ब्राऊहॅम** १८१६ मध्यें आला. त्याचे खटपटीनें देशांतील गरीब लोकांच्या शिक्षणाच्या प्रश्नाची चौकशी करण्याकरतां एक कमिटी निवडण्यांत आली. या कमिटीनें दोन वर्षें काम केलें व या कमिटीच्या रिपोर्टानंतर 'इंग्लंड व वेल्स येथील गरिबांचे शिक्षणाची सुधारणा' करण्याकरतां १८२० मध्यें एक बिल पार्लमेंटपुढें मांडिलें गेलें.

ही पार्श्वभूमि लक्षांत घेतली म्हणजे मिशनऱ्यांच्या चळवळीला इंग्लंडमध्यें पाठबळ कसें मिळत होतें व त्यामुळें कंपनीला शिक्षणदानाची आपली जबाबदारी कशी स्वीकारावी लागली, हें समजण्यासारखें आहे. ही जबाबदारी पार पाडणें मात्र सोपें नव्हतें. त्यावेळीं खुद्द इंग्लंडमध्यें देखील लोकांना शिक्षण देणें, हें सरकारचें कर्तव्य आहे हें तत्त्व मानलें जात नव्हतें. अर्थात् हिंदुस्थानांत कंपनीनेंही तें मान्य केलें नाहीं. दुसरें असें कीं कंपनीचा हेतु पैसा मिळविणें हा होता; परोपकार करणें हा नव्हता. त्यामुळें ज्या योगानें फायदा कमी अशा जबाबदाऱ्या स्वीकारण्यास तिची तयारी नसे. तिसरी गोष्ट म्हणजे हिंदी लोकांचें स्वतः या कार्याकडे लक्ष नव्हतें. मोगल साम्राज्यानंतर उत्पन्न झालेल्या अराजकतेमुळें ते अगदीं जर्जर झाले होते, व देशामध्यें कायदा व सुस्थिति प्रस्थापित व्हावी, हेंच त्यांचें राज्यकर्त्यांजवळ मागणें होतें. त्यांचें सुदैव हेंच कीं, ते स्तब्ध बसले असतांही इंग्लंडमधील व हिंदुस्थानांतील धार्मिक प्रवृत्तीच्या परोपकारी माणसांनीं यशस्वी चळवळ सुरू केली. या माणसांमध्यें **बर्क, चार्लस् ग्रँट, विल्बरफोर्स व लॉर्ड मिंटो** यांचा प्रामुख्यानें समावेश होतो.

६. **बर्कसाहेबांनीं** हिंदुस्थानची जी कामगिरी बजावली ती केवळ शिक्षणविषयक नव्हती. **वॉरन हेस्टिंगच्या** खटल्याचे वेळीं विशेषतः त्यांनीं हिंदुस्थानसंबंधीं जीं भाषणें पार्लमेंटमध्यें केलीं, त्यांनीं हिंदुस्थानचे प्रश्न

पार्लमेंटच्या डोळ्यापुढें उभे केले. केवळ पैसा मिळविण्याकरतां वसलेल्या कंपनीपासून व तिच्या स्वार्थी नोकरांपासून हिंदी जनतेचें रक्षण करावें व तिचे कल्याणाचा मार्ग शोधून काढावा, हें इंग्लंड सरकारचें कर्तव्य आहे, अशी भावना त्यानें जागृत केली. यामुळें आजच्या शिक्षण पद्धतीचा पाया रोवला गेला, इतकेंच नव्हे तर, इतरही सुधारणा घडून आल्या.

बर्क हा परोपकारी गृहस्थ होता. हिंदी लोकांना तुडविलें जात आहे, हें पाहून त्याचें अंतःकरण कळवळलें. त्याच्याच प्रवृत्तीच्या ग्रँट आणि विल्बरफोर्स या थोर गृहस्थांनीं हिंदुस्थानचा प्रश्न हातीं घेतला. शिक्षणाशिवाय हिंदी लोकांची आर्थिक व नैतिक सुधारणा होणार नाहीं, असें त्यांचें म्हणणें होतें. परंतु शिक्षण आणि धर्म हीं एकच आहेत, अशी त्यांची समजूत झाल्यानें ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाल्याशिवाय शिक्षण वाढणार नाहीं, असें त्यांना वाटत होतें. असें गृहीत धरावयास तत्त्वतः कांहीं कारण नव्हतें. हा त्यांचा समज चुकीचा होता, ही गोष्ट, हिंदुस्थानांतील इंग्रजी शिक्षणाचा जो भावी इतिहास निर्माण झाला, त्यानें सिद्ध केली आहे. कै. एम्. आर. परांजपे यांनीं म्हटल्याप्रमाणें ज्या तरुणांनीं आपल्या धर्मातील वेडगळ समजुती सोडून दिल्या ते ख्रिस्ती धर्मातील अशा समजुती मान्य करण्यास तयार नव्हते. ख्रिस्ती धर्म वाढविल्याशिवाय शिक्षण वाढणार नाहीं, ही समजूत केवळ ग्रँट आणि विल्बरफोर्स यांचीच होती असें नाहीं. त्यांच्या विचाराची आणखी बरीच मंडळी होती. त्यांचीं मतें कांहींही असलीं तरी शिक्षणाची बाजू त्यांनीं उचलून धरल्याबद्दल हिंदुस्थाननें त्यांचे ऋणी राहिलें पाहिजे. मात्र ही गोष्ट खरी कीं ग्रँट आणि विल्बरफोर्स यांच्यासारख्या धार्मिक प्रवृत्तीच्या माणसापेक्षां केवळ परोपकार बुद्धीनें काम करणाऱ्या बर्क, मेटकाफ् व मेकॉले या साहेबांचे आभार विशेष मानले पाहिजेत.

७. **ग्रँट साहेबांचे विचार**:—'ग्रेट ब्रिटनच्या आशिया खंडांतील प्रजेची स्थिति, नीति व ती सुधारण्याचे उपाय' यावर ग्रँट साहेबांनीं आपले विचार १७९२ मध्यें प्रगट केले. हिंदी समाजाची बिघडलेली स्थिति पूर्ण अतिशयोक्तीनें रेखाटल्यानंतर ती सुधारण्याचे उपाय ग्रँट-साहेब खालीलप्रमाणें सुचवितात.

" अंधःकार नाहींसा करावयाचा म्हणजे प्रकाश पाडला पाहिजे. हिंदु लोक चुकतात, कारण ते अज्ञानी आहेत व त्यांच्या चुका त्यांच्यापुढें नीट मांडल्या गेल्या नाहींत. आपण त्यांना ज्ञान दिल्यास त्यांची आपत्तींतून सुटका होईल. हें ज्ञान दोन प्रकारांनीं देतां येईल, एक त्या त्या मातृभाषेंतून किंवा दुसरें आपल्या इंग्रजी भाषेंतून. एकदां भाषा आली म्हणजे त्या भाषेच्याद्वारें, कला तत्त्वज्ञान व धर्म यांसारख्या अनेक विषयांचें ज्ञान देतां येईल. हें ज्ञान त्यांना मिळूं लागलें, म्हणजे हळू हळू अज्ञानरूपी वृक्ष उन्मळून पडेल. सरकारनें थोडासा खर्च केल्यास, सर्व प्रांतांमधून इंग्रजी लिहिण्यावाचण्याच्या मोफत शाळा, सहज चालवितां येतील. हजारो तरुण या शाळांत दाखल होतील व क्रमिक पुस्तकांतून दिलें जाणारें अनेक विषयांचें ज्ञान त्यांना मिळूं लागेल. थोड्याच वेळांत हेच हिंदु दुसऱ्यांना इंग्रजी भाषा शिकवूं लागतील. व्यवहारामध्यें इंग्रजी भाषेचा फैलाव होऊ लागला म्हणजे एका पिढींतच इंग्रजी भाषा सर्वत्र पसरलेली दिसून येईल. सरकारचें या कामीं प्रोत्साहन मात्र पाहिजे, म्हणजे कांहींही अशक्य नाहीं. त्यांची यश मिळविण्याची जर इच्छा असेल तर तें यश त्यांना मिळालेंच पाहिजे. सरकार दरबारीं, आज जेथें पर्शियन भाषा सुरू आहे तेथें, इंग्रजी भाषा सुरूं झाली व इंग्रजी शिक्षणाच्या मोफत शाळा निघूं लागल्या म्हणजे इंग्रजी शिक्षणाचा प्रसार होण्यास कितीसा अवकाश आहे! लोकांना आपलें हित कशांत आहे हें कळतेंच."

८. **विल्बरफोर्स** (१७५९ ते १८३३) गुलामाची चाल बंद करण्यामध्यें ज्यानें पुढाकार घेतला होता, तो हा **विल्बरफोर्स** ज्या धार्मिक पंथाचे **चार्लस ग्रँट** व **झाचरी मेकॉले** (लॉर्ड मेकॉले यांचे वडील) हे सभासद होते, त्याच पंथाचा तोही सभासद होता. १७८० मध्यें ते पार्लमेंटचे सभासद झाले व हिंदुस्थानच्या प्रश्नामध्यें लक्ष घालण्यास त्यांनीं

सुरवात केली. १७९३ मध्यें कंपनीला पुनः सनद देण्याची वेळ आली. त्या वेळीं त्यानें खालील दुरुस्ती सुचविली.

"वरील शिक्षणाचा उद्देश साध्य व्हावा यासाठीं शिक्षक, धर्मोपदेशक वगैरे होतील या हेतूनें योग्य माणसांची नेमणूक करून त्यांना हिंदुस्थानांत वेळोवेळीं पाठविण्याचा अधिकार कंपनीच्या अधिकाऱ्यांना देण्यांत येत आहे."

अधिकाऱ्यांनीं या सूचनेस जोराचा विरोध केला. धर्मापासून अलिप्त राहिल्यानेंच हिंदुस्थानांतील आपले राज्यास मजबुती येणार आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या चळवळीमुळें हिंदी लोकांशीं आपलें वितुष्ट येणार आहे, हें त्यांना आतां कळून चुकलें होतें. **विल्बरफोर्सचे** मताप्रमाणें धार्मिक शिक्षण देण्याची बाब जरी सोडून दिली तरी, केवळ शिक्षण देण्यासही ते फारसे तयार नव्हते. म्हणून आर्थिक व राजकीय दृष्टीचा विचार करून त्यांनीं असें मत दिलें कीं, हिंदु लोकांना धर्म व नीति चांगली कळत असून त्यांना बाटविणें म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे. या मतामुळें पार्लमेंटनें **विल्बरफोर्सची** सूचना अमान्य केली. या पराभवानंतरही **ग्रँट** व **विल्बरफोर्स** यांनीं पूर्वीप्रमाणें एकत्र काम करून नवीन विचाराची ज्योत तेवत ठेविली.

९. मिंटो साहेबांचें पत्रक:—इंग्लंडमधील या खटपटी लोकांचे बरोबर, हिंदुस्थानांतील कंपनीच्या अधिकाऱ्यांनींही हिंदी शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतला. अशा लोकांमध्यें हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल **लॉर्ड मिंटो** (१८०६ ते १८१३) हे प्रमुख होते. **मिंटो** हे पौर्वात्य विद्येचे भोक्ते होते व या विद्येचा अभ्यास करणें, हें पाश्चिमात्य देशाच्या हिताचें आहे, असें त्यांचें मत होतें, व म्हणून इंग्रज लोकांनीं हिंदी संस्कृतीचें रक्षण करण्यास उत्तेजन द्यावें, असें त्यांस वाटे. १८११ चे पत्रकामध्यें त्यांनीं असें सुचविलें कीं 'देशी शिक्षणाला पूर्वी राजे, सरदार, किंवा इतर श्रीमंत यांचेकडून जशी मदत मिळाली होती तशी मदत आतां बंद

झाल्यानें देशी पद्धतीच्या शिक्षणाचा ऱ्हास होऊं लागला आहे. म्हणून कंपनीनें देशी शिक्षणाला पूर्ण साहाय्य द्यावें.

१०. **१८१३ मधील सनदी कायदा:**—इंग्लंड व हिंदुस्थान येथें चाललेल्या या खळबळीचा परिणाम असा झाला कीं, १८१३ साली कंपनीला पुनः सनद देण्याची जेव्हां वेळ आली तेव्हां भारतीय शिक्षणाचा प्रश्न उपस्थित झाला. भारतीय शिक्षणाचा प्रसार करावयास अधिक उपयुक्त साधन कोणतें, हा मुख्य वादाचा विषय होता. चार्लस ग्रँटचे मताप्रमाणें एका पक्षाचें असें मत होतें कीं, हिंदी लोकांना इंग्रजी भाषा व ख्रिस्ती धर्माचीं तत्त्वें शिकवावीं व हें सर्व काम सर्वस्वी मिशनरी लोकांकडे सोपविण्यांत यावें. दुसरा पक्ष मिंटो साहेबांचें मतानुरोधानें असें प्रतिपादन करीत होता कीं, हिंदी लोकांना त्यांच्या संस्कृत, अरेबिक या भाषांचें शिक्षण द्यावें व कंपनीनें या बाबतींत त्यांना सढळ हातानें मदत करावी. त्यांचें असेंही म्हणणें होतें कीं कंपनीच्या कारभाराला कोणत्याहि प्रकारें धोका येऊं नये, यासाठीं कंपनीनें धार्मिक बाबतींत उदासीनता स्वीकारणें जरूर असल्यानें मिशनरी लोकांना कोणत्याही प्रकारची मदत देण्यांत येऊं नये. या वादामध्यें अखेर मिशनऱ्यांनीं हिंदुस्थानांत जाऊन रहावें, असा ठराव कॉमन्स सभेंत पास झाला. तरी पण प्रतिपक्षानेंही या मिशनरी लोकांवर मात करून खालील मजकूर सनदेमध्यें समाविष्ट करवून घेतला.

"एक लाखापेक्षां कमी नाहीं एवढी रक्कम बाजूला काढून ठेवण्यांत यावी, व या रकमेंतून हिंदी पंडितांस व त्यांचे वाङ्मयाचे पुनरुज्जीवनास मदत करण्यांत यावी, व शास्त्रीय ज्ञानाचें शिक्षणाचा लोकांत प्रसार करण्यांत यावा."

मिशनरी लोकांच्या धाडशी उचापतीला अशा रीतीनें कोलदांडा घालण्याचा हा खात्रीचा मार्ग होता. हा विशिष्ट मजकूर सनदेमध्यें समा-

विष्ट करण्यानें आपण सरकारी शिक्षण पद्धतीचा पायाच घालीत आहोंत, याची त्यांना कल्पना नव्हती.

१८१३ ची सनद म्हणजे हिंदी शिक्षणाच्या इतिहासांतील महत्त्वाची गोष्ट होय. ही सनद म्हणजे ग्रँट व विल्बरफोर्स यांच्या वीस वर्षांच्या खटपटींना आलेलें गोड फळ होय. हिंदी लोकांना शिक्षण देणें हें कंपनी सरकारचें एक कर्तव्य होऊन बसले. शिक्षणासाठीं बरीच मोठी रक्कम खर्च होऊं लागली. हिंदुस्थानांत मिशनरी लोक मोठ्या प्रमाणांत येऊं लागले व इंग्रजी शाळा स्थापन करूं लागले. आधुनिक शिक्षणाचा पाया अशारीतीनें रोवला गेला.

प्रकरण तिसरें

प्रयोगाचा काळ

(१८१३ ते १८३३)

१८१३ ते १८३३ चा वीस वर्षांचा काळ शिक्षण क्षेत्रांत अनेक प्रयोग करण्यांत गेला. १८१३ च्या सनदेमध्यें शिक्षणाचे दोन हेतु निश्चित करण्यांत आले होते. एक वाङ्मयाचें पुनरुज्जीवन व त्याची सुधारणा व दुसरा लोकांमध्यें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार. परंतु हे हेतु कोणत्या मार्गांनीं साध्य करावयाचे याविषयीं स्पष्ट धोरण कांहीं ठरलें न गेल्यानें पुनः वाद निर्माण झाले. १८१३ नंतर हिंदुस्थानाशीं संबंध असलेल्या युरोपियनांमध्यें विचाराचे तीन प्रवाह निर्माण झाल्याचें दिसून येईल.

(१) बंगालमधील कंपनीचे जुने अधिकारी एका पंथांत मोडत असत. त्यांना **वॉरन हेस्टिंगज्** व **मिंटो** यांचें म्हणणें पूर्ण मान्य होतें. संस्कृत व अरेबिक भाषांचें शिक्षणास उत्तेजन देऊन या भाषांच्याद्वारें पाश्चिमात्य शास्त्राचा व ज्ञानाचा प्रसार करणें हें त्यांचें ध्येय होतें.

(२) **मनरो** व **एल्फिन्स्टन** यांचा दुसरा पंथ होता. शिक्षणाचा प्रसार हा चालू हिंदी भाषांतून व्हावा, असें त्यांचें मत होतें. बहुजन-समाजापर्यंत ज्ञान पोहोंचवावयाचें असेल तर त्याला हा एकच मार्ग आहे, असें ते प्रतिपादीत.

(३) **ग्रँटसाहेबांचे** मताला मान देणारा तिसरा वर्ग होता. पाश्चिमात्य शिक्षणाचा प्रसार हा इंग्रजी भाषेचें माध्यम ठेवल्यानें होणार आहे, असें त्यांचें म्हणणें होतें. या वर्गामध्यें मिशनऱ्यांचा व कंपनीच्या तरुण


अधिकाऱ्यांचा समावेश होत असे. प्रथम प्रथम त्यांच्या मताला फारसा जोर चढला नाहीं, परंतु पुढें तें मत बरेंच प्रबळ झालें.

या तीन पंथाप्रमाणें शिक्षणाचा विचार करणाऱ्या हिंदी लोकांमध्येंही तीन पक्ष निर्माण झाले. (१) जुन्या विचाराचीं माणसें हीं वरील पहिल्या पंथाचे मतास चिकटून राहिलीं. (२) मुंबईतील विद्वानांनीं दुसऱ्या मताचें अनुकरण केलें, व (३) बंगालमधील **राजा राममोहन राय** सारख्या माणसांना तिसरा पंथ आवडला. परंतु ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं, हिंदी लोकांच्या मताचा कोणताही परिणाम सरकारावर होत नसे. कंपनीच्या युरोपिअन नोकर वर्गाच्या पक्षोपपक्षावर व त्यांच्या मतावर शिक्षणाचें धोरण अवलंबून असें.

हीं भांडणें **कोर्ट ऑफ डायरेक्टर्स** यांना मिटवितां आलीं असतीं, डायरेक्टर्सनीं आपलें मत जाहीर करून तें नोकरवर्गास स्वीकारावयास लाविलें असतें, तर शिक्षणाचें पाऊल अधिक झपाट्यानें पडलें असतें. परंतु एकमत करण्यास तेच तयार नव्हते. प्रत्येक पक्षाशीं कांहीं बाबतींत ते सहमत असले, तरी तिन्ही पक्षांशीं त्यांचा विरोध होता. जे लोक त्यांचेकडे येतील त्यांचे मताला मान देऊन त्यांचें म्हणणें किंवा मागण्या ते मान्य करीत असत. हें धोरण, किंवा योग्य शब्दांत सांगावयाचें म्हणजे धोरणाचा अभाव, शिक्षणाबद्दल त्यांना वाटत असलेली बेफिकीरी दर्शवीत होते.

२. या काळांत घडलेल्या गोष्टींचे खालीलप्रमाणें पांच भाग पाडतां येतील.

(१) बंगालमधील अधिकाऱ्यांचे प्रयत्न.
(२) मुंबईमधील अधिकाऱ्यांचे प्रयत्न.
(३) मद्रासमधील अधिकाऱ्यांचे प्रयत्न.
(४) मिशनऱ्यांचें कार्य.
(५) हिंदी लोकांचें कार्य.


ग्रंथालय
अनुक्रमांक 12370
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

३. बंगाल प्रांत:—कोर्ट ऑफ डायरेक्टरांचे उदार धोरणामुळें बंगाल प्रांतांत प्रथम शिक्षणाचे सुधारणेस प्रारंभ झाला. १८२३ मध्यें १७ जुलैला, गव्हर्नर जनरलानें बंगाल प्रांताकरितां 'लोक शिक्षण समिति' स्थापन केली. त्या समितींत दहा लोक होते व या दहांत, **मेकॉलेसाहेब,** पौर्वात्य पंडित **एच्. एम्. विल्सन** यांना विरोध केल्यामुळें प्रसिद्धि पावलेले **एच्. टी. प्रिन्सेप,** हेही होते. १८१३ चे सनदी कायद्यानें मंजूर केलेले एक लाख रुपये या समितीचे स्वाधीन करण्यांत आले.

या समितीमध्यें संस्कृत व अरेबिक भाषेचे पुरस्कर्ते बरेच असल्यानें **मिंटोसाहेबांचे** मताप्रमाणें पौर्वात्य भाषांना प्रोत्साहन देण्याचें ठरलें ही कांहीं आश्चर्य करण्याची गोष्ट नव्हे. १८२३ ते १८३३ च्या काळांत समितीनें (१) कलकत्ता, मद्रास व बनारस संस्कृत महाविद्यालय यांची सुधारणा केली. (२) १८२४ मध्यें कलकत्त्यास संस्कृत महाविद्यालय स्थापन केलें. (३) आग्रा व दिल्ली येथें दोन पौर्वात्य महाविद्यालयें स्थापिलीं. (४) मोठ्या प्रमाणावर संस्कृत व अरेबिक पुस्तकांची छपाई व प्रकाशन सुरू केलें. आणि (५) इंग्रजी भाषेंतील ज्ञान पौर्वात्य महित भाषांत आणण्यासाठीं पौर्वात्य पंडितांची नेमणूक केली.

ही समिती नेमल्याबरोबर तिला विरोध होऊं लागला. पहिला विरोध **राजा राममोहन रायसारख्या** विद्वानांकडून झाला. ११ डिसेंबर १८२३ ला **राममोहननें** आपलें म्हणणें गव्हर्नर जनरलकडे सादर केलें. कलकत्त्यास होऊं घातलेलें संस्कृत महाविद्यालय बंद करण्यांत यावें व उदार शिक्षणाची दिशा स्वीकारून, गणित, पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, शरीर शास्त्र व इतर उपयुक्त शास्त्रें शिकविण्यांत यावींत. युरोपमध्यें शिकून तयार झालेल्या कांहीं थोड्या लोकांच्या मदतीनें, सर्व साधनांनीं सज्ज असें महाविद्यालय स्थापन करावें. हातीं असलेल्या पैशांतून हें सर्व करतां येईल, असें त्यांचें म्हणणें होतें. या एका गोष्टीवरून विचाराचे वारे कोणत्या दिशेनें वहात होते व इंग्रजी शिक्षणाची

आवड लोकांमध्यें कशी निर्माण झाली होती, हें स्पष्ट होत आहे. परंतु या म्हणण्याकडे सरकारनें लक्ष दिलें नाहीं व कलकत्त्यास संस्कृत महाविद्यालय स्थापण्याचें निश्चित झालें.

कंपनीच्या धोरणास दुसरा जोराचा तडाखा कोर्ट ऑफ डायरेक्टर्स यांनीं दिला. १८ फेब्रुवारी १८२४ च्या खलित्यांत ते लिहितातः—

" शिक्षण संस्थांची सुधारणा व्हावी म्हणून ज्या योजनेकडे आमचें लक्ष वेधण्यांत येत आहे, ती मूलतः चुकीच्या पायावर आधारलेली आहे. केवळ हिंदु व मुस्लीम वाङ्मय शिकविण्याकरितां शाळा स्थापन करण्यानें तुम्ही कुचकामी असें शिक्षण देण्यास स्वतःला बांधून घेत आहांत, असें आम्हांला वाटतें. "

या खलित्यामुळें कमिटी पुनः विचार करूं लागली. डायरेक्टर्स कमिटीला प्रगतीचें पाऊल टाकण्यास जोरानें प्रवृत्त करीत होते व त्यांना या कामीं गव्हर्नर जनरलचाही थोडा बहुत पाठिंबा होता. परंतु कमिटीला पंडितांचें व लोकांचें मत काय आहे, हें माहीत असल्यानें, नवीन दिशेनें जाण्यास ती धजत नव्हती. कमिटीचें मत असें होतें कीं, हिंदु व मुसलमान यांचा इंग्रजी शिक्षणाला जोराचा विरोध असून पौर्वात्य वाङ्मय उपयोगी असल्यानें, तें एकाएकीं टाकून देण्यास लोक तयार नाहींत; म्हणून महित भाषांचें माध्यम ठेवणें अपरिहार्य आहे. या माध्यमामधून युरोपिअन शास्त्रांचें ज्ञान देण्यास शिक्षक व पुस्तकें नाहींत, हें जरी खरें असलें तरी, कमिटी हीं पुस्तकें तयार करण्याचा व योग्य शिक्षक विनीत करण्याचा प्रयत्न करीत आहे. लवकरच डायरेक्टरांच्या सूचनेप्रमाणें सर्व गोष्टी घडून येतील. डायरेक्टरांनींही हें कमिटीचें म्हणणें मान्य केलें व कमिटीनें महित भाषांना प्रोत्साहन देण्याचें काम तसेंच चालूं ठेवलें.

परंतु इंग्रजी शिक्षणाला लोकांचा पाठिंबा हळूहळू वाढूं लागला. याला अनेक कारणें झालीं. (१) मिशनरी लोकांनीं इंग्रजी शिक्षणाविषयीं लोकांमध्यें आवड निर्माण केली. (२) **राजा राममोहन राय** सारख्या सुधारकांनीं लोकांना इंग्रजी भाषा शिकण्यास व भाषेच्या द्वारें पाश्चिमात्य

शास्त्रीय ज्ञान संपादन करण्याचा आग्रह केला. (३) राजकारणांत राज्यकर्त्यांची भाषा म्हणून इंग्रजीचें महत्त्व वाढूं लागलें. ज्यांना अधिकाराच्या जागा पाहिजे होत्या त्यांना इंग्रजी भाषा बोलतां व लिहितां येणें आवश्यक झालें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, समाजांत मानाचें स्थान मिळविण्यासाठीं व चांगल्या उत्पन्नाचा धंदा साध्य करण्यासाठीं इंग्रजी भाषा, हा एक राजमार्ग होऊन बसला. यामुळें नवीन पिढीच्या लोकांना इंग्रजी ज्ञान हेंच आपल्या भाग्योदयाचें साधन आहे, असें वाटावयास लागलें, यांत आश्चर्य नाहीं.

लोकांकडून इंग्रजीची जोराची मागणी होत असतां सरकारच्या शिक्षण समितीला ती नाकारणें शक्य नव्हतें. म्हणून १८२३ सालीं कमिटीनें आग्र्याचें महाविद्यालय व कलकत्त्याचा मद्रासा यांना इंग्रजी वर्ग जोडण्यांत आले. परंतु या अर्धवट योजनांनीं लोकांचें समाधान होईना. लोकांचा रोष ओढूं नये म्हणून महित भाषांचें शिक्षण देण्याचें कमिटीनें १८२३ सालीं ठरविलें, हें ठीक होतें; परंतु लोकांची नवी मागणी होत असतां, पूर्वीच्याच धोरणास चिकटून रहाण्यानें कमिटीच्या सभासदांमध्यें दुमत निर्माण झालें. कांहींच्या मतें हिंदु मुस्लीम संस्कृतीचें शिक्षण चालूं ठेवावयाचें होतें, तर कांहींच्या मतें इंग्रजी भाषेच्या द्वारें पाश्चिमात्य ज्ञानाचा प्रसार करावयाचा होता. ध्येयामध्यें बदल झाल्यामुळें शिक्षणाचें माध्यम काय असावें याविषयीं संस्मरणीय असा वाद निर्माण झाला. त्याचा विचार पुढील प्रकरणांत करण्यांत येईल.

८. मुंबई प्रांतांत सरकारी अधिकाऱ्यांनीं शिक्षणाचा प्रसार करण्याकरतां काय प्रयत्न केले ते आपण पाहूं. १८१८ मध्यें पेशवाई लयास गेली, व आजचा मुंबई प्रांत बनविण्यांत आला. ब्राह्मणांना दक्षिणा वांटण्यासाठीं पेशवे सरकार पांच लाख रुपये खर्च करीत. हा खर्च थांबवून त्याचा कांहीं भाग वैदिक शिक्षणाचे उत्तेजनार्थ खर्च करण्यांत यावा असें ठरलें व त्याप्रमाणें १८२१ मध्यें पुण्यास संस्कृत महाविद्यालय

स्थापन झालें. समाजांतील प्रमुख ब्राह्मण वर्गास खूष करण्यासाठीं व हिंदी शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठीं ज्याप्रमाणें बनारसचें संस्कृत महाविद्यालय निर्माण करण्यांत आलें, त्याच कारणासाठीं हें महाविद्यालय स्थापण्याचें ठरलें.

१८२३ सालापर्यंत पुणें येथें संस्कृत महाविद्यालयाची स्थापना, एवढेंच शैक्षणिक कार्य मुंबई सरकारनें केलें होतें. **दॅंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें** या सालीं सरकारकडे मदतीची मागणी केली. या मागणीस उत्तर म्हणून **एल्फिन्स्टन**साहेबांचें एक पत्रक प्रसिद्ध झालें. मुंबई प्रांतांत शिक्षणाची योजना कशी असावी याविषयींचे विचार या पत्रकामध्यें विशद केले असल्यानें, या पत्रकास बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. सरकारनें सात गोष्टी कराव्यात असें त्यांनीं सुचविलें होतें त्या अशा :—

(१) शाळांची संख्या वाढविणें व त्यांतील शिक्षणाची पद्धत सुधारणें. (२) शाळांना पाठ्य पुस्तकें पुरविणें. (३) समाजांतील खालच्या लोकांना या शिक्षणाच्या संधीचा फायदा घेण्यास उत्तेजन देणें (४) जेथें युरोपियन शास्त्रें शिकविलीं जातील अशा शाळा स्थापन करणें व उच्च शिक्षणाच्या शाळा सुधारणें. (५) देशी भाषांतून विज्ञानशास्त्राची व नैतिक ज्ञानाचीं पुस्तकें प्रसिद्ध करणें (६) इंग्रजी भाषेचा सखोल अभ्यास करण्यासाठीं व युरोपियनांनीं केलेल्या शोधांचें ज्ञान मिळविण्यासाठीं, इंग्रजी शिक्षणाच्या शाळा स्थापन करणें. (७) या शाळांतून हें ज्ञान घेणाऱ्या नागरिकांना उत्तेजन देणें.

जेव्हां हें पत्रक गव्हर्नरचे कौन्सिलपुढें ठेवण्यांत आलें त्यावेळीं कौन्सिलचे एक सभासद, मिस्टर **वॉर्डन**, यांनीं या पत्रकास विरोध केला. बहुजन समाजाला शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारनें आपल्या अंगावर घेऊं नये, असें त्यांचें म्हणणें होतें. 'सरकारनें समाजाचे वरचे थरांतील लोकांना शिक्षण द्यावें, म्हणजे आपोआप तें गळून खालच्या थरावरील लोकांना मिळूं शकेल,' या विचाराचे जे पूर्वीचे अधिकारी होते,

त्या विचाराचे मिस्टर वार्डन हे होते. इंग्रजी शिक्षणास ते बरेंच महत्त्व देत होते व अगोदर प्राथमिक शिक्षण देऊन नंतर बऱ्याच काळानें इंग्रजी शिक्षण देण्याची **एल्फिन्स्टन**साहेबांची कल्पना त्यांना मान्य नव्हती. ते लिहितात:—

"पुष्कळांना थोडें शिक्षण देण्यापेक्षां थोड्यांना पुष्कळसें शिक्षण देणें जास्त हितावह आहे. इमारतीचा पाया मजबूत घालणें जास्त श्रेयस्कर असून ज्या कामाला शंभर वर्षें लागतील तें एका दिवसांत करण्याचा प्रयत्न करूं नये. थोड्या लोकांना जें शिक्षण द्यावयाचें तें योग्य पद्धतीनें दिलें गेलें पाहिजे. लोकांमध्यें शिक्षण प्रसार करण्याचा खरा मार्ग म्हणजे त्यांना इंग्रजी शिक्षण देणें हा आहे. हा उद्देश मुख्य—दुय्यम नव्हे—समजला गेला पाहिजे."

एल्फिन्स्टन व **वार्डन** यांच्या मतभेदांमुळें एल्फिन्स्टनसाहेबांच्या अनेक सूचना **कोर्ट—ऑफ—डायरेक्टर्स** यांनीं अमान्य केल्या. १८३२पर्यंत मुंबई सरकारचें शिक्षण कार्य म्हणजे पुण्याचें संस्कृत महाविद्यालय चालविणें, व बॉंबे एज्युकेशन सोसायटी व बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी यांना मदत देणें, एवढेंच राहिलें.

५. मद्रास प्रांत :—शिक्षण क्षेत्रांत मद्रास प्रांताचा नंबर शेवटीं लागला. १८२२ सालीं **मनरो**साहेबांनीं स्थानिक शिक्षणाची काय परिस्थिति आहे हें पाहण्यासाठीं एक पत्रक काढलें होतें. पत्रकावरून जी माहिती गोळा झाली, तीवरून त्यांना असें दिसून आलें कीं सरकारच्या मदतीचे अभावी व लोकांच्या दारिद्र्यामुळें या प्रांतांतील शिक्षण फारच मागासलेलें आहे. याला उपाय म्हणून १०मार्च १८२६ चे पत्रकांत त्यांनीं खालील गोष्टी सुचविल्या. मद्रासच्या स्कूल बुक कमिटीला योग्य पुस्तकाचें प्रकाशन करण्यासाठीं मदत देण्यांत यावी. प्रत्येक जिल्ह्यांत दोन—एक हिंदूकरितां व एक मुसलमानांकरतां—व तालुक्यामध्यें एक, अशा शाळा स्थापन करण्यांत याव्यात. यासाठीं पन्नास हजार रुपयांपर्यंत खर्च करण्यांत यावा. १८२८ मध्यें **कोर्ट—ऑफ—डायरेक्टर्स्** यांनीं या **मनरो**च्या सूचना मान्य केल्या. परंतु **मनरो** हे १८२७ सालीं निवर्तल्यामुळें व त्यांच्यामागून

येणाऱ्यांना याविषयीं फारशी कळकळ न वाटल्यामुळें या प्रयोगाकडे त्यांनीं मनापासून लक्ष घातलें नाहीं. १८३० पर्यंत तालुक्यांतून ७० शाळा स्थापन झाल्या. परंतु ही योजना पूर्णपणें अमलांत येण्यापूर्वीच, म्हणजे १८३० च्या सप्टेंबरमध्यें, डायरेक्टरांनीं असें सुचविलें कीं, मद्रास सरकारनें बहुजन समाजामध्यें शिक्षण प्रसार करण्यापेक्षां इंग्रजी शिक्षणावरच जास्त भर द्यावा. या नवीन धोरणामुळें, मनरोनीं स्थापिलेल्या शाळा जरी बंद झाल्या नाहींत, तरी त्या १८३६ पर्यंत कशातरी चालत राहिल्या व त्यांच्या संख्येंत कोणतीच भर पडली नाहीं. बहुजनसमाजाचे शिक्षणाला अशा तऱ्हेनें धक्का बसला व १८६८ पर्यंत त्यांचेकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं.

६. मिशनऱ्यांचे प्रयत्न:—(१८१३ ते १८३३). १८१३ मध्यें पास झालेल्या सनदी कायद्यामुळें मिशनरी लोकांना हिंदुस्थान खुला झाला, हें मागील प्रकरणांत सांगितलेंच आहे. १८१३ ते १८३३ च्या काळांत कंपनीच्या मुलखांत मिशनऱ्यांनीं बरीच चळवळ केली. ज्या शिक्षणसंस्था पूर्वी काम करीत होत्या त्यांत नवीन संस्थांची भर पडली. या नवीन संस्थांमध्यें जनरल मिशनरी सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, चर्च मिशनरी सोसायटी, वेस्लियन मिशन व स्कॉच मिशनरी सोसायटी इत्यादि संस्थांचा निर्देश करतां येईल.

मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्याचा विचार करतांना दोन गोष्टी आपल्या सहज लक्षांत येतात. पहिली गोष्ट — शिक्षण देणें हा मिशनऱ्यांचा मुख्य उद्देश नव्हता. लोकांना ख्रिस्ती धर्मांत आणणें हा मुख्य हेतु असून अशा तऱ्हेनें बाटलेल्या लोकांची सुधारणा करण्यासाठीं व ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचे कामीं हिंदी लोकांना विनीत करण्यासाठीं, त्यांनीं शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें होतें. दुसरी गोष्ट—देशी भाषांच्या अभ्यासाकडे आद्य मिशनऱ्यांनीं विशेष लक्ष दिलें. त्यांना समाजाच्या खालच्या वर्गामध्यें काम करावें लागत असें व लोकांना स्वतःच्या

भाषेशिवाय कोणतीच भाषा समजत नसे. या कारणामुळें मिशनरी लोकांनीं मोठ्या तत्परतेनें देशी भाषेच्या अभ्यासास सुरवात केली, भाषेचें व्याकरण व कोश तयार केला व बायबलचें भाषांतर केलें. देशी भाषांतून शिक्षण देण्याची सुरवात अगोदर मिशनऱ्यांनीं केली, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. देशी भाषा दुबळी व ओबडधोबड असल्यानें तीमध्यें कोणत्याच पुस्तकाचें भाषांतर होऊं शकणार नाहीं, असें कंपनीच्या अधिकाऱ्याप्रमाणें, त्यांना वाटलें नाहीं.

७. हिंदी लोकांचे प्रयत्न:—देशी शिक्षणाच्या शाळा व महाविद्यालयें ह्यावर हिंदी लोकांनीं भर दिला होता. या प्रकारच्या शिक्षणास मुंबई व मद्रास प्रांतांत मदत मिळत नव्हती. बंगालमध्यें सरकारच्या शिक्षण समितीकडून थोडी मदत अशा शाळांना दिली जात होती. यांपैकीं कांहीं देणग्या नवीन नसून, पूर्वी राजे लोकांकडून ज्या देणग्या मिळत असत त्या कंपनी सरकारनें पुढें चालूं ठेविल्या होत्या, एवढेंच. या मदतीचें स्वरूप कोणतेंही असलें तरी देशी शाळांना मदत देण्याचें धोरण सरकारनें स्वीकारलें होतें असें म्हणतां येणार नाहीं. अधिकाऱ्यांनीं हातीं घेतलेल्या शिक्षण प्रसाराचें योजनेमध्यें, देशी शाळांकडे व महाविद्यालयाकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें गेलें होतें, ही गोष्ट स्पष्ट होत आहे.

(अ) बंगाल :—१८१६ मध्यें **राजा राममोहन रायचे** खटपटीनें एक सोसायटी कलकत्त्यास स्थापन झाली. या सोसायटीचे एक सभासद हिंदी होते. इंग्रजी भाषा, वाङ्मय व युरोपांतील शास्त्र यांचें ज्ञान हिंदूंना करून देणें हा तिचा हेतु होता. या कार्यासाठीं एक लाखावर फंड जमा करून १८१७ मध्यें या सोसायटीनें एक विद्यालय स्थापन केलें. इंग्रजी शिक्षणाची वाढ व्हावी यासाठीं हिंदी लोकांनीं स्थापिलेली ही पहिली संस्था होती. बौद्धिक व नैतिक ज्ञानाचे प्रसारासाठीं योग्य पुस्तकें प्रकाशित व्हावींत, म्हणून १८१७ सालीं कलकत्ता स्कूल बुक सोसायटी निर्माण झाली. त्याचप्रमाणें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं १८१९

मध्यें कलकत्ता स्कूल सोसायटी उदयास आली. या सर्व संस्थांना कंपनी सरकारकडून मदत मिळत असे.

(ब) **मद्रासः**—मद्रासमध्यें मिशनऱ्यांशिवाय शिक्षणाचे बाबतींत खाजगी प्रयत्न फारसे दिसून येत नाहींत. नाहीं म्हणावयास, बंगालप्रमाणें एक मद्रास-स्कूल-सोसायटी स्थापन झाल्याचें दिसून येतें. कंपनीकडून वर्षास सहा हजाराची मदत या संस्थेस मिळत असे.

(क) **मुंबईः**—१८५० मध्यें चर्च-ऑफ-इंग्लंडच्या मुंबईत राहणाऱ्या सभासदांनीं मुंबई-एज्युकेशन-सोसायटी स्थापन केली. तिचा उद्देश युरोपियन शिपायांचे मुलांना शिक्षण देणें हा होता. या संस्थेनें चालविलेल्या शाळांमधून हिंदी लोकांचें मुलांना प्रवेश दिला जात असे. हळूहळू या हिंदी मुलांची संख्या एवढी वाढली कीं त्यांना शिक्षण देण्यासाठीं म्हणून बॉंबे-नेटिव्ह-एज्युकेशन-सोसायटी, या नांवाची स्वतंत्र सोसायटी, १८२२ मध्यें स्थापण्यांत आली. **मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन** या संस्थेचे अध्यक्ष होते.

या सोसायटीनें एक पोट-कमिटी निवडून तिच्याकडे मुंबई प्रांतांतील शिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्याची कामगिरी सोपविली. १८२३ मध्यें या कमिटीनें आपला अहवाल सादर केला. या अहवालाचे सूचनेप्रमाणें खालील गोष्टी करण्याचें ठरलें व सरकारकडे आर्थिक मदतीची मागणी केली गेली.

(१) योग्य पाठ्य-पुस्तकें तयार करणें.

(२) गुजराथी, मराठी, कानडी व उर्दू या चार भाषांतून, प्रत्येकीं सहा याप्रमाणें, हिंदी नागरिकांना निवडून वर्ग-प्रमुखाचें मदतीनें शाळा कशा चालवावयाच्या, याचें शिक्षण द्यावयाचें व अशारीतीनें तयार झालेल्या शिक्षकांच्या मदतीनें प्रांतांतील वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्यें सरकारी प्राथमिक शाळा सुरू करावयाच्या.

(३) इंग्रजी शिक्षणाच्या शाळा स्थापण करणें.

एल्फिन्स्टन साहेबांचे प्रोत्साहनामुळें व मुंबईमधील लोकांनीं मोकळ्या हातानें मदत केल्यामुळें, १८२४ ते १८३३ पर्यंत सोसायटीनें चांगली प्रगति केली.

८. **१८३३ चा सनदी कायदा:**—१८३३ मध्यें कंपनीची सनद नवीन करण्याचा प्रश्न पुनः पार्लमेंटपुढें आला. कोणतेंही नवीन धोरण स्वीकारण्यापूर्वी कंपनीच्या कारभाराची पूर्ण चौकशी करण्याचें पार्लमेंटनें ठरविलें. हाऊस—ऑफ—कॉमन्सनें निवडलेल्या समितीनें त्या वेळच्या शिक्षण पद्धतीसंबंधीं खुलासेवार अहवाल प्रसिद्ध केला असून, हिंदी शिक्षणाच्या इतिहासाच्या अभ्यासूंना त्याचा बराच उपयोग होण्यासारखा आहे.

वीस वर्षांकरितां म्हणून कंपनीला १८३३ मध्यें नव्यानें सनद देण्यांत आली. तीमध्यें प्रत्यक्ष शिक्षण विषयक असें कलम नव्हतें; परंतु सर्वसाधारण कलमांमध्यें हिंदी शिक्षणाचें भावी धोरण सूचित केलें होतें. त्यांत एक कलम असें होतें कीं, कोणाही माणसाला, तो एका विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा आहे म्हणून कंपनीची नोकरी नाकारतां येणार नाहीं. दुसऱ्या कलमानें—सर्व देशाच्या मिशनऱ्यांना हिंदुस्थानांत येण्यास परवानगी देण्यांत आली होती. तिसऱ्यानें—बंगाल सरकारचा ताबा मुंबई व मद्रास सरकारांवर प्रस्थापित करण्यांत आला; व अशारीतीनें बंगालच्या गव्हर्नर जनरलला आपलीं मतें व धोरण त्या दोन्ही प्रांतांवर लादणें शक्य झालें. चवथ्यानें—बंगालच्या गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळावर आजवर जेथें तीनच सभासद असत, तेथें एक जादा सभासद, कायदे—पंडित म्हणून घेण्यांत आला. १८३४ मध्यें हिंदुस्थानांत आलेले **मेकॉलेसाहेब** हे या मंडळाचे पहिले कायदे—पंडित सभासद झाले. त्यांचे आगमनानें हिंदी शिक्षणाचे इतिहासांत नवा मनू सुरू झाला.

प्रकरण चवथें

आधुनिक शिक्षणपद्धतीचा उदय

(१८३३-१८५३)

इंग्रजीविरुद्ध महित भाषा:—लोकशिक्षण समितीच्या सभासदांमध्यें मतभेद झाला, हें आपण मागील प्रकरणांत पाहिलेंच आहे. हा मतभेद प्रामुख्यानें शिक्षणाचें माध्यम काय असावें या प्रश्नावर झाला. १८२३ मध्यें स्थापन झालेल्या या समितीच्या जन्मापासून हे मतभेद सुरू झाले व ते १८३४ मध्यें कळसाला पोहोचले. दहा सभासदांपैकीं पांच जणांनीं शिक्षण, संस्कृत व अरेबिक या भाषांतून देण्यांत यावें, असें प्रतिपादन केलें; इतर पांचांनीं हें शिक्षण इंग्रजी भाषेंतून दिलें जावें, असें प्रतिपादिलें. एकाला प्राच्यभाषानिष्ठ तर दुसऱ्याला आंग्लभाषानिष्ठ अशीं नांवें देतां येतील. बंगाल सरकारच्या शिक्षण खात्याचे सेक्रेटरी **एच्. टी. प्रिन्सेप** हे पौर्वात्त्य पक्षाचे अध्वर्यू होते. या पक्षांत कंपनीचे जुने नोकर होते. इंग्रजी-पक्षांत नेता असा कोणी नव्हता. या पक्षांत कंपनीचे नवीन नोकरांचा समावेश होत होता. गव्हर्नर जनरलचे कार्यकारी मंडळांतील कायदे-पंडित व लोक-शिक्षण-समितीचे अध्यक्ष **मेकॉले-साहेब** यांचेकडून आपणांस पाठिंबा मिळेल, अशी आशा यांना वाटत होती. समितींतील दोन्हीं पक्ष तुल्यबल असल्यानें समितीच्या कार्याचें पाऊल पुढें पडेना. त्याच त्याच मुद्यावर पुनः पुन्हा चर्चा होत असे व शेवटीं चर्चेचा संबंध वादाच्या मुख्य कारणाशीं लावला जात असे. कधीं कधीं तर वादाचा निर्णयच लागत नसे. पुष्कळ वेळां असें घडे कीं जेव्हां एका पक्षाचे कांहीं समासद कांहीं अनपेक्षित कारणामुळें गैरहजर रहात, त्यावेळीं दुसऱ्या पक्षाचे मतांचा विजय होत असे; पण

पुढच्या सभेंत पहिल्या पक्षाचें पाठबळ वाढलें कीं, उलट मताचे ठराव पसार होत; अर्थात् अशा प्रकारची स्थिति फार काळ टिकणें शक्य नव्हतें. १८३५ चे सुरवातीस दोन्ही पक्षांनीं आपलें भांडण गव्हर्नर जनरल यांचेपुढें, त्यांचे निर्णयासाठीं, ठेवण्याचें ठरविलें.

२ प्राच्यभाषानिष्ठांचें म्हणणें:—या पक्षाचें म्हणणें १८१३ च्या सनदी कायद्याच्या ५३ कलमाविषयीं विशेष होतें. या कलमान्वयें प्रत्येक वर्षीं एक लाख रुपये 'वाङ्मयाचें पुनरुज्जीवन व सुधारणा, हिंदी पंडितांना प्रोत्साहन व हिंदुस्थानांतील ब्रिटिश नागरिकांमध्यें शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार' याकरतां खर्च व्हावयाचें होते. यापैकीं पहिल्या दोन मुद्यांसंबंधीं या पक्षाचा युक्तिवाद असा:—

ज्या वाङ्मयाचें पुनरुज्जीवन करावयाचें व ज्यास मदत द्यावयाची तें वाङ्मय म्हणजे हिंदु व मुस्लीम या दोन मुख्य जमातींचें वाङ्मय. या वाङ्मयाचें पुनरुज्जीवन करावयाचें म्हणजे या भाषांच्या ज्या शिक्षण संस्था हयात आहेत त्यांना मदत देणें व नवीन संस्था स्थापणें. तसेंच या भाषांतून आजवर जे हस्तलिखित ग्रंथच उपलब्ध असत, ते छापून प्रसिद्ध करणें. मंजूर केलेल्या रकमेचा कांहीं भाग यासाठीं खर्च होई. विद्वान् पंडितांना प्रोत्साहन देण्याचा हेतु शिक्षण-संस्थांना मदत देतांना व नवीन ग्रंथ प्रकाशित करतांना साध्य होत असे. होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन त्यांचेकडून दीर्घकाळ अभ्यास करून घेण्यानेंही हा हेतु साध्य होत असे. हें सर्व नागरिकांसाठीं व त्यांचे वाङ्मयासाठीं केलें जाई."

शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार, या तिसऱ्या हेतुविषयीं त्यांचें असें म्हणणें होतें कीं, इंग्रजी भाषेविषयीं हिंदी लोकांचे मनांत पूर्वग्रह असल्यामुळें, ज्या भाषेला ते मान देतात व ज्या भाषेशीं पूर्वापार संस्कृतीचा संबंध आल्यामुळें जीविषयीं त्यांना आपुलकी वाटते, त्या भाषेंतून शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार व्हावा म्हणून उपयुक्त इंग्रजी पुस्तकांचें भाषांतर संस्कृत

त्र अरेबिक भाषांत करण्याचा समितीचा प्रयत्न स्तुत्य आहे. १८१३ च्या सनदी कायद्याप्रमाणें आमचीं कामें होत आहेत, व सनदी कायद्यामध्यें बदल केल्याशिवाय चालूं कामाचे धोरणांत तुम्हांला फरक करतां येणार नाहीं, असें प्राच्यभाषानिष्ठांचें आग्रहाचें म्हणणें असे.

दुसरें असें कीं—आपल्या चालू शिक्षण–संस्था टिकविण्यासाठीं पौर्वात्त्य पक्षाची फार खटपट असे. याचे उलट या संस्था बंद व्हाव्यात असा इंग्रजी पक्षाचा प्रयत्न होता. ,वादाचा खरा मुद्दा हाच होता. प्राच्य-भाषानिष्ठांना आपला कमीपणा कशांत आहे, हें माहीत होतें व म्हणून सरकारशीं तडजोड करण्यास तो तयार होता. माहितभाषा किंवा इंग्रजी यांपैकीं कोणतें शिक्षण द्यावयाचें, हा प्रश्न लोकांवरच सोंपवावा, असा त्यांचा आग्रह होता. पौर्वात्य पद्धतीच्या शाळा बंद करण्यास त्यांचा विरोध होता. त्यांचे दृष्टीनें, हें करणें म्हणजे लोकानुवर्ती सरकारी धोरणास विसंगत, नव्हे तर त्या धोरणाचे विरुद्ध होतें. **प्रिन्सेप** हे कलकत्ता मद्रासाबद्दल विशेष कळकळ बाळगीत. मद्रासा ही वॉरन हेस्टिंगजनें विश्वासानें दिलेली देणगी असल्यामुळें ती बंद करणें म्हणजे विश्वासघात करण्यासारखें आहे, असें त्यांना वाटे.

प्राच्यभाषानिष्ठांचे इतर मुद्दे फारसे महत्वाचे नव्हते. उदाहरणार्थ, त्यांचा एक मुद्दा असा होता कीं, इंग्रजी भाषा हिंदी लोक कधींही चांगली शिकूं शकणार नाहींत. हिंदी लोकांवर ती भाषा लादणें, म्हणजे एक प्रकारचा त्यांचेवर जुलूम करण्यासारखें आहे; वगैरे वगैरे. सरकारला हे मुद्दे पटत नसत, कारण इंग्रजी भाषा हस्तगत करण्याचें बुद्धिकौशल्य हिंदी लोकांमध्यें आहे, याची साक्ष ते प्रत्यहीं देत होते. शिवाय सतीची चाल ज्यांनीं बंद केली अशा गव्हर्नर जनरल बेन्टिंकला, लोकांच्या हिताची गोष्ट करीत असतां, त्यांच्या विरोधाची फारशी भीति वाटत नसे.

३ मेकॉले साहेबांचें पत्रक:—आतां दुसऱ्या बाजूचा आपण विचार करूं. या पक्षाची बाजू **मेकॉले** साहेबांनीं पुढें मांडली. लोक–शिक्षण–

समितीच्या बैठकीमध्यें त्यांनीं कोणताच भाग घेतला नाहीं, कारण कार्यकारी सभेचा एक सभासद म्हणून हा प्रश्न आपणांपुढें येणार आहे, ही गोष्ट ते जाणून होते. सभेपुढें जेव्हां तो प्रश्न आला त्यावेळीं, 'नवीन शिक्षणाची दिशा' यावर ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचें एक पत्रक २ फेब्रुवारी १८३५ ला त्यांनीं प्रसिद्ध केलें.

या पत्रकांत विचाराकरतां घेतलेला पहिला प्रश्न म्हणजे १८१३ च्या सनदी कायद्यांतील ४३ व्या कलमाचा अर्थ विशद करणें हा होता. त्यांचे मतें या कलमामध्यें येणाऱ्या 'वाङ्मय' या शब्दामध्यें इंग्रजी वाङ्मयाचाही अंतर्भाव होण्यासारखा आहे. तसेंच 'हिंदी पंडितांमध्यें' लॉकचें तत्त्वज्ञान व मिल्टनची कविता अवगत असणाऱ्या पंडिताचाही समावेश होऊं शकेल. त्याचप्रमाणें ज्ञानाचा प्रसार हा इंग्रजी भाषेचा अवलंब केल्यानेंच होणार आहे, असेंही त्यांनीं प्रतिपादन केलें. हा आपण लाविलेला अर्थ जर स्वीकारला नाहीं, तर सनदी कायद्यांमधून हें ४३ वें कलम गाळण्यास आपण तयार आहोंत, असेंही त्यांचें म्हणणें होतें. **मेकॉले साहेबांनीं** लाविलेला हा अर्थ चुकीचा आहे, असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी तो अर्थ ओढून ताणून आणिलेला आहे, असेंच म्हणावें लागतें.

पौर्वात्य शिक्षण संस्था चालू ठेवण्यांत याव्यात म्हणून पौर्वात्य पक्षाचें जें म्हणणें होतें त्यासही **मेकॉले साहेबांचा** विरोध होता. या संस्था निरुपयोगी असल्यानें त्या बंद करण्यांत याव्यात, असेंच त्यांचें मत होतें. ते म्हणतात:—

" पौर्वात्य शिक्षण पद्धतीच्या चहात्यांनीं दुसरा दावा मांडला आहे. तो जर आपण मान्य केला तर शिक्षणांत कोणताच बदल न करण्यास आपण स्वत:ला बांधून घेतल्यासारखें होणार आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, सध्यांच्या शिक्षण पद्धतीवर लोकांचा विश्वास असून अरेबिक व संस्कृत या भाषांना उत्तेजन देण्याकरतां खर्च होणारा पैसा जर इतर कार्याकरतां खर्च केला तर तो अपव्यय

होणार आहे. कोणत्या विचारसरणीनें ते हा निर्णय घेऊं शकतात, हें मला कळत नाहीं. वाङ्मयाचे उत्तेजनाकरतां ज्या सार्वजनिक फंडांतून पैशाची मदत दिली जाते, त्याच फंडांतून इतर उपयुक्त कार्यांसही मदत केली जाते. उत्तम हवेच्या ठिकाणीं आपण आरोग्यधाम बांधतों; परंतु आपल्या हेतूप्रमाणें तें स्थळ आरोग्यकारक नसेल तर तें धाम चालूं ठेवण्यास आपण बांधलों गेलों आहोंत काय ? आपण इमारत बांधण्यास सुरवात करतों, परंतु पुढें ही इमारत बांधण्यापासून आपला फायदा होणार नाहीं, हें कळून आल्यानंतर, ती जर आपण बंद ठेविली तर, लोकांचा आपण विश्वासघात केला, असें होईल काय ?"

नंतर **मेकॉलेसाहेबांनीं** आज कोणत्या बोधभाषेची जरूर आहे व कोणती हितावह आहे, या प्रश्नाचा विचार हातीं घेतला. लोकांची मातृभाषा, संस्कृत अरेबिक सारखी महितभाषा, किंवा इंग्रजी, या तीन भाषांपैकीं कोणतीही एक भाषा बोधभाषा म्हणून सरकारास सहज निवडतां येईल. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं दोन्ही पक्षांनीं मातृभाषेचा अधिकार काय आहे याचा विचारच केलेला नाहीं. ते लिहितातः—

"दोन्ही पक्षांचें एका बाबतींत मतैक्य असल्याचें दिसतें. जी भाषा लोक बोलतात त्या भाषेंत शास्त्रीय किंवा वाङ्मयीन असें लिखाण नसल्यानें, ती इतर भाषांच्या मदतीनें संपन्न झाल्याशिवाय, कोणत्याही महत्त्वाच्या पुस्तकाचें भाषांतर या भाषेंत होऊ शकणार नाहीं आणि म्हणून ज्यांना बौद्धिक ज्ञान प्राप्त करून द्यावयाचें आहे त्यांना देशी भाषेवर अवलंबून न राहतां, कोणत्या तरी दुसऱ्या भाषेची कास धरावी लागणार, हें उघड आहे."

मातृभाषेला अशारीतीनें बाजूला सारल्यानंतर बोधभाषा म्हणून एका बाजूला असलेली इंग्रजी व दुसऱ्या बाजूला असलेल्या संस्कृत व अरेबिक या दोन महित भाषा, यांपैकीं एक निवडणें ओघानेंच आलें. **मेकॉलेसाहेबांस** संस्कृत किंवा अरेबिक येत नव्हतें. परंतु पौर्वात्य पंडितांचेंच खालील म्हणणें त्यांनीं लोकांपुढें मांडिलें. "हिंदुस्थान व अरेबिया येथील सर्व वाङ्मयाची किंमत युरोपियन पुस्तकालयांतील एका फळीवर सामावणाऱ्या पुस्तकांनीं होणार आहे."

दुसरें असें कीं, इंग्रजी भाषा ही राज्यकर्त्यांची भाषा असल्यानें ती उपयुक्त आहे, पौर्वात्य व्यापारी जगांत ती बोलली जाते, व हिंदुस्थानांतील उच्च वर्गीयामध्यें या भाषेचा प्रसार अगोदरच झाला आहे, अशी स्तुति मेकॉलेसाहेबांनीं मुक्त कंठानें चालविली होती.

इंग्रजी भाषेविषयीं लोकांना तिटकारा वाटतो असें जें कांहीं ठिकाणीं म्हटलें जातें, त्याविषयीं ते लिहितात कीं—लोकांना काय आवडतें यापेक्षां लोकांच्या हिताचें कोणतें आहे, हें इंग्लंडनें ठरविलें पाहिजे. लोकांची आवड विचारांत घेतली पाहिजे, हें घटकाभर ग्राह्य धरलें तरी, लोकांना इंग्रजीबद्दल प्रेम वाटत आहे, हें सिद्ध करण्यास भरपूर पुरावा आहे. लोक-शिक्षण-समितीला महित भाषांतून लिहिलेलीं पुस्तकें खपविणें कठीण जातें, याचे उलट, इंग्रजी भाषेंत लिहिलेलीं पुस्तकें हजारोनीं खपत असून त्यांच्यापासून चांगला फायदाही मिळत आहे, हें सर्व जाणतात. संस्कृत महाविद्यालय व मद्रासा या संस्थांमधून शिक्षण घेण्यासाठीं विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या द्याव्या लागतात, तर इंग्रजी शाळामध्यें स्वतः फी देऊन शिकण्यास येण्याची लोकांची तयारी असते.

धर्म आणि कायदा ज्या महित भाषांतून लिहिला गेला आहे, त्या भाषांचा अभ्यास झाला पाहिजे. या मुद्यावर त्यांचें असें म्हणणें होतें कीं, महित भाषांच्या शिक्षणसंस्थांवर खर्च करण्यापेक्षां सरकारनें हिंदु व मुस्लीम कायद्यांचें भाषांतर इंग्रजीमध्यें करावें.

वरीलप्रमाणें मुख्य कारणें देऊन मेकॉलेसाहेबांनीं पाश्चिमात्य ज्ञानप्रसारासाठीं इंग्रजी हेंच माध्यम असावें असें जोरानें प्रतिपादन केलें, इतकेंच नव्हें तर, चालू असलेल्या महित भाषांच्या शाळा बंद करून त्यायोगें बचत होणारा पैसा इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारासाठीं खर्च करण्यांत यावा, असेंही त्यांनीं सुचविलें.

४ लॉर्ड विल्यम बेंटिकनें हें पत्रक मान्य केलें:—इंग्रजी शिक्षणाचे बाजूनें मेकॉलेसाहेबांनीं जे मुद्दे मांडिले, ते सर्व लॉर्ड विल्यम बेंटिकनें मान्य केले. ७ मार्च १८३५ चे ठरावांत ते लिहितात:—

'लोक–शिक्षण–समितीच्या सेक्रेटरीची गेल्या जानेवारीच्या २१ व २२ तारखेचीं पत्रें, व संबंधीचे कागदपत्र गव्हर्नर जनरल यांनीं काळजीपूर्वक पाहिलीं.

(१) लाड साहेबांचें असें मत आहे कीं ब्रिटिश सरकारचा मुख्य हेतु हिंदी नागरिकांमध्यें युरोपियन वाङ्मयाचा व शास्त्राचा प्रसार करणें हा असून शिक्षणासाठीं राखून ठेविलेल्या पैशाचा सदुपयोग इंग्रजी शिक्षणाकरतां तो खर्च केल्यानें होणार आहे.

(२) परंतु ज्या देशी शाळांचा किंवा महाविद्यालयांचा फायदा घ्यावासा नागरिकांना वाटतो आहे, अशा शाळा किंवा महाविद्यालयें बंद केलीं जाणार नाहींत. समितीच्या देखरेखीखालीं चाललेल्या शाळा महाविद्यालयांतून काम करणाऱ्या शिक्षकांना पूर्वीप्रमाणें पगार मिळत राहील. परंतु या शाळांतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना यापुढें शिष्यवृत्ति मिळणार नाहीं. त्याचप्रमाणें एकदां शिक्षक कमी झाल्यास त्याची वर्गाची परिस्थिति सरकारास कळविण्यांत यावी, म्हणजे दुसरा शिक्षक नेमणें जरूर आहे किंवा कसें याचा विचार सरकार करील.

(३) समितीनें महित भाषांतून पुस्तकें प्रसिद्ध करण्यासाठीं बराच पैसा खर्च केल्याचें दिसून आलें आहे. यापुढें अशा तऱ्हेनें पैसा खर्च केला जाऊं नये, असें लाडसाहेबांचें मत आहे.

(४) समितीचे हातीं शिक्षणकार्यासाठीं जेवढा पैसा आहे तेवढा सर्व पैसा हिंदी लोकांना इंग्रजी वाङ्मयाचें व शास्त्राचें ज्ञान, इंग्रजी भाषेंतून, देण्यासाठीं खर्च करण्यांत यावा.

५. या वादाचें महत्त्वः—या वादाला कित्येक वेळां अवास्तव महत्त्व दिलें जातें. आमच्या मतें या वादाला फारच थोडें महत्त्व असून वरील दोन्ही पक्षांची विचारसरणी चुकीची आहे. खरें पाहतां देशी भाषा हेंच माध्यम ठेवावयास पाहिजे होतें. देशी भाषा 'ओबडधोबड व दरिद्री' असें समजून तिला दूर सारणें चुकीचें होतें, संस्कृत किंवा अरेबिक भाषा माध्यम असावी, असें म्हणण्यांत पौर्वात्य पक्षाची जेवढी चूक होती, तेवढीच चूक इंग्रजी भाषा बोधभाषा असावी, हें म्हणण्यांत **मेकॉलेसाहेबांची** होत होती.

या वादापेक्षां मुंबईमध्यें जो वाद निर्माण झाला—म्हणजे इंग्रजी भाषा माध्यम असावी कां देशी भाषा माध्यम असावी हा—अधिक महत्वाचा होता.

६ हिंदी शिक्षणाचे बाबतींत मेकॉलेसाहेबांची कामगिरीः—**मेकॉलेसाहेबांची** कामगिरी विविध प्रकारांनीं वर्णिली जाते. कोणी त्यांना 'प्रगतिपथावरील ज्ञानदीप' असें म्हणतात; तर कोणी राजकीय असंतोष पसरविण्यास इंग्रजी भाषा कारणीभूत आहे असें समजून, आजच्या सर्व दुःखाचें खापर त्यांचे माथीं मारतात. देशी भाषा, धर्म व संस्कृति हीं समजून न घेतां त्यांचा अव्हेर केला म्हणून, कांहीं त्यांचा तिटकारा करतात, तर कांहीं इंग्रजी भाषेनंतर बोधभाषा म्हणुन ज्या चालू हिंदी भाषा उपयोगांत येत आहेत, त्यांच्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांना नांवें ठेवीत आहेत. बारकाईनें विचार केल्यास असें दिसून येईल कीं, वरील दोन्ही प्रकारचीं मतें बरोबर नाहींत. **मेकॉलेसाहेबांना** प्रगति-पथावरील ज्ञानदीप म्हणावयाचें म्हणजे त्यांनीं केलेल्या शिक्षणविषयक कामगिरीस फाजील महत्त्व देण्यासारखें आहे. मेकॉलेसाहेबांनीं इंग्रजी शिक्षणाबद्दल आवड निर्माण केली नाहीं, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. इंग्रजी शिक्षणापासून लोकांचा आर्थिक फायदा होत असल्यानें ही आवड अगोदरच निर्माण झालेली होती. इंग्रजी बोधभाषा असावी, असें

म्हणणारांचा पक्ष त्यांनीं स्थापन केला, असें म्हणावें तर तेंही खरें नव्हतें; कारण ते हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच तो पक्ष जन्मास आला होता. खरें पाहतां, १८३४ मध्यें **मेकॉलेसाहेब** आले त्यावेळीं, नव्या व जुन्या पक्षांतील भांडणें विकोपास गेलीं होतीं. लोकांना इंग्रजी शिक्षणाची तहान लागली होती. ती तहान कंपनी सरकारकडून भागविली जाईना, म्हणून लोकांना मिशनरी शाळांचा अवलंब करावा लागला. कंपनी सरकारच्या तरुण नोकरांना सुधारणेची आस्था लागून राहिल्यानें इंग्रजी शिक्षण चालू करण्यास ते अगदीं उत्सुक होते. परंतु या दोन्ही प्रवाहांचा जोर थांबवून धरण्याचें कार्य जुना नोकरवर्ग करीत होता. त्यांना **हेस्टिंगज्** व **मिंटो** यांचें धोरण बरोबर वाटत होतें. या वर्गास पुराणमतवादी हिंदी लोकांचा पाठिंबा होता. या वेळीं **मेकॉलेसाहेबांचा** उदय झाला व त्यांनीं आपल्या वक्तृत्वानें जुनाट मतांचा काळोख दूर करून, नवीन मतांचा प्रकाश पाडला. जे वाद कित्येक दिवस रेंगाळत राहिले असते ते त्यांनीं तात्काळ मिटवून निश्चित धोरण स्वीकारलें, हा त्यांचा विशेष आहे.

मेकॉलेसाहेबांच्या चहात्यांनीं त्यांचे बाब्यास जेवढें श्रेय यावयास पाहिजे होतें, त्यापेक्षां बरेचसें श्रेय त्यांचे पदरीं बांधलें, या त्यांच्या औदार्याबद्दल कोणीही फारशी तक्रार करणार नाहीं. परंतु ज्या गोष्टीची जबाबदारी त्यांचेवर पडत नाहीं, त्या गोष्टीबद्दल अकारण त्यांचा धिःकार व्हावा, ही दुःखाची: गोष्ट होय. **मेकॉलेसाहेबांनीं** आपल्या पत्रकांत पौर्वात्य वाङ्मयाला व धर्माला यत्किंचित्ही महत्व दिलें नाहीं, हा त्यांचा दोष आहे. परंतु आज शंभर वर्षांनंतर त्यांचे लिखाणांतील एवढी बाब आपण दृष्टिआड करावयास नको काय ? त्यांचा हेतु अप्रामाणिकपणाचा होता, असा आरोप त्यांचेवर आपणांस करतां यावयाचा नाहीं. आज झाल्या गोष्टी विसरून जाणें हेंच श्रेयस्कर. दुसऱ्या इतर बाबतींत जी टीका **मेकॉलेसाहेबांवर** होत आहे ती असमर्थनीय आहे,

असें आम्हास वाटतें. उदाहरणार्थ हिंदी भाषेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांचेवर करणें गैर आहे. हिंदी भाषा माध्यम म्हणून स्वीकारणें किती महत्वाचें आहे, हें मेकॉलेसाहेब ओळखून होते. परंतु वादामध्यें भाग घेणाऱ्या दोन्ही पक्षांकडून ती गोष्ट अशक्य असल्याचें त्यांना सांगण्यांत येत असे. ते या लोकांचे शब्दावर विश्वसून राहिले, हा काय त्यांचा दोष ? ज्या लोक-शिक्षण-समितीचे ते अध्यक्ष होते त्या समितीच्या १८३६ च्या अहवालांत आधुनिक हिंदी भाषेच्या अभ्यासाचें महत्व खालीलप्रमाणें ते प्रतिपादितात:—

"देशी भाषेला उत्तेजन देणें ही महत्त्वाची गोष्ट आहे हें आम्ही जाणून आहोंत. ७ मार्चचा हुकूम आमच्या या उत्तेजनाचे कार्याचे आड येतो, असें आम्हांस वाटत नाहीं. देशी वाङ्मयाची वाढ करणें हें आम्ही आमचें अंतिम ध्येय समजतों व तें कार्य आम्ही अखंड करीत राहाणार."

या मेकॉलेसाहेबांचे विचाराप्रमाणें त्यांचेमागून येणारे लोक वागले नाहींत, हा काय त्यांचा दोष ? मेकॉलेच्या पत्रकानंतर जीं सरकारी पत्रकें प्रसिद्ध झालीं, त्यांतही देशी भाषेला महत्व दिलें आहे. असें असूनही शिक्षणखात्याच्या अंमलदारांनीं त्याकडे दुर्लक्ष केलें. या त्यांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दोषांचें खापर एकट्या मेकॉलेसाहेबांचे माथीं फोडणें गैर होय.

सध्यांच्या राजकीय अशांततेचें कारण मेकॉलेसाहेब आहेत असें म्हणणारांनीं तर त्यांचेवर मोठाच गहजब केला आहे, असें आम्हांस वाटतें. प्रथम, इंग्रजी शिक्षणाचे अभावीं राजकीय चळवळ निर्माणच झाली नसती, असें म्हणतां येईल कीं नाहीं, याविषयीं जबर शंका येते. इंग्रजी शिक्षणामुळें ही अशांतता निर्माण झाली असें घटकाभर गृहीत धरलें तरी तीबद्दल इंग्लंडला एक प्रकारचा अभिमान वाटेल, हें आपलें मत मेकॉलेसाहेबांनीं कॉमन्स सभेंत केलेल्या एका भाषणांत व्यक्त केलें आहे.

७. ऑक्लंड साहेबांचें पत्रक:—बेंटिंक सरकारचे ठरावाबरोबर या वादास मूठमाती मिळाली हें म्हणणें चुकीचें आहे. पुढें पांच वर्षेंपर्यंत हा वाद तसाच रेंगाळत राहिला व १८३९ नोव्हेंबर २४ च्या गव्हर्नर जनरल लॉर्ड ऑक्लंड यांच्या पत्रकानें त्यावर शेवटचा पडदा पडला. वादाची तीव्रता हळूहळू कमी झाल्यानें तडजोड घडवून आणण्याची वेळ जवळ आली असें त्यांना वाटलें. वाद उत्पन्न होण्यास मुख्य कारण पैसा आहे, हें त्यांचे शोधक बुद्धीला दिसून आलें व दोन्ही पक्षाला पुरेसा पैसा पुरवल्यास दोन्ही पक्ष स्वतंत्रपणें कार्य करूं शकतील, असा त्यांना विश्वास वाटला व या दृष्टीनें त्यांनीं खालीलप्रमाणें गोष्टी केल्या.

(अ) पौर्वात्य शिक्षण संस्था चालू रहाव्यात, यासाठीं त्यांना पुरेशी मदत देण्यांत आली. त्याचप्रमाणें विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्त्या व थोर पंडितांचे तनखे त्यांनीं चालू ठेविले.

(ब) पौर्वात्य शिक्षणाकरतां जेवढ्या पैशाची सोय केली होती, तेवढ्या पैशांत पौर्वात्य भाषेमध्यें पाठ्य पुस्तकें तयार करण्यास व प्रकाशित करण्यास त्यांनीं प्रोत्साहन दिलें.

(क) पौर्वात्य महाविद्यालयाचें पहिलें कर्तव्य पौर्वात्य पद्धतीनें शिक्षण देणें हें आहे. जरूर वाटल्यास, हें कर्तव्य पार पाडल्यानंतर, त्यांना इंग्रजी भाषेचे वर्ग उघडण्यांत येतील, असें सुचविण्यांत आलें.

यानें प्राच्यभाषानिष्ठांचें पूर्ण समाधान झालें. वरील योजनेसाठीं वर्षास २१ हजार रुपये खर्च येणार होता. थोड्याशा पैशाची वाढ कोर्ट–ऑफ–डायरेक्टर्स यांनीं मान्य करून वादाचें मूळ गाडून टाकिलें, हें नमूद करावयास ऑक्लंड साहेबास अभिमान वाटत होता.

इंग्लिश पक्षासही लागेल तो पैसा पुरविण्यास ऑक्लंड साहेबांची तयारी होती. इंग्रजी शिक्षणाचे प्रसारासाठीं त्यांनीं प्रथम एक लाखाची तरतूद केली. दुसरें, हिंदी शिक्षणाच्या प्रश्नाचें संपूर्ण निरीक्षण त्यांनीं

आपल्या पत्रकांत केलें व खालीलप्रमाणें निर्णय घेतले. या निर्णयावरून इंग्लिश पक्षाला त्यांचें पाठबळ होतें, ही गोष्ट सहज लक्षांत येणार आहे.

(अ) संस्कृत किंवा अरेबिक भाषेचें माध्यम घेऊन युरोपियन शास्त्र शिकविण्याचे प्रयत्नास यावें असें यश येणार नाहीं.

(ब) शिक्षणाचें मुख्य धोरण शक्य तितक्या जास्त विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेच्या द्वारें युरोपियन वाङ्मय, तत्त्वज्ञान व शास्त्र यांचें शिक्षण देणें, हें आहे.

(क) समाजांतील वरच्या वर्गास–ज्यांना शिकण्यास पुरेशी फुरसत आहे अशांना–उच्च शिक्षण देणें हें सरकारचें काम आहे. वरचे वर्गाला मिळालेलें ज्ञान खालचे वर्गांत उतरतें, हा जुना अंतरझर सिद्धांत (Down-ward Filtration Theory) होता. तो ऑक्लंडसाहेबांनीं मान्य केल्यामुळें, सरकारनेंही त्याचा स्वीकार केला. यापुढें शिक्षणाचें हें धोरण १८७० पर्यंत चालू राहिलें.

एकंदरीत असें म्हणतां येईल कीं लॉर्ड ऑक्लंड साहेबांनीं महित भाषा प्रवर्तकांना वांचविण्याचा जरी प्रयत्न केला असला, तरी त्यांनीं इंग्रजी शिक्षणाचे प्रसारास फार जोरानें चालना दिली.

८. ऑक्लंडसाहेबांचे माध्यमाविषयीं विचार:—ऑक्लंडसाहेबांचे पत्रकावरून असें दिसून येतें कीं, ज्यावेळीं मेकॉलेसाहेबांचें पत्रक बाहेर पडून अवघीं पांच वर्षें देखील झालीं नव्हतीं त्यावेळीं, कित्येक लोकांकडून निदान माध्यमिक शाळेमधून, देशी भाषा बोधभाषा करण्याबद्दल सूचना आल्या होत्या. विषय थोडे असल्यानें ते विषय देशी भाषांतून सहज शिकविता येतील, मात्र त्या भाषेंत क्रमिक पुस्तकें तयार झालीं पाहिजेत व शिक्षकांना योग्यप्रकारें ट्रेनिंग मिळालें पाहिजे, असेंही सांगण्यांत येत होतें. असें केल्यानें या भाषांच्या वाङ्मयास उत्तेजन मिळणार होतें. शिवाय मुंबईमध्यें बहुतेक शाळांमधून हें माध्यम

नों. दि. ....
७७
ग्रंथालय

ठेवूनच शिक्षणविण्यास सुरवात झाली होती व ही गोष्ट सरकारचे निदर्शनास आणून देण्यांत आली होती. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं ऑक्लंडसाहेबांनीं एवढीं सबळ कारणें असतांही लोकांचें म्हणणें मान्य केलें नाहीं. १८३३ च्या सनदी कायद्यानें शिक्षण केंद्रीभूत झालें होतें, व त्यायोगें गव्हर्नर जनरलच्या मताचा पगडा सर्व प्रांतावर पडत होता. हा पगडा मुंबई व मद्रास प्रांतावर किती पडला हें आपणास पुढील प्रकरणीं दिसून येईल.

९. **ॲडॅमसाहेबांच्या शिफारशी:**—देशी प्राथमिक शाळांचा प्रसार व सुधारणा यासंबंधीं ॲडॅमसाहेबांनीं ज्या शिफारशी केल्या व त्यावर ऑक्लंडसाहेबांनीं जे हुकूम बाहेर काढले, तेही तितकेच असमाधानकारक होते. अंतरंग तत्त्व ॲडॅमसाहेबांना पटत नव्हतें; व म्हणून हिंदुस्थानांत नवीन शिक्षणाची ज्योत पेटवावयाची असेल तर त्याला चालू देशी शाळांचीच वाढ केली पाहिजे, असें त्यांचें ठाम मत झालें होतें. या ध्येयानुसार त्यांनीं आपली योजना सरकारकडे विचारासाठीं पाठविली होती. या योजनेचे सात भाग पाडण्यांत आले होते.

(१) एक किंवा अधिक जिल्हे निवडावयाचे व त्यामध्यें प्रयोग म्हणून ही योजना सुरू करावयाची.

(२) ॲडॅम साहेबांनीं निरीक्षण करण्यासाठीं ज्याप्रमाणें जिल्ह्यांची निवड केली होती, त्याप्रमाणें जिल्ह्यांची निवड करून त्यांची शैक्षणिक पाहाणी करावयाची.

(३) शिक्षकांकरतां व विद्यार्थ्यांकरतां आधुनिक देशी भाषांमधून पुस्तकें तयार करावयाची.

(४) प्रत्येक जिल्ह्यामध्यें योजनेप्रमाणें काम होतें किंवा नाहीं, हें पाहण्याकरतां एक अधिकारी नेमावयाचा. आपल्या जिल्ह्याची पाहणी करणें, शिक्षकांच्या भेटी घेणें, पुस्तकें समजावून सांगणें, परीक्षा घेणें,

अनुक्रम

बक्षिसें देणें व योजना यशस्वीरीतीनें कशी पार पाडतां येईल, हें पाहणें त्यांचें कर्तव्य होतें.

(५) शिक्षकांमध्यें पुस्तकें वाटणें, त्या पुस्तकांचा अभ्यास त्यांचेकडून नीट व्हावा म्हणून त्यांची परीक्षा घेणें व या परीक्षांमधून जे पास होतील त्यांना पारितोषिकें देणें. या शाळांच्या शिक्षकांकरतां ट्रेनिंग कॉलेजें स्थापण्यांत यावींत अशीही सूचना ॲड्यामसाहेबांनीं केली होती. वर्गाचें नुकसान न होतां, शिक्षकाला आपला दर्जा वाढवितां यावा यासाठीं प्रत्येक वर्षीं फक्त तीन महिने शिक्षण घेऊन, चार वर्षांत ट्रेनिंग पुरें करण्यांत यावें, अशी त्यांची योजना होती.

(६) मिळविलेलें नवीन ज्ञान मुलांना देण्यासाठीं शिक्षकांना प्रोत्साहन देणें, मुलांच्या परीक्षा घेणें व त्यांना बक्षिसें देणें.

(७) खेड्यांत शिक्षकांनीं वास्तव्य करावें व गांवच्या मुलांना शिकवावें, यासाठीं त्यांना जमिनी देण्यांत याव्यात. या जमिनी कोणत्या वेगवेगळ्या पद्धतींनीं देतां येतील, हेंही ॲड्यामसाहेबांनीं सुचविलें होतें.

१०. ॲड्याम शिफारशी अमान्य:--ॲड्याम योजनेमध्यें कांहीं चुका असल्या तरी मुख्यतः त्याचें म्हणणें बरोबर होतें. त्यांची योजना सरकारनें जर मान्य केली असती तर बहुजनसमाजाच्या शिक्षणाचा इतिहास कांहीं वेगळाच झाला असता. ॲड्याम योजना ही लॉर्ड ऑक्लंडसाहेबांना काल्पनिक व अव्यवहार्य वाटली. सध्यां मुंबई व बंगाल प्रांतांतून चाललेले प्रयोग कसे काय चालतात तें पाहण्याची त्यांनीं सूचना केली व ॲड्याम योजना खालीलप्रमाणें शेरा मारून बाजूला ठेवून दिली.

" या विषयासंबंधीं माझें असें मत आहे कीं, मिस्टर ॲड्याम यांनीं सुचविलेली योजना जर अमलांत आणवयाची असेल तर, ती सर्वत्र व परिणामकारक रीतीनें अमलांत यावी, यासाठीं योग्य ती तरतूद करण्यांत आली आहे व पूर्णपणें तत्पर व लायक सुपरवायझर आपणाजवळ आहेत, अशी सरकारनें अगोदर आपली खात्री करून घ्यावी. ह्याशिवाय या योजनेस हात घालण्यांत येऊ नये. "

११. बंगालमधील घडामोडी. (१८४०–५३) लॉर्ड ऑक्लंड यांचे पत्रकानंतर शिक्षणाचे बाबतींत विशेष नांव घेण्यासारखें असें बंगालमध्यें कांहीं घडलेलें नाहीं. १८४४ मध्यें शिकलेल्या प्रत्येक माणसाला सरकारी नोकरींत घेतले जाईल, हें आपलें धोरण सरकारनें जाहीर केलें. १८४५ मध्यें एज्युकेशन कौन्सीलनें कलकत्त्यास विद्यापीठाची स्थापना करावी अशी शिफारस केली; परंतु कोर्ट–ऑफ–डायरेक्टरस् यांनीं, अजून वेळ आली नाहीं या सबबीवर, ती फेटाळून लाविली. १८५४ सालीं एज्युकेशन कौन्सिल १५१ शाळा चालवीत होतें. या शाळांतून १३,१६३ विद्यार्थी असून त्यावर रु. ५,९४,४२८ वार्षिक खर्च होत होता. १८५३ सालीं बंगालमध्यें शिक्षणाची स्थिति काय होती व इंग्रजी विषयाला कसें महत्त्व दिलें जात होतें, ही गोष्ट **बुड-साहेबांचे** खलित्यांतील खालील मजकुगवरून स्पष्ट होण्यासारखें आहे.

" बंगालमध्यें इंग्रजीमधून शिक्षण दिलें गेल्यामुळें तो इतर प्रांताचे मानानें बराच पुढें गेला आहे. या शिक्षणासाठीं लोकांची मागणी येत असल्याचें प्रत्यहीं अनुभवास येत असून तें मिळविण्यासाठीं प्रत्येक जिल्ह्यांतील लोकांची धडपड दिसून येत आहे. आज पांच आंग्ल–हिंदी महाविद्यालयें असून बहुतेक प्रत्येक जिल्ह्यांत शाळा स्थापन झाल्या आहेत. शाळांना सरकारी मदत (ग्रँट–इन्–एड) दिल्यास चांगल्या प्रकारच्या शाळा बऱ्याच ठिकाणीं निर्माण होतील, असा आम्हास भरंवसा वाटतो.

बंगालमध्यें बहुजनसमाजास देशी भाषांचे द्वारें शिक्षण देण्याचा फारसा प्रयत्न झाला नाहीं. १८४४ सालीं कांहीं प्राथमिक शाळा स्थापन करण्यांत आल्या; पण त्यांपैकीं फक्त ३३ शाळा आज अस्तित्वांत असून त्यामध्यें १४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १८५२ चे एप्रिलमध्यें या शाळा जेव्हां रिव्हेन्यू बोर्डाकडून एज्युकेशन बोर्डाकडे आल्या त्यावेळीं त्यांची स्थिती बरीच खालावलेली अशी दिसून आली व त्या स्थापन करतांना जी आशा व्यक्त करण्यांत आली होती ती पूर्ण न झाल्याचें दिसून आलें. "

१२. हिंदुस्थानांतील इतर प्रांतांची स्थितिः—१८५३ सालीं हिंदुस्थान हा मुंबई, मद्रास, बंगाल, पंजाब व उत्तर-पश्चिम प्रांत (आजचा संयुक्त प्रांत) अशा पांच प्रांतांत विभागला गेला. बंगालमध्यें शैक्षणिक प्रगति कशी झाली हें पूर्वी दाखविलेंच आहे. या प्रांतांची छाप इतर प्रांतांवर पडल्यामुळें त्यास ऐतिहासिक दृष्ट्या विशेष महत्व आहे. आतां आपण इतर प्रांतांकडे वळूं.

१३. मुंबईची प्रगतिः—१८२२ मध्यें मुंबई नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. तेव्हांपासून तिचे हातून उपयुक्त कामगिरी होत होती. १८४० सालीं ही सोसायटी ज्या शिक्षण संस्था चालवीत होती त्यांचे अहवाल पाहिल्यास तिचे कामाच्या स्वरूपाची आपणास कल्पना येईल.

(अ) जिल्ह्यांतील इंग्रजी शाळाः— मुंबई, ठाणा, पनवेल व पुणें या चार ठिकाणीं शाळा चालू होत्या व त्यावर युरोपिअन हेडमास्तर होते.

(ब) जिल्ह्यांतील प्राथमिक शाळाः—जिल्ह्यांत प्राथमिक शाळा चालविण्याकडे सोसायटी बरेंच लक्ष पुरवीत असे. ' प्राथमिक शिक्षण ' या शब्दांचा अर्थ त्यावेळीं ' मातृभाषेंतून दिलें जाणारें पाश्चिमात्य शास्त्राचें ज्ञान ' असा केला जात असे व यामुळें त्यावेळच्या प्राथमिक शाळा व आजच्या प्राथमिक शाळा यांमध्यें बरेंच अंतर आहे. त्यावेळच्या प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमांत खालील विषय येत असतः—वाचन, लेखन, अंकगणित, इंग्लंडचा व हिंदुस्थानचा इतिहास, भूगोल, खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, बीजगणित, युक्लीडची भूमिति व त्रिकोणमिती. वर्ग सहा ते दहा असत. या शाळांना प्राथमिक शाळा म्हणण्यापेक्षां मातृभाषेंतून शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा म्हणणेंच जास्त शोभेल.

अशा प्रकारच्या शाळांची वाढ करणें हें ध्येय मुंबई नेटिव्ह सोसायटीनें १८२२ ते १८४० पर्यंत स्वीकारलें होतें. प्रगति मंद गतीनें होत

होती, कारण सोसायटीस पुरेसा पैसा मिळत नव्हता व शाळेकरतां विशेष ट्रेनिंग देऊन शिक्षक तयार करावे लागत. परंतु सोसायटीनें चिकाटीनें आपलें कार्य चालविलें. १८४० मध्यें वरील प्रकारच्या प्राथमिक शाळांची संख्या ११५ होती.

एज्युकेशन बोर्ड (शिक्षण समिति)—१८४० च्या एप्रिलमध्यें मुंबई सरकारनें हिंदी लोकांच्या शिक्षण संस्थांची व्यवस्था पाहण्यासाठीं एक **शिक्षण-सामिति** नेमिली. या समितीमध्यें सात सभासद असून त्यांपैकीं ३ सोसायटीनें नेमावयाचे होते. ही समिति नेमल्यानंतर सोसायटी बंद करण्यांत आली. १८५५ पर्यंत या शिक्षण-समितीनें काम केल्यानंतर शिक्षण खात्याचे पहिले डायरेक्टर नेमण्यांत आले.

शिक्षण समितीनें नेटिव्ह-एज्युकेशन-सोसायटीचें धोरण पुढें चालू ठेविलें. १८४५ सालीं घेतलेल्या खालील आंकड्यांवरून बंगाल व मुंबई इलाख्यांतील प्रगतीमधील फरक सहजच नजरेस येईल.

		बंगाल		मुंबई
१ लोकसंख्या		३,७०,००,०००		१,०५,००,०००
२ शिक्षणावर खर्च	रु.	४,७७,५९३	रु.	१,६८,२२६
३ सरकारी शाळेंतील विद्यार्थी		५,५७०		१०,६१६
४ इंग्रजी शाळेंतील विद्यार्थी		३,९५३		७६३

देशी शाळांकडे दुर्लक्ष—देशी शाळांना उत्तेजन देण्याबद्दल ॲड्याम-साहेबांनीं जी शिफारस केली त्याबाबतींत समितीकडे लोकांकडून विचारणा होऊं लागली. समितीनें या शाळाविषयींचे कांहीं आंकडे गोळा केले व शेवटीं ठरविलें कीं या शाळा सुधारण्यासाठीं कोणताही खर्च करावयाचा नाहीं. पाश्चिमात्य शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार देशी भाषांच्या द्वारें करावयाचा, हें समितीचें ध्येय होतें व तें ध्येय देशी शाळांकरवीं साध्य होणें शक्य नव्हतें. केवळ लिहिणें, वाचणें व हिशेब करणें यास शिक्षण समजण्यास समितीची तयारी नव्हती व यामुळें देशी शाळा म्हणजे

कुचकामाच्या, असें बोर्डाचें मत होणें स्वाभाविक होते. यामुळें आपल्या-जवळ असलेला पैसा या शाळांकरतां खर्च करावयाचा नाहीं, असा बोर्डानें निश्चय केला.

माध्यमाविषयींचा वाद (१८४५-४९):—मुंबईमध्यें माध्यमा-विषयीं वाद माजून राहिला होता हें मागें सांगितलेंच आहे. कर्नल जर्व्हिस व बोर्डाचे तीन सभासद यांचा एक गट होता. त्यांनीं असें प्रति-पादन केलें कीं मुलांना शिक्षण द्यावयाचें तें त्यांच्या मातृभाषेंतून दिलें पाहिजे. बोर्डाचे अध्यक्ष एर्सकाईन पेरी व आणखी दोन युरोपियन सभासद हे दुसऱ्या गटांत होते. शिक्षण इंग्रजी भाषेच्या द्वारें दिलें जावें असें या गटाचें मत होते. बंगालमध्यें इंग्रजी विरुद्ध महितभाषा हा जो वाद झाला त्यापेक्षां हा इंग्रजी--मातृभाषावाद जास्त महत्वाचा होता.

पेरी साहेबांच्या इंग्रजी गटाचें काय म्हणणें होतें हें पाहण्याकरतां फार खोल जाण्याचें फारसें कारण नाहीं. त्यांना स्फूर्ति बंगालपासून मिळाली होती व मेकॉले व ऑक्लंड यांचे जे विचार होते, तेच जवळ जवळ या पक्षाचे होते. परंतु मुंबईमध्यें परिस्थिति थोडी भिन्न असल्यानें या पक्षानें खालील तीन निर्णय घेतले.

(अ) हिंदी लोक स्वतः इंग्रजी शिकण्यास जास्त उत्सुक आहेत.

(ब) पाश्चिमात्य शास्त्राच्या व ज्ञानाच्या पुस्तकांचीं भाषांतरें देशी भाषांतून करणें हें जास्त त्रासाचें व खर्चाचें आहे.

(क) हिंदी लोकांना इंग्रजी शिकण्यास प्रोत्साहन देणें राजकीय-दृष्ट्या जरूरीचें आहे. शास्ते व शासित यांच्यामध्यें विचाराची देवाण-घेवाण करण्याकरतां कांहीं साधन असणें जरूर आहे. यासाठीं इंग्लिश लोकांना देशी भाषा शिकण्याची सक्ति करावयास पाहिजे, किंवा हिंदी लोकांनीं इंग्रजी शिकलें पाहिजे. पेरीसाहेबांचें असें मत होतें कीं हिंदी लोकांना इंग्रजी शिकण्यास लावणें हें जास्त सोपें व कमी

खर्चाचें आहे. इंग्रज मनुष्य हा भाषा शिकण्याच्चे बाबतींत कमी प्रवीण असल्यानें त्यास हिंदी भाषा शिकण्याची सक्ति करणें त्रासाचें होणार आहे.

जर्व्हिस साहेब व तीन हिंदी सभासद यांनीं जो पक्ष बनविला होता, त्यांचें मत खालीलप्रमाणें होतें.

(अ) बहुजनसमाजास पाश्चिमात्य ज्ञान द्यावयाचें असेल तर तें त्यांच्या मातृभाषेंतूनच द्यावयास हवें.

(ब) इंग्रजी हें माध्यम केल्यास बुद्धिवान लोक व बहुजनसमाज असे दोन वेगळे गट बनले जातील.

(क) संस्कृत व अरेबिक यासारख्या महित भाषांची जोपासना करून देशी भाषांची वाढ करणें हें सरकारचें आद्यकर्तव्य आहे.

(ड) इंग्रजी वाङ्मयांतून साधनसंपत्ति घेऊन महित भाषांच्या मदतीनें समृद्ध बनलेल्या देशी भाषा, हिंदी शिक्षण योजनेंत, बोधभाषा म्हणून स्वीकारण्यांत याव्यात.

१८४८ सालीं हें भांडण विकोपास गेलें व म्हणून सर्व प्रश्न पुनः सरकारकडे विचारासाठीं पाठविण्यांत आले. दुर्दैवानें सरकारनें आपलें निर्णायक असें मत न दिल्यानें, भांडणें तशींच चालू राहिलीं. इंग्रजी हें माध्यम असावें या विचाराचें दडपण बंगालमधून सतत येऊं लागल्यामुळें मातृभाषेचे वाढीस अडथळा येऊं लागला. सर्व सूत्रें केंद्रित झालीं असल्यानें त्यावेळीं कोणत्याही नव्या खर्चास बंगाल सरकारची परवानगी लागत असे. म्हणून जेव्हां प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं मुंबई सरकारनें आपली योजना मध्य सरकारपुढें मांडली, त्यावेळीं खर्चाच्या सबबीखालीं ती स्वीकारण्यांत आली नाहीं. इतकेंच नव्हे तर, सरकारास इंग्रजी शिक्षणाचा खर्च कमी येतो म्हणून इंग्रजी शिक्षणाकडे जास्त लक्ष पुरवावें, असेंही सुचविण्यांत आलें.

या वादाचा शेवट म्हणून कॉलेज शिक्षणामध्यें इंग्रजी माध्यम ठाम ठरलें गेलें. माध्यमिक शाळांमध्यें मातृभाषा माध्यम करण्यांत कर्नल जार्व्हिस यांचें पक्षास यश आलें. हेंच मत १८५४ चे खलित्यामध्येंही स्वीकारण्यांत आल्याचें आपणास दिसून येईल.

१४ मद्रासची प्रगति :—सरकारच्या योजनेमध्यें नेहमीं फरक होत राहिल्यानें, व ज्या लोकांकडे शिक्षणाचीं सूत्रें होतीं त्यांच्यामध्यें सारखा बदल होत गेल्यानें, १८२२ ते १८५२ या काळांतील मद्रास इलाख्यांतील शिक्षणाचा इतिहास म्हणजे एक करुण कहाणीच झाली आहे. फारसें खोलांत न जातां महत्त्वाच्या गोष्टी म्हणून खालीलप्रमाणें माहिती देतां येईल.

(१) देशी शाळांना कोणत्याच प्रकारचें उत्तेजन दिलें गेलें नाहीं.

(२) १८२६ मध्यें **मनरो**साहेबांनीं ज्या जिल्ह्या शाळा व तालुका शाळा स्थापन केल्या होत्या, त्या बंगाल सरकारचे हुकुमावरून बंद करण्यांत आल्या. या शाळांना बंगाल सरकारनें पैसा देण्याचें नाकारलें. पैसा असल्यास मद्रास येथें एक महाविद्यालय व प्रांतांत महत्त्वाच्या ठिकाणीं इंग्रजी शिक्षणाच्या शाळा उघडण्यास मात्र परवानगी देण्यांत आली.

(३) १८४१ सालीं मद्रासला एक माध्यमिक शाळा—ज्याला त्यावेळीं युनिव्हर्सिटी किंवा विश्वविद्यालय म्हटलें जात असे—उघडण्यांत आला.

(४) शिक्षणाकरतां ५० हजार रुपये जरी मंजूर करण्यांत आले होते तरी ही रक्कम पूर्णपणें कधींच खर्च होत नसे. १८५३ सालीं अशा तऱ्हेनें साचून राहिलेली रक्कम ३ लक्ष रुपयांवर गेली. १८५४–५५ मध्यें मद्रासच्या डायरेक्टर साहेबांनीं जो अहवाल प्रसिद्ध केला, त्यावरून १८५३ पर्यंत मद्रासची प्रगति काय होती हें दिसून येणार आहे.

" अहवालसालचे सुरवातीस, चिंग्लेपुट, नॉर्थ आर्कट, नेलोर, आणि तंजोर या जिल्ह्यांचा खर्च सोडल्यास व गंजम डोंगरी भागांतील प्राथमिक शाळा वगळल्यास, शिक्षणखात्याचें सर्व लक्ष मद्रास युनिव्हर्सिटी (विश्वाविद्यालय) या नांवाखालीं मोडणाऱ्या कॉलेज संस्थेवर व राजमहेंद्री व कुडालोर या प्रांतिक शाळांवर खिळलेलें होतें. गेल्या कांहीं वर्षांत कुंभकोणम्, कालिकत व बेलरी या ठिकाणीं प्रांतिक शाळा व कुडालोअरचे जवळपास दोन प्राथमिक शाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत. "

समाधानाची गोष्ट एवढीच दिसते कीं मिशनरी लोकांनीं या प्रांतांत बरेंच मोठें शिक्षण-कार्य केलें व त्याचा परिणाम असा झाला कीं, मुंबई प्रांतापेक्षांहि—जेथें सरकारनें प्रत्येक जिल्ह्यांत एक तरी इंग्रजी शाळा स्थापिली होती--मद्रास प्रांतांत इंग्रजी शिक्षण मोठ्या प्रमाणांत देण्यांत येऊं लागलें.

१५. **उत्तर-पश्चिम प्रांतांतील प्रगतिः**—या प्रांतांतील शिक्षण संस्था १८४० पर्यंत बंगाल सरकारच्या नियंत्रणाखालीं होत्या. १८४० नंतर त्या शाळा उत्तर-पश्चिम प्रांताकडे सोपविण्यांत आल्या. थॉमसनसाहेब-प्रांताचे लेफ्टनंट गव्हर्नर-यांनीं मातृभाषेंतून शिक्षण देण्याची एक योजना तयार केली. या योजनेस ' थॉमसन-प्लॅन ' असें संबोधण्यांत येत असे व ॲड्याम साहेबांचे योजनेप्रमाणेंच हिचें स्वरूप होतें. या योजनेमुळें प्रत्येक जिल्ह्यास साडेचार हजार रुपये खर्च येणार होता. एकतीस पैकीं आठ जिल्ह्यांना ही योजना कोर्ट-ऑफ-डायरेक्टरस् यांनीं लागू केली. या योजनेप्रमाणें काम चालू असतां १८५४ चा खलिता प्रसिद्ध झाला. बोर्ड-ऑफ-डायरेक्टरस् या योजनेवर एवढे खुष झाले कीं त्यांनीं ही योजना सर्व प्रांतांत लागू करावी अशी शिफारस केली.

१६ **पंजाब प्रांताची प्रगतिः**—१८४९ मध्यें पंजाब प्रांत बनविण्यांत आला. या वर्षीं अमृतसर येथें नवीन पद्धतीची शाळा सरकारनें स्थापिली. या शाळेंत इंग्रजी, हिंदी, पार्शियन, अरेबिक, संस्कृत व गुरुमुखी

शिकविलें जात असे. हिंदु, शीख व मुस्लीम या संस्थेचा सारखाच फायदा घेत असत. १८५४ पर्यंत दुसरी कोणतीच शिक्षण-संस्था स्थापण्यांत आली नाहीं.

१७ अधिकारी व मिशनरी यांचे संबंध:—१८३२ पूर्वी वीस वर्षे मिशनरी लोकांनीं जें कार्य केलें त्यापेक्षां पुष्कळ जास्त या सालानंतरच्या वीस वर्षांत त्यांनीं केलें. १८१३ च्या सनदेनें इंग्लडच्या मिशनरी लोकांनाच फक्त हिंदुस्थान खुलें झालें; परंतु १८३३ च्या सनदेमुळें जगांतील सर्व मिशनऱ्यांचें हिंदुस्थान मुक्तद्वार बनलें. यामुळें जर्मनी, अमेरिका यांसारख्या परक्या देशांतील मिशनरीहि शिक्षण क्षेत्रांत उतरू लागले.

या काळांतील महत्त्वाचा फरक म्हणजे इंग्रजी शिक्षणाच्या शाळा मिशनरी लोकांनीं मोठ्या प्रमाणावर सुरू केल्या. बंगालमध्यें डफ, मुंबईमध्यें विल्सन व मद्रासमध्यें अँडरसन यांनीं या कार्याचा पुरस्कार केला. या शाळा स्थापन करण्याचे मिशनरी लोकांचे दोन हेतु होते. एक इंग्रजी ज्ञानाचा व शास्त्राचा अभ्यास करणारे हिंदी लोक ख्रिस्ती धर्मांत सुलभतेनें ओढतां येतात; व दुसरें, ज्या हिंदी समाजांतील उच्च वर्गीयांची गांठ होणेंही कठीण, अशांचा संबंध शाळांतून येऊं लागल्यानें, त्यांना वायवल शिकविण्याची अनायासें संधि प्राप्त होते.

या काळांतील लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरकारी अधिकारी व मिशनरी यांचे जिव्हाळ्याचे संबंध, ही होय. हा संबंध घडून येण्यास दोन कारणें झालीं. पहिलें—१८३३ ते ५३ हा काळ इंग्लंडमध्यें सामाजिक सुधारणांचा व उदात्त कल्पनांचा होता. यामुळें कंपनीच्या अधिकारी वर्गामध्यें मिशनऱ्यांप्रमाणें कार्याबद्दल आस्था बाळगणारे लोक होते. दुसरें—धर्मामध्यें हात घातलेला हिंदु व मुस्लीम जनतेस रुचणार नाहीं, म्हणून पूर्वी धर्मापासून अलग राहण्याचें कंपनी सरकारनें ठरविलें होतें. परंतु धार्मिक संस्थांचे बाबतींत हस्तक्षेप केल्यास

हिंदू मुस्लिमांना आवडणार नाहीं, ही भीति या काळांत सरकारास वाटे-नाशी झाली. उदाहरण म्हणून सतीची चाल घेतां येईल. ही चाल बंद करण्याचे विरुद्ध जे होते त्यांना असें वाटलें कीं ही चाल बंद केल्यास लोक बंड करतील, परंतु तसें कांहीं प्रत्यक्ष घडलें नाहीं. एवढेंच नव्हे तर सुशिक्षित हिंदूंनीं या सुधारणेस पाठिंबा देऊन सरकारचे आभार मानिले. याचप्रमाणें हिंदूंच्या धार्मिक यात्रा व श्रीमंत हिंदूंची देवालयें यांची व्यवस्था कंपनी सरकारनें आपल्या हातीं घेतली. येथेंही लोकांतून कोणत्याही प्रकारचा विरोध झाला नाहीं. उलट कंपनीला दोन पैशाचा फायदाच झाला. म्हणून मिशनरी लोकांबरोबर मिसळण्यास व त्यांना त्यांचे कार्यांत प्रोत्साहन देण्यांत अधिकारीवर्गास कसलीच भीति वाटली नाहीं. तिसरें — कंपनीच्या अधिकाऱ्यानीं हें जें धोरण स्वीकारलें होतें, त्यास इंग्लंडमधील शिक्षण-प्रसाराचे पद्धतीनें एक प्रकारचा पाठिंबा दिला होता. त्या वेळीं शिक्षण मिळणें हा गरिबांचा हक्क आहे, हें मानण्यांत येत नव्हतें. श्रीमंतांनीं धार्मिक व उदारबुद्धीनें देऊं केलेली ती एक बाब आहे, असें समजण्यांत येत होतें. पार्लमेंटनेंही प्रत्यक्ष शिक्षणाच्या सवलती दिल्या नाहींत. धर्माच्या नांवानें प्राथमिक शाळा चालविणाऱ्या शिक्षण संस्थांना त्यांनीं फक्त मदत दिली. हीच विचारसरणी कंपनी सरकारचे अधिकाऱ्यांतही दिसून आली. विद्या ही लोकांना इंग्रज राज्यकर्त्याकडून हक्कानें मिळालेली गोष्ट नसून हिंदुस्थानला दिलेलें तें दान आहे, असेंच त्यांना वाटत होतें. इंग्लंडमध्यें जी गोष्ट धार्मिक संस्था करीत आहेत, तीच गोष्ट मिशनरी लोक हिंदुस्थानांत करीत आहेत, असा त्यांचा समज होता. यामुळें मिशनरी लोकांचे व कंपनीच्या अधिकारी लोकांचे १८३३ ते १८५३ पर्यंतच्या काळांतील संबंध फार सलोख्याचे राहिले. हा सलोखा १७९३ ते १८१३ किंवा १८१३ ते १८३३ या काळांत क्वचितच पाहावयास सांपडतो. या सलोख्याचे उभारणीवर १८५४ चा खलिता लिहिला गेला.

प्रकरण ५ वें

वुडसाहेबाचा खलिता

(१८५४)

कोर्ट ऑफ डायरेक्टरस् यांचा ९ जुलै १८५४ चा शिक्षण-विषयक खलिता ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. यास **वुडसाहेबाचा खलिता** असें म्हणतात. बोर्ड ऑफ़ कन्ट्रोल यांचे अध्यक्ष चार्लस वुड यांचे सांगण्यावरून तो खलिता लिहिला गेल्यामुळें कदाचित् हें नामाभिधान त्यास प्राप्त झालें असावें. हा खलिता शंभर परिच्छेदांचा असून शैक्षणिक-दृष्ट्या महत्वाच्या अशा बऱ्याच प्रश्नांचा विचार त्यामध्यें केला गेला आहे.

२ शिक्षणाच्या धोरणाचे उद्देशः—या खलित्यामध्यें सुरवातीस हिंदुस्थानांतील शिक्षणाची व्यवस्थिति (organisation) करण्याचें कंपनीनें कां ठरविलें आहे व त्यापासून कोणत्या गोष्टींची अपेक्षा केली जात आहे, हें दिलें आहे.

" ज्या महत्वाच्या प्रश्नांकडे आमचें लक्ष वेधून राहिलें आहे त्यामध्यें शिक्षण हा महत्वाचा प्रश्न आहे. उपयुक्त ज्ञानाचे प्रसारापासून जे आर्थिक व नैतिक सुख प्राप्त होतें व जें परमेश्वरकृपेनें हिंदुस्थानचा इंग्लंडशीं संबंध आल्यानें सहज प्राप्त होणार आहे, तें हिंदी नागरिकांना मिळवून देणें हें आमचें पवित्र कर्तव्य आहे.

" शिक्षणाचे योगें माणसास बौद्धिक पात्रता प्राप्त होते, इतकेंच नव्हे तर त्यापासून त्यास नैतिक बळही मिळतें, असा आमचा समज आहे. या योगें ज्यांना विश्वासानें महत्वाचे जागेवर नेमतां येतील असा अधिकारी-वर्गही निर्माण होणार आहे.

शिक्षणाची वाढ करणें हा जसा इंग्लंडच्या इभ्रतीचा प्रश्न आहे, तसा तो लोकांच्या आर्थिक उन्नतीचाही प्रश्न आहे. या ज्ञानप्रसारापासून भांडवल व मजूर यांचा योग्य उपयोग केल्यानें देशाच्या संपत्तीची वाढ कशी करतां येतें, कशा तऱ्हेनें प्रयत्न केले असतां व्यापाराची वाढ होऊन संपत्ति मिळवितां येते, या गोष्टींचें ज्ञान लोकांना होईल. इतकेंच नव्हे तर आपल्या कारखान्यासाठीं पुष्कळसा कच्चा माल मिळून ब्रिटिश मजुरांना भरपूर काम मिळेल व लोकांनाही नित्योपयोगी वस्तू मिळतील. "

३ आंग्लभाषानिष्ठ (anglicists) व महितभाषानिष्ठ (classicists) यांचा वाद :—बंगालमध्यें इंग्रजीचा पुरस्कार करणारे व महित भाषांचा पुरस्कार करणारे, यांचेमध्यें उत्पन्न झालेल्या वादाचा उल्लेख या खलित्यांत केला आहे. मेकॉलेसाहेबांनीं ज्याप्रमाणें महित भाषांचा प्रश्न उडवून लाविला, त्याप्रमाणें येथें झालें नाहीं. महित भाषांच्या अभ्यासापासून काय फायदे होतात हें या खलित्यांत स्पष्ट केले आहे. महित भाषांतील ग्रंथाचें अध्ययन ऐतिहासिक पुराणवस्तु संशोधनाचे दृष्टीनें महत्त्वाचें आहे; हिंदु मुस्लीम कायदा जाणण्यास व देशी भाषांची सुधारणा व वाढ करण्यासाठींही या भाषांचा उपयोग होतो. शास्त्रीय ज्ञानाची नवी दृष्टि धारण करून हिंदू तत्त्वज्ञानामध्यें पौर्वात्य पंडितांनीं कोणती स्पृहणीय कामगिरी केली आहे व त्याचा परिणाम, जे लोक या भाषांना पूज्य मानतात त्यांवर, कोणता झाला आहे याचाही उल्लेख या खलित्यांत केला आहे. तरीपण पौर्वात्य ग्रंथांमधून शास्त्र व तत्त्वज्ञान याबाबतींत बऱ्याच चुका दिसून येतात. आधुनिक संशोधन व सुधारणा या विषयीं या ग्रंथांतून कांहींच सांपडत नाहीं, वगैरे दोष जे मेकॉलेसाहेबांनीं दाखविले, तेही या खलित्यांत दाखविलेले आढळतात. या खलित्याचा शेवट खालील शब्दांत केला आहे.

" आपण असें स्पष्ट जाहीर केलें पाहिजे कीं हिंदुस्थानांत जें शिक्षण वाढावें म्हणून आम्हांस वाटतें तें म्हणजे युरोपांतील सुधारलेल्या कलांचें, शास्त्रांचें, तत्त्वज्ञानाचें व वाङ्मयाचें ज्ञान हें होय. "

४ शिक्षणाचें माध्यम:—शिक्षणाचें माध्यमाचा नंतर विचार केला आहे. युरोपियन ज्ञान पौर्वात्य भाषांतील कोणत्याही ग्रंथामध्यें न सांपडल्यामुळें इंग्रजी हें माध्यम सुरवातीस करावें लागलें व त्यायोगें देशी भाषांकडे दुर्लक्ष झालें हें खलित्यांत कबूल केलें आहे. देशी भाषांना गाडून टाकण्यासाठीं इंग्रजी भाषेचें माध्यम ठेवलें या आरोपाचा इन्कार करून देशी भाषा व इंग्रजी भाषा यांची सारखी वाढ होणें इष्ट आहे, असें खलित्यांत स्पष्ट मत दिलें आहे.

ज्या तीन मुद्यांचा विचार या खलित्यामध्यें केला आहे ते पूर्वींचेच वाद होते. त्यांचें पुनः चर्वितचर्वण न करतां त्यांचा फक्त गोषवारा घेण्यांत आला आहे.

५ नवीन योजना:—(१) शिक्षणखातें:—नवीन योजना कोणत्या अमलांत आणावयाच्या याचा विचार या खलित्यांत केला आहे. ज्या प्रांतांत कंपनी सरकारचें राज्य विभागलें होतें त्या—बंगाल, मद्रास, मुंबई, उत्तर—पश्चिम प्रांत व पंजाब या पांच प्रांतांत शिक्षण खातें स्थापण्यांत आलें. त्यावर एका जबाबदार अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत येऊन त्यास ' डायरेक्टर ऑफ पब्लिक इनस्ट्रक्शन ' असें संबोधण्यांत आलें. त्याचे हाताखालीं पुरेसे पर्यवेक्षक (Inspectors) देण्यांत आले, व दर वर्षी प्रांतांतील शिक्षणाचा अहवाल सरकारकडे सादर करण्याची जबाबदारी त्यांवर टाकण्यांत आली.

(२) **विश्वविद्यालयें:**...दुसरी योजना विश्वविद्यालयांसंबंधीं होती. १८४५ सालीं शिक्षण समितीनें (Council of Education) कलकत्त्यास विश्वविद्यालय स्थापन व्हावें म्हणून सुचविलें होतें, परंतु

डायरेक्टरांनीं अजून योग्य वेळ आली नाहीं, या सबबीवर ती सूचना फेटाळून लाविली. परंतु आतां ती वेळ आली आहे, असें त्यांना वाटं लागलें. हिंदी लोकांमध्यें उदार शिक्षणाचा फैलाव झाल्यामुळें व युरोपियन आणि अँग्लो-इंडियन नागरिकांना जरूर वाटल्यामुळें, कलकत्ता व मुंबई या ठिकाणीं विश्वविद्यालयें स्थापण्यास परवानगी देण्यांत आली. मद्रास किंवा ज्या ठिकाणाहून जास्त पदवीधर मिळूं शकतील अशा ठिकाणींही तें स्थापण्याबद्दल त्यांनीं सूचना केली. हीं सर्व विश्वविद्यालयें लंडन विश्वविद्यालयाप्रमाणें फक्त परीक्षा घेणाऱ्या संस्था होणार होत्या. त्यांच्या सिनेटमध्यें चान्सेलर, व्हाईस-चान्सेलर, व फेलोज यांचा समावेश होता व या सर्वांची निवड सरकारमार्फत होणार होती. परीक्षा द्यावयाच्या व पदव्या द्यावयाच्या एवढीच कामगिरी या विद्यालयांची होती. विश्वविद्यालयाच्या या पूर्व काळांत देखील शिक्षणाच्या वेगवेगळ्या शाखांमध्यें प्रोफेसरांची निवड करण्याबद्दल सुचविण्यांत आलें होतें.

३ **हिंदुस्थानभर शाळांचें जाळें:**—शिक्षणखातें व विश्वविद्यालयें यांची स्थापना झाल्यानंतर ज्या शाळांचें जाळें सर्व देशभर पसरविण्याचें होतें त्या शाळांविषयीं माहिती या खलित्यांत देण्यांत आली आहे. एका टोंकास विश्वविद्यालय व मान्य केलेलीं कॉलेजें, त्यानंतर इंग्रजीमधून किंवा मातृभाषेंतून शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा व त्याखालीं—दुसऱ्या टोंकास—देशी प्राथमिक शाळा, अशी या शिक्षण संस्थांची मालिका होती.

गेल्या कांहीं वर्षांत सरकारचें लक्ष उच्च शिक्षण देणारीं कॉलेजें स्थापन करण्याकडे होतें व त्यावरच सार्वजनिक पैशाचा मोठा भाग खर्ची पडत असे. अंतरझर तत्त्व अयशस्वी ठरलें असून या धोरणाचे योगें वरच्या वर्गातील फक्त मूठभर लोकांमध्येंच शिक्षणाचा प्रसार झाला आहे, ही गोष्ट मोठ्या खेदानें सरकारनें मान्य केली आहे. या

वरच्या वर्गातील लोकांनीं आतां आपल्या पायावर उभें राहिलें पाहिजे हें सांगतांना खलिता पुढें म्हणतो:—

" आजपर्यंत ज्याची हेळसांड झाली परंतु जें अत्यंत महत्त्वाचें आहे अशा शिक्षणाकडे आतां आपण आपलें लक्ष वळविलें पाहिजे. जीवनाच्या हरएक अवस्थेमध्यें उपयोगी पडेल असें शिक्षण बहुजनसमाजास देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे व त्याकरतां बराच पैसाही खर्च केला पाहिजे.

या हेतूच्या सिद्धीसाठीं पुष्कळ माध्यमिक शाळांची स्थापना हा उपाय डायरेक्टरांनीं सुचविला आहे. हिंदी भाषांचें माध्यम घेऊन माध्यमिक शाळांची वाढ झाली पाहिजे, ही खलित्यांत सुचविलेली गोष्ट पुष्कळांच्या लक्षांत आलेली दिसत नाहीं. खलित्याचें म्हणणें काय होतें हें पुढील उताऱ्यावरून स्पष्ट होईल.

" ज्या शाळांमध्यें वेगवेगळें माध्यम आहे अशा शाळांमध्यें कोणत्याही प्रकारचा फरक न करतां देशीभाषेंतील शाळा व इंग्रजी–देशी भाषांतील शाळा ही एकाच गटांत आम्ही सामिल करीत आहोंत. आज देशी भाषांतून दिल्या जाणाऱ्या शाळांपेक्षां इंग्रजी–देशी शिक्षणाच्या शाळा वरच्या दर्जाच्या आहेत; परंतु देशी भाषा ज्या प्रमाणांत समृद्ध होतील व शिक्षणदानाचें कामांत शिक्षक लायक होईल, त्या प्रमाणांत हा फरक हळू हळू नष्ट होणार आहे. "

माध्यमिक व पूर्व माध्यमिक शाळा यांच्या खालीं ज्या प्राथमिक शाळा आहेत त्यांना योग्य मदत देऊन प्रोत्साहन देण्याचें डायरेक्टरसाहेबांनीं ठरविलें. उत्तर–पश्चिम प्रांतांत थॉमसनसाहेबांनीं देशी शाळांना उत्तेजन देण्याची जी योजना होती तिचा इंडिया गव्हर्मेंटनें स्वीकार करावा अशी डायरेक्टरसाहेबांची सूचना होती.

या सर्व प्रकारच्या शाळांना जोडणारा एक धागा म्हणून होतकरू विद्यार्थ्यांना माध्यमिक व महा–विद्यालयीन शिक्षण घेतां यावें म्हणून शिष्यवृत्त्या देण्याबद्दल शिफारस करण्यांत आली. खलिता म्हणतो:—

" प्राथमिक शिक्षणापासून तें उच्च शिक्षणापर्यंत सारखें लक्ष पुरविलें व योग्य त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देऊन वरपर्यंत त्यांना पोंहचविलें म्हणजे हळू हळू समाजांतील सर्व वर्गांमध्यें या शिक्षणाचा प्रसार होईल. "

वरील शिफारशीमध्यें तीन गोष्टींचा अंतर्भाव झालेला आहे.

(१) समाजाच्या वरच्या थराला शिक्षण दिलें म्हणजे तें खालच्या थराला मिळतें, हें अंरतझर तत्त्व अमान्य करण्यांत आलें. (२) देशी भाषांचा माध्यम म्हणून माध्यमिक शाळांमधून उपयोग व (३) सार्वत्रिक शिक्षण योजनेचा पाया म्हणून देशी शाळांचा अंतर्भाव. या शिफारशी म्हणजे लॉर्ड ऑकलंड यांनीं स्वीकारलेल्या योजनेस जबर धक्काच होय.

(४) ग्रँट-इन-एड (सरकारी मदत)—शाळांना मदत देण्याची कल्पना दिसावयास सुंदर दिसते; परंतु ती इतकी खर्चाची होती कीं लोकावर कर लादून पैसा वसूल केल्याशिवाय भागणार नव्हतें. दुर्दैवानें डायरेक्टर लोक या योजनेस धीरानें तोंड देण्यास तयार होईनात. नवीन योजनेस जादा पैसा मंजूर करण्यास आम्ही तयार आहोंत असें ते मोघम बोलून गेले. इंग्लंडनें बहुजनसमाजाचे शिक्षणाचा ज्याप्रमाणें प्रश्न सोडविला, त्याप्रमाणें खाजगी शाळांना मदत देऊन तो प्रश्न हिंदुस्थानांत सोडवितां येईल, अशी त्यांची प्रामाणिक समजूत होती. त्यांचें म्हणणें असें होतें कीं,—

हिंदुस्थानांतील लोकांना योग्य तें शिक्षण देण्याची जबाबदारी एकट्या सरकारला पुरी पाडतां येणें कठीण आहे. सरकारनें कोणत्याही प्रकारचें आजवर प्रोत्साहन न दिल्याभुळें जी मदत लोकांकडून मिळूं शकली नाहीं, ती मदत आज लोक देण्यास तयार आहेत. या दोन गोष्टींचा विचार केला म्हणजे असें वाटतें कीं सरकारचे मदतीस उदार, सुशिक्षित

व श्रीमंत लोक घेतल्यास हिंदुस्थानांतील लोकांच्या शिक्षणविषयक अडचणी दूर होणार आहेत.

" म्हणून हिंदुस्थानांत ग्रँट-इन-एडची—शाळांना सरकारी मदत देण्याची—पद्धत आम्ही स्वीकारीत आहोंत. ही पद्धत यशस्वी तऱ्हेनें अगोदरच अमलांत आलेली आहे. सरकारनें आपला शिक्षणावरील खर्च वाढविण्यापेक्षां, सरकारास स्थानिक लोकांची मदत झाली तर शिक्षणाचें पाऊल अधिक झपाट्यानें पडणार आहे. या योगानें शिक्षण झपाट्यानें वाढेल, एवढेंच नव्हें तर, स्वतःचे पायावर उभे रहाण्यास लोक शिकतील व हा धडा कांहीं कमी महत्त्वाचा नाहीं. "

या धोरणानुसार प्रत्येक प्रांतिक सरकारनें ग्रँट-इन-एडचे नियम तयार करावेत, असें खलित्यामध्यें सुचविण्यांत आलें. उदाहरणार्थ खालील प्रकारच्या शाळांना मदत देण्यांत यावी.

(१) व्यवहारोपयोगी शिक्षण देणाऱ्या शाळा. धार्मिक शिक्षण जरी या शाळा देत असतील, तर त्या गोष्टीचा विचार केला जाऊ नये.

(ब) ज्यांची व्यवस्था चांगली आहे.

(क) ज्या शाळा सरकारच्या अटी कबूल करतात, व ज्यांना सरकारी तपासणीस मान्यता देतात.

(ड) शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकडून ज्या फी घेतात.

खलित्यामध्यें धार्मिक शिक्षणाबद्दल जें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे, तेंही लक्षांत घेणें जरूर आहे. त्यावेळीं सरकारी मदत घेणाऱ्या शाळा म्हणजे केवळ मिशनच्या शाळा होत्या. या शाळांमधून जें धार्मिक शिक्षण दिलें जातें, त्यांची दखलगिरी तपासणी अधिकाऱ्यांनीं घेऊं नये. सरकारी शाळांविषयीं खलित्यांत खालीलप्रमाणें उल्लेख आहे:—

सरकारी शाळांतून धार्मिक शिक्षणाचे बाबतींत जें धोरण आम्ही स्वीकारलें आहे त्याविषयीं बराचसा गैरसमज दिसतो. हिंदुस्थानांतील

सर्व लोकांकरतां या शाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत, व या शाळांतून केवळ व्यवहारोपयोगी शिक्षण दिलें जावें, अशी आमची इच्छा आहे. विद्यालयाच्या व महाविद्यालयाच्या पुस्तकालयांमधून बायबल ठेविलें आहे. व ज्या विद्यार्थ्यांना तें वाचावयाचें असेल त्यांना तें वाचतां येईल. ज्या विद्यार्थ्यांना बायबलसंबंधीं कांहीं विचारावयाचे असेल, त्यांना तें मनमोकळेपणानें शिक्षकांस विचारतां येईल. अशा विद्यार्थ्यांना आम्ही प्रतिबंध करूं शकत नाहीं. मात्र हें शिक्षण शाळेच्या वेळेबाहेर द्यावयाचें आहे. हें शिक्षण स्वखुशीनें दिलें व घेतलें जात असल्यानें, अधिकाराचा उपयोग धर्म शिक्षण देण्याकडे केला जातो, असा आमचे-विषयीं कोणीही संशय घेऊं नये. शाळांची पाहणी करतांना तपासणी अधिकाऱ्यांनींही धार्मिक शिक्षणाविषयीं कोणतीही चौकशी करण्याचें कारण नाहीं."

(५) **शिक्षकांचें ट्रेनिंग:**—योग्यप्रकारचें ट्रेनिंग देऊन शिक्षक विनीत करण्याचे प्रश्नाबद्दल खलिता म्हणतो:—

शिक्षक विनीत करण्याचे बाबतींत जें धोरण इंग्लंडमध्यें स्वीकारलें गेलें आहे तेंच हिंदुस्थानांत स्वीकारावयाचे; त्याशिवाय अधिक कांहीं चांगलें करतां येईल असें आम्हांस वाटत नाहीं. प्रथम शिक्षकांची निवड करावयाची. त्यांना शिष्यवृत्ति देऊन शाळेच्या वेळेच्या इतर वेळीं त्यांना शिक्षण द्यावयाचें. जे योग्य ठरतील अशा शिक्षकांची निवड ट्रेनिंग कॉलेजसाठीं करावयाची. ट्रेनिंग पुरें झाल्यावर त्यांना प्रमाणपत्रें (सर्टिफिकेटस्) द्यावयाचीं. यानंतर त्यांची शिक्षक म्हणून नेमणूक करावयाची व योग्य तो पगार त्यांना द्यावयाचा. ही पद्धत सरकारी शाळा व कॉलेजें यामध्यें आमलांत यावयाची. ज्या खाजगी शाळा सरकारमान्य आहेत तेथेंही ही पद्धति स्वीकारली जावयाची आहे.

"सरकारच्या इतर खात्याप्रमाणें शिक्षण खातें आकर्षक व्हावें व त्यास भरपूर शिक्षक मिळावेत असा आमचा मानस आहे."

६ शिक्षण व नोकऱ्या:—शिकलेल्या लोकांना उत्तेजन मिळावें या प्रश्नाचा विचार—खालित्यांत खालीलप्रमाणें केला आहे.

बुद्धिमान व विश्वासार्ह लोकांना नोकऱ्या देऊन सरकारच्या सर्व खात्यांत सुधारणा घडवून आणण्याच्या आमच्या योजनेकडे आम्हीं आपलें लक्ष वेधीत आहोंत. वेळोवेळीं रिकाम्या होणाऱ्या जागीं शिकलेल्या माणसांची योजना केल्यानें शिक्षणासही एकप्रकारचें उत्तेजन दिल्यासारखें होणार आहे.

आमची अशी इच्छा आहे कीं ज्यावेळीं नोकरीसाठीं येणाऱ्या दोन उमेदवारांमध्यें इतर गुण सारखे आहेत, परंतु एक दुसऱ्यापेक्षां चांगला शिकलेला आहे, तर या शिकलेल्या माणसाची प्रथम निवड करण्यांत यावी. खालच्या जागेवर निवड करतांना इतर गुण पाहतांना त्या माणसास लिहितां व वाचतां येतें कीं नाहीं, या गोष्टीकडेही लक्ष पुरविण्यांत यावें.

सरकारी खात्यांत कितीही जागा भरावयाच्या असल्या तरी उच्च शिक्षण घेऊन ज्यांनीं आपली उपयुक्तता वाढविली आहे अशांचीच निवड केली जाते, ही गोष्ट हिंदी लोकांचे मनावर पटविली गेली पाहिजे. लोकांच्या आकांक्षा ज्यांना कळतात व लोकांनाही ज्यांचेविषयीं आपुलकी वाटते, अशा अधिकारी वर्गानें व्यावहारिक शिक्षणापासून कोणते फायदे होतात, हें लोकांना समजावून सांगावें.

७ स्त्री-शिक्षण:—शेवटीं शिक्षणाच्या इतर प्रश्नांसंबंधीं खालित्यामध्यें चर्चा केली आहे. देशी भाषांचे अभ्यासासाठीं योग्य शाळा उघडण्याची जरूर किती आहे हें दाखविण्यांत आलें आहे. धंदेशिक्षणाचें महत्व दाखवून धंदे शिक्षणाच्या शाळा व कॉलेजें उघडण्याचें महत्वही सांगितलें आहे; त्याचप्रमाणें स्त्री शिक्षणाच्या प्रसाराची आवश्यकताही विशद केली आहे.

"स्त्रीशिक्षणाचें महत्त्व किती आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं." आपल्या मुलींना शिक्षण देण्याची इच्छा पुष्कळ हिंदी गृहस्थांचे मनांत उत्पन्न झाली आहे. स्त्रीवर्गास शिक्षण देण्यानें शैक्षाणेक व नैतिक वातावरणामध्यें मोठ्या प्रमाणांत फरक घडून येणार आहे. ज्यांना सरकारी मदत मिळते अशा शाळांमध्यें स्त्रियांकरितां काढलेल्या शाळांचा अंतर्भाव केला जातो व या शिक्षणाचे बाबतींत जे प्रयत्न केले जातात त्यास आमचें पूर्ण पाठबळ आहे. गव्हर्नर जनरलांनीं बंगालचे गव्हर्नरास असें कळविलें आहे कीं, हिंदुस्थानांत स्त्रीशिक्षणास मुक्तहस्तानें मदत केली पाहिजे. या सूचनेस आमचा पूर्ण पाठिंबा आहे. रावबहादुर मगनभाई करमचंद यांनीं अहमदाबादेस दोन मुलींच्या शाळा स्थापन करण्यासाठीं वीस हजार रुपये दिल्याबद्दल त्यांचा जो बहुमान करण्यांत आला तो आम्हांस पूर्ण मान्य आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा अशी आमची इच्छा आहे. या प्रसारास अशा मदतीनें प्रोत्साहन मिळणार आहे.

८. **खलित्याविषयीं चर्चा:**—ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा म्हणून गणलेल्या खलित्यांत कोणती तरतूद केली हें आपण पाहिलें. खलित्याचा तात्कालिक परिणाम म्हणून प्रत्येक प्रांतांत शिक्षणखात्याची स्थापना करण्यांत आली व कलकत्ता, मुंबई व मद्रास या शहरीं विश्वविद्यालयें निर्माण झालीं. या योगानें माध्यमिक शिक्षणास व थोड्या बहुत प्रमाणानें प्राथमिक शिक्षणास चालना मिळाली. ग्रँट-इन-एडची पद्धत सुरू झाली. शिक्षक तयार करण्यासाठीं ट्रेनिंग कॉलेजें अस्तित्वांत आलीं. ग्रँट, मॉयरा, मेटकाफ, एलफिन्स्टन, मनरो, मेकॉले व ऑक्लंड यांनीं ऐतिहासिक दृष्ट्या जीं वेळोवेळीं पत्रकें प्रसिद्ध केलीं त्यांत वुडसाहेबाचा खलिता हें शेवटचें पत्रक होतें. आधुनिक शिक्षणाच्या योजनेचा पहिला आराखडा तयार करण्यास या शेवटच्या पत्रकानें महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे. कै. एम्. आर. परांजपे म्हणतात:—"खलित्यामध्यें कोणकोणत्या योजना मांडल्या गेल्या होत्या व त्यांपैकीं किती

योजना आपण पुऱ्या करूं शकलों; त्याचप्रमाणें गेल्या शतकामध्यें शैक्षणिक ध्येयामध्यें कसकसे फरक झाले, त्यांत केवळ काळानें कोणते घडवून आणिले व जगांतील एकंदर शैक्षणिक घडामोडीमुळें कोणते घडले, हें या खलित्यावरून आपणांस पाहावयास सांपडेल."

या खलित्यापैकीं कांहीं शिफारशी बऱ्याच कालावधीनें हातीं घेण्यांत आल्या, कांहीं अर्धवट स्वरूपांत हातीं घेण्यांत आल्या, व कांहीं शिफारशी तर तशाच पडून राहिल्या. हें पाहून मात्र वाईट वाटतें. लोकांच्या भाषांना प्रोत्साहन देण्याचें ठरलें असतांही त्याकडे दुर्लक्ष करण्यांत आलें व त्यामुळें ज्या भाषा बहुजनसमाजाला कळत होत्या व ज्या भाषांत ते बोलत होते त्यांची हेळसांड झाली. लोकांना शाळा चालविण्यास मदत देऊन सरकारनें शिक्षण-क्षेत्रांतून आपलें अंग काढून घ्यावयाचें, या नियमाचें पालन व्हावयाचे ऐवजीं उल्लंघनच झालें. के. एम. आर. परांजपे म्हणतात:--

"साठ वर्षांचे वर सरकारी शाळा वाढत गेल्या व खाजगी शाळांना प्रोत्साहन देण्याचे ऐवजीं त्यांचा निरुत्साहच करण्यांत आला. १८५० ते १८८० पर्यंत शिक्षणक्षेत्रांत मिशनऱ्यांच्याच काय त्या खाजगी शाळा होत्या, परंतु या लोकांवर शिक्षणाचें काम पूर्णत्वानें सोपविण्यास सरकारास धैर्य होईना, कारण मिशनचा मुख्य उद्देश शिक्षणापेक्षां ख्रिस्ती धर्माचा प्रसार हा होता. १८५७ च्या बंडानें सरकारास कळून चुकलें कीं, हिंदी लोकांच्या धर्माच्या बाबतींत सरकारनें संशयित वर्तन करणें धोक्याचें आहे. याचा परिणाम असा झाला कीं, शिक्षणक्षेत्रांत बिन-सरकारी कार्य करणाऱ्या संस्था मिशनऱ्यांच्या असल्या व त्याबद्दल सरकारास जरी आपुलकी वाटत असली, तरी त्यांना सरकारकडून पूर्ण मदत मिळाली नाहीं."

जसा शिक्षणाचा प्रसार झाला व समाजसेवेचीं नवीं ध्येयें उपलब्ध झालीं; तसे खाजगी प्रयत्न सुरू झाले; परंतु आपल्या शाळा व

क्रमांक 9e390
नों. दि. ४ डिसें. १९१७
वा. नाल. ३०१२

कॉलेजें हिंदी व्यवस्थापकांचे हातीं देण्यास सरकार तयार होईना. हिंदी लोकांचे अंगीं या संस्था चालविण्याची पात्रता आहे असं सरकारास वाटेना. आमच्या मतें हे सरकारचे विचार चुकीचे होते.

खलित्यामध्यें बहुजनसमाजाचे शिक्षणाची जी योजना होती ती आजही पूर्ण झालेली नाहीं. मातृभाषेंतून सर्व शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळाही जन्मास आल्या नाहींत. खलित्यामध्यें दर्शविल्याप्रमाणें गोष्टी अमलांत न आल्यामुळें आज शिक्षणांत बरेच दोष राहिले आहेत.

खलित्यामध्यें असे कांहीं विचार व्यक्त केले गेले आहेत कीं, त्यांकडे पुनः कोणीं लक्षच दिलें नाहीं. उदाहरणार्थ, शिक्षण हें प्रत्येक परिस्थितीला साजेसें असावें, असें म्हटलें आहे. जन्म व परिस्थिति यामुळें माणसाला जो दर्जा प्राप्त झाला आहे, त्याप्रमाणें त्याला शिक्षण मिळावें, ही व्हिक्टोरिया राणीच्या वेळीं लोकांची कल्पना होती. परंतु ही कल्पना आज लोकांना कर्शाशीच वाटते. प्रत्येकाला शिक्षण घेण्याची सारखी संधि मिळाली पाहिजे असें लोकांना वाटतें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानानें कच्चा माल ब्रिटिश कारखान्यांसाठीं तयार करावा व अशारीतीनें तयार झालेला माल हिंदुस्थाननें वापरावा, ही खलित्यांत प्रदर्शित केलेली इच्छाही कोणास आवडण्यासारखी नाहीं. आर्थिक दृष्ट्या किंवा शैक्षणिक दृष्ट्या हे विचार कोणाही स्वाभिमानी हिंदी माणसास आवडतील असें वाटत नाहीं.

हे दोष दाखवितांना खलिता हा फोल आहे, अशी चुकीची कल्पना कोणीही करून घेऊं नये. कांहीं इतिहासकारांनीं या खलित्यास फाजील महत्त्व देऊन 'हिंदी शिक्षणाची ही मोठी सनद आहे' असें जें म्हटलें आहे तें चुकीचें आहे, एवढेंच आम्हांस दाखवावयाचें आहे. खलित्यानें त्या वेळच्या शैक्षणिक परिस्थितीचे मानानें शिक्षण योजना प्रस्थापित करण्यांत मोठीच कामगिरी केली आहे हें निर्विवाद आहे. परंतु शैक्षणिक ध्येयें सध्यां इतकीं बदललेलीं आहेत कीं ~~खलित्यामध्यें~~

दर्शित केलेल्या विचाराप्रमाणें आज चालणें फायद्याचें होणार नाहीं. या खलित्यास सनद म्हणावी कीं कसें याविषयीं कै. एम्. आर. परांजपे यांचेंच मत देणें जास्त उपयुक्त होईल:—

"खलित्यामध्यें बऱ्याच चांगल्या गोष्टी आहेत म्हणून त्यास विशेष हक्क प्रस्थापित करणारी शैक्षणिक सनद म्हणणें चुकीचें होणार आहे. सरकारी मदतीनें शिक्षणप्रसार करण्याचें कार्य जरी सुरू असलें तरी, सार्वत्रिक साक्षरता प्रसाराचें ध्येय सरकारनें आपल्यापुढें ठेविल्याचें या खलित्यावरून दिसून येत नाहीं. विशेष वयोमर्यादेपर्यंत सर्व बालकांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारवर आहे ही गोष्ट जाहीर झाली नाहीं. गरिबी ही होतकरू विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे आड कधींही येणार नाहीं, हें धोरण सरकारनें जाहीर केलें नाहीं. सरकारी नोकरी हेंच शिक्षणाचें ध्येय आहे, हें जरी सरकारनें खलित्यामध्यें मान्य केलें नसलें तरी खलिता तयार करणारांनीं, समाजांत पुढारी निर्माण व्हावेत, हिंदुस्थानांत उद्योगधंद्याचें पुनरुज्जीवन व्हावें किंवा मातृभूमीचें रक्षण व्हावें किंवा, थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास, स्वराज्याला उपयुक्त होतील असे नागरिक तयार करणें, हें ध्येय आपल्यापुढें ठेविलें नव्हतें. एक शतकानंतरही लोकांच्या आकांक्षा काय आहेत याची कल्पना सरकारास आली नाहीं, हेंही क्षम्य ठरेल; परंतु यावरून खलिता सदोष आहे, हींच गोष्ट सिद्ध होत नाहीं का? १८५४ मध्यें जो खलिता महत्त्वाचा वाटला त्यास १९४१ सालीं शिक्षणाची सनद म्हणून संबोधणें चूक होणार आहे."

ग्रंथ संग्रहालय ठाणे

प्रकरण सहावें

शिक्षण खात्यांचे कायमें प्रारंभ

१८५४ चा खलिता बाहेर पडल्याबरोबर हिंदुस्थानांतील प्रत्येक प्रांतांत शिक्षण खात्याची स्थापना होऊन त्यावर डायरेक्टर म्हणून मुख्य अधिकाऱ्याची नेमणूक झाली. त्यास मदत करण्यासाठीं म्हणून पुरेशा इन्स्पेक्टरांचीही नेमणूक करण्यांत आली. योजनेप्रमाणें कार्य करण्यासाठीं मोठ्या रकमा खर्चासाठीं देण्यांत आल्या व अशारीतीनें हिंदुस्थानच्या आधुनिक शिक्षण खात्याची सुरवात झाली.

शिक्षण खात्याची पहिल्या तीस वर्षांची कामगिरी पुढीलप्रमाणें होती.

(१) मुंबई, मद्रास, कलकत्ता व लाहोर या ठिकाणीं विश्वविद्यालयांची स्थापना झाली.

(२) कॉलेजच्या शिक्षणाचा प्रसार झाला.

(३) माध्यमिक किंवा हायस्कूलच्या शिक्षणाचा प्रसार त्याहीपेक्षां जास्त प्रमाणांत झाला.

(४) लोकल फंड गोळा करण्यांत येऊं लागल्यामुळें प्राथमिक शिक्षणाची कांहींशी प्रगति झाली.

या काळांत खलित्यांत दर्शित केल्याप्रमाणें कांहीं गोष्टी झाल्या, तथापि त्याचबरोबर ज्या कांहीं इतर गोष्टी व्हावयास पाहिजे होत्या त्या घडून आल्या नाहींत. उदाहरणार्थ, हिंदी विश्वविद्यालयें या शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणून बनावयाच्या होत्या, परंतु त्या केवळ परीक्षा घेणाऱ्या संस्था म्हणूनच राहिल्या; हिंदी भाषा या शिक्षणाचें माध्यम

केल्या जातील असें स्पष्ट म्हटलें गेलें असतांही माध्यमिक शाळांतून इंग्रजीचेंच वर्चस्व राहिलें; शिक्षकांना ट्रेनिंग देण्याची जरूर असतांही त्याकडे दुर्लक्ष करण्यांत आलें; व देशी शाळांकडे दुर्लक्ष केलें गेल्यामुळें बहुजनसमाजाचं शिक्षणावर विपरीत परिणाम घडून आला.

२. विश्वविद्यालयांची स्थापना:—१८५७ मध्यें विश्वविद्यालयें स्थापन होण्यापूर्वी हिंदुस्थानांत कॉलेजें स्थापण्यांत आलीं होतीं हें आपण पूर्वी पाहिलेंच आहे. परंतु हीं पूर्वीचीं कॉलेजें सध्यांच्या कॉलेजापेक्षां भिन्न होतीं. इंग्रजी शिकविणाऱ्या शाळांमधून हीं पूर्वीचीं कॉलेजें जन्मास आलीं होतीं. ज्या शाळेंत इंग्रजी मूळाक्षरं शिकविलीं जात त्याच शाळेंत शेक्सपिअरचे ग्रंथ, कॅल्क्यूलस हा गणिताचा विषय; स्मिथनें लिहिलेलें ' राष्ट्राची संपत्ति ' हें पुस्तक आणि रामायण हीं शिकविलीं जात असत. त्यावेळीं उच्च प्रकारची शिक्षण संस्था म्हणजे कॉलेज, ही कॉलेज या शब्दाची व्याख्या केली जात असे. आज ज्यांना आपण कॉलेज म्हणतों त्या संस्था १८५७ सालीं विश्वविद्यालयें स्थापन झाल्यानंतर जन्माला आल्या. यापुढें विश्वविद्यालयानें घेतलेल्या प्रवेशपरीक्षेमध्यें जे पास होतील असेच विद्यार्थी कॉलेजमध्यें घेतले जात असत व त्यांना विश्वविद्यालयानें ठरवून दिलेला अभ्यास द्यावा लागत असे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कॉलेजें हीं विश्वविद्यालयाचीं मुख्य घटक बनलीं व त्यांच्या करवीं वेगवेगळ्या विषयांत उच्च दर्जाचें शिक्षण देण्यांत येऊं लागलें.

१९ जुलै १८५४ रोजीं कोर्ट ऑफ डायरेक्टरांचा खलिता पोहोंचल्याबरोबर हिंदुस्थान सरकारनें कलकत्ता, मुंबई व मद्रास या ठिकाणीं विश्वविद्यालयें स्थापण्याचें कार्य सुरू केलें. सुरवातीचें काम बरेंच त्रासाचें होतें व त्याला बराच वेळ लागला. १८५७ च्या सुरवातीस तीनही ठिकाणीं विद्यालयें स्थापन करून कायदे तयार करण्यांत आले. स्थानिक परिस्थितीमुळें होणारे कांहीं विशिष्ट फरक जर सोडून दिले तर, तीनही

विश्वविद्यालयांची घटना एकाच स्वरूपाची आहे, हें दिसून येईल. एका संस्थेची घटना पाहिली म्हणजे इतर घटना पाहण्याचें कारण नाहीं. मुंबई विश्वविद्यालयाची घटना आपण पाहूं.

मुंबई विश्वविद्यालयाच्या कायद्याच्या प्रस्तावनेंत विश्वविद्यालयाचा उद्देश काय असावा हें खालीलप्रमाणें दिलें आहे. वेगवेगळ्या विषयामध्यें विद्यार्थ्यांनीं किती प्रभुत्व मिळविलें आहे हें विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन ठरविणें व तें प्रभुत्व प्राप्त करून घेतलें असल्याचा दाखला म्हणून त्यांना पदव्या देणें.

नंतर या कायद्यान्वयें चॅन्सेलर, व्हाइस–चॅन्सेलर व फेलो यांची प्रथम निवड करण्यांत आली, व अशारीतीनें मुंबई विश्वविद्यालयाची मुख्य निकाय संस्था (Body corporate) निर्माण झाली. चॅन्सेलर व व्हाइस–चॅन्सेलर सोडून फेलोंची संख्या २६ पेक्षां कमी नसावयाची. फेलो हे दोन प्रकारचे असावयाचे., एक–कार्यपरत्वें आलेले–(एक्स ऑफिशिओ)—यांच्यामध्यें खालील अधिकाऱ्यांचा समावेश होतो. मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश, मुंबईचे बिशप, मुंबई सरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, मुंबईच्या शाळाखात्याचे प्रमुख–डायरेक्टर; व सर्व कॉलेजांचे प्रमुख. दुसऱ्या प्रकारचे फेलोंना ऑर्डीनरी फेलो असें नामाभिधान देण्यांत आलें आहे. सरकार अशा लोकांची कायमची नेमणूक करतें. मृत्यू आल्यामुळें, किंवा राजीनामा दिल्यामुळें, किंवा हिंदुस्थानचे बाहेर कायमचे गेल्यामुळें किंवा सरकारनें एखाद्यास काढून टाकल्यामुळें, जर जागा रिकामी झाली तर सरकार ती पुन्हा भरतें.

विश्वविद्यालयाच्या सेनेटमध्यें खालीलप्रमाणें अधिकारी असतात. चॅन्सेलर (हा नेहमीं मुंबई प्रांताचा गव्हर्नर असतो), व्हाईस–चॅन्सेलर (याची निवड गव्हर्नर जनरल दोन वर्षांकरतां म्हणून करतात) व फेलोज, कामानिमित्त आलेले किंवा सरकारनें निवडलेले. विश्वविद्यालयाचें सर्व काम या मंडळाकडे सोपविण्यांत आलें आहे.

३. १८५७ च्या विश्वविद्यालयाचे कायद्याविषयीं विचार:—या कायद्यावर विशेष टीकात्मक लिहिण्यासारखें नाहीं. विषयाची माहिती व्हावी या दृष्टीनें खालील गोष्टी लिहितां येतील.

(अ) फेलो २६ पेक्षां कमी असूं नये असें म्हटलें, परंतु जास्तींत जास्त किती असावे हें निश्चित न केल्यानें, व ऑर्डिनरी फेलो यांची कायमची नेमणूक करण्यांत येऊं लागल्यानें सिनेटच्या सभासदांची संख्या वाढूं लागली.

(ब) विश्वविद्यालयामध्यें हरघडी घडणाऱ्या बारीक सारीक गोष्टीकडे लक्ष पुरविण्यासाठीं सिंडिकेट म्हणून एक लहानसें कार्यकारी मंडळ निवडण्याची प्रथा सुरू झाली. कायद्यामध्यें सिंडिकेट मंडळाचा कोठेंही उल्लेख नसून सर्व अधिकार सिनेटला देण्यांत आले आहेत. सिनेटनें केलेल्या नियमाप्रमाणें सिंडिकेटची स्थापना करण्यांत आली; व त्यासही कांहीं अधिकार सुपूर्त करण्यांत आले. कायद्यानें कोणतेही अधिकार सिंडिकेटला मिळाले नाहींत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

(क) प्रस्तावनेंत ' परीक्षा घेणें व पदव्या देणें ' एवढींच कामगिरी विश्वविद्यालयाकडे सोंपविली आहे. ही गोष्ट १८५७ सालीं अस्तित्वांत असणाऱ्या लंडन विश्वविद्यालयाच्या घटनेस अनुसरून अशी झाली असली, तरी १८५४ सालीं प्रसिद्ध झालेल्या खलित्यामध्यें दिग्दर्शित केलेले उद्देश पूर्णांशानें सफल करणारी अशी ती घटना नव्हती. विश्वविद्यालयें म्हणजे केवळ शिक्षण देणाऱ्या संस्था न होतां, इतरत्र शिक्षण घेऊन तयार झालेल्या विद्यार्थ्यांची त्यांनीं परीक्षा घ्यावी, हा जरी खलित्याचा उद्देश असला तरी, कायदा, स्थापत्य व महितभावा यासारख्या विषयांच्या उच्च अभ्यासाची सोय इतर संस्थांमधून होत नसल्यानें मुद्दाम प्रोफेसर लोक नेमून विश्वविद्यालयानें करावी, अशी सूचना खलित्यामध्यें केली होती. १८५७ चा विश्वविद्यालयाचा कायदा

तयार करणारांनीं १८५४ च्या खलित्याचा फार संकुचित दृष्टीनें विचार केला, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं.

(ड) १८५७ चे कायद्यानें ज्या प्रकारचीं विश्वविद्यालयें स्थापन झालीं त्यांना स्वीकारी (affiliating) विश्वविद्यालयें असें समजण्यांत येतें. या प्रकारामध्यें ज्या कॉलेजांचा संबंध विश्वविद्यालयाशीं जोडण्यांत येतो, तीं कॉलेजेंच फक्त शिक्षण देणारीं केंद्रें बनतात; व विश्वविद्यालयें प्रत्यक्ष शिक्षण देणाऱ्या संस्था न बनतां, त्यांचें काम विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेऊन त्यांना पदव्या देणें एवढेंच रहातें. तात्पुरत्या फायद्याचे दृष्टीनें विचार करतां १८५७ सालीं अशीं विश्वविद्यालयें असणें श्रेयस्कर होतें, परंतु दूरवर विचार केल्यास तीं अहितकारक असल्याचेंच दिसून येईल. तात्पुरत्या फायद्यासाठीं कालांतरानें मिळणाऱ्या फायद्याकडे दुर्लक्ष केलें गेलें ही दुःखाची गोष्ट आहे. राष्ट्राचे हिताचे दृष्टीनें पूर्ण विचार करून योजना न आखतां जी गोष्ट फारशी दगदग न करतां होण्यासारखी होती, तिचाच अवलंब करण्यांत आला. १८५४ सालीं ज्या लंडन विश्वविद्यालयाचें अनुकरण केलें गेलें, तिनें १८५८ सालीं आपलें स्वरूप परिणामीं अहितकारक म्हणून बदलून टाकिलें, हें लक्षांत आणिलें म्हणजे हिंदुस्थान सरकारनें घेतलेला निर्णय विचित्र वाटतो. विश्वविद्यालयासंबंधीं होणारा कायदा १८५७ सालीं न होता तो जर १८५९ सालीं झाला असतां, तर कदाचित् ही आपत्ति निर्माण झाली नसती.

४. १८५४ ते १८८२ पर्यंत झालेली कॉलेज शिक्षणाची वाढ:– विश्वविद्यालयें स्थापन झाल्यापासून ते हिंदी शिक्षणाचा विचार करण्याकरतां नेमलेल्या हंटर कमिशन पर्यंतच्या काळांत कॉलेजांची वाढ झपाट्यानें झाली. या वाढीचें एक कारण माध्यमिक शिक्षणाचा प्रसार हें असून दुसरें सरकारनें उदार हस्तानें दिलेली मदत हें होय. पहिली जी मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाली तींत २१९ उमेदवार यशस्वी झाले;

परंतु १८८१-८२ मध्यें ७४२९ विद्यार्थी परीक्षेस बसले व २७७८ पास झाले. त्यावेळीं पास झालेल्यांपैकीं वरेचसे विद्यार्थी कॉलेजांत जात असत, कारण पदवीधर झालेल्यांना आर्थिक फायदा मिळत असे व म्हणून १८५७ ते १८८२ चे काळांत कॉलेज संस्था व त्यांतील विद्यार्थी यांची बरीच वाढ झाली.

१८५७ व १८८२ या सालांतील कॉलेज संस्थांचे आंकडे खालील प्रमाणें आहेत:—

प्रांत	१८५७ मध्यें कॉलजची संख्या	१८८२ मध्यें कॉलेजची संख्या
बंगाल प्रांत ...	१५	२७
मुंबई ,, ...	३	६
उत्तर-पश्चिम प्रांत ..	५	११
मद्रास ,, ...	४	२५
पंजाब ,, ...	०	२
मध्यप्रांत ...	०	१
एकूण ...	२१	७२

या काळांत नवीन उदयास आलेल्या कॉलेजांपैकीं दोन कॉलेजांचा विशेष नामनिर्देश करणें जरूर वाटतें. पहिलें लखनौचें कॅनिंग कॉलेज. १८५७ च्या बंडानंतर गव्हर्नर जनरल लॉर्ड कॅनिंग यांनीं लोकांना चांगल्यारीतीनें वागविलें म्हणून कृतज्ञता बुद्धि ठेवून प्रांतांतील तालुकदारांनीं हें कॉलेज लॉर्ड कॅनिंग यांचे नांवानें १८६४ मध्यें स्थापन केलें. या कॉलेजमधून आजचें लखनौ विश्वविद्यालय निघालें.दुसरें कॉलेज म्हणजे सर सय्यद अहमद यांनीं स्वप्रयत्नानें १८७५ सालीं स्थापिलेलें मोहाम्मे-

ड्न अँग्लो–ओरिएंटल कॉलेज. या कॉलेजमधून अलिगडचें मुस्लीम विश्वविद्यालय उद्‌यास आलें.

या काळांतील विशेष म्हणजे कॉलेज संस्था चालविण्याचें कार्य हिंदी लोकांनीं आपले हातीं घेण्यास सुरवात केली, हें होय. १८८१–८२ सालीं हिंदी लोकांनीं सरकारची मदत घेऊन ५ कॉलेजें चालविलीं होतीं; वर उल्लेखलेलीं दोन कॉलेजें उत्तर–पश्चिम प्रांतांत व पचियप्पाचें कॉलेज आणि विजगापट्टण व तिनेवेलीचीं हिंदु कॉलेजें मद्रास प्रांतांत. या कॉलेजांचे प्रमुख बहुधा युरोपियन गृहस्थच असावयाचे, ही लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. पहिल्या प्रतीच्या कॉलेजचे प्रमुख होण्यास हिंदी लोक नालायक आहेत, असा त्यावेळीं लोकांचा समज होता.

५. पंजाब विश्वविद्यालयाची स्थापना:—१८८२ सालीं विशेष कायदा पास करून पंजाब विश्वविद्यालयाची स्थापना झाली. १८५७ सालीं इतर विश्वविद्यालयाचे बाबतींत पास झालेल्या कायद्याप्रमाणेंच हाही कायदा होता, परंतु पंजाब विश्वविद्यालय इतर विद्यालयापासून अनेक बाबतींत भिन्न आहे. १८९७ ते १९०२ या सरकारच्या पंचवार्षिक अहवालामध्यें हा फरक दाखविण्यांत आला आहे.

(१) या विश्वविद्यालयामध्यें प्राच्य विद्या देणारी एक ज्ञान शाखा आहे. तीमधून बॅचेलर (बी. ए.), मास्टर (एम्. ए.) व डॉक्टर अशा पदव्या विद्यार्थ्यांना देण्यांत येतात. ज्या स्वरूपाचा अभ्यासक्रम आर्ट (सांस्कृतिक) कॉलेजांतील परीक्षांकरतां आहे त्याच स्वरूपाचा अभ्यासक्रम याही परीक्षांसाठीं आह. मात्र माध्यम इंग्रजी न राहतां उर्दू असतें.

(२) संस्कृत, अरेबिक व पर्शियन या भाषांच्या परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना पौर्वात्य भाषांतून पदव्या दिल्या जातात.

(३) देशी भाषांतील प्राविण्य–परीक्षा घेतल्या जातात.

(४) मुस्लीम कायदा, हिंदु कायदा व वैद्यशास्त्र या विषयांमध्यें पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना देशी पदव्या दिल्या जातात.

(५) शाळांच्या अनेक परीक्षा घेतल्या जातात.

(६) हें विश्वविद्यालय पौर्वात्य कॉलेज व लॉ (कायद्याचें) कॉलेज चालवितें. शिवाय वेळोवेळीं सिनेट ठरवील त्याप्रमाणें शाळा व कॉलेजें चालविण्यांत येतात.

(७) सर्व साधारण शैक्षणिक बाबतीत सिनेट मार्गदर्शन करतें.

६. माध्यमिक शिक्षण:—१८८५ ते १८९२ चे काळांतील विशेष हा आहे कीं उच्च व प्राथमिक शिक्षणाचे मानानें माध्यमिक शिक्षणाचा प्रसार बराच झाला. १८५४ चा खलिता ज्यावेळीं प्रसिद्ध झाला त्यावेळीं इंग्रजी शिक्षण देणाऱ्या शाळा नुकत्याच सुरू झाल्या होत्या. शाळांची गणती केली नसल्यामुळें निश्चित आंकडा जरी देतां आला नाहीं तरी, शाळांची संख्या बरींच कमी होती व त्यांत शिकणाऱ्या मुलांची संख्या कांहीं हजारांपलीकडे गेली नव्हती.

१८५४ च्या खलित्यानें माध्यमिक शिक्षणावर जोर दिला होता, हें आपण पाहिलेंच आहे. गेल्या कांहीं वर्षांत सरकारचा प्रयत्न उच्च शिक्षण देण्याचा होता, हें जरी मान्य केलें तरी, यापुढें सर्व साधारण पाश्चिमात्य ज्ञान देणारें, परंतु थोड्या कमी प्रतीचें व समाजाच्या वेगवेगळ्या पातळीमध्यें असणाऱ्या सर्व लोकांना व्यावहारिक दृष्ट्या उपयोगी पडणारें शिक्षण पसरविण्याचे प्रयत्न फार जोरानें झाले पाहिजेत, असें खलित्यांत म्हटलें आहे. हा हेतु साध्य करण्याकरतां प्रत्येक जिल्ह्यांत अशा शाळा काढण्यांत याव्यात कीं जेथें थोड्या लोकांना उच्च शिक्षण देण्याचे ऐवजीं समाजांतील वेगवेगळ्या परिस्थितींतील लोकांना उपयुक्त नागरिक बनवितां येईल, अशा प्रकारचें शिक्षण देण्याची सोय अधिक चांगल्या प्रकारें करतां येईल, अशी शिफारस खलित्यानें केली होती.

१८५४ च्या खलित्यानंतर माध्यमिक शाळा झपाट्यानें वाढूं लागल्या. यामध्यें पुढाकार नवीन स्थापन झालेल्या शाळा खात्यानें घेतला, हें सांगणें नको. इंग्रजी शिक्षणाची मागणीही जोरानें होऊं लागली. सरकारनेंही यासाठीं जादा मदत देण्यास सुरवात केली. १८५४ ते १८७० च्या काळांत सरकारनें चालविलेल्या माध्यमिक शाळांचे संख्येंत वाढ झाली. १८६५-७० चे काळांत शिक्षणाची प्रगति अजमावतांना मात्र सरकारनें प्राथमिक शिक्षणप्रसारावर जोर दिला व त्याचा परिणाम म्हणून माध्यमिक शिक्षण थोडें ढिलें पडलें. तथापि त्याची प्रगति समाधानकारक अशीच होती. १८५४ सालीं माध्यमिक शाळांची संख्या १६९ होती व त्यांत १८३३५ विद्यार्थी शिकत होते; १८८२ सालीं शाळांची संख्या १३६३ असून त्यांतील मुलांची संख्या ४४६०५ होती.

सरकारचें माध्यमिक शिक्षणावरचें लक्ष थोडें कमी झालें तरी त्यापासून विशेष नुकसान झालें नाहीं. १८५४ च्या खलित्यानें खाजगी शाळांना मदत देण्याच्या पद्धतीला विशेष महत्त्व दिलें होतें व प्रत्येक प्रांतिक सरकारनें अशी मदत देण्यासाठीं पैशाची तरतूदही केली होती. याचा परिणाम असा झाला कीं खाजगी शाळा भराभर वाढूं लागल्या व सरकारनें जरी आपले प्रयत्न ढिलावले होते तरी, एकूण प्रगति कांहीं खुंटली नव्हती.

वुडसाहेबांचा खलिता बाहेर पडल्यावर कांहीं वर्षेपर्यंत शिक्षणप्रसाराचे खाजगी प्रयत्न म्हणजे फक्त मिशनरी लोकांचेच होत असत. परंतु थोड्याच वर्षांत हिंदी लोक या क्षेत्रांत उतरले व १८८२ सालीं हिंदी लोकांनीं चालविलेल्या शाळांचा आकडा एकूण शाळांचे संख्येंत इतरांपेक्षां अधिक मोठा होता. या दृष्टीनें इंडियन एज्युकेशन कमिशनचे अहवालामधून घेतलेला व १८८१-८२ ची परिस्थिति दाखविणारा खालील तक्ता पहाण्यासारखा आहे.

१८८१-८२ मध्यें माध्यमिक खाजगी शाळा किती होत्या हें दाखविणारा तक्ता.

प्रांत	हिंदी लोकांनीं चालविलेल्या		इतर लोकांनीं चालविलेल्या	
	इंग्रजी शाळांची संख्या	दिलेली मदत	इंग्रजी शाळांची संख्या	दिलेली मदत
मद्रास ...	६१८	८८,२८४	४१८	८५,२८९
मुंबई ...	१३	१४,६५३	४०	३७,३४३
बंगाल ...	५८२	१,९८,९११	२३	१६,४२०
उत्तर-पश्चिम प्रांत व अयोध्या	१७	१८,६४३	१०४	७८,५७१
पंजाब ...	२	१,५२२	११८	५१,४७१
मध्यप्रांत ...	४	४,०५३	९	११,१२६
आसाम ...	२५	१०,७७१	४५	६,६५७
एकूण ...	१३४१	३,३६,८३७	७५७	२,८६,८७७

यावरून असें दिसेल कीं बंगाल प्रांतांत बहुतेक इंग्रजी शाळा हिंदी लोकांनींच चालविलेल्या होत्या. मद्रास प्रांतांत मिशनरी लोकांचे प्रयत्न मोठ्या प्रमाणांत झाले होते; परंतु तेथेंही हिंदी लोकांच्या शाळांचीच संख्या अधिक होती. मुंबई व इतर प्रांतांत मात्र हे प्रयत्न अल्प प्रमाणांतच सुरू झाल्याचें दिसून येईल. एकंदरींत हिंदी लोकांनीं चालविलेल्या शाळांची संख्या इतरांनीं चालविलेल्या शाळांच्या दुप्पट होती, हें दिसून येईल.

८. **माध्यमिक शिक्षणांतील कांहीं दोष:**—माध्यमिक शिक्षणाबरोबर कांहीं दोषही आले. या शिक्षणाच्या प्रथम अवस्थेतच उद्योगधंद्याचे शिक्षण-क्रमाचा अभाव, इंग्रजी भाषेचा वरचष्मा व ट्रेन्ड शिक्षकांची

उणीव, हे दोष दिसून आले. हेच दोष पुढें वाढत गेले. हे दोष शिक्षण क्रमांत कसे आले हें आतां आपण पाहूं.

(अ) माध्यमिक शाळांतून धंदेशिक्षणाचा अभाव:—

१८५४ च्या खलित्यामध्यें स्पष्ट म्हटलें होतें कीं, माध्यमिक शाळांतून दिलें गेलेलें शिक्षण समाजांतील वेगवेगळ्या परिस्थितींतील माणसांना व्यावहारिक दृष्ट्या उपयुक्त व्हावें; व या दृष्टीनें पुढें काढण्यांत येणाऱ्या शाळांतून सर्व प्रकारच्या लोकांना ते उपयुक्त नागरिक होतील अशा प्रकारचें शिक्षण देण्याची व्यवस्था व्हावी. यावरून धंदेशिक्षणाच्या लहान मोठ्या शाळा अस्तित्वांत याव्यात ही सरकारची इच्छा खलित्यावरून स्पष्ट होत आहे.

परंतु हें धोरण पुढें येणाऱ्या अधिकाऱ्यांनीं पाळलेलें दिसत नाहीं. १८८२ सालीं इंडियन एज्युकेशन कमिशनला असें दिसून आलें कीं, मुंबई प्रांतांत माध्यमिक शाळांना जोडलेल्या शेतामध्यें शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीचें शिक्षण घेण्यास उत्तेजन देण्यासाठीं महिना चार रुपयाच्या कांहीं शिष्यवृत्त्या ठेविल्या आहेत. हें एवढेंच एकुलतें एक उदाहरण सोडून दिल्यास असें दिसून येईल कीं, हिंदुस्थानांतील सर्व माध्यमिक शाळा विशिष्ट एकादी कला शिकविण्याकरतां जन्मास आल्या नव्हत्या. या शाळा स्वयंपूर्ण नसून विद्यापीठाच्या अभ्यासाची पूर्वतयारी करण्याकरतां आहेत, असा सर्वत्र समज झाला होता. ज्यांचें शिक्षण माध्यमिक शाळांतच थांबतें अशांना या शाळापासून कांहींही उपयोग होणार नव्हता. ही स्थिति तीन कारणांमुळें उत्पन्न झाली. माध्यमिक शाळांतून शिक्षण घेणारे विद्यार्थी समाजांतील सुशिक्षित वर्गातून आलेले होते व शिक्षण घेण्याचा त्यांचा उद्देश सरकारी नोकरी मिळवून समाजांत आपलें मानाचें स्थान मिळवावें व आपली आर्थिक स्थिति सुधारावी हा होता. समाजाला आपण कसें उपयोगी पडूं हें ध्येय त्यांचेपुढें नव्हतें. मॅट्रिक्युलेशन परीक्षा पास व्हावी व सरकारी नोकरी पत्करावी असें धोरण कांहींचें

होतें. जे थोडे अधिक महत्त्वाकांक्षी होते ते कॉलेजमध्यें जात असत व तेथील शिक्षण घेऊन सरकारच्या मोठ्या नोकऱ्या पटकावीत असत. म्हणून मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेस व इंग्रजी भाषेस फाजील महत्त्व प्राप्त झालें. याचा परिणाम माध्यमिक शाळांतील कामावर अर्थातच झाला. शिवाय या शाळा चालविणारे लोक पुढारलेल्या वर्गांतील होते; हीही गोष्ट महत्त्वाची होती. दुसरें असें कीं धंदेशिक्षणाच्या शाळा काढण्याचे कोणतेच प्रयत्न सरकारनें केले नाहींत. त्या वेळीं सरकारी शाळा नमुन्याच्या म्हणून समजल्या जात असत. खाजगी शाळा सरकारी शाळांचें अनुकरण करीत असत. सरकारी शाळांतून धंदेशिक्षण नसल्यामुळें खाजगी शाळांतूनही त्याचा अभाव दिसून आला. तिसरी गोष्ट अशी कीं:— ज्या नवीन शाळा उदयास आल्या त्यांचेजवळ द्रव्यबळ नव्हतें. मॅट्रिक्युलेशन परीक्षेची तयारी करणाऱ्या शाळांना फारशा साहित्याची व खर्चाची जरूरी नसल्यानें, या नवीन शाळांमधून हेंच शिक्षण दिलें जाऊं लागलें. या सर्वांचा एक परिणाम झाला व तो म्हणजे १८८२ सालीं माध्यमिक शाळा म्हणजे मॅट्रिक्युलेशन परीक्षेची तयारी करणाऱ्या शाळा, असें मानण्यांत येऊं लागलें.

(ब) माध्यम म्हणून न मानल्यामुळें मातृभाषेची दुःस्थिति:— १८५४ च्या खलित्यानें असें ठरविलें होतें कीं इंग्रजी माध्यम वापरणाऱ्या शाळांबरोबर मातृभाषा माध्यम वापरणाऱ्या शाळा जन्मास याव्यात. मातृभाषा माध्यम वापरणाऱ्या कांहीं शाळा होत्याँ, परंतु त्यांचा दर्जा फार कमी होता. इंग्रजी व मातृभाषा माध्यम म्हणून वापरणाऱ्या शाळांतून दिसून येणारा फरक हळू हळू नाहींसा करण्याचें धोरण शाळा खात्यांनीं आखावें, अशी इच्छा खलित्यांत प्रदर्शित केली होती. हें धोरण अधिकाऱ्यांनीं अमलांत आणण्याचा प्रयत्न केला असता तर मातृभाषांमधून शिक्षण देण्याची योजना माध्यमिक शाळांतून वाढीस लागली असती; इतकेंच नव्हे तर विश्वविद्यालयामधून देखील या भाषांचें

माध्यम स्वीकारलें गेलें असतें. परंतु दुर्दैवानें शिक्षणखात्याचें धोरण देशी भाषांना उत्तेजन देण्याचें नव्हतें व त्यामुळें इंग्रजी व मातृभाषा या दोन माध्यमामधून शिक्षण देणाऱ्या शाळांतील फरक नाहींसा होण्याचे ऐवजीं तो दुणावला.

(क) **ट्रेन्ड शिक्षकांचा अभाव:**—या काळांत शिक्षकांना ट्रेनिंग देण्याची व्यवस्था बरी नव्हती. सर्व हिंदुस्थानांत ट्रेनिंग देणाऱ्या फक्त दोनच संस्था होत्या. एक मद्रासमध्यें (१८५७ सालीं स्थापन झाली) व दुसरी लाहोरमध्यें (१८८० मध्यें स्थापन झाली). मद्रासच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें १८८२ सालीं शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्यें ८ पदवीधर, २ कॉलेजची हिली परीक्षा पास झालेले व १८ मॅट्रिक्यूलेटस होते. लाहोरच्या ट्रेनिंग कॉलेजांत २० विद्यार्थी व ते सर्व कॉलेजचे पहिले वर्ष पास झालेले होते. कॉलेजास जोडून प्रॅक्टिसिंग स्कूल नव्हतें; व विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा जरी कमी अधिक होता तरी त्यांना एकाच्च शिक्षणक्रमांतून जावें लागे. यावरून हें स्पष्ट होईल कीं ज्याला ट्रेनिंग म्हणतां येईल असें ट्रेनिंग माध्यमिक शाळांतील किती थोड्या शिक्षकांना मिळत होतें.

८. प्राथमिक शिक्षण:—१८५४ ते १८८२ या काळांत प्राथमिक शिक्षणाची काय परिस्थिति होती हें पाहण्यासाठीं (१) १८५४–५९ (२) १८५९, ज्या वर्षीं खलिता प्रसिद्ध करण्यांत आला. व (३) १८५९–८२; या तीन कालखंडांत घडलेल्या गोष्टींचा विचार करावा लागेल.

९. १८५४–५९ या काळांत घडलेल्या गोष्टी:—१८५४ पूर्वीं सरकारनें शिक्षणाप्रीत्यर्थ फारशी रक्कम खर्च केली नाहीं; व हें धोरण जोंपर्यंत चालू होतें तोंपर्यंत बहुजनसमाजामध्यें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होऊं शकला नाहीं. १८५४ च्या खलित्यानें प्राथमिक शिक्षणाचे इतिहासांत एक महत्त्वाचें पान उघडलें गेलें. या खलित्यानें, ज्या लोकांना

स्वतः शिक्षण घेण्याचें सामर्थ्य नव्हतें, अशांना उपयुक्त होणारें व्यावहारिक शिक्षण देण्याची शिफारस केली गेली. या खलित्यामुळें लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारनें पत्करली असें नाहीं. परंतु या खलित्यानें अशा प्रकारचें शिक्षण देण्याची अवश्यकता सरकारास पटूं लागली. दुसरें—बहुजनसमाजास प्राथमिक शिक्षण योग्य प्रकारें देण्यासाठीं खाजगी शाळांना उत्तेजन देण्यांत यावें अशी सूचना खलित्यानें सरकारास दिली. उत्तर-पश्चिम प्रांतांत थॉमसनसाहेबांनीं जी योजना अमलांत आणिली होती तिकडे प्रांतिक सरकारचें लक्ष वेधण्यांत आलें. [या योजनेची माहिती चवथ्या प्रकरणामध्यें दिली गेली आहे.] १८५४ च्या खलित्यानें प्राथमिक शिक्षणाचें महत्त्व पटाविण्याचा प्रयत्न केला असला तरी, या शिक्षणाचे प्रसारार्थ सरकारनें शाळा उघडाव्यात असें बंधन शाळा खात्यावर लादण्यांत आलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, खाजगी शाळांना मदत देऊन योग्यप्रकारच्या देखरेखीखालीं त्यांची सुधारणा करण्यांत यावी असें सुचविण्यांत आलें.

पुढच्या पांच वर्षांच्या घडामोडींवरून असें दिसतें कीं खलित्यामध्यें स्पष्ट केलेल्या सूचनांकडे शिक्षण खात्यानें लक्ष दिलें नाहीं. अंतरङ्गर तत्त्व चुकीचें आहे असें प्रत्ययास आलें तरी त्यावरील विश्वास अजून पार नाहींसा झाला नव्हता व यामुळें प्राथमिक शिक्षणाचे प्रसाराऐवजीं माध्यमिक शिक्षणाचे प्रसाराकडे शिक्षणखात्याचें अधिक लक्ष लागून राहिलें होतें. अधिक पैशाची तरतूद केली असतांहि तो पैसा शिक्षण खात्याच्या निर्वाहासाठीं व इंग्रजी शिक्षणासाठीं खर्च होऊं लागला, व खाजगी शाळांना कोणतीही मदत होऊं शकली नाहीं. यामुळें या काळांत प्राथमिक शिक्षणामध्यें म्हणण्यासारखी प्रगति घडून आली नाहीं.

१०. १८५९ चा खलिता:—कंपनी सरकारचा कारभार १८५८ सालीं संपुष्टांत आला व ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानचा कारभार आपल्या हातीं घेतला. यामुळें १८५७ सालीं निष्पन्न झालेल्या कटकटी लक्षांत

येऊन कंपनी सरकारच्या शिक्षणाचे धोरणाचा पूर्णतः विचार करून योग्य ते बदल सुचविण्याची जबाबदारी सेक्रेटरी ऑफ स्टेटवर येऊन पडली. लॉर्ड स्टॅनले त्यावेळीं हिंदुस्थानचे सेक्रेटरी होते. त्यांनीं १८५४ मध्यें दर्शित केलेल्या प्राथमिक शिक्षणाशिवायच्या सर्व सूचना मान्य केल्या. लोकांनीं शाळा काढावयाच्या व सरकारनें त्यांना मदत द्यावयाची, या धोरणामुळें प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत लोकांकडून जेवढे प्रयत्न व्हावयास पाहिजे होते तेवढे झाले नाहींत. यासाठीं लोकांमध्यें शिक्षण-प्रसार व्हावा म्हणून शिक्षणखात्यानें आपल्या देखरेखीखालीं प्राथमिक शाळा स्थापन कराव्यात, असें सुचविण्यांत आलें. या सूचना इतक्या तडकाफडकी व १८५४ च्या खलित्यांतील तत्त्वाच्या विरुद्ध होत्या कीं हिंदुस्थानच्या परिस्थितीकडे लक्ष देऊन त्यांचें समर्थन करणें कठीण जातें.

इंग्लंडमध्यें यावेळीं जे शिक्षण-विषयक वाद निर्माण झाले होते, ते लक्षांत घेतल्याशिवाय या सूचनांचा अर्थ लावतां येत नाहीं. इंग्लंडमध्यें त्यावेळीं प्राथमिक शिक्षण लोकांनीं खाजगी संस्था काढून चालविलें होतें व त्यास सरकारची मदत होती. परंतु यापुढें प्राथमिक शिक्षणाचें भवितव्य काय असावें, याविषयीं दुमत झालें होतें. एका पक्षाचें असें मत होतें कीं खाजगी शाळांकडूनच प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचें खरें कार्य होईल. सरकारनें अशा शाळांना योग्य ती मदत द्यावी म्हणजे झालें. प्राथमिक शिक्षण जर सरकार देऊं लागलें तर वेगवेगळ्या धर्मपंथाना धार्मिक शिक्षण देण्याची मोकळीक रहाणार नाहीं. उलट, दुसऱ्या पक्षाचें मत असें होतें कीं-खाजगी शाळांची शिक्षणपद्धति सदोष आहे. या पद्धतीमुळें सर्व मुलें शाळेंत येऊं शकत नाहींत. सार्वत्रिक शिक्षण द्यावयाचें असेल तर तें कार्य खाजगी संस्थांकरवीं होऊं शकणार नाहीं. शिक्षणासाठीं स्थानिक कर बसवावेत, सरकारनें शाळा उघडाव्यात व लोकांतून निवडलेल्या मंड-

ञाकडे त्यांची देखरेख सोपविण्यांत यावी. हें दोन पक्षांतील वादळ १८४६ ते १८७० पर्यंत चालू होतें. १८७० च्या शिक्षण-कायद्यानें तें थोडेसें शमलें.

या मतभेदाचा परिणाम हिंदुस्थानच्या शिक्षणविषयक घडामोडीवर होणें क्रमप्राप्तच होतें. खाजगी शाळांकडून शिक्षणप्रसार करावा अशा विचाराची माणसें १८५४ चा खलिता करणाऱ्यामध्यें प्रमुख होती, तर या साधनावर ज्यांचा विश्वास नव्हता अशा माणसांच्या हातीं १८५९ मध्यें कारभार आला होता, व यामुळें या दोन खलित्यामध्यें विरोध आपणास दिसून येतो. हिंदुस्थानांत शिक्षणक्षेत्रांत आलेल्या केवळ अनुभवावरून धोरणांत बदल करण्यांत आला, असें विचारांतीं दिसून येत नाहीं. इंग्लंडमधील विरोधाचा ध्वनि हिंदुस्थानांत उमटला एवढेंच.

११. १८५९ ते १८८२ मधील घडामोडी:—विचार निश्चित झाले नसल्यामुळें १८५९ च्या खलित्यामुळें हिंदुस्थानांत मतभेद निर्माण झाले. कांहींना १८५४ चा खलिता पसंत पडला होता, तर कांहींना १८५९ चा खलिता अधिक श्रेयस्कर वाटत होता. मुख्यतः मतभेदाचे तीन मुद्दे होते. (१) खाजगी शाळांची वासलात कशी लावावयाची. (२) स्थानिक कर बसवावयाचा कीं नाहीं; व (३) प्राथमिक शाळांना सरकारची मदत द्यावयाची कीं नाहीं. यांवर बराच वेळपर्यंत वाद माजून राहिला, परंतु त्यामधून निश्चित असें धोरण ठरलें गेलें नाहीं, व प्रत्येक प्रांताला आपल्या मर्जीप्रमाणें कार्य करण्यास परवानगी देण्यांत आली. १८५९ ते १८८२ या काळांत ज्या घडामोडी झाल्या, त्यावरून १८८२ सालीं नेमण्यांत आलेल्या इंडियन एज्यूकेशन कमिशननें विशेष सूचना कां केल्या हें समजून येणार आहे.

(अ) खाजगी शाळा:—प्राथमिक शिक्षणाचे प्रसाराकरतां कोणतें साधन वापरावयाचे यावर १८५९ च्या खलित्यानंतर बरीच चर्चा झाली. कांहींच्या मतें हें कार्य खाजगी शाळांकडे पूर्णत्वानें सोपवावें व

सरकारनें फक्त कांहीं शाळा, नमुन्याच्या म्हणून, चालू ठेवाव्यात. इतरांना असें वाटत होते कीं हा प्रसार सरकारी शाळांकडूनच व्हावा. दोन्ही प्रकारच्या शाळांचा उपयोग करण्यांत यावा, असें म्हणणारा तिसराही एक वर्ग होता. या मतमतांतरामुळें ज्या प्रांताला जें साधन सोयीचें वाटेल तें त्यानें स्वीकारावें, असें ठरलें.

उदाहरणार्थ, मुंबई प्रांतानें खाजगी शाळांची मदत घेतली नाहीं, तर बंगाल पूर्णत्वानें खाजगी शाळांवर अबलंबून राहिला. १८८१–२ मध्यें मुंबई प्रांतांत फक्त ७२ खाजगी मदतीच्या शाळा होत्या. याचे उलट बंगाल प्रांतांत त्या ४७,३७४ होत्या. मद्रास प्रांत दोन्ही प्रकारच्या शाळांना धरून चालला होता व म्हणून त्यामध्यें सरकारी शाळा १२६३ व खाजगी शाळा १३,२२३ होत्या. उत्तर—पश्चिम प्रांत हलकबंदी किंवा केंद्र शाळांवर पूर्णत्वानें अवलंबून होता. खाजगी शाळांना समाविष्ट करून घेण्याचा कोणताच प्रयत्न झाला नाहीं. १८८१–२ सालीं केलेल्या पाहणी-वरून असें कळते कीं खाजगी विनामदतीच्या ६१७२ शाळा होत्या व त्यांत ६१६३४ मुलें शिकत होती. मदतीच्या शाळा फक्त २४३ होत्या व त्यांत १५०१९ मुलें शिकत होती. कूर्ग प्रांतानें मुंबईचें अनुकरण केलें; तर पंजाबनें उत्तर-पश्चिम प्रांतांचा मार्ग स्वीकारला. १८८१–२ मध्यें पंजाबमध्यें मदतीच्या प्राथमिक शाळा २७८ होत्या व त्यांत १४६१६ मुलें शिकत होतीं. परंतु खाजगी शाळा १३,१०९ होत्या व त्यांमधून १,३५,३८४ मुलें शिक्षण घेत होतीं. मध्य प्रांतानें बंगालचें अनुकरण करून खाजगी शाळांना उत्तेजन दिलें. परंतु खाजगी शाळांची मजबूत अशी घटना न बनल्यामुळें सरकारी शाळा उघडणें भाग पडलें. १८८१-२ सालीं या प्रांतांत ८९४ सरकारी शाळांतून ५५७४५ विद्यार्थी व ३६८ मदतीच्या शाळांतून १८७८६ विद्यार्थी शिकत होते. बऱ्हाडनें मुंबईचा कित्ता उचलला; परंतु खाजगी शाळांना मुंबईप्रांतापेक्षां जास्त प्रमाणांत उत्तेजन दिलें. १८८१–२ मध्य या प्रांतांत ४६७

सरकारी शाळा व त्यांत २७८४४ मुलें, व २०९ मदतीच्या शाळा व त्यांत ४२१२ मुलें होतीं. शिवाय विनामदतीच्या २०७ शाळा असून त्यांत २६७२ मुलें शिकत होतीं. आसामप्रांत हा १८७४ पर्यंत बंगालचा एक भाग होता व त्यामुळें बंगालप्रांतांतील पद्धतीप्रमाणें खाजगी शाळांचा तेथें जास्त प्रसार झाला. १८८१-२ सालीं तेथें सरकारी फक्त ७ शाळा होत्या व त्यांत १८७ मुलें होतीं; याचे उलट मदतीच्या शाळा १२५७ व त्यांत मुलें ३५६४३, व विनामदतीच्या ४१७ व त्यांत मुलें ९७३३ होतीं.

(व) **खर्च:**—प्राथमिक शिक्षणाच्या खर्चाच्या दुसऱ्या वादग्रस्त प्रश्नाकडे आतां आपण वळूं.

बहुजनसमाजाचे शिक्षणाचा खर्च मिटविण्याकरतां लोकांवर लोकल-सेस (स्थानिक कर) बसवावा, अशी सूचना १८५९ चे खलित्यानें केली. या सूचनेंत हिंदुस्थान सरकारनें थोडी दुरुस्ती केली, केवळ शिक्षणा-करतां हा कर घेतला न जातां इतर स्थानिक सोयी घडवून आणण्या-साठींही या कराच्या पैशाचा उपयोग करण्यांत यावा, अशी दुरुस्ती सुचविण्यांत आली. त्याप्रमाणें सर्व प्रांतांमधून हा स्थानिक कर शिक्षण व इतर सुखसोयी यांवर होणारा खर्च भागविण्यासाठीं बसविण्यांत आला. खेड्यापाड्यांतून स्थानिक-कर वसूल करण्यास शेत-साऱ्याचा आधार मान्य करण्यांत आला व त्याप्रमाणें कर वसूल होऊं लागला. बंगालमध्यें मात्र अडचण उत्पन्न झाली, कारण तेथें लॉर्ड कॉर्नवालिसनें कायम धाऱ्याची पद्धत चालू केली होती. शहरांमधून हा कर घरावर बसविण्यांत आला व तो म्युनिसिपालिट्यामार्फत वसूल करण्यांत येऊं लागला. जमीनीवर बसविलेल्या कराचा पैसा रस्ते व शिक्षण यांवर खर्च होऊं लागला, म्युनिसिपालिट्यांना मात्र हा कर अनेक गोष्टींकरतां खर्च करावा लागे. बंदोबस्तासाठीं ठेविलेल्या पोलिसांचा खर्चही करांतून होत असे.

हलकबंदी किंवा केंद्र शाळांची योजना १८५४ पूर्वीच अंमलांत आली. खेड्यांतील शेतकरी लोकांना शिक्षण देणें हा या शाळा स्थापन करण्याचा मुख्य उद्देश होता. या योजनेप्रमाणें कांहीं खेड्यांचे गट पाडण्यांत आले होते व कोणत्याही खेड्यापासून दोन मैलांपेक्षां जास्त दूर होणार नाहीं अशा मध्यवर्ती खेड्यांत शाळा उघडण्यांत येत असे. शाळेचा खर्च भागविण्याकरतां सरकारी महसूलाचा शेंकडा एक टक्का कर जमिनीच्या मालकांचे संमतीनें वसूल केला जात असे. या एक टक्क्यापैकीं अर्धा भाग जमिनीच्या मालकांनीं द्यावयाचा असून दुसरा अर्धा सरकारानीं द्यावयाचा आहे. जमिनीच्या मालकांची कर देण्यास समंति असल्यासच त्या त्या भागांतून शाळांची स्थापना होत असे. १८५७ मध्यें उत्तर-पश्चिम प्रांतांत या योजनेस सरकारची संमति मिळाली. जमीन महसूलाची फेर आखणी करतांना सर्व जिल्ह्यांतून महसूलाच्या शेंकडा एक टक्का कर हलकबंदी शाळांच्या मदतीकरतां म्हणून वसूल करण्यांत आला.

१८६१ ते १८७१ च्या काळांत बंगालखेरीज इतर प्रांतांत शिक्षणाकरतां स्थानिक कर वसूल करण्यांत येऊं लागला. उत्तर-पश्चिम प्रांतांत महसूलाचे शेंकडा एक टक्का, शिक्षण-कर म्हणून, वसूल करण्यांत येत असे. या प्रांताचे मागोमाग पंजाबनें १८५६-७ सालांत तसाच कर वसूल केला; मात्र तो सर्व भागांतून वसूल केला गेला नाहीं. १८६४ सालीं सर्व भागांतून तो गोळा केला गेला. अयोध्या प्रांतानें १८६१ सालीं जमीन महसूलाचे अडीच टक्के कर बसविला, व त्यापैकीं एक टक्का शिक्षणाकरतां म्हणून बाजूला काढून ठेविला. १८६२ सालीं मध्यप्रांतानें एक टक्का कर बसविला. दोन वर्षांनंतर खर्च भागेना म्हणून शेकडा दोन टक्के कर घेण्यांत आला. मुंबई प्रांतानें १८६३ सालीं महसूलाचे प्रत्येक रुपयामागें एक आणा म्हणजे शेंकडा $6\frac{1}{4}$ टक्के कर बसविण्यास सुरवात केली व १८६९ च्या लोकल फंड ॲक्टान्वयें तो सर्व भागांतून वसूल होऊं लागला.

या कराचा अर्धा भाग स्थानिक गरजा भागविण्यासाठीं देण्यांत आला व अर्धा भाग सरकारनें कॅनालची सफाई, सरकारी इमारती वगैरे खर्चा-

साठीं राखून ठेविला. वऱ्हाडनें शेंकडा ७½ टक्के कर वसूल करून एक टक्का कर शिक्षणाकरतां राखून ठेविला. मद्रास प्रांतानें १८७१ सालीं लोकल फंड ॲक्ट पास केला व महसूलाच्या रुपयामागें एक आणा वसूल करण्याचें ठरविलें, परंतु शिक्षणासाठीं या करापैकी किती हिस्सा खर्च करावयाचा हें निश्चित ठरविलें गेलें नाहीं. आसाममध्यें १८७९ सालीं हा कर बसविण्यांत आला; परंतु १८८२ पर्यंत अशा प्रकारचा कर वसूल करण्याचा प्रयत्न झाला नाहीं.

या करांचें स्वागत शिक्षणखात्यानें मोठ्या आनंदानें केलें; कारण लोक शिक्षणाची मागणी करूं लागले व सरकारी खर्च सारखा वाढत राहिला. त्यावेळीं शिक्षणाच्या वाढत्या खर्चाला हिंदुस्थान सरकारची संमति मिळवावी लागे; म्हणून कराचे रूपानें वसूल झालेला पैसा म्हणजे परमेश्वराची एक कृपाच, असें शिक्षणखात्याला वाटूं लागलें. खेड्यांतून महसूलाबरोबर कर वसूल करणें सोपें गेलें; परंतु शहरांतून हा कर वसूल होण्यास अडचण पडूं लागली. कारण म्युनिसिपालिटीच्या एकूण उत्पन्नापैकीं अमुक एक भाग शिक्षणाकरतां राखून ठेवला जावा, असा कोणताच कायदा आतांपर्यंत पास केला गेला नव्हता. कायद्यानें म्युनिसिपालिटयांना शिक्षणार्थ खर्च करण्याची परवानगी दिली होती; परंतु असा खर्च त्यांनीं केला पाहिजे अशी त्यांचेवर सक्ति नव्हती. यामुळें जेवढा पैसा या कार्यासाठीं खर्च करावयास पाहिजे होता, तेवढा खर्च केला जात नसे. ज्या नवीन शाळा निघत असत त्या शहरांतच विशेषेंकरून उघडण्यांत येत असत, कारण तेथील लोकांमध्येंच विशेष जागृति निर्माण झाली होती. म्युनिसिपालिट्यांना तर हा वाढता खर्च भागवितां येत नसे व यामुळें शहरांतून वसूल केलेल्या कराच्या पैशाऐवजीं खेड्यांतून वसूल केलेल्या लोकल सेसमधून हा खर्च मिटवावा लागे.

म्युनिसिपालिट्या व जिल्हे यांमधून शिक्षणासाठीं वसूल करण्यांत येत असलेल्या स्थानिक करविषयीं व त्यांचा राज्यकारभारांत उपयोग

करण्याविषयीं अनेक गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले होते. या सर्व प्रश्नांचा या पुस्तकांत आपणांस उहापोह करतां येणें कठीण आहे. परंतु जे प्रश्न चादग्रस्त होते व जे पुढें इंडियन एज्युकेशन कमिशननें मिटाविले ते आम्ही खालीं देत आहोंत.

(१) स्थानिक कराचा पैसा हा प्रांताच्या बजेटाचा एक भाग समजण्यांत येऊं नये. या कराचा पैसा स्वतंत्र फंड म्हणून समजण्यांत यावा व प्रत्येक वर्षीं तो निकालांत न काढतां, प्राथमिक शिक्षणासाठीं तो सदैव उपयोगांत आणतां यावा.

(२) म्युनिसिपालिटीचे व खेड्याचे लोकल फंडाचे हिशेब वेगवेगळे ठेवण्यांत यावेत.

(३) लोकल फंडाचा उपयोग फक्त प्राथमिक शिक्षणाकडे केला जावा, माध्यमिक व कॉलेजच्या शिक्षणाकडे केला जाऊं नये.

(४) लोकल फंडाला मदत करणें हें सरकारचें कर्तव्य आहे, कारण लोकल फंड हा लोकांनीं स्वखुशीनें दिलेला असून सरकारनें बसविलेला कर नाहीं.

(क) **प्रसार:**—प्राथमिक शिक्षणाचा प्रसार दोन गोष्टींवर अवलंबून होता. एक—शिक्षणाकरतां लागणारा पैसा व दुसरी—शिक्षणप्रसाराकरतां उपयोगांत येणाऱ्या साधनांचा खर्च. पुढील हकीकतीवरून दिसून येईल कीं वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या शिक्षणयोजना सुरू होत्या व त्यामुळें शिक्षणप्रसारही कांहीं प्रांतांत कमी व कांहीं प्रांतांत जास्त दिसून येत आहे. उदाहरणार्थ बंगालमध्यें लोकल सेस बसविण्यांत आला नव्हता. परंतु सरकारच्या मदतीमुळें व खाजगी शाळांच्या साधनांनीं बरीच प्रगति करतां आली. मुंबई प्रांतांत कराचे रूपानें बराच पैसा वसूल होत असें, परंतु महागड्या अशा सरकारी शाळांकडून शिक्षणप्रसार होत असल्यामुळें जेवढी प्रगति होणें शक्य होते तेवढी प्रगति होऊं शकली नाहीं. पंजाबमध्यें कराचे

रूपानें वसूल होणारा पैसा बेताचा होता, शिवाय शाळाही बहुतेक सरकारीच असत; त्यामुळें वरील दोन प्रांतांत दिसून येणारी प्रगति येथें दिसून येत नाहीं. त्यावेळच्या परिस्थितीचें चित्र इंडियन एज्युकेशन कामिशनचे खालील उताऱ्यानें स्पष्ट रेखाटल्याचें दिसून येईल. शेंकडेवारी आंकडे प्राथमिक शाळेंत शिकत असणाऱ्या २०,६१,५४१ विद्यार्थी धरून न काढतां सर्व प्रकारच्या शाळांतून शिकत असलेल्या २६,४३,९७८ विद्यार्थ्यांवरून काढलेली आहे, हें लक्षांत घेतलें म्हणजे त्यावेळीं हिंदुस्थानचा शिक्षणांतील मागासलेपणा अधिक स्पष्ट होतो.

"आम्ही ८५९८४४ चौरस मैलाच्या प्रदेशाची पाहणी केली. या प्रदेशांत खेडीं व शहरें मिळून ५५२, ३७९ गांवें होतीं व लोकसंख्या २०२,६०४, ०८० होती. १८८१–२ सालीं या भागांत एकूण ११२२१८ शाळा होत्या. १०० लोकसंख्येमध्यें शाळेंत जाऊं शकतील अशा मुलामुलींचें प्रमाण अंदाजें १५ असतें. वेगवेगळ्या प्रांतांत अशा मुलांच्या कोणत्या प्रमाणांत प्रत्यक्ष मुलें शाळेंत जात होतीं हें खालील आकडयांवरून दिसून येईल.

प्रांत		मुलग्यांचें शेंकडा प्रमाण	मुलींचें शेंकडा प्रमाण
मद्रास	...	१७.७८	१.४८
मुंबई ब्रिटिश मुलुख	...	२४.९९	१.८५
मुंबई संस्थानी मुलुख	...	१७.८५	०.९३
बंगाल	...	२०.८२	०.८०
उत्तर-पश्चिम प्रांत व अयोध्या	...	८.२५	०.२८
पंजाब	...	१२.११	०.७२
मध्य प्रांत	...	१०.४९	०.४८
आसाम	...	१४.६१	०.४६
कूर्ग	...	२२.४४	२.८६
हैद्राबादचे तोडून दिलेले जिल्हे	...	१७.१०	०.२२
एकूण	...	१६.२८	०.८४

या संख्येमध्यें युरोपिअन व युरेजिअन मुलांकरतां चालविलेल्या शाळांतील मुलांचीं संख्या धरण्यांत आली नाहीं. त्याप्रमाणें उद्योगधंद्याच्या सरकारमान्य नसलेल्या शाळांतील मुलांची संख्याही समाविष्ट करण्यांत आली नाहीं. परंतु (१८८१–२ सालीं शिक्षण खात्याला माहीत असलेल्या) इतर सर्व शाळांतील मुलांचा अंतर्भाव यांत केला आहे. हिंदुस्थानांत शिक्षणांत पुढें असलेल्या प्रांतांमध्यें देखील मुलग्यांपैकीं शेकडा ७५ टक्के मुलगे व मुलीपैकीं शेंकडा ९८ टक्के मुली अजून शाळेंत जात नव्हती. एका प्रांतांत तर पुरुष–स्त्री वर्गांची संख्या ४·४ कोटींची असतांहि ९२ टक्के मुलगे अज्ञानांत वाढत होते व मुलींचे शिक्षणास तर सुरवातही झाली नव्हती.....अजमीर व इतर नऊ प्रांत–ज्यांचे विषयीं माहिती रिपोर्टांत दिली आहे–" यांमध्यें पुरुष वस्ती १०·३ कोटिपेक्षां जास्त आहे. परंतु त्यापैकीं ९४$\frac{3}{4}$ लोक निरक्षर आहेत. स्त्रियांची संख्या ९·९७ कोटी आहे. परंतु यापैकीं ९·९५ कोटी स्त्रियांना लिहितां वाचतां येत नाहीं. "

१२. शिक्षण खातें व मिशनरी लोक यांचा संबंध:—१८५४च्या खलित्यामुळें अशी आशा व्यक्त करण्यांत येत होती कीं, सरकार शिक्षण-क्षेत्रांतून आपला काढता पाय घेईल व सरकारी मदत मिळत असणाऱ्या मिशनरी शाळांचें जाळें सर्व देशभर पसरलें जाईल. परंतु थोड्याच वर्षांत ही आशा फोल ठरली. १८५७ च्या घडामोडीमुळें इंग्लंडमध्यें वातावरण प्रक्षुब्ध झालें. मिशनरी लोकांचे कार्यास कोणत्याही प्रकारची मदत द्यावयाची नाहीं व धर्माचे बाबतींत अगदीं उदासीन रहावयाचें असें ठरविण्यांत आलें. मिशनरी लोकांनीं सरकारकडे हक्कानें मागणी मागण्याचे प्रयत्न सुरू केले, परंतु राजकीय मताला प्राधान्य मिळून मिशनऱ्यांना हार खावी लागली. १८५८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या राणीच्या जाहीरनाम्यामध्यें लोकांना असें आश्वासन देण्यांत आलें कीं, हिंदुस्थाना-वर ख्रिस्ती धर्म लादण्याचा सरकारास हक्क नाहीं व त्याची तशी इच्छाही नाहीं.

१८५८ ते १८८२ चे काळांत दोन गोष्टी प्रामुख्यानें आपल्या नजरेंत येतात. एक, सरकारी शाळा झपाट्यानें वाढल्या व दुसरी,

मिशनरी शाळांना कोणतेंच उत्तेजन देण्यांत आलें नाहीं. सरकारी शाळा वाढण्यास तीन कारणें झालीं. (१) मिशनरी शाळांना उत्तेजन दिल्यास राजकीय प्रतिक्रिया होईल ही सरकारास वाटणारी भीति. (२) हिंदी लोकांचे शिक्षण प्रसाराचे कामीं प्रयत्नाचा अभाव व (३) शाळांचा मगदूर सुधारतो म्हणून आपल्या देखरेखीखालीं शाळा व कॉलेजें चालविण्याची शाळाधिकाऱ्यांची इच्छा.

मिशनऱ्याशीं अधिकाऱ्यांनीं जी तुटकपणाची वागणूक स्वीकारली, त्या बाबतींत असें दिसून येईल कीं, त्या वेळच्या सरकारी अधिकाऱ्यांमध्यें बरेचसे निरीश्वरवादी होते किंवा त्यांचे ठिकाणीं मिशनरी कामाबद्दल आस्था नव्हती. यामुळें मिशनरी लोकांना सरकारनें आंखून दिलेल्या योजनेंत व तीबाहेरही काम करतां येईना. सरकारच्या योजनेंत काम करणें मिशनऱ्यांना किती कठीण जात होतें हें खालील उताऱ्यावरून स्पष्ट होईल.


" शिक्षणाच्या नवीन योजनेमुळें चऱ्याच अडचणी उत्पन्न झाल्या ही गोष्ट दृष्टिआड करून चालणार नाहीं. पूर्वी कांहीं वेळ मिशनरी लोकांना शाळेचे इन्स्पेक्टरस् म्हणून निवडण्यांत येत होतें, परंतु १८५७ च्या घडामोडीनंतर त्यांना दूर सारून धर्मावद्दल उदासीन असणाऱ्या इंग्रजांना किंवा ख्रिस्ती नसलेल्या ब्राह्मणांना, थोडा पक्षपात करूनही, त्या जागा द्याव्या लागत असत. शाळांना मदत देणें हें ख्रिस्त्यांकडे वांकड्या नजरेनें पहाणाऱ्या या लोकांच्या हातीं असल्यानें त्यांची मर्जी सांभाळणें ख्रिस्ती शाळांना नाइलाजानें भाग पडत असे. परीक्षा घेतांना, शाळेच्या इमारतीची पाहाणी करतांना किंवा शाळेच्या शिक्षक वर्गासंबंधी टीकात्मक लिहितांना किती लहरीपणाचें व पक्षपाताचें वर्तन इन्स्पेक्टरांकडून घडत असेल याची कल्पना केलेलीच बरी! यामुळें इन्स्पेक्टर लोक व शाळा चालक यांचेमध्यें सलोखा निर्माण व्हावयाचे ऐवजी नेहमच उत्पन्न व्हावयाची..... सर्व ठिकाणीं सारखेपणा असावा म्हणून सरकारनें मान्य केलेलीं क्रमिक पुस्तकें लावण्यांत येत असत. ख्रिस्ती समाजानें अत्यंत मेहनतीनें पाठ्यपुस्तकें तयार केलीं होती व त्यांत धार्मिक धड्यांचा अंतर्भाव

केला होता. परंतु ज्यांत धर्माचा यत्किंचितही वास येणार नाहीं, अशींच पुस्तकें अधिकारी मान्य करीत असत. "

त्याचप्रमाणें शिक्षण खात्यानें एक प्रकारचें चढाओढीचें वातावरण निर्माण केलें व त्यामधून खात्याशीं कोणत्याही प्रकारचा संबंध न ठेवतां स्वतंत्रपणें निभावून जाणें मिशनऱ्यांना जड जाऊं लागलें.

या अडचणीमुळें मिशनरी लोकांना इंग्लंड व हिंदुस्थान या दोनही देशांमध्यें चळवळ करणें भाग पडलें. त्यांचें म्हणणें असें होतें कीं (१) १८५४ च्या खलित्यान्वयें सरकारी शाळा बंद करण्याचें किंवा त्या दुसऱ्यांचे ताब्यांत देण्याचें जें धोरण सरकारनें स्वीकारावयास पाहिजे होतें तें स्वीकारलें जात नाहीं. (२) सरकारी अधिकारी मिशनरी शाळाशीं जें चढाईचें वर्तन करतात, त्यामुळें मिशनरी लोकांना शाळा चालविणें कठीण जातें; (३) व्यावहारिक शिक्षण देण्याचें सरकारनें ठरविल्यामुळें सर्व शिक्षणसंस्था नास्तिक बनत चालल्या आहेत.

या मिशनरी लोकांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्या तक्रारीचा विचार करण्यासाठीं व १८५४ नंतर ज्या शिक्षणविषयक घडामोडी झाल्या, त्यांचा दूरदृष्टीनें विचार करण्याकरतां १८८२ सालीं सरकारनें इंडियन एज्युकेशन कमिशन नेमण्याचें ठरविलें. या कमिशनचा विचार आपण पुढील प्रकरणांत करूं.



प्रकरण सातवें

हन्टरकामिशन व त्यानंतर

(१८८२-१९०२)

हिंदुस्थान सरकारनें ' इंडियन एज्यूकेशन कामिशन ' १८८२ सालीं नेमिलें. या कमिटीचे अध्यक्ष सर डब्ल्यू. हंटर असल्यानें या कमिशनास ' हंटर कामिशन ' असें संबोधण्यांत येतें. या कामिशनला त्याचे कामांत मदत व्हावी म्हणून प्रांतवार कमिट्या नेमण्यांत आल्या. या कमिट्यांनीं आपलें प्रांतापुरते सविस्तर अहवाल तयार केले व ते कामिशनला सादर केले. कामिशननें सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला, प्रत्यक्ष परिस्थिति समजावून घेतली व लोकांच्या साक्षी घेऊन लोकांचें मत अजमाविलें. दोन वर्षं खटाटोप करून, प्रांतिक सरकारच्या अहवालाबरोबर, आपला अहवाल तयार केला. हिंदी शिक्षणाचें इतिहासामध्यें या कामिशनचे अहवालास बरेंच मोठें महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

२ कामिशनपुढें आलेले प्रश्न:—हिंदुस्थान सरकारनें कमिशन नेमतांना हिंदी विश्वविद्यालयाचा प्रश्न थोडा बाजूला ठेवून खालील प्रश्नावर आपलें लक्ष केंद्रित केलें होतें.

(अ) हिंदुस्थानचे शिक्षणयोजनेमध्यें सरकारी शाळांचें स्थान.

(ब) सरकारचा खाजगी शाळांशीं संबंध.

(क) शिक्षणक्षेत्रांतील मिशनरी लोकांचे प्रयत्न.

(ड) वेगवेगळ्या शिक्षणक्रमाचे बाबतींत येणारा सरकारी संबंध व ज्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारवर आहे, त्या शिक्षणाचा प्रसार व सुधारणा करण्याचीं साधनें.

या प्रश्नाशिवाय आणखी दोन मुद्दे कमिशननें निर्माण केले.

(अ) कॉलेजचें शिक्षण व (ब) माध्यमिक शिक्षण.

कमिशननें शिफारस केलेल्या या एकूण सहा मुद्यांवर आपण आतां विचार करूं.

३ सरकारनें स्वतः शिक्षण देण्याचे कार्यापासून परावृत्त व्हावें या कमिशनचे सूचनेचा विचारः—

गेल्या पंचवीस वर्षांत सरकारनें ज्याप्रमाणें शाळा वाढविल्या, त्याप्रमाणें याहीपुढें ही वाढ चालू ठेवावयाची किंवा सरकारच्या मदतीवर खाजगी शाळांना पुढें येण्यास वाव करून द्यावयाचा, या प्रश्नावर कमिशनला आपलें निर्णायक मत द्यावयाचें होतें. महत्त्वाचीं कारणें दिसून आल्यामुळें खाजगी शाळांना प्रोत्साहन देण्याचें कमिशननें ठरविलें. सरकारनें कमिशनला स्पष्ट कळविलें होतें कीं, समाधानकारक शिक्षणाची वाढ करण्यासाठीं सरकारजवळ पुरेसा पैसा नाहीं व शिक्षणाच्या वेगवेगळ्या शाखांमध्यें लोकांनीं मदत केल्याशिवाय सरकारी तिजोरीवर पडणारा ताण कमी होणार नाहीं. लोकांची शिक्षणविषयक गरज पूर्णपणें भागवावयाची असेल तर, सरकारी मदतीवरच शाळा चालविल्या जाणें आवश्यक आहे. शिक्षणासाठीं लागणारा पैसा अपुरा असल्यानें एक एक पै देखील विचार करून खर्च करावी लागेल. सरकारी शाळा खाजगी संस्थांकडे दिल्या तर खर्चामध्यें बचत होईल, अशारीतीनें वांचविलेल्या पैशामधून आणखी खाजगी शाळांना मदत देतां येईल. या व आणखी इतर अशा कारणासाठीं कमिशननें अशी शिफारस केली कीं, सरकारनें आपला शाळेवरील खर्च कमी करावा व शाळा चालविण्याकरतां योग्य संस्था किंवा व्यक्ति मिळतांक्षणींच, त्यांचेवर कार्याचा भार सोपवून आपण त्या कार्यापासून परावृत्त व्हावें.

प्राथमिक शाळांच्या बाबतींत तर कमिशननें अशी शिफारस केली कीं, सरकारनें प्राथमिक शाळा न चालवितां तीं जबाबदारी म्युनिसिपाल्टिच्या व लोकल बोर्डे यांचेवर सोपविण्यांत यावी. माध्यमिक शाळा व कॉलेजें मात्र लोकांच्याकडे सोपविण्यांत यावींत. सरकारी संस्था खाजगी संस्थाकडे देतांना शिक्षणखात्यानें कोणत्या गोष्टीकडे लक्ष द्यावें हें सांगतांना कमिशन म्हणतें:—

(अ) सरकारी माध्यमिक संस्था व कॉलेजें आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं, खाजगी संस्थांचें सहकार्य लाभावें म्हणून सरकारनें उदार हस्तें कांहीं ठराविक मुदतीपर्यंत तरी त्यांना मदत द्यावी. खाजगी संस्थेनें मात्र या संस्था उत्तम प्रकारें व कायम आपण चालवूं अशी खात्री दिली पाहिजे.

(ब) शिक्षण संस्था ताब्यांत देतांना संस्थांच्या इमारती, संस्थेला मिळालेलीं वर्षासनें व इतर मालमत्ता हीं कायदेशीररीत्या सुपूर्त करण्यांत यावीं.

(क) संस्था दुसऱ्याचे ताब्यांत देतांना त्या संस्थांमध्यें काम करीत असलेल्या नोकरवर्गाचे हक्क व अधिकार पूर्ववत् राखिले जावेत.

(ड) खाजगी संस्थांनीं शाळेवर होणाऱ्या खर्चाच्या शेंकडा ६० टक्के रक्कम फीमधून जमा करावी.

४ सरकारी मदत देण्याचे बाबतींत कमिशनची सूचना:—शिक्षणाचें कार्य लोकांनीं हातीं घ्यावें, या प्रश्नावर कमिशननें बराच जोर दिला. सरकारी मदत कोणत्या तत्त्वावर दिली जाईल हें सुचवितांना खालीं दिलेल्या सर्वमान्य तत्त्वांचाच उल्लेख कमिशननें केला:—

(अ) खाजगी संस्थाचा दर्जा व तिचे अधिकार सरकारी संस्थेंप्रमाणेंच मान्य करण्यांत येतील.

(ब) उदार हस्तें मदत दिली जाईल.

(क) संस्थेच्या खाजगी कारभारामध्यें हस्तक्षेप केला जाणार नाहीं.

(ड) लोकांच्या विश्वासास पात्र असलेला असाच अधिकारी–वर्ग नेमण्यांत येईल.

सरकारी मदत सर्व ठिकाणीं कोणत्या पद्धतीनें दिली जाते, याचा कमिशननें ओघाओघानें अभ्यास केला. मद्रास प्रांतांत शिक्षकांच्या पगारावर ती आधारलेली होती, हिंदुस्थानच्या उत्तर व मध्य विभागांत ठराविक मुदतीची पद्धत अमलांत होती. मुंबई प्रांतांत परीक्षांच्या निकालावर ती मोजण्यांत येत असे. या वेगवेगळ्या पद्धतीच्या गुणदोषांचा विचार करून असें ठरविलें कीं हिंदुस्थानच्या सर्व भागांत एकच पद्धत अमलांत आणणें शक्य होणार नाहीं, व म्हणून प्रत्येक प्रांतानें जी पद्धत त्यांना योग्य दिसेल तिचा अवलंब करावा. या बाबतींत कमिशनच्या सूचना अशा होत्या—

(अ) प्रत्येक प्रांताच्या परिस्थितीस अनुकूल व लोकांचें सहकार्य लाभावें यासाठीं प्रांताचे सरकारांनीं शाळा–व्यवस्थापकांच्या सल्ल्यानें ग्रँट-इन-एड नियम दुरुस्त करावे.

(ब) नियम दुरुस्त करतांना मदत किती द्यावयाची, कोणत्या मुदतीपर्यंत द्यावयाची व इमारत, उपकरणें व सामान यासाठीं मिळणारी मदत कोणत्या अटींवर देण्यांत येईल, हें निसंदिग्धपणें स्पष्ट करण्यांत यावें.

५. मिशनरी लोकांचे कार्याबद्दल कमिशनच्या सूचना:—हिंदी शिक्षणाचे बाबतींत मिशनरी लोकांचें स्थान काय राहील या बाबतींत कमिशननें केलेल्या सूचनाही महत्त्वाच्या आहेत. प्राथमिक शाळा म्युनिसिपालिटच्या व लोकल बोर्डे यांचे ताब्यांत देण्याचे सूचनेमुळें मिशनऱ्यांचे कार्यावर कोणताच परिणाम झाला नाहीं. एक तर मिशनरी लोकांनीं चालविलेल्या प्राथमिक शाळा कमी होत्या. दुसरें—

खाजगी शाळांना म्युनिसिपालिट्यांकडून किंवा लोकलबोर्डांकडून निश्चित स्वरूपाची मदत मिळावी व त्यांच्या लहरीवर कोणतीही गोष्ट अवलंबून राहूं नये, असे नियम कमिशननें घालून दिले होते. माध्यमिक शाळा व कॉलेजें यांतून आपलें अंग काढून घेतल्यामुळें जी स्थिति निर्माण होणार होती तीविषयीं मात्र बरेच वाद माजून राहिले. याविषयीं कमिशन म्हणतें:—

"माध्यमिक शाळा व कॉलेजें यांतून सरकारनें आपलें अंग काढून घेतल्यामुळें हें शिक्षण मिशनरी लोकांचे हातीं कितपत जाईल, हा चर्चेचा विषय होता. सरकारनें या शाळा किंवा हीं कॉलेजें चालविलीं नाहींत तर तीं मिशनऱ्यांचे ताब्यांत जातील अशी भीति सरकारी अधिकाऱ्यांना वाटत होती. स्वतः मिशनरी लोकांनीं या बाबतींत ज्या साक्षी दिल्या त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, सरकारनें या प्रकारच्या शिक्षणांतून आपलें अंग काढून घेतलें, ही गोष्ट जरी आम्हास पसंत असली, तरी हें सर्व शिक्षण देण्याचा अधिकार आमचेकडे यावा अशी आमची इच्छा नाहीं. हिंदुस्थानांत लोकांच्या गरजा विविध प्रकारच्या आहेत; व अशा परिस्थितींत हें उच्च प्रकारचें शिक्षण देण्याचा अधिकार एका प्रकारच्या संस्थेकडे असावा, हें आम्हांस मान्य नाहीं. मिशनरी संस्थांकडे तर हा अधिकार जाऊं शकत नाहीं, कारण आजवर त्यांनीं कितीही मनापासून व हितबुद्धीनें काम केलें असलें तरी बहुजनसमाजाविषयीं सर्व बाबतींत त्यांना अजून सहानुभूति वाटत नाहीं. मिशनरी लोकांच्या ताब्यांत या संस्था जाव्यात या हेतूनें सरकारनें त्या आपल्या अंगाबाहेर टाकूं नयेत व सरकारनें या संस्था मिशनऱ्यांचे ताब्यांत देऊं नयेत, असें आम्हां सर्वांचें एक मतानें सांगणें आहे. मिशनरी संस्था सरकारी व खाजगी संस्थांपासून भिन्न आहेत. त्या मिशनरी लोकांनीं स्वप्रयत्नानें चालविल्या असल्या तरी त्या लोकांमधून निर्माण झालेल्या नाहींत; व या संस्था त्यांचे ताब्यांत दिल्यानें, लोकांचें स्वावलंबन वाढावें हा जो सरकारी मदत देण्याचा हेतु आहे, तो त्यानें साध्य होईल असें वाटत नाहीं. प्रयत्न केला असतां काय साध्य होतें हें इतरांना दाखविण्यासाठीं व त्यांना हें कार्य हातीं घेण्यास उत्तेजन देण्यासाठीं, मिशनरी संस्थांनीं आपली कामगिरी बजाविली आहे. सरकारचे देखरेखीखालीं स्वतंत्रपणें काम करण्यास त्यांना मोकळीक असावी." त्याचप्रमाणें ज्या संस्थांना

शिक्षणाचें कार्य करण्याची इच्छा आहे, त्यांना पूर्ण प्रोत्साहन देण्यांत येऊन योग्य ती मदत मिळावी. खाजगी प्रयत्न हा लोकांमधूनच निर्माण व्हावयास पाहिजे हें विसरतां कामा नये. लोकांच्या शैक्षणिक गरजा पूर्णपणें भागवावयाच्या असतील तर लोकांनीं हें शिक्षण-दानाचें काम हातीं घेतलें पाहिजे. इतर लोकांकडून कांहीं वेळ हें कार्य केलें जाईल, परंतु उच्च शिक्षणाचा फैलाव व्हावयाचा असेल तर बऱ्याचशा लोकांनीं पुढें येऊन हें कार्य हातीं घेतलें पाहिजे."

ही शिफारस फार महत्त्वाची आहे. कारण हिच्यामुळें असें निश्चित झालें कीं शिक्षणाचे राष्ट्रीय योजनेमध्यें मिशनरी कार्यकर्त्यांना महत्त्वाचें स्थान मिळणें शक्य नाहीं. १८५४ च्या खलित्यानंतर मिशनरी लोकांना अशी आशा वाटत होती कीं देशाच्या शिक्षणविषयक गरजा भागविण्याचें कार्य त्यांना करावें लागेल; परंतु हंटर कमिशननें ही आशा समूळ नाहींशी झाली.

धार्मिक शिक्षण—शाळा कॉलेजांतून द्यावें किंवा नाहीं याविषयीं कमिशनच्या सूचनाः—

सरकारी अधिकारी व मिशनरी यांचेमध्यें मतभेद होण्यास दुसरें कारण म्हणजे धार्मिक शिक्षण होय. याही बाबतींत कमिशनचा निकाल मिशनरी लोकांच्या विरुद्धच गेला. केवळ व्यावहारिक शिक्षण दिलें गेल्यानें लोकांची श्रद्धा आपण नष्ट करीत आहोंत व एक मोठा धोका पत्करीत आहोंत, ही गोष्ट मिशनऱ्यांनीं प्रामुख्यानें सरकारचें नजरेस आणिली. मिशनरी शाळांमधूनच नव्हे तर सरकारी शाळांमधून, धार्मिक शिक्षण, आणि तेंहि ख्रिस्ती धर्माचें देण्यांत यावें, असा त्यांचा आग्रह होता. सरकारी अधिकाऱ्यांचें मत याचें अगदीं उलट होतें. सरकारनें धार्मिक शिक्षणाचे बाबतींत औदासीन्य पत्करावें, व शाळांमधून फक्त व्यावहारिक शिक्षण द्यावें. मदतीच्या शाळांतून शिकणाऱ्या मुलांचे पालकांची इच्छा असल्यास हें शिक्षण घेण्याची त्यांना मोकळीक असावी, असें त्यांचें म्हणणें होतें. हेंच मत हिंदी पुढाऱ्यांचेंही

होतें. रा. तेलंग यांनीं हंटर कमिशनचे रिपोर्टामध्यें आपलें विरोधी मत नमूद करतांना ही गोष्ट स्पष्ट केली आहे. कमिशननें या प्रश्नाचा सर्व बाजूंनीं विचार करून तडजोड म्हणून खालीलप्रमाणें सूचना केल्याः— "सरकारी मदत देण्याचें धोरण १८५४ च्या खलित्याचे ५२ व्या परिच्छेदांत दर्शाविल्याप्रमाणें राहील, म्हणजे जी संस्था धर्म-शिक्षणापासून अलिप्त आहे तीसच ग्रँट दिली जाईल. एकाद्या शहरांत किंवा खेड्यांत एकच शाळा असेल व इतर विषयांबरोबर ती धर्म-शिक्षण देत असेल तर, धर्म-शिक्षण वगळून इतर विषयांचें शिक्षण घेण्याचा हक्क पालकांना राहील."

६. कॉलेजच्या शिक्षणाविषयीं कमिशनची सूचना—सरकारनें हें कमिशन नेमलें त्यावेळीं हिंदी विश्वविद्यालयाच्या सर्व साधारण कारभाराविषयीं विचार करण्याची जरूर नाहीं, असें कमिशनला सुचविण्यांत आलें होतें. कारण कॉलेजच्या शिक्षणाची ज्यांना गरज होती अशा वर्गांतून निवडलेल्या समितीच्या मार्फत विश्वविद्यालयाचा कारभार चाललेला असतो. त्याचप्रमाणें कमिशनपुढें असणाऱ्या मुख्य कामाचा व्याप वाढूं नये म्हणून कॉलेजच्या शिक्षणाचा विचार करण्याची जबाबदारीही कमिशनवर लादली नव्हती. या कारणामुळें कॉलेजच्या शिक्षणाचा सांगोपांग विचार कमिशनला करतां येणें शक्य नव्हतें, आणि म्हणून या बाबतींत त्यानें केलेल्या शिफारशी, माध्यमिक किंवा प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत केलेल्या शिफारशीप्रमाणें फारशा महत्त्वाच्या नाहींत. कमिशनच्या कॉलेजच्या शिक्षणाबद्दलच्या शिफारशी खालीलप्रमाणें आहेतः—

(अ) कॉलेजला जी मदत द्यावयाची ती (१) शिक्षकांची संख्या (२) कॉलेजचा खर्च (३) कॉलेजचा दर्जा व (४) स्थानिक गरजा वगैरे पाहून देण्यांत यावी.

(ब) मदतीच्या कॉलेजांना इमारती, सामान, पुस्तकालय, व शिक्षणाचीं उपकरणें यांकरतां वेगळी ग्रँट देण्यांत यावी.

(क) सरकारनें चालविलेल्या कॉलेजांतून हिंदी पदवीधरांना व विशेषतः विलायतच्या विश्वविद्यालयाची पदवी धारण करणारांना जास्त प्रमाणांत नेमण्यांत यावें.

(ड) विविध संस्कृतीस उत्तेजन मिळावें, यासाठीं सरकारनें चालविलेल्या व मदतीच्या खाजगी कॉलेजांत वाङ्मयीन व भौतिक असे वेगवेगळें वैकल्पिक अभ्यासक्रम असावेत.

(ई) सरकारी व बिनसरकारी कॉलेजांतून सर्वसाधारण धर्माचीं मूलतत्त्वें शिकविण्याकरतां नीतिबोध देणारीं पुस्तकें तयार करण्यांत यावीं.

(एफ) एकाद्या सरकारी व मदतीच्या कॉलेजांतील प्रिन्सिपॉलांनीं किंवा प्रोफेसरानें दरवर्षीं 'नागरिकांचीं व मानवांचीं कर्तव्यें' या विषयावर कांहीं व्याख्यानें द्यावीं.

(जी) शिक्षणाच्या प्रसारास अडथळा न येतां जेवढी जास्त फी ठेवतां येईल, तेवढी फी मदतीच्या कॉलेजांतून ठेवण्यांत यावी. हें तत्त्व जरी मान्य केलें असलें तरी शेजारच्या सरकारी कॉलेजांतून जी फी घेण्यांत येते, तितकी फी खाजगी कॉलेजांनीं ठेविली पाहिजे अशी सक्ति ल्यांचेवर नाहीं.

(एच) सरकारी व मदतीच्या कॉलेजमध्यें कांहीं प्रमाणांत नादार मुलें घ्यावींत. हें प्रमाण शिक्षणखात्यानें, जरूर वाटल्यास कॉलेजच्या व्यवस्थापकाच्या सल्लयानें, ठरवावें.

(आय) हुशार पदवीधरांना विलायतेस जाऊन यांत्रिक उद्योगधंद्याचें शिक्षण घेतां यावें यासाठीं शिष्यवृत्त्या ठेवावयाच्या किंवा कसें, हें प्रांतिक सरकारनें ठरवावें.

परीक्षांच्या निकालाकडे पाहून मदत देण्याची प्रथा मुंबई प्रांतांतच होती. पहिल्या शिफारशीचें तत्त्व मुंबई प्रांतानें स्वीकारल्यामुळें १८८३-७

सालापासून मदत देण्याची ही पद्धत मुंबई प्रांतानें बंद केली. इतर शिफारशींबाबत कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशननें जे विचार आपल्या रिपोर्टामध्यें दिले आहेत ते बरेच उद्बोधक वाटतील.

"विश्वविद्यालयाचे कार्यक्षेत्रांत कमिशनला शिरण्याचें कारण नसल्यानें कॉलेजच्या शिक्षणाच्या प्रश्नाचा त्यांनीं विचार केला नाहीं व सूचनाही केल्या नाहींत. विद्यार्थी व समाज यांच्या गरजा काय आहेत व त्याच अभ्यासक्रमाशीं प्रत्यक्ष किती संबंध येतो, किंवा प्रत्येक अभ्यासक्रमाची मूलतः काय किंमत आहे, या गोष्टींचा विचार झाला नाहीं. शिक्षण योजनेचा विद्यार्थ्यांवर काय परिणाम होईल, या प्रश्नाचा आस्थापूर्वक विचार झालेला नाहीं. परंतु त्यांना जे दोष दिसले ते दुरुस्त व्हावेत यासाठीं कांहीं मार्ग सुचविण्यांत आले. उदाहरणार्थ, प्रिन्सिपालनें किंवा एका प्रोफेसरानें प्रत्येक वर्गाला नागरिकांचीं व मानवांचीं कर्तव्यें शिकवावींत व त्यासाठीं नीतिबोधाचें पुस्तक करण्यांत यावें, हें सुचविलें आहे. कॉलेजांना जोडून वसतिगृहें असावींत अशी त्यांनीं शिफारस केली, परंतु अशा वसतिगृहांची वाढ कशानें होईल हें सुचविलें नाहीं. शिक्षण अधिक शास्त्रीय पद्धतीनें दिलें जाईल अशी त्यांनीं आशा व्यक्त केली, परंतु शास्त्रीय पद्धतीनें म्हणजे काय, या बाबतींत स्पष्ट सूचना केल्या नाहींत. कारण या सूचना करणें म्हणजे विश्वविद्यालयाचे कारभारांत शिरण्यासारखें होईल असें त्यांना वाटलें."

७. माध्यमिक शिक्षणाचे बाबतींत कमिशनच्या सूचना:— माध्यमिक शिक्षणाचे बाबतींत कमिशनला दोन गोष्टींचा प्रामुख्यानें विचार करावयाचा होता. माध्यमिक शिक्षणाचा प्रसार कोणत्या मार्गानीं होईल ही पहिली गोष्ट. १८५४ ते १८८२ पर्यंत माध्यमिक शिक्षणाचा प्रसार बराच झाला होता. तरी राष्ट्राच्या दृष्टीनें ही प्रगति विशेष समाधानकारक होती असें म्हणतां यावयाचें नाहीं. दुसरी गोष्ट ही कीं, माध्यमिक

शाळांच्या योजनेंत जे दोष निर्माण झाले होते ते दाखविण्याची कामगिरी कमिशनकडे आली होती.

पहिल्या मुद्यावर कमिशनचें असें म्हणणें होतें कीं सरकारनें या क्षेत्रांतून आपलें अंग काढून घ्यावें व शक्य तितक्या जास्त खाजगी संस्थांना हें कार्य हातीं घेण्यास प्रोत्साहन द्यावें. सरकारचा प्राथमिक शिक्षणाशीं जो संबंध आहे त्यापेक्षां निराळा संबंध माध्यमिक शिक्षणाशीं आहे, असें त्यांचें मत होतें. प्राथमिक शिक्षण लोकांना देण्याची—वेळ पडल्यास कायद्यानें सक्ति करून—जबाबदारी सरकारवर आहे. जेथें लोकांची मागणी आहे तेथें प्राथमिक शाळा उघडून भागणार नाहीं, तर ज्या ठिकाणीं त्यांची आवश्यकता आहे तेथेंही त्या उघडल्या गेल्या पाहिजेत. याचे उलट, माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारवर तितकीशी पडत नाहीं. अर्थात् जेथें लोक जागृत होऊन शिक्षण घेण्याचे प्रयत्न करतील तेथें त्यांना मदत देणें हें सरकारचें कर्तव्य आहे. म्हणून कमिशननें असें सुचविलें कीं सरकारी मदत देऊन जेवढें माध्यमिक शिक्षण वाढविता येईल तेवढें वाढवावें व शक्य तितक्या लवकर सरकारनें स्वतः शाळा चालविण्याची जबाबदारी कमी करावी.

ही सूचना १८५४ च्या खलित्यानें केलेल्या सूचनेसारखीच आहे. यामुळें दोन मुद्दे उपस्थित झाले.

(अ) जीं सरकारी हायस्कुलें आज अस्तित्वांत आहेत त्यांचें काय करावयाचें ?

(ब) सरकारी मदत घेऊन शाळा चालविण्यास ज्या ठिकाणीं लोक समर्थ नाहींत अशा ठिकाणची सोय कशी लावावयाची ?

पहिल्या प्रश्नासंबंधीं कमिशनचें असें मत होतें कीं सरकारनें हळू हळू आपल्या शाळा खाजगी संस्थांचे ताब्यांत द्याव्यात; मात्र असें करतांना त्या शाळा चांगल्या तऱ्हेनें कायम चालू रहातील हें पाहिलें जावें. दुसऱ्या

प्रश्नाबाबत त्यांनीं सुचविलें कीं, ज्या ठिकाणीं लोक स्वतः शाळा चालविण्यास समर्थ नाहींत, त्या ठिकाणीं वरील शिफारशीमुळें सरकारला स्वतःच्या शाळा चालविण्यास, लोकांच्या हिताचे दृष्टीनें, बाध येतो असें नाहीं. प्रत्येक जिल्ह्यांत सरकारी किंवा बिनसरकारी चांगलें हायस्कूल, एक तरी, असावें. एकापेक्षां जास्त हायस्कुलें काढून माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करण्याची जबाबदारी लोकांवर सोंपविण्यांत यावी, असें कमिशनचें म्हणणें होतें.

दुसरें—माध्यमिक शिक्षणाचा प्रसार खाजगी प्रयत्नास उत्तेजन दिलें तरच होईल, या गोष्टीवर कमिशननें विशेष जोर दिला. या शिफारशीमुळें पुढील बांस वर्षांत माध्यमिक शिक्षणाची प्रगति फार झपाट्यानें झाली.

माध्यमिक शिक्षणांतील दोष नाहींसे करण्याकरतां कमिशननें केलेल्या सूचनांकडे आतां आपण वळूं. खालील तीन मुद्यांवर विशेषतः त्यांचें काय म्हणणें होतें तें आपण पाहूं या.

(अ) माध्यमिक शाळांतून धंदेशिक्षण सुरूं करणें.

(ब) शिक्षकांचें ट्रेनिंग, व

(क) शिक्षणाचें माध्यम.

माध्यमिक शाळांतून वरच्या इयत्तेमध्यें धंदेशिक्षण देण्यांत यावें अशी कमिशनची सूचना होती. लोकांना उत्तेजन दिल्याशिवाय हें शिक्षण लोकप्रिय होणार नाहीं, अशी कमिशनची ठाम समजूत होती. कमिशनकडून पुढें यावर वेगवेगळ्या सूचना करण्यांत आल्या. विश्वविद्यालयानें या धंदेशिक्षणाचा अभ्यासक्रम मान्य करावा, असें कांहींनीं सुचविलें. कांहींच्या मतें शिक्षणखात्यानें शाळांना चांगलीशी मदत द्यावी. ही मदत देण्यास कोणत्या शाळा लायक आहेत हें परीक्षा घेऊन ठरवावें व जीं मुलें पास होतील त्यांना प्रमाणपत्रें द्यावींत. कांहींनीं असें सुचविलें कीं ज्यांचेजवळ या शिक्षणाबद्दल प्रमाणपत्रें असतील त्यांना सरकारी नोकरीसाठीं प्रथम

यसंत करावें. या तिन्ही प्रकारांनीं धंदेशिक्षणास प्रोत्साहन मिळेल असें कमिशनला वाटेना. उच्च प्रकारचें व्यावहारिक किंवा व्यापारी शिक्षणाला स्वतंत्रपणें बाजारांत किंमत असली पाहिजे, असें कमिशनचें मत होतें. हें शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना, जे मालक कामावर लावतील व ते या शिक्षणाबद्दल जी किंमत देतील त्यावर या शिक्षणाचें भवितव्य अवलंबून राहील, असें त्यांना वाटे. हें तात्विक धोरण दोन मुद्यांवर सोडून देणें भाग पडलें. एक म्हणजे सरकारी नोकरींत जसा पगार मिळतो तसा पगार या धंदेशिक्षण घेतलेल्या लोकांना इतरत्र मिळण्याचा संभव फार कमी आहे. दुसर, म्हणजे गेल्या पन्नास वर्षांत सरकारी नोकरीबद्दल बुद्धिमान वर्गास जें प्रेम वाटत आहे त्याचाही विचार केला गेला पाहिजे. या दोन्ही मुद्यांचा विचार करून कमिशननें ठरविलें कीं माध्यमिक शाळेच्या वरच्या विभागांत दोन प्रकारचे वर्ग ठेवण्यांत यावेत. एका वर्गांतील मुलें विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेकरतां तयारी करतील; दुसऱ्या वर्गांतील मुलें व्यापार किंवा उद्योगधंदा यांचें शिक्षण घेतील. या शिफारशीमुळें स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट परीक्षा जन्मास आली.

शिक्षकांचें ट्रेनिंग:—आज जरी ट्रेनिंगचें महत्त्व काय आहे हें सर्वांना कळून चुकलें आहे, तरी ज्यावेळीं हिंदुस्थानांत हें हिंदी शिक्षण-कमिशन नेमण्यांत आलें, त्यावेळीं इंग्लंडमध्यें या प्रश्नावर द्विमत होतें. एका पक्षानें फ्रेंच ट्रेनिंग कॉलेजचें धोरण मान्य केलें होतें. त्यांचे मतें एकादा विषय कसा शिकवावा, यापेक्षां त्या विषयाचें व त्या विषयाशीं संबंध असणाऱ्या विषयांचें ज्ञान संपादन करणें, ही जास्त महत्त्वाची गोष्ट आहे. दुसऱ्या पक्षाला जर्मन मत अधिक विचारार्ह वाटलें. शिक्षणशास्त्र व शिक्षणकला यांवर या पक्षानें विशेष भर दिला होता.

या मतभेदाचा ध्वनि हिंदुस्थानांत उमटला हें स्वाभाविकच झालें. हिंदुस्थानांतील शिक्षण—तज्ज्ञांमध्यें दोन पक्ष निर्माण झाले. एकाचे दृष्टीनें माध्यमिक शाळांना ट्रेन्ड शिक्षकांची जरूर नव्हती. 'अंकगणित

कसें शिकवावयाचें हें शिकवितांना शिक्षकांना फक्त अंकगणित शिकविलें म्हणजे झालें. अशा शिक्षकाला जास्त तरबेज करावयाचें असेल तर त्याला बीजगणित शिकवा. जो शिक्षक अन्ट्रेन्ड आहे, परंतु ज्याला आपल्या कामाची हौस आहे, तो आपल्या विषयाच्या सखोल अभ्यासामुळें व आवडीमुळें यशस्वी शिक्षक झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षण घेण्यापेक्षां अनुभविक हेडमास्तराचे हाताखालीं काम करणें जास्त श्रेयस्कर आहे. शिक्षणशास्त्र व कला या-विषयींचें ज्ञान, जें ट्रेनिंग कॉलेजांतून दिलें जातें तें, केवळ पुस्तकें वाचून मिळण्यासारखें आहे. हा शेवटचा मुद्दा प्रतिपादन करण्यास कारण असें घडले कीं त्यावेळीं अस्तित्वांत असणाऱ्या ट्रेनिंग कॉलेजांना जोडून प्रॅक्टिसिंग स्कूलस् नव्हतीं, दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें होतें कीं शिक्षणाचीं तत्त्वें माहिती असल्याशिवाय केवळ त्या त्या विषयाचें ज्ञान असून भागणार नाहीं. सर्व वर्गाचें लक्ष एका गोष्टीकडे कसें वळवावें, दुर्लक्ष करणाऱ्या मुलांचें लक्ष विषयाकडे राहील याला उपाय काय करावा, विषयाची योग्य मांडणी कशी करावी, मुलांचें लक्ष विषयाकडे वेधण्यासाठीं चित्रादि साहित्यांची निवड कशी करावयाची, या गोष्टी ट्रेन्ड शिक्षकांशिवाय इतरांस कळणार नाहींत. जे लोक असें म्हणतात कीं चार वर्षें एका शिक्षकाचे हाताखालीं काम केलें म्हणजे ट्रेनिंग कॉलेजमध्यें शिक्षण घेतल्याचें श्रेय मिळतें, ते लोक कॉलेजमधील शिकविण्याची पद्धत माध्यमिक शाळांतील पद्धतीपेक्षां भिन्न असते ही गोष्ट विसरतात. विषयाची आवड असली तरी पद्धत म्हणून कांहीं आहे व तिची जोड प्रत्येक शिक्षकानें करून घेतली पाहिजे.

अशा परिस्थितींत कमिशननें केलेल्या खालील सूचनांचें स्वरूप अगदीं मोघम रहावें हें साहजिकच आहे.

(१) शिक्षण शास्त्र व कला यांची परीक्षा घेण्यांत यावी; व या परीक्षेंत जे पास होतील त्यांनाच खाजगी किंवा सरकारी माध्यमिक शाळांतून कायम स्वरूपाची नोकरी देण्यांत यावी.

(२) ज्या पदवीधरांना हें शिक्षण ट्रेनिंग कॉलेजमध्यें घेण्याची इच्छा आहे त्यांना इतरापेक्षां थोड्या मुदतींत हें शिक्षण घेतां येईल.

शिक्षणाचें माध्यम:—माध्यमाच्या बाबतींत कमिशनच्या शिफारशी तर याहीपेक्षां असमाधानकारक होत्या. माध्यामिक शाळांत मातृभाषा माध्यम असावी याबद्दल कमिशननें अवाक्षरही काढलें नाहीं; त्यांचा कल इंग्रजीभाषेकडेच होता. माध्यामिक शाळांतील खालच्या इयत्तांमध्यें—मिडलस्कूलमध्यें—मातृभाषा माध्यम होण्यासारखी आहे असें त्यांचें मत असलें तरी, त्याबाबतींत निश्चित धोरण कांहींच प्रतिपादण्यांत आलें नाहीं. हा प्रश्न परिस्थितीवर अवलंबून असल्यानें शाळाचालकांनीं तो परिस्थिति पाहून सोडवावा, एवढीच त्यांनीं सूचना केली आहे.

प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत कमिशनच्या सूचना:—प्राथमिक शिक्षण हा विषय कमिशनचे अहवालामध्यें प्रामुख्यानें प्रतिपादला गेला आहे. या शिक्षणाचा प्रसार कसा करतां येईल याविषयीं कमिशनन कांहीं. सूचना केल्या आहेत. त्याचे खालीलप्रमाणें पांच भाग पाडतां येतील.

(१) धोरण (२) कायदा व कारभार (३) खाजगी शाळांना प्रोत्साहन (४) शाळांचा कारभार व (५) पैसा.

धोरण:—सरकारचें प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत धोरण काय राहील याविषयीं कमिशन म्हणतें:—

(अ) बहुजन समाजाचे जीवनाला ज्या विषयांची जरूर आहे अशा विषयांचें मातृभाषेंतून दिलें गेलेलें शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण होय. विश्वविद्यालयीन शिक्षणाचा या शिक्षणाशीं संबंध नाहीं.

(ब) प्रत्येक प्रकारच्या शिक्षणाकडे सरकारचें लक्ष असणें जरी उचित असलें तरी, देशाच्या सध्याचे परिस्थितींत प्राथमिक शिक्षणाची तरतूद, प्रसार व सुधारणा यांकडे सरकारनें पूर्वीपेक्षां अधिक लक्ष पुरविणें जरूर आहे.

(क) लॉर्ड हार्डिंज यांनीं ११ आक्टोबर १८४४ रोजीं ध्वनित केलेल्या तत्त्वाची आज पुनर्घोषणा केली पाहिजे व सरकारच्या खालच्या दर्जाच्या नोकर वर्गामध्यें, ज्यांना लिहितां वाचतां येतें अशांचींच, नेमणूक केली पाहिजे.

(ड) मागासलेल्या भागांतून व विशेषतः, जेथें रानटी लोकांची वस्ती आहे तेथें, प्राथमिक शिक्षणाचा फैलाव झाला पाहिजे. लोकलबोर्डें अस्तित्वांत येईपर्यंत हें काम सरकारनें हातीं घ्यावें व जे कोणी या भागांत शाळा स्थापन करतील त्यांना सरकारनें भरपूर मदत द्यावी.

कायदा आणि कारभार:—इंग्लंडमध्यें १८७० व १८७६ सालीं पास झालेल्या शिक्षण–कायद्यान्वयें देशाचे वेगवेगळे शाळा–विभाग पाडण्यांत आले होते. प्रत्येक विभागाकरतां वेगवेगळी समिति नेमण्यांत आलीं होतीं. शिक्षणासाठीं कर बसवून पैसा उभा करणें, शाळा स्थापणें व मुलांना सक्तीनें शाळेंत आणणें वगैरे कामें या समितीकडे सोंपाविण्यांत आली होतीं. या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानांतही प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी जिल्हा बोर्डें व म्युनिसिपल बोर्डें यांचेकडे सोंपाविण्यांत यावी; या बोर्डांकडे ही जबाबदारी सोंपावितांना योग्य ते कायदे करण्यांत यावेत; त्याचप्रमाणें सरकारच्या व बोर्डाच्या अधिकाऱ्यांची सत्ता व कर्तव्य काय राहील हें स्पष्ट नमूद करण्यांत यावें; असें कमिशननें सुचविलें.

खाजगी शाळांना मदत:—खाजगी शाळांना उत्तेजन देण्यांत यावें व सरकारी शिक्षण योजनेंत त्यांना समाविष्ट करून घेण्यांत यावें, अशी कमिशनची सूचना होती. त्यांनीं खालीलप्रमाणें आपलें मत याबाबतींत व्यक्त केलें आहे.

" खाजगी शाळांनील शिक्षणाचा 'दर्जा चेताचा असला तरी त्यांना मदत मिळाली पाहिजे, असें आम्हांस वाटतें. चढाओढीमध्यें टिकून या संस्था जिवंत राहिल्या, यावरून त्यांचें सामर्थ्य व त्यांची लोकप्रियता स्पष्ट होत आहे. मद्रास व बंगाल प्रांतांतील घरींचशी उदाहरणें घेऊन आम्हांला असें दाखवितां येईल, कीं

या खाजगी शाळांच सुधारणा केल्यास त्यांतून चालूं घडीला उपयुक्त ठरणाऱ्या शाळा तयार करतां येतील. मुंबई प्रांतांतील लोकल सेसच्या मदतीनें चाललेल्या शाळा नमुनेदार आहेत. खाजगी शाळांना सरकारी मान्यता व मदत मिळाली तर त्यांची सुधारणा होऊन सरकारच्या सार्वजनिक शिक्षण योजनेमध्यें त्या महत्त्वाचें स्थान पटकावतील अशी आशा वाटते."

सरकारी खात्यापेक्षां जिल्हा व म्युनिसिपल बोर्डांचा खाजगी शाळांशीं संबंध अधिक जिव्हाळ्याचा असतो व म्हणून अशा शाळांना मदत देण्याचें कार्य बोर्डाकडे सोंपाविण्यांत यावें. हें धोरण इष्ट असलें तरी, खाजगी शाळांना परीक्षांच्या निकालावरून मदत देण्याची पद्धत स्वीकारली गेल्यामुळें, त्याचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. सार्वत्रिक शिक्षणप्रसाराचे दृष्टीनें ही पद्धत उपकारक नव्हती. त्यापेक्षां मुलांच्या संख्येवर मदत देण्याचें तत्त्व सरकारनें मान्य करावयास पाहिजे होतें. जेव्हां शिक्षण–प्रसार झपाट्यानें करावयाचा असतो, तेव्हां मुलांच्या संख्येवर ग्रँट देणें हितावह असते. परंतु हें धोरण हिंदुस्थानांत लागूं करण्याची बुद्धि कमिशनला कां सुचली नाहीं, हें कळत नाहीं.

परीक्षांच्या निकालावरून ग्रँट देण्याची पद्धत कॉलेजमधून काढण्यांत आली. माध्यमिक शिक्षणाचे बाबतींत ही पद्धत सर्वस्वी ग्राह्यही धरली नाहीं व त्याज्यही समजली नाहीं. प्राथमिक खाजगी शाळांचे बाबतींत मात्र ही पद्धत सुरू झाली.

या दुर्दैवी घटनेमुळें सर्व प्रांतांच्या ग्रँट–इन्–एडच्या नियमामध्यें हें तत्त्व घुसडलें गेलें व लॉर्ड कर्झननें आपल्या हातीं कारभार घेईपर्यंत त्याचा अंमल जारी राहिला.

शेवटीं, खाजगी शाळांची आस्ते आस्ते सुधारणा करण्याचे हेतूनें खालील गोष्टी सुचविल्या:—

(अ) खाजगी शाळांची सुधारणा क्रमाक्रमानें परंतु सावकाश करण्यांत यावी. शिक्षकांमध्यें किंवा कार्यक्रमामध्यें फेरफार करून कामामध्यें अडथळे आणूं नयेत.

(ब) खाजगी शाळांचे हेडमास्तरांना ट्रेनिंग घेण्यासाठीं उत्तेजन द्यावें; त्याचप्रमाणें त्यांचे नातेवाईकांना किंवा त्यांचे मागून हेडमास्तराचे जागीं येणाऱ्या गृहस्थांनाही हें ट्रेनिंग देण्यांत यावें.

(क) खाजगी शाळांमध्यें लोकांच्या दृष्टीनें जें महत्त्वाचें शिक्षण आहे, त्याचें रक्षण होईल अशा पद्धतीनें प्रत्येक प्रांतांत परीक्षा घेण्यांत याव्यात. उपयुक्त विषयांचा शिक्षणक्रमांत अंतर्भाव व्हावा, यासाठीं विशेष मदत देण्यांत यावी.

शाळांचा कारभार:—प्राथमिक शाळांचे अंतर्व्यवस्थेसंबंधीं कमिशननें असें सुचविलें कीं, सर्व प्रांतांमधून एकसारखें शिक्षण करण्याचा प्रयत्न करण्यांत येऊ नये. परिस्थितीप्रमाणें अभ्यासक्रमांत फरक करण्यांत यावा व शक्य तितकें तें सोपें करण्यांत यावें. व्यवहारांत उपयोगी असे विषय म्हणजे हिशेब व देशी पद्धतीचा जमाखर्च हे शिकविण्यांत यावेत. शाळा चालकांना आपल्या इच्छेप्रमाणें क्रमिक पुस्तकें निवडण्याची मोकळीक असावी. ऋतुमानाप्रमाणें शाळा भरविण्याची वेळ ठरविण्यांत यावी. मुलांना मातृभाषेंतून शिक्षण दिलें जावें.

खर्च:—खर्चासंबंधीं कमिशननें महत्त्वाच्या सूचना केल्या व त्यामुळें या बाबतींतील पूर्वीचे वाद मिटले गेले. उदाहरणार्थ, कमिशननें ठरविलें कीं प्राथमिक शिक्षणाकरतां स्वतंत्र फंड उभारण्यांत यावा. म्युनिसिपल हद्दींत व इतर खेडे-भागांत खर्च झालेल्या पैशाचा हिशेब वेगवेगळा दाखविण्यांत यावा व खेड्याकरतां जमा केलेला पैसा म्युनिसिपल हद्दींत खर्च केला जाऊं नये. लोकल फंडाचा पैसा प्राथमिक शाळांकरितांच खर्च व्हावा. क्वचित् प्रसंगीं माध्यमिक व कॉलेज शिक्षणाकरतां तो

खर्च व्हावा. सरकारनें या लोकल फंडाला योग्य ती मदत द्यावी. सरकारनें ही मदत कोणत्या मर्यादेपर्यंत द्यावी हें दुर्दैवानें निश्चित ठरविलें गेलें नाहीं. प्रांतिक सरकाराकडून लोकल फंडाला पैसा मिळण्याचा हक्क आहे, एवढेंच सुचविण्यांत आलें.

लोकल फंडाचे बाबतींत जें मोघम सुचविण्यांत आलें त्याला दोन कारणें आहेत. प्रांताप्रांतांमधून परिस्थिति भिन्न असल्यामुळें सर्वांना सारखा लागूं होईल असा नियम करणें कठीण होतें. उदाहरणार्थ, बंगालमध्यें लोकल-फंड वसूल केला जात नसल्यानें, सरकारनें प्राथमिक शिक्षणाला द्यावयाची मदत ही वेगळ्या तत्त्वावर आधारली गेली. मुंबई प्रांतांत लोकल-फंड मोठ्या प्रमाणांत वसूल केला जात होता. दुसरी गोष्ट अशी कीं, खर्चाचा प्रश्न कसा सोडवावयाचा या प्रश्नाचा विचार करण्याचें कमिशनवर सोंपविलें नव्हतें. कमिशन म्हणतें:—

"शिक्षणाचीं साधनें कशीं वाढवावींत हें सुचविण्याची कामगिरी आम्हांकडे सोपविण्यांत आली नाहीं. म्युनिसपालिटी व लोकल बोर्डे यांचें शिक्षणाचे बाबतींत काय कर्तव्य आहे, याविषयीं साक्षीदारांनीं जें मत दिलें तें आम्हीं फक्त नमूद केलें आहे. नवीन योजनेप्रमाणें स्थानिक सरकारांवर कोणती जबाबदारी पडते आहे, हें आम्हीं स्पष्ट केलें आहे. कांहीं प्रांतांमधून शिक्षणाकरतां चांगली मदत जमा होत आहे व हें उदाहरण इतर प्रांतांतील स्थानिक सरकारांस मार्गदर्शक होण्यासारखें आहे. सध्यां होत आहेत त्यापेक्षां जास्त प्रयत्न व्हावयास पाहिजेत."

कमिशननें आपल्या रिपोर्टांत प्रकरण ४ ते १२ मध्यें जी चिकित्सा केली तीवरून कमिशनचें या बाबतींत काय मत होतें हें समजणें शक्य आहे.

(अ) प्राथमिक शिक्षण-प्रसाराची मुख्य जबाबदारी लोकल फंडावर आहे. प्रांतिक सरकारनें लोकल फंडास योग्य ती मदत द्यावयाची आहे.

(व) लोकल फंड हा जरी कायद्यानें वसूल करण्यांत येत असला तरी तो लोकांनीं आपण होऊन दिलेला पैसा आहे व म्हणून सरकारनें या फंडास मदत देणें जरूर आहे.

(क) लोकल फंडामुळें गरीब जनतेस मदत देण्याची सरकारची जबाबदारी कमी न होतां वाढते आहे, कारण हा पैसा जे स्वतःचे पायावर उभे राहण्यास समर्थ नाहींत अशा लोकांकडून जमा केलेला असतो.

(ड) सरकारकडून लोकल फंडास जी मदत व्हावयाची ती लोकल फंडाचे अर्धी किंवा एकूण खर्चाचे $\frac{1}{3}$ असावी, असें धोरण प्रांतिक सरकारनें स्वीकारावें.

वर दिलेल्या सूचना किती असमर्थनीय आहेत हें खालील विवेचनावरून स्पष्ट होईल.

त्यावेळीं ब्रिटिश हिंदुस्थानची लोकसंख्या २० कोटी होती. शेंकडा १५ शाळेंत जाणारीं मुलें असतात असें कल्पिल्यास ३ कोटी मुलें शाळेंत जाणारीं निघतात. सरकारी शाळेंत शिकणाऱ्या प्रत्येक मुलामागें खर्च रु. ४–६–५ येत आहे. यापैकीं सरकार रु. ०–१५–४, लोकल फंड रु. २–९–११ व म्युनिसिपालिटी रु. ०–४–६ सोशी. खाजगी शाळेंत शिकणाऱ्या मुलामागें रु. ३–७–१ खर्च येत असे. त्यापैकीं रु. १–२–० सरकार व लोकल फंड सोशी. सर्व मुलें खाजगी शाळेंत शिकविलीं अशी कल्पना केल्यास सरकारास व लोकल फंडास एकूण खर्च ३·३७ कोटींचा येईल, १८८२ मध्यें प्राथमिक शिक्षणावर प्रांतिक सरकाराकडून १६·७७ लाख रुपये व लोकल फंडाकडून २४·८८ लाख रुपये खर्च होत असत. कमिशनच्या सूचनेप्रमाणें प्राथमिक शिक्षणाप्रीत्यर्थ सरकारास ५०० टक्क्यांपेक्षां जास्त खर्च करावा लागला असता, म्हणजे खर्च १७ लाखांवरून ११२ लाखांवर गेला असता. त्याचप्रमाणें लोकल फंडाचा खर्च

८०० टक्क्यांनीं वाढला असता, २५ लाखांचा खर्च २२४ लाखांवर गेला असता. यावरून प्राथमिक शिक्षणप्रसारासाठीं केवढ्या मोठ्या रकमेची गरज होती हें दिसून येईल. हा पैसा कसा निर्माण करावयाचा या प्रश्नाकडे कमिशनचें लक्ष जावयास पाहिजे होतें. या प्रश्नाचा सखोल विचार न करतां 'अधिक प्रयत्न व्हावयास पाहिजे' व 'एका प्रांतानें दुसऱ्या प्रांताचें पैसा जमा करण्याचे बाबतींत अनुकरण करावें' एवढें म्हणण्यानें कार्यभाग होणार नव्हता. खर्चाच्या प्रश्नाचा विचार न केल्यामुळें कमिशननें केलेल्या चांगल्या शिफारशींसहीं हरताळ फांसण्यांत आला.

९. **१८८२ ते १९०२ या कालांतील घडामोडी:**—एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या वीस वर्षांत सामाजिक, राजकीय व आर्थिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं अनेक चळवळी सुरूं झाल्या. कै. दादाभाई नौरोजी, सर फिरोजशहा मेहता, डब्ल्यू. सी. बानर्जी, सर सय्यद अहमदखान, लोकमान्य टिळक, आणि गोपाळ कृष्ण गोखले यांसारख्या राष्ट्रीय वृत्तीच्या पुढाऱ्यांनीं या कामीं अत्यंत परिश्रम घेतले. या चळवळींचा परिणाम म्हणून पाश्चिमात्य विद्या संपादन करण्याची आकांक्षा सर्वत्र निर्माण झाली व शाळा आणि कॉलेज यांमध्यें जाणाऱ्या विद्यार्थ्यांचीं संख्या भराभर वाढूं लागली.

ही शिक्षणाबद्दलची मागणी तीन मार्गांनीं मिटवितां आली असती. **पहिला मार्ग**—ज्या ठिकाणीं शाळा नाहींत त्या ठिकाणीं सरकारास शाळा काढतां आल्या असत्या. इंडियन एज्यूकेशन कमिशननें जरी आपला विरोध स्पष्ट दर्शविला होता तरी सरकारनें या बाबतींत प्रयत्न केला. परंतु या कामीं पैशाची तूट पडल्यामुळें फारच थोड्या मुलांची सोय लावतां आली.

दुसरा मार्ग—मिशनरी लोकांना नवीन शाळा काढतां आल्या असत्या. परंतु इं. ए. कमिशनचे अहवालानंतर मिशनरी लोकांनीं

आपलें धोरण बदललें. कमिशन बसण्यापूर्वी सर्व ठिकाणीं लोकांची मागणी पुरी करतां येईल, इतक्या शिक्षणसंस्था काढण्याची त्यांची तयारी होती. परंतु कमिशनच्या अहवालामुळें त्यांची बरीचशी निराशा झाली. शिवाय इंग्रजी शिक्षण घेतलें म्हणजे तो मनुष्य खिस्तीधर्माचा स्वीकार करतो, ही कल्पनाही फोल ठरली. जे लोक खिस्ती नाहींत त्यांना शिक्षण देणें, हें आपलें काम नाहीं, असें कांहीं मिशनऱ्यांना वाटावयास लागलें. त्यामुळें ज्या शिक्षण संस्था पूर्वी उभारण्यांत आल्या होत्या त्याच चालविण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. या संस्थांमधून बहुतेक खिस्ती लोकांचाच भरणा असे. यावरून असें दिसून येईल कीं, शिक्षणाच्या वाढत्या मागणीस तोंड देणें मिशनरी लोकांना शक्य नव्हतें.

पैशाचे अभावीं सरकार शाळा वाढवूं शकत नव्हतें व नवीन धोरणामुळें मिशनरी लोकांचेही प्रयत्न मंदावले होते. यामुळें **तिसरा मार्ग**, म्हणजे हिंदी लोकांनीं स्वतः शिक्षणदानाचें कार्य करावयाचें, हा एवढाच शिल्लक राहिला होता. वेळ कोणती आली आहे, हें ओळखून हिंदी लोक कामास तयार झाले, हें त्यांना भूषणावह आहे. आधुनिक पद्धतीचें शिक्षण ज्यांचें झालें होतें असे लोक आपल्या बांधवांना शिक्षण देण्यासाठीं मोठ्या प्रमाणांत पुढें सरसावले. अशारीतीनें अंतरझर तत्त्व प्रथमच प्रत्यक्षांत आल्याचें दिसून आलें.

शिक्षण प्रसाराच्या कार्याचे सुरवातीस पैसा जमा करणें हेंच कार्य हिंदी लोकांना करावें लागलें. हिंदी लोकांनीं चालविलेल्या कॉलेजचे प्रिन्सीपाल युरोपिअनच असत. शाळेचे हेडमास्तर किंवा कॉलेजचे प्रिन्सीपाल होण्यास हिंदी लोक असमर्थ आहेत, अशी त्या वेळची समजूत होती. आज समज कांहीं असले तरी, त्यावेळीं असे समज समाजांत असणें स्वभाविक होतें. एक तर युरोपियन शास्त्रांत व ज्ञानांत पारंगत झालेलीं हिंदी माणसें फार कमी होतीः दुसरें—ज्याची मातृभाषा इंग्रजी आहे अशा गृहस्थासच इंग्रजी शिकवितां

येईल, असा त्यावेळीं समज होता. शिक्षणाचा मुख्य भाग म्हणजे इंग्रजी विषयाचें शिक्षण. तें उत्तमरीतीनें देतां यावें म्हणून हिंदी लोकांनीं चालविलेल्या शाळा-कॉलेजांतून युरोपियन लोक नेमले जात असत.

परंतु ज्या ध्येयांनीं हिंदी लोक प्रेरित झाले होते, तें ध्येय युरोपियन हेडमास्तर किंवा प्रिन्सीपाल यांचे ठिकाणीं असणें शक्य नव्हतें व त्यामुळें शिक्षण संस्थांची भरभराट जशी व्हावयास पाहिजे होती तशी होऊं शकली नाहीं. शिवाय जोंपर्यंत युरोपियन प्रमुख नेमला जात असे तोंपर्यंत शिक्षणाचा खर्च सर्वसाधारण परिस्थितीच्या माणसाला झेपेल इतका खालीं आणतां येणें शक्य नव्हतें व त्यामुळें मोठ्या प्रमाणांत शिक्षण-प्रसार होणेंही अशक्य होतें. समाजांतील बुद्धिमान माणसांनीं त्याग बुद्धीनें पुढें आल्याशिवाय तरणोपाय नव्हता. अशा लोकांकडे सरकारी नोकऱ्या चालून येत असत. परंतु या मानाच्या नोकऱ्यांकडे पाठ फिरवून खाजगी संस्थांमधून अल्पसें वेतन घेऊन काम करणाऱ्या त्यागी माणसावर आज राष्ट्रहित अवलंबून राहिलें होतें. या राष्ट्राच्या हांकेला ओ देऊन ज्या क्षणीं सुशिक्षित हिंदी लोक पुढें आले, तो क्षण भाग्याचा होय! केंब्रिज विश्वविद्यालयाचे सीनीयर रँग्लर, सर आर. पी. परांजपे, यांचे सारखीं माणसें खाजगी संस्थेला ज्यावेळीं प्रिन्सीपाल म्हणून लाभली, त्यावेळीं खाजगी संस्थेच्या कपाळाचा दुबळेपणाचा डाग नाहींसा झाला; शिक्षणावर होणारा खर्च कमी होऊ लागला व शिक्षणाची प्रगति झाली.

१८८२ ते १९०२ च्या काळांत शिक्षण हें ध्येय ठेवून ज्यांनीं कार्य केलें, त्यांना जेवढें धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. मातृभूमीच्या उद्धारासाठीं शिक्षणाची मागणी ज्यांनीं पुरविली, नव्हे ती आणखी वाढविली, त्या सुपुत्रांनीं हिंदुस्थानांत आधुनिक शिक्षणाचा पाया घातला.

हिंदी शिक्षणाच्या इतिहासांतील यापुढची महत्त्वाची गोष्ट म्हणजे १९०४ मधील लॉर्ड कर्झन यांचा ठराव. इं. ए. कमिशनचा अहवाल व हा ठराव यांमधील काळांत घडलेल्या गोष्टींचा धांवता आढावा घेऊं या.

हिंदी विश्वविद्यालयें:—१८५७ च्या कायद्यान्वयें कमिशनच्या नंतरच्या वीस वर्षांत काम चालूं होतें. १८८७ मध्यें अलाहाबाद विश्वविद्यालयाची स्थापना एवढीच महत्त्वाची गोष्ट घडून आली. इतर चार विश्वविद्यालयांप्रमाणेंच परीक्षा घेणें, एवढेंच प्रमुख ध्येय या विद्यापीठांपुढें होतें; मात्र इच्छा असल्यास शिक्षण देण्याचें कार्य करतां येईल अशी तरतूद कायद्यांत केली होती.

कॉलेजांची वाढ:—कमिशननें ज्या कॉलेज शिक्षणासंबंधीं सूचना केल्या त्या फारशा महत्त्वाच्या नाहींत. परंतु इतर शिफारशींचा कॉलेज शिक्षणावर दोन मार्गांनीं परिणाम झाला.

(१) **पहिला**—शिफारशीमुळें माध्यमिक शिक्षणाचा बराच प्रसार झाला. माध्यमिक शिक्षण—क्रमांत वेगवेगळ्या अभ्यास—क्रमाची तरतूद केली न गेल्यामुळें, प्रत्येकजण मॅट्रिक्युलेशन परीक्षेची तयारी करूं लागला. या परीक्षेंत पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं बरेच विद्यार्थी कॉलेजमध्यें शिक्षण घेऊं लागले. याला कारण विश्वविद्यालयाच्या पदवीधरांना चांगल्या नौकऱ्या सरकारी खात्यांत मिळत असत, हें एक; आणि दुसरें, दुसऱ्या अभ्यास—क्रमाची कांहींच तरतूद केली गेली नव्हती. याचा परिणाम कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या संख्येंत वाढ होण्यांत झाला.

(२) **दुसरा**—कमिशनच्या शिफारशीमुळें हिंदी खाजगी प्रयत्नास शिक्षणक्षेत्रांत वाव मिळाला. १८८२ मध्यें या क्षेत्रांत मिशनऱ्यांचें वर्चस्व होतें. परंतु कमिशनच्या रिपोर्टानंतर या परिस्थितींत बराच फरक झाला. मिशनऱ्यांचे प्रयत्न थंडावले, तर हिंदी प्रयत्नास जोर चढला. १९०१—२ सालीं मिशनऱ्यांनीं चालविलेल्या कॉलेजांची संख्या ३७ होती, तर हिंदी लोकांनीं चालविलेल्या कॉलेजांची संख्या ४२ होती.

या परिस्थितीमुळें कॉलेजच्या शिक्षणामध्यें वाढ होणें हें स्वाभाविक होतें. १८८२ मध्यें हिंदी विश्वविद्यालयास जोडलेल्या कॉलेजांची संख्या ६८ होती. (४९ पहिल्या ग्रेडची व १९ दुसऱ्या ग्रेडची) पुढील दहा वर्षांत १८८२–१८९१ मध्यें, ६१ नवीन कॉलेजें जन्मास आलीं. (३० पहिल्या ग्रेडची व ३१ दुसऱ्या ग्रेडची). १८९२ ते १९०२ च्या काळांत आणखी ५० कॉलेजें निघालीं. (१० पहिल्या ग्रेडची व ४० दुसऱ्या ग्रेडची.) १९०१–२ मध्यें अशारीतीनें हिंदी विश्वविद्यालयास जोडलेल्या एकूण कॉलेजांची संख्या १७९ होती; यांपैकीं १३६ ब्रिटिश इंडियामध्यें होती, ३२ हिंदी संस्थानामध्यें, ९ सीलोनमध्यें व २ ब्रह्मदेशांत होती. ब्रिटिश इंडियामध्यें जी १३६ होती त्यापैकीं ११ केवळ युरोपियन लोकांसाठीं होती व १२ स्त्रियांसाठीं होती. बाकी राहिलेलीं ११३ कॉलेजें खालीं दर्शविल्याप्रमाणें वेगवेगळ्या संस्थांनीं चालविलेलीं होतीं.

२३ सरकारी, ६ निम-सरकारी, ५ म्युनिसिपालिट्यां, ३७ मिशनरी व ४२ हिंदी

माध्यमिक शाळा:—कमिशनच्या अहवालानंतरच्या वीस वर्षांत माध्यमिक शिक्षणाचा प्रसार फार जोरानें झाला. याचें बरेचसें श्रेय खाजगी संस्थांनाच द्यावें लागेल. खालील आंकड्यावरून या शाळांची झालेली वाढ निदर्शनास येईल.

	१८८१–२	१९०१–२
१ माध्यमिक शाळांची संख्या	३,९१६	५,१२४
२ माध्यमिक शाळांतील मुलांची संख्या	२,१४,०७७	५,९०,१५९

(या आंकड्यामध्यें ब्रह्मदेशाचे आंकडे आले नाहींत. कांहीं संस्थानांतील आंकडे मात्र आले आहेत.)

यावरून वीस वर्षांत माध्यमिक शाळांची वाढ झालेली दिसून येईल. मुलांची संख्या तर दुप्पटीपेक्षां जास्त वाढली. १८५४ ते १८८२ या काळांत प्राथमिक शिक्षणामध्यें जी वाढ झाली त्यापेक्षां माध्यमिक शिक्षणाची जास्त वाढ झाली, असें कमिशननें आपल्या अहवालांत नमूद केलें आहे व अशी सूचना केली आहे कीं, सरकारनें माध्यमिक शिक्षण लोकांवर सोंपवून आपण स्वतः प्राथमिक शिक्षण प्रसाराचें कार्य हातीं घ्यावें. परंतु १८८२ ते १९०२ च्या काळांत माध्यमिक शिक्षणाचीच वाढ झाल्याचें दिसून आलें व प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न पूर्ववत् लोंबकळत राहिला.

कमिशननें सुचविल्याप्रमाणें, प्रांतिक सरकारांनीं आपआपल्या भागांत सोयीचें होईल याबेतानें, ग्रँट–इन्. एड कोडामध्यें फरक केलें.

हिंदुस्थानांतील पांचही विश्वविद्यालयांनीं कमिशनच्या सूचनेप्रमाणें शालान्त(School leaving certificate) परीक्षा घेण्यास सुरवात केली. परंतु मुंबई प्रांत सोडल्यास ही परीक्षा फारशी लोकप्रिय झाली नाहीं. मुंबई मध्यें मात्र ही परीक्षा पास होणारांना सरकारी नोकरी दिली जात असे. १९०१–२ मध्यें, सर्व हिंदुस्थानभर मॅट्रिक्युलेशन परीक्षेस २३ हजार विद्यार्थी बसले होते. परंतु यासारख्या ज्या दुसऱ्या परीक्षा होत्या त्यास फक्त २ हजार विद्यार्थी बसले व त्यांपैकीं मुंबई प्रांतांत १२०० होते. यावरून १८८२ सालाप्रमाणेंच १९०२ सालींही मॅट्रिक्युलेशन परीक्षेचें प्राबल्य माध्यमिक शिक्षणक्षेत्रांत असल्याचें दिसून येतें.

माध्यमिक शिक्षकांना ट्रेनिंग देण्याच्या बाबतींत या कालखंडामध्यें कांहीं प्रगति झाल्याचें दिसून येतें. १८८२ मध्यें फक्त दोन ट्रेनिंग कॉलेजें होतीं. १९०१–२ मध्यें हा आंकडा सहावर गेला. सिदापेट, राजमुंद्री, कुर्सेआँग, अलाहाबाद, लाहोर, व जबलपूर या ठिकाणीं हीं कॉलेजें निघालीं. प्रत्येक प्रांतांत ट्रेनिंगचें सर्टिफिकेट देणारी परीक्षा सुरू झाली; मद्रास प्रांतामध्यें मात्र एल्. टी. ही ट्रेनिंगची पदवी देण्यांत येत असे.

सहा कॉलेजाशिवाय माध्यमिक शाळांतील शिक्षकांना विनीत करण्यासाठीं बऱ्याच शाळा होत्या. १९०२ पर्यंत मुंबई हा एकच प्रांत असा होता कीं त्या ठिकाणीं ट्रेनिंग देण्याची कांहीं व्यवस्था नव्हती.

माध्यमिक शाळांमध्यें मातृभाषेंतून शिक्षण देण्यास अजून सुरवात झाली नव्हती, ही दुर्दैवाची गोष्ट होय. १९०२ पर्यंत मातृभाषांतून शिक्षण फक्त मिडलस्कूलमध्यें देतां येत असे. सर्व प्रांतांनीं हायस्कूलचें शिक्षण मातृभाषेंतून देण्याची कल्पनाच टाकून दिली होती. इंग्रजी भाषेचें महत्त्व कमी होऊन तिचें स्थान मातृभाषेनें घ्यावें हा विचार कमिशनलाही मान्य नव्हता. यायोगें इंग्रजी भाषेचें वर्चस्व वाढत गेलें व १९०२ पर्यंत माध्यमिक शाळेचा मुख्य हेतू म्हणजे, इंग्रजी भाषेचें शिक्षण देणें, हाच राहिला. हिंदी भाषांकडे दुर्लक्ष होऊं लागलें, इतकें कीं मातृभाषा नीट येऊं लागण्यापूर्वीच विद्यार्थी इंग्रजी शिकण्यास सुरवात करी. इंग्रजी हें माध्यम झाल्यानें ती चांगली शिकण्याकरतां विद्यार्थ्यांचा पुष्कळसा वेळ जाऊं लागला. अभ्यासक्रमांतील ज्ञान वाढविणाऱ्या विषयांचा अभ्यास होण्याऐवजीं केवळ इंग्रजीचा अभ्यास होऊं लागला.

प्राथमिक शिक्षण:—कमिशनच्या शिफारशीप्रमाणें हिंदुस्थानांतील सर्व प्रांतांमधून लोकल बोर्डे, म्युनिसिपल कमिट्या, किंवा कौन्सिलें स्थापन झालीं. या संस्थांचें मुख्य काम प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणें हें होतें. तरी त्यांचे कार्यक्षेत्रांतून माध्यमिक व उच्च शिक्षण पूर्णपणें वगळण्यांत आलें नव्हतें. कांहीं प्रांतामध्यें असें निश्चित धोरण आंखण्यांत आलें होतें, कीं उत्पन्नाचा अमुक एक भाग प्राथमिक शिक्षणाकरतां खर्च झालाच पाहिजे. प्राथमिक शिक्षणाची गरज भागल्यावरच माध्यमिक व उच्च शिक्षणाकरतां यां बोर्डांनीं खर्च करावयाचा आहे. या बाबतींत बोर्डाचि अधिकार निश्चित काय रहातील व शाळांना मदत कोणत्या नियमांनीं देण्यांत येईल, हेंही ठरविण्यांत आलें.

कमिशननें सुचविल्याप्रमाणें योग्य कायदेकानू अस्तित्वांत आले व त्याप्रमाणें प्राथमिक शाळांचा ताबा लोकल बोर्डाकडे आला. या ताब्याचें स्वरूप प्रत्येक प्रांतांत वेगवेगळें होतें. एकाच प्रांतांत देखील लोकल बोर्डापेक्षां म्युनिसिपालिटीकडे अधिक ताबा असे, कारण म्युनिसिपालिटी-तील लोकांना लोकमताची जाणीव अधिक झाली होती. विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं सरकारनें सत्ता—मग ती कमी असो कीं अधिक असो—लोकांचे ताब्यांत दिली होती व ती त्यांच हातून परत घेणें आतां शक्य नव्हतें.

खाजगी शाळांच्या बाबतींत कमिशननें केलेल्या शिफारशी पाहतां अशा शाळांना सररहा मान्यता दिली नव्हती. परीक्षांचे निकालावर या शाळांना सरकारी मदत मिळत असे. एवढेंच. खालील तक्त्यावरून त्यांचे स्थितीविषयीं अधिक माहिती मिळेल.

	१८८१–२		१९०१–२	
	सरकारी किंवा बोर्डाच्या शाळा	खाजगी मदतीच्या शाळा	सरकारी किंवा बोर्डाच्या शाळा	खाजगी मदतीच्या शाळा
मद्रास ...	१,२६३	७,४१४	२,८३६	११,१२५
मुंबई ...	३,८११	१९६	४,६७०	१,९२९
बंगाल ...	२८	४७,३७४	२६	३६,०४६
सरहद्द प्रांत ...	...	...	१३५	१७
संयुक्त प्रांत ...	५,५६१	२४३	४,५१८	२,४६३
पंजाब ...	१,५४९	२७८	१,८०२	६३६
मध्यप्रांत ...	८९४	३६८	९३१	८६४
आसाम ...	७	१,२५६	१,२६०	१,४८२
बऱ्हाड ...	४६७	२०९	६४०	४००
कुर्ग ...	५७	३	७०	४

वरील तक्त्यावरून दिसून येईल कीं, आसामनें आपलें जुनें १८८१ मधील धोरण बदललें व कमिशननें केलेल्या शिफारशी विरुद्ध १९०१ मध्यें वर्तन केलें. बऱ्हाड, कुर्ग व पंजाब यांनीं आपलें पूर्वीचेंच धोरण पुढें चालू ठेविलें. संयुक्त प्रांत व मुंबई प्रांत यांनीं वीस वर्षांत बरीच सुधारणा केली. बंगालमध्यें कमिशनच्या शिफारशी पाळल्याचें दिसत नाहीं, कारण तेथें मदतीच्या शाळांचा आंकडा बराच कमी झाल्याचें दिसून येईल.

विसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत खाजगी शाळांचा प्रश्न जवळ जवळ सुटला. ज्यांना मदत मिळूं शकली नाहीं त्यांचा, चढाओढीमध्यें टिकाव न लागल्यानें, त्या शाळा बंद पडल्या.

प्राथमिक शिक्षण व त्यावर होणारा खर्च या बाबतींत कमिशननें केलेल्या सूचना प्रांतिक सरकारांनीं पाळल्या नाहींत, असें आपणांस दिसून येईल. कमिशनच्या अहवालानंतरच्या वीस वर्षांचे काळांत माध्यमिक शाळा व कॉलेजें यांची फार जोरानें वाढ झाली व बराचसा पैसा त्यांच्यासाठींच खर्च झाला. प्राथमिक शिक्षणाची मात्र उपासमार झाली. १८८१-२ मध्यें प्राथमिक शिक्षणावर सरकारचा खर्च रु. १६·७७ लक्ष होता, तो १९०१-२ मध्यें १६·९२ लक्ष रुपये झाला. म्हणजे वाढ फारच थोडी झाली. लोकल बोर्डांनीं मात्र प्राथमिक शिक्षणाची कामगिरी चोख बजाविली. १८८१-२ मध्यें त्यांनीं या शिक्षणासाठीं २४·९ लक्ष रुपये खर्च केले, तर १९०१-२ मध्यें हा खर्च ४६·१ लाखावर गेला. परंतु सरकारकडून या शिक्षणासाठीं द्रव्य-सहाय्य न झाल्यानें या शिक्षणाचें पाऊल फारसें पुढें पडलें नाहीं व शिक्षणाचा गाडा पूर्वीप्रमाणेंच मंदगतीनें चालू लागला.

प्रकरण आठवें

लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द

विसाव्या शतकाच्या सुरवातीस हिंदी शिक्षणाचे इतिहासांत क्रांति घडून आली. इंडियन एज्यूकेशन कमिशननें घालून दिलेल्या धोरणाप्रमाणें शिक्षण खात्यानें चालविलेल्या प्रगतीच्या शांत वातावरणांत भांडणाचें वादळ उत्पन्न झालें. वादविवाद, परिषदा, समित्या, सरकारी ठराव यांचा एकच गोंधळ माजला. शिक्षणाचे प्रत्येक शाखेंत भांडणें निर्माण झालीं, तीं बराच वेळ चालू राहिली व त्याचा शेवट शिक्षणखातें १९२१ मध्यें हिंदी मंत्र्यांचे ताब्यांत जाण्यांत झाला. या दूरगामी चळवळीचीं तीन कारणें होतीं. पहिलें—इंग्लंडमध्यें चाललेल्या शिक्षणविषयक घडामोडीचा प्रतिध्वनि हिंदुस्थानांत उमटला. दुसरें:—हा काळ सुबत्तेचा होता व शिक्षणास लागणाऱ्या अधिक पैशाची तरतूद बजेटांत केली गेली होती. तिसरें:—थोर व्यक्तिमत्व असलेले लॉर्ड कर्झनसारखे मुत्सद्दी गव्हर्नर जनरल होते. त्यांना शिक्षणाबद्दल जिव्हाळा वाटत होता, इतकेंच नव्हे तर, शिक्षणामध्यें परिणामकारक सुधारणा घडवून आणण्याचा त्यांनीं निश्चय केला होता. ते अधिकारी असतांना हिंदी शिक्षण कार्यात महत्त्वाच्या घडामोडी झाल्या.

लॉर्ड कर्झन हे १८९९ सालीं हिंदुस्थानांत आले. ते आल्याबरोबर प्रथम त्यांचें लक्ष शिक्षणविषयक प्रश्नांकडे गेलें. १९०१ सालीं सर्व प्रांतांच्या डायरेक्टरस् ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनची त्यांनीं सिमल्यास सभा बोलविली, व चालू शिक्षण, त्यांतील दोष व ते नाहींसे करण्याचे उपाय

यांवर चर्चा केली. अशा तऱ्हेचा प्रयत्न पूर्वी कोणीही केला नव्हता. यामधून पुढें येणाऱ्या सुधारणांचा उगम झाला. या सभेचा अहवाल जरी प्रसिद्ध झाला नसला तरी, पुढें घडून आलेल्या गोष्टीवरून त्या सभेचा रोख काय होता, हें कळून येणार आहे.

(अ) इंडियन एज्यूकेशन कमिशननें ज्या शिफारशी केल्या त्यांची फलश्रुति झाली होती. मोठ्या प्रमाणांत शिक्षणाचा प्रसार हा त्यांचा हेतु होता व तो आतां साध्य झाला होता.

(ब) कमिशनच्या शिफारशीप्रमाणें शिक्षण खात्यांनीं खाजगी प्रयत्नांना पूर्ण स्वातंत्र्य दिलें होतें. याचे कांहीं वाईट परिणाम दिसूं लागले. उदाहरणार्थः—खाजगी संस्थांनीं चालविलेल्या शाळांचा दर्जा कमी झाला. शिक्षक संख्येनें कमी असून त्यांची लायकीही बेताची दिसून आली. शाळा शिक्षणाचीं केंद्रें न होतां, परीक्षेकरतां मुलांना तयार करणारे वर्ग बनले.

(क) या दोषांना आळा घालण्यासाठीं लोकांना दिलेलें स्वातंत्र्य नियंत्रित करणें व शिक्षण–प्रसाराचे ऐवजीं शिक्षणांत सुधारणा घडवून आणणें, एवढाच उपाय होता.

(ड) सरकारनें प्रत्यक्ष शिक्षणक्षेत्रांत उतरूं नये ही कमिशनची सूचना आत्मघातकी आहे. सुदैव एवढेंच कीं या सूचनेप्रमाणें सरकारनें वर्तन केलें नाहीं. ही सूचना नियमबाह्य समजली पाहिजे अशी वेळ आली आहे. उलटपक्षीं सरकारनें कांहीं नमुनेदार संस्था चालविणें जरूर आहे.

ही झाली अधिकाऱ्यांची दृष्टि. त्यांची अशी ठाम समजूत झाली होती कीं इंडियन एज्यु. कमिशननें शिक्षणप्रसार करीत असतां शिक्षणाच्या दर्जाकडे पाहिलें नाहीं व यापुढें केवळ प्रसाराकडे न पाहातां शिक्षणाचा दर्जा कसा सुधारतां येईल याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. लॉर्ड कर्झन

यांचेंही हेंच मत होतें आणि हें मत लक्षांत घेऊन आपण त्यांच्या शिक्षण सुधारणांकडे पाहिलें पाहिजे.

लॉर्ड कर्झन यांची शिक्षण सुधारावें ही मनापासूनची इच्छा होती. दोषांचें त्यांनीं केलेलें निदान बरोबर होतें, परंतु त्यांनीं अवलंबिलेला मार्ग योग्य नव्हता. कर्झनच्या पूर्वी जे व्हाइसरॉय झाले त्यांनीं इंग्लंडच्या पार्लमेंटच्या नियंत्रणाखालीं आपणास आवडेल त्याप्रमाणें कारभार केला. त्यांनीं लोकांच्या मताला किंमत दिली नाहीं. याचें कारण कदाचित् लोकमत त्या वेळपावेतों तयार झालें नव्हतं हेंही असूं शकेल. लॉर्ड कर्झन यांची साहजिकच अशी समजूत झाली कीं शिक्षण सुधारण्याचे कामीं आपण आपल्या अधिकाऱ्यांचा विचार घेतला म्हणजे पुरें आहे. काळ बदलला आहे ही गोष्ट त्यांचे ध्यानीं आली नाहीं. ज्यांना शिक्षणाविषयीं कळकळ आहे अशा हिंदी सुशिक्षितांमध्यें हळू हळू निश्चित स्वरूपाचें मत बनत आहे, हें मत अधिकाऱ्यांच्या मताहून भिन्न आहे व तें मत शिक्षण-सुधारणा घडवून आणण्यापूर्वी आपण लक्षांत घेतलें पाहिजे, याची त्यांना कल्पना नव्हती. या मताकडे कर्झनसाहेबांनीं लक्ष न दिल्यामुळें ज्या चुका घडून आल्या, त्याबद्दल कोणासही दुःखच वाटेल. उदाहरणार्थ सिमल्यास मिशनरी लोकांना बोलाविलें, परंतु हिंदी शिक्षणतज्ज्ञांना बोलाविलें नाहीं. हिंदी विश्वविद्यालयाचें जें कमिशन नेमिलें त्यांत ख्रिश्चन लोकांना जागा मिळाली, परंतु हिंदी लोकांचा अंतर्भाव झाला नाहीं. यामुळें हिंदी जनतेमध्यें गैरविश्वासाचें व अशांततेचें वातावरण निर्माण झालें, व अधिकारीवर्ग आणि हिंदी जनता यांचेमध्यें वैवनाव निर्माण झाला.

अधिकारीवर्गाचें मत व हिंदी लोकांचें मत कसें भिन्न होतं हें पाहण्यासारखें आहे.

(अ) शिक्षणाचा प्रसार करण्याऐवजीं त्याच्या दर्जाला किंमत देण्यांत कोणताच शहाणपणा नाहीं, असें हिंदी लोकांना वाटलें. ज्या

इंग्लंडमध्यें शिक्षणाचा प्रसार पूर्णत्वानें झाला आहे, त्या ठिकाणीं हें धोरण ठीक असेल; परंतु ज्या हिंदुस्थानांत शिक्षणप्रसारास नुकतीच सुरवात झाली आहे, तेथें हें धोरण हितावह नाहीं, असें त्यांचें मत होतें.

(ब) माध्यमिक व उच्च शिक्षण नियंत्रित करण्याचा जो सरकारचा हेतु आहे त्याच्या बुडाशीं कांहीं राजकीय डाव आहे; शिक्षणसुधारणा या नांवाखालीं सुशिक्षित लोकांच्या मनांत उत्पन्न झालेल्या राष्ट्रप्रेमाला बांध घालण्याचा सरकारचा उद्देश आहे, असें लोकांना वाटे.

(क) शिक्षणप्रसार व्हावा हें सरकारचें धोरण सर्वतः मान्य होतें, मात्र हा प्रसार फार मंद गतीनें होत आहे, अशी लोकांची तक्रार होती.

यावरून मतभेद किती निश्चित स्वरूपाचे होते हें ध्यानांत येईल. यांतून तेढ निर्माण झाली हें स्वाभाविकच झालें. लॉर्ड कर्झन व त्यांचे अधिकारी यांनीं लोकमत काय आहे, तें पाहून तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला असता तर, हिंदी शिक्षणाचा इतिहास कांहीं वेगळाच झाला असता. हिंदी मत झुगारून आपल्या विचाराचें घोडें लॉर्ड कर्झनसाहेबांनीं दामटल्यामुळें, हिंदी लोकांना असें वाटूं लागलें कीं, शिक्षणाची व्यवस्था आपल्या हातीं आल्याशिवाय शिक्षणाची सुधारणा होणें शक्य नाहीं. यापुढें हळू हळू हे विचार बळावले व त्याचा परिणाम असा झाला कीं, १९१९ सालीं शिक्षणखातें हिंदी मंत्र्याकडे सोपविण्यांत आलें.

११ मार्च १९०४ रोजीं सरकारनें आपलें शिक्षण विषयक धोरण ठरावाचे रूपानें प्रसिद्ध केलें. प्राथमिक, माध्यमिक, उच्च व धंदेशिक्षण यांबाबतींत ज्या सुधारणा या ठरावांत सुचविल्या होत्या, त्यांचा ठोकळ मानानें आपण विचार करूं.

२. इंडियन युनिव्हर्सिटी कमिशन:—ब्रिटिश हिंदुस्थानांत जीं विश्वविद्यालयें स्थापन झालीं होतीं, त्यांची आजची स्थिति काय

आहे व त्यांचें भवितव्य कशा प्रकारचें आहे, हें पाहण्यासाठीं २७ जानेवारी १९०२ रोजीं एक कमिशन नेमण्यांत आलें व अशा रीतीनें लॉर्ड कर्झनसाहेबांचे सुधारणांस उच्च शिक्षणापासून सुरवात झाली. या कमिशनकडे विश्वविद्यालयाची घटना व कारभार पाहून त्यांत कोणती सुधारणा करतां येईल, व विश्वविद्यालयांत दिलें जाणारें शिक्षण सुधारून एकूण शिक्षणाची प्रगति कशी घडवून आणतां येईल, याविषयीं सूचना करण्याची कामगिरी सोपविली होती. या कमिशननें केलेल्या मुख्य सूचना खालीलप्रमाणें आहेत.

(अ) १८९८ चे कायद्यानें सुधारलेलें लंडन विश्वविद्यालय हा नमुना कमिशननें आपल्यापुढें ठेविला. त्या बाबतींत कलकत्ता विश्व-विद्यालय कमिशन म्हणतें:—

"ज्याप्रमाणें १८५७ मध्यें त्याचप्रमाणें १९०२ मध्येंही लंडन विश्वविद्यालय हें ध्येय शिक्षणक्षेत्रांतील मुत्सद्यांनीं स्वीकारलें. लंडन विश्वविद्यालयामध्यें जे चार बदल घडून आले त्याचा परिणाम हिंदी वैचारिक वातावरणांत दिसून आला. ते चार बदल असे होते. पहिला विश्वविद्यालय ही शिक्षण--देणारी संस्था असली पाहिजे. दुसरा विश्वविद्यालय शिक्षकवर्ग व साहित्य यांनीं सुसज्ज असल्याशिवाय त्याला पूर्ण अधिकार दिले जाऊं नयेत. तिसरा विश्वविद्यालयाचे कारभारामध्यें प्रिन्सिपाल व शिक्षक यांनीं आत्मीयतेनें भाग घ्यावा. चवथा--विश्वविद्यालयाचें व्यवस्थापक मंडळ म्हणून असलेल्या सिनेटमध्यें सभासदांची संख्या फार नसावी. अशारीतीनें इंग्लंडमधील वादविवादाचे पडसाद हिंदुस्थानांत उमटले.."

(ब) १८८२ चे कमिशनकडे ज्याप्रमाणें उच्च शिक्षणाविषयीं आपलें मत प्रदर्शित करण्याचें काम सोपविलें नाहीं, त्याचप्रमाणें या कमिशनकडे माध्यमिक शिक्षणाचा कोणताही विचार न करण्याचें सुचविलें होतें. शिक्षणाचा सर्व बाजूंनीं जो विचार व्हावयास पाहिजे होता तो अशामुळें होऊं शकला नाहीं.

(क) कमिशनपुढें मुख्य प्रश्न दोन होते--

(१) ज्या प्रकारच्या घटनेची वाढ पुढें करतां येईल अशी विश्व-विद्यालयीन घटना निश्चित करणें व (२) थोड्या वेळांत आपलें ध्येय गांठतां येईल असे फरक सुचविणें.

परंतु दुःखाची गोष्ट ही कीं या प्रश्नांचा विचार कमिशननें आपल्या अहवालांत केला नाहीं.

" विश्वविद्यालयाला कॉलेजें जोडून घेण्याची जी पद्धत होती तिचे ऐवजीं दुसऱ्या कोणत्या पद्धतीचा शेवटीं अवलंब करावयाचा हें ठरविण्यांत आलें नाहीं. आहे ती पद्धत ठीक आहे असें समजून तीच सुधारण्याचे व चळकट करण्याचे प्रयत्न झाले. "

(ड) कॉलेजें स्वीकृत करून (affiliating) घेण्याची पद्धत इंग्लंडनें ज्या वर्षीं बंद केली, त्याचे आदल्या वर्षीं म्हणजे १८५७ सालीं, हिंदुस्थाननें कॉलेजें स्वीकृत करण्याचें आपलें ध्येय ठरविलें. १९०२ मध्येंही अशीच विचित्र घटना घडून आली. १९०२ मध्यें कमिशननें जो अहवाल तयार केला त्यांत विश्वविद्यालयाचे घटनेसंबंधीं कांहीं विचार झाल्याचें दिसून येत नाहीं. कारण याविषयीं इंग्लंडमध्यें चर्चा झाली नव्हती. याचे पुढच्या वर्षीं उत्तर इंग्लंडचे व्हिक्टोरिया विश्वविद्यालया-मध्यें विश्वविद्यालयीन कारभाराचे तत्त्वांवर बराच उहापोह झाला व कॉलेजें जोडून घेण्याचें तत्त्व अमान्य करण्यांत आलें. हिंदी कमिशन १९०२ मध्यें बसलें, तें जर १९०५ मध्यें बसलें असतें तर हिंदुस्थानचा निश्चित फायदा झाला असता.

(इ) कमिशननें खालील पांच प्रश्नांचा विचार केला.

(१) विश्वविद्यालयीन कारभाराची पुनर्रचना.

(२) विश्वविद्यालयाची कॉलेजांवर सक्त देखरेख व तीं जोडून घेतांना त्यांचेवर घालावयाच्या अटी.

(३) विद्यार्थी कशाप्रकारें रहातात व काम करतात याची पहाणी.

(४) कांहीं प्रमाणांत विश्वविद्यालयानें शिकविण्याचें काम करणें.

(५) अभ्यासक्रमांत व परीक्षा घेण्याचे पद्धतींत फरक.

यापैकीं तिसऱ्या व पांचव्या शिफारशींसंबंधीं सविस्तर नियम विश्वविद्यालयानें करावयाचे, असें ठरविण्यांत आलें.

परंतु पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या शिफारशींचा विचार १९०४ च्या विश्वविद्यालयाच्या कायद्यामध्यें केला असल्यानें त्यांकडे आतां आपण वळूं.

२. **इंडियन युनिव्हर्सिटी ॲक्ट, १९०४:**—विश्वविद्यालयांच्या घटनेमध्यें या कायद्यानें सात बदल सुचविले.

(१) **विश्वविद्यालयाच्या कामाचा व्याप वाढविला:**—विश्वविद्यालयाचें कार्याचें क्षेत्र वाढविलें आणि त्यांना प्राध्यापक नेमण्याचा आणि संशोधन हातीं घेण्याचा अधिकार देण्यांत आला.

(२) सिनेटची संख्या नियमित करण्यांत आली. कायद्यामाणें विश्वविद्यालयाचे फेलो हें सरकारकडून कायमचे म्हणून नेमले जात असत. अमूक संख्येपेक्षां ते जास्त असूं नयेत, अशी कमाल मर्यादा घालण्यांत आली नव्हती. गेल्या पन्नास वर्षांत सरकारनें हा अधिकार विद्यापीठाचे हितासाठीं म्हणून सर्व वेळीं बजावला नाहीं, तरीपण सिनेटची संख्या बेसुमार वाढली होती. म्हणून १९०४ च्या कायद्यानें असा निर्बंध घातला कीं ही संख्या ५० पेक्षां कमी नसावी व १०० पेक्षां जास्त नसावी व फेलो हा जन्मभर फेलो न राहतां त्याची मुदत फक्त पांच वर्षांची राहील.

(३) कायद्यानें निवडणुकीचें तत्त्व अमलांत आणिलें. मुंबई, मद्रास व कलकत्ता या विश्वविद्यालयांमध्यें प्रत्येकीं २० व इतर विद्यालयांमध्यें १५ फेलो निवडण्यांत यावेत.

(४) सिंडिकेट हें मंडळ कायद्यानें निर्माण केलें आणि त्यावर विश्वविद्यालयाचे शिक्षकांना योग्य प्रमाणांत प्रतिनिधित्व देण्यांत आलें.

(५) विश्वविद्यालयांना कॉलेजें जोडून घेतांना कडक नियम लावण्यांत आले व विद्यालयामध्यें शिक्षणाचा योग्य दर्जा रहावा, याकरतां कॉलेजांची तपासणी सिंडिकेटकडून नेहमीं केली जावी, असें ठरविण्यांत आलें.

(६) सिनेटनें कोणते नियम करावयाचे यावर सरकारनें नियंत्रण ठेविलें. विश्वविद्यालयाच्या पूर्वीच्या कायद्याप्रमाणें हे नियम करण्याचा अधिकार सिनेटला दिला होता. सरकारकडे हे नियम मंजुरीकरतां पाठविले जात असत व एकादा नियम त्यास पसंत नसेल तर तो नामंजूर केला जात असे. १९०४ च्या कायद्यानें असें ठरविलें कीं सिनेटनें केलेल्या नियमांमध्यें योग्य ते फेरफार करण्याचा सरकारला अधिकार आहे, व ठराविक वेळांत सिनेटनें कांहीं नियम न केल्यास सरकारनें ते नियम करावेत.

(७) शेवटीं विश्वविद्यालयाच्या भौगोलिक मर्यादा ठरविण्याचा अधिकार या नवीन कायद्यानें गव्हर्नर जनरलकडे आला. ह्या १८५७ च्या कायद्यामध्यें मर्यादा मुक्रर करण्याच्या प्रश्नाचा उल्लेखच नव्हता, त्यामुळ कांहीं विचित्र प्रकार घडून आले. उदाहरणार्थ कांहीं कॉलेजें दोन विश्वविद्यालयांना जोडण्यांत आलीं. कांहीं एका विश्वविद्यालयाचे कक्षेंत असतांना दुसऱ्या विश्वविद्यालयास जोडण्यांत आलीं. नवीन कायद्यानें असें ठरविलें कीं गव्हर्नर जनरल यांनीं, प्रत्येक विद्यालयानें कोणत्या विभागांत काम करावें तो भौगोलिक विभाग ठरवावा.

४. १९०४ च्या विश्वविद्यालयाच्या कायद्यास लोकांचा विरोध:—१९०४ च्या कायद्यास लोकांनीं जोराचा विरोध केला, विश्वविद्यालयाचे कायद्यांत कोणताच बदल करावयास लोकांची तयारी

नव्हती, असा विरोधाचा अर्थ नव्हे. परंतु सरकारविरुद्ध एक प्रकारचें अविश्वासाचें वातावरण निर्माण झाल्यामुळें सरकारच्या कायद्याविषयीं गैरसमज निर्माण झाला. लोकांची अशी समजूत झाली कीं कायद्याचे नांवाखालीं सरकार, सरकारी किंवा मिशनरी कॉलेजांतून काम करीत असलेल्या युरोपियन तज्ज्ञांचे हातांत सर्व सत्ता सोंपवीत आहे, व हें करण्यामध्यें सरकारचा हेतु लोकांनीं उच्च शिक्षणाचे कार्यांत पडूं नये असा आहे. पांच मुद्यांवर हा विरोध विशेष दिसून आला.

(१) विश्वविद्यालयानें शिकविण्याचें कार्य हातीं ध्यावें याविषयीं केले गेलेले नियम तसेच पडून राहतील–व तसें अलाहाबाद विद्यापीठाचे बाबतींत घडलें होतें–कारण यामुळें होणाऱ्या खर्चाचें ओझें झेपण्यासाठीं आर्थिक मदत देण्याची कांहींच योजना सरकारनें केली नव्हती.

(२) निवडणुकीचें तत्त्व सुरू केल्याबद्दल लोकांना बरें वाटलें, परंतु ज्यांचा विद्यापीठाशीं निकटचा संबंध येतो अशा कॉलेजच्या प्राध्यापकांनीं ही निवड करावी, इतरांनीं नव्हे, असें त्यांचें म्हणणें होतें.

(३) सिनेटची संख्या मर्यादित केली गेली, या नियमाला जरी लोकांचा विरोध नसला तरी, विश्वविद्यालयामध्यें युरोपियनांचें मताधिक्य असावें या हेतूनेंच हा नियम तयार करण्यांत आला असावा, अशी भीति लोकांना वाटली.

(४) कॉलेजें जोडून घेतांना लावण्यांत येणाऱ्या कडक नियमांनाही विरोध दर्शविण्यांत आला. लोकांनीं शिक्षण क्षेत्रांत जे प्रयत्न चालविले होते त्यांना प्रतिबंध करण्यासाठीं हे नियम केले, अशी लोकांची समज झाली. विश्वविद्यालयाच्या नवीन सिनेटमध्यें युरोपियन लोकांचें मताधिक्य होणार या कल्पनेनेंही वरील समज दुणावले.

(५) नवीन कायद्यानें विश्वविद्यालयाचे कारभारांत सरकारकडे अधिक अधिकार आले, या गोष्टीला सर्वांत जास्त विरोध झाला. या अधिकारांत फेलोज नेमणें, कॉलेज स्वीकृत करण्यास मंजूरी देणें, सिनेटनें केलेल्या नियमांत फेरफार करणें किंवा नवीन नियम करणें वगैरे बाबींचा समावेश करण्यांत आला होता. नवीन कायद्यानें विश्वविद्यालयें म्हणजे एक प्रकारचें सरकारचेंच खातें बनलें, असें लोकांना वाटलें.

५. १९०४ च्या विश्वविद्यालयीन कायद्याची फलश्रुति:—१९०२ ते १९०४ या काळांत विश्वविद्यालयाचे सुधारणेबाबत खडाजंगी माजून राहिली. सरकारी गोटांतील लोकांनीं १९०४ च्या हिंदी विश्वविद्यालयाचे कायद्यास फाजील महत्त्व दिलें. कॉलेजच्या शिक्षणामध्यें निर्माण झालेले सर्व दोष या कायद्यानें नाहींसे होतील, असा त्यांचा दावा होता. हिंदी लोकांनीं या कायद्याविषयीं आपला गैरसमज करून घेतल्यामुळें त्यांनीं या कायद्याला, तो प्रतिगामी आहे म्हणून, विरोध केला. खरें पाहतां हा कायदा सर्वस्वीं चांगलाही नव्हता व वाईटही नव्हता. त्या काळापासून आपण आज बरेच दूर आलों असल्यानें त्यामध्यें गुण काय होते व दोष काय होते, हें निःपक्षपातीपणानें आपणांस पाहतां येईल.

हा कायदा विश्वविद्यालयाचा कारभार सुधारावा, यासाठीं करण्यांत आला होता, ही गोष्ट आतांपर्यंत केलेल्या कायद्याचे विचारावरून सहज कळून येईल. विद्यालयांचा कारभार शिथिल झाला होता, तो सुधारणें हा या कायद्याचा हेतु होता व तो बहुंशीं साध्य झाला, असें म्हणावयास हरकत नाहीं. पूर्वीपेक्षां नवीन सिनेट अधिक सुटसुटीत व कार्यक्षम बनलें. सरकार वाटेल तशा नेमणुका करून आपलें बहुमत करील ही लोकांना वाटणारी भीति निराधार ठरली. यामुळें विद्यालयांचा कारभार सुधारण्यास या कायद्याची फार मदत झाली असें सर्वांना कबूल करणें भाग पडलें.

कॉलेजें स्वीकृत करण्याविषयीं जे कडक नियम केले त्यामुळें नवीन कॉलेजें अस्तित्वांत येण्यास अडचण उत्पन्न झाली, इतकेंच नव्हे तर, जीं

कॉलेजें कशीं तरी जीव धरून होतीं तीं मोडकळीस आलीं. एक गोष्ट मात्र लक्षांत ठेविली पाहिजे आणि ती ही कीं, या १९०४ च्या कायद्यानें कॉलेजच्या शिक्षणक्षेत्रांत उतरण्याची लोकांची धडाडी यत्किंचितही कमी झाली नाहीं. १९०४ नंतर नवीन कॉलेजांची संख्या कमी न होतां उलट वाढली. या कायद्यास विरोध करणारांनीं दर्शविलेली भीति अशा-रीतीनें फोल ठरली. इतकेंच नव्हे तर, उलट आपणास असें म्हणतां येईल कीं, कायदा तयार करणारांनीं कॉलेजचें शिक्षण सुधारण्याचें जें ध्येय आपल्यापुढें ठेविलें होतें, तें बहुतांशीं साध्य झालें, असें म्हणावयास हरकत नाहीं. नियमामुळेंच सर्व साध्य झालें असें आपणास म्हणतां येणार नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे. कॉलेजांतील विद्यार्थी वाढल्यामुळें फीचे उत्पन्नांत वाढ झाली, फीचे दरही वाढले, सरकारनेंही मुक्त हस्तानें मदत दिली आणि लोकांकडूनही मोठमोठ्या देणग्या मिळाल्या. या सर्व ग्रोष्टींचा कॉलेजें सुधारण्याकडे उपयोग झाला.

या कायद्यामुळें कोणत्या चांगल्या गोष्टी घडून आल्या हें आपण पाहिलें. काय व्हावयाचें राहिलें तें आपण आतां पाहूं. विश्वविद्यालयीन शिक्षणपद्धतीचा सांगोपांग विचार होऊन ती योग्य पायावर उभारली गेली नाहीं. अनेक ठिकाणीं विश्वविद्यालयाची गरज असतांहि नवीन विद्यालयें निर्माण झालीं नाहींत, आणि शेवटीं या कायद्यानें सरकारला एवढे अधिकार दिले कीं, कलकत्ता युनिव्हार्सिटी कमिशननें म्हटल्याप्रमाणें, जगांतील सर्व विश्वविद्यालयांमध्यें हिंदी विश्वविद्यालयें हीं पूर्णत्वानें सरकारी बनलीं.

६. माध्यमिक शिक्षण:—जें धोरण कॉलेजच्या शिक्षणाचे बाबतींत लॉर्ड कर्झन यांनीं स्वीकारलें, तेंच माध्यमिक शिक्षणाचे बाबतींतही स्वीकारलें गेलें. १९०२ पर्यंत जी विशेष परिस्थिति उच्च शिक्षणाचे बाबतींत दिसून आली, तीच माध्यमिक शिक्षणाचे बाबतींत दिसून आली. दोन्ही प्रकारच्या शिक्षकांमध्यें, १८८२ ते १९०२ या काळांत, वाढ दिसून

आली. हिंदी लोकांनीं चालविलेल्या संस्था, इतर सरकारी किंवा मिशनरी संस्थांचे मानानें, अधिक होत्या. बरींचशीं कॉलेजें ज्याप्रमाणें मुलांच्या फीवर अवलंबून राहाणारीं व शिक्षणाचीं केंद्रें बनण्याऐवजीं केवळ खाजगी शिक्षण देणारे वर्ग होऊन बसलीं होतीं, त्याचप्रमाणें बऱ्याच शाळांचीही असमाधानकारक स्थिति होती. यामुळें जें धोरण कॉलेजच्या बाबतींत स्वीकारण्यांत आलें, तेंच माध्यमिक शिक्षणाचे बाबतींतही अनुसरलें गेलें.

नवीन धोरणाचीं दोन अंगें होतीं–नियंत्रण आणि सुधारणा. खालील नियमांचे साधनांनीं नियंत्रण करण्याचें सरकारनें ठरविलें.

(अ) शिक्षण खात्याची मान्यता:—इं. ए. कमिशनचें असें मत होतें कीं सरकारी मदत कोणत्या अटीवर दिली जाईल, हें खात्यानें ठरवावें आणि जे शाळाचालक मदतीची याचना करतील त्यांना त्या अटीवर ती द्यावी. जे मागणी करणार नाहींत त्यांना आपल्या मताप्रमाणें शाळा चालविण्यास मोकळीक असावी. १८८२ ते १९०२ चे काळांत मदतीचे शाळांना मार्गदर्शक होतील असे बरेच नियम तयार झाले, परंतु मदत न घेणाऱ्या शाळांचे बाबतींत कांहींच व्यवस्था घडून आली नाहीं. १९०२ नंतर या धोरणांत बदल झाला व शाळा मदतीच्या असोत कीं बिनमदतीच्या असोत त्यांचें नियंत्रण झालें पाहिजे, असें ठराविण्यांत आलें. १९०४ चा सरकारी ठराव आपलें धोरण खालीलप्रमाणें व्यक्त करीत आहे.

" शाळा सरकारी असोत कीं खाजगी असोत, त्यांना सरकारी मदत असो किंवा नसो, त्यांमधून दिलें जाणारें शिक्षण चांगलें आहे कीं नाहीं हें पाहाण्याचें कर्तव्य सरकारचें आहे. एकादे ठिकाणीं माध्यमिक शाळेची जरूरी आहे किंवा कसें, ती चालविण्यासाठीं लोकांजवळ पुरेसा पैसा आहे किंवा नाहीं, तिचें व्यवस्थापक मंडळ–जर असें मंडळ असेल तर–योग्य प्रकारें बनविण्यांत आलें आहे काय, ती आपले विषय योग्य प्रकारें शिकविण्यास समर्थ आहे किंवा कसें, विषयाचें

शिक्षण, आरोग्य, खेळ व शिस्त शिकविण्यासाठीं तिनें जरूर ती तरतूद केली आहे काय, तिच्या जवळ पुरेसा सुशिक्षित, शीलवान असा शिक्षकवर्ग आहे किंवा नाहीं व जेणेंकरून शिक्षणाचा दर्जा कमी होईल अशी जवळच्या शाळाशीं घातकी स्पर्धा उत्पन्न करणारी कमी फी ठेवण्यांत आली आहे किंवा कसें, वगैरे गोष्टींची सरकारनें प्रथम खात्री करून घ्यावी. या अटीप्रमाणें सर्व व्यवस्था आहे, असें दिसून आल्यास, ती शाळा सरकारी नदतीसाठीं मान्य करण्यांत यावी व तिला आपले विद्यार्थी सरकारी शिष्यवृत्त्या मिळविण्यासाठीं परीक्षेस पाठविण्याची किंवा शिष्यवृत्त्या घेणाऱ्या मुलांना शाळेंत प्रवेश देण्याची परवानगी असावी. अशा शाळांना **सरकार-मान्य** म्हणून समजण्यांत यावें. "

(ब) विश्वविद्यालयाची मान्यता:-- ज्या शाळांना आपले विद्यार्थी विश्वविद्यालयाच्या मॅट्रिक्युलेशन परीक्षेसाठीं पाठवावयाचे असतील त्यांनीं त्या विश्वविद्यालयाकडूनही मान्यता मिळविणें जरूर होतें. नियंत्रणाचें हें प्रभावी साधन होतें, परंतु १९०४ पर्यंत या साधनाचा व्हावा तसा उपयोग झाला नाहीं. याविषयींचे नियम सदोष होते व त्या नियमांची अम्मलबजावणीही योग्य तऱ्हेनें होत नसे. विश्वविद्यालया-जवळ शाळांची प्रत्यक्ष पाहाणी करण्याचें कांहींही साधन नव्हतें, व त्यामुळें शाळांकडून जी माहिती पुरविली जाई, तीवरच विश्वविद्यालयास अवलंबून रहावें लागे. सरकारी शिक्षण खातें व विश्वविद्यालय यांचें क्षेत्र भिन्न असल्यानें व या दोन्हीकडूनही शाळांना मान्यता देण्यांत येत असल्यानें, या दोन्ही संस्थांमध्यें तेढ निर्माण होण्याचे प्रसंग येत असत. १९०४ च्या हिंदी विश्वविद्यालयाचे कायद्यानें सर्व विश्वविद्यालयांनीं शाळांना मान्यता देण्याचे बाबतींत नियम केले. या नियमामध्यें, माध्यमिक शाळांनीं कोणत्या अटींची परिपूर्तता करावयास पाहिजे, याची फोड केली. ज्या मार्गाल द्वारानें कोणताही खाजगी विद्यार्थी मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेस बसत असे, तें द्वार बंद करण्यांत आलें; मात्र लायक विद्यार्थ्यांना खाजगी रीत्या परीक्षेस बसतां येंत असे. त्याचप्रमाणें शिक्षणखातें व

विश्वविद्यालय यांमध्यें तेढ उत्पन्न न होईल असेही नियम करण्यांत आले.

(क) **मान्यतेपासून फायदे व मान्यतेच्या नियमांची सक्ति:**— मान्यतेसाठीं अवश्य त्या अटी केवळ जाहीर करून भागण्यासारखें नव्हतें. आपण सरकारी मान्यता मिळवावी अशी इच्छा शाळा चालकांचे मनांत निर्माण होईल, इतके फायदे त्या मान्यतेपासून मिळणें अवश्य होतें. त्याचप्रमाणें अटीप्रमाणें शाळांकडून वर्तणूक होते किंवा नाहीं, हें पाहण्याकरतां योग्य ते अधिकारी नेमण्याचीही जरुर होती. युनिव्हर्सिटीनें मान्यता दिली म्हणजे मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेस मुलें बसवितां येत असत. खात्याची मान्यता मिळाली म्हणजे (१) शाळा सरकारी मदत मिळण्यास पात्र होत असे; (२) शाळा आपलीं मुलें सरकारी परीक्षेस किंवा सरकारी धंदे शिक्षणाच्या प्रवेश परीक्षेस पाठवूं शकत असे; व (३) सरकारी शिष्यवृत्त्या घेणाऱ्या मुलांस ती शाळेंत प्रवेश देऊं शकत असे.

शाळांनीं सरकारकडून मान्यता मिळवावी व आपला शैक्षणिक दर्जा वाढवावा, यासाठीं सरकारांनीं मदत वाढविण्याचें ठरविलें. त्याचप्रमाणें शाळांकडून नियम पाळले जातात कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं अधिक अधिकारीही नेमिले गेले.

(ड) **अमान्य शाळेचीं मुलें मान्य शाळेंत घेण्यास प्रतिबंध:**— मान्यतेपासून फायदे कोणते आहेत, हें बारकाईनें पाहिल्यास असें दिसून येईल कीं, शाळा सरकारी मदतीसाठीं सरकारची मान्यता मिळवीत असत, व मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेस मुलांना बसतां यावें म्हणून विश्वविद्यालयाची मान्यता घेत असत. परंतु ज्यांना मदत नव्हती किंवा मिळण्याची आशा नव्हती किंवा ज्या शाळा मॅट्रिक्युलेशनपर्यंत शिक्षण देत नसत, त्या मान्यता मिळविण्याचा प्रयत्नच करीत नसत. अशा शाळांची संख्या मोठी असल्यानें त्या शाळा नियंत्रणाखालीं कशा आणतां येतील, हा प्रश्न होता. मान्य नसलेल्या शाळेंतील मुलें मान्यता मिळालेल्या शाळेंत

घेण्यास प्रतिबंध करणें हा एकच मार्ग होता व त्यायोगें वरील प्रश्न सुटत होता. या अडचणीमुळें मान्यतारहित शाळा नीट चालणें कठीण होऊन बसलें. केवळ फायदा पाहिजे असेल तरच मान्यता मिळवावी, असें नसून केवळ जगण्यासाठीं देखील शाळांना मान्यतेची जरूर भासूं लागली; व यायोगें सर्व माध्यमिक शाळा आपल्या प्रभावी नियंत्रणाखालीं सरकारास आणतां आल्या.

सर्व माध्यमिक शाळा सरकारी नियंत्रणाखालीं आणण्याच्या या प्रयत्नाबद्दल लोकांकडून सरकारवर टीका होऊं लागली. या प्रश्नाचा राजकीय स्वरूपाचा उहापोह येथें करण्याचें कारण नाहीं, परंतु शैक्षणिक दृष्ट्या देखील हें धोरण सर्वथैव समर्थनीय नव्हतें. शाळांना पूर्ण स्वातंत्र्य देण्याचें पूर्वीचें धोरण चुकीचें होतें, याबद्दल वाद नाहीं. या स्वातंत्र्याचा उपयोग मन मानेल त्याप्रमाणें लोक करूं लागले, ही गोष्टही खरी आहे व यामुळें अधिक सरकारी नियंत्रणाची जरूर होती. परंतु एक चूक सुधारण्याकरतां सरकारनें दुसरी चूक केली, असें पुष्कळांना वाटलें. योग्य प्रमाणांत नियंत्रण पाहिजे, याबद्दल वाद नव्हता; परंतु त्याचा अतिरेक झाला म्हणजे त्याचा परिणाम निर्जीव ठोकळेवजा शिक्षण पद्धति निर्माण करण्यामध्यें होतो; व ही वस्तुस्थिति पुढें निर्माण झालीही. कांहीं वेळां ही स्थिति निर्माण होण्यास पैशाचा व योग्य कार्यकर्त्या माणसांचा अभाव, हीं जरी कारणें असूं शकलीं, तरी फाजील नियंत्रण हेंच अधोगतीचें प्रबळ कारण आहे, असें लोकांना वाटूं लागलें.

लॉर्ड कर्झनच्या शैक्षणिक धोरणाचा दुसरा हेतु म्हणजे शिक्षणाचा दर्जा सुधारणें हा होता. तो साध्य करण्यासाठीं खालील गोष्टी करण्याचें ठरविण्यांत आलें.

(अ) सरकारी शाळा सुधारण्यासाठीं प्रांतिक सरकारास मोठ्या प्रमाणावर मदत देण्यांत आली. सरकारी शाळा सुधारल्या म्हणजे खाजगी शाळांना त्या मार्गदर्शक होतील, हा हेतु. त्याचप्रमाणें इमारती-

साठीं, वसतिगृहासाठीं, शिक्षण वर्गांचे पगाराचें प्रमाण सुधारून देण्यासाठीं व शाळेस लागणाऱ्या जरूर त्या सामानासाठीं अधिक रक्कम बाजूला काढून ठेवण्यांत आली.

(ब) सरकारी शाळेप्रमाणें खाजगी शाळांचा दर्जा वाढावा यासाठीं खाजगी शाळांना जादा मदत देण्यासाठीं अधिक रक्कम मंजूर करण्यांत आली.

(क) शिक्षकांना ट्रेनिंग देण्याच्या आवश्यकतेवर अधिक भर देऊन नवीन ट्रेनिंग संस्था निर्माण करण्यांत आल्या.

(ड) शालान्त परीक्षेचा अभ्यास बदलून तो अधिक उपयुक्त व व्यावहारिक बनविण्यांत आला.

(इ) मिडल् स्कूलमध्यें, म्हणजे माध्यमिक शाळेच्या खालच्या वर्गांतून, मातृभाषा हें शिक्षणाचें माध्यम सररहा उपयोगांत आणावें; त्याचप्रमाणें इंग्रजी विषयाची अधिक चांगली तयारी या वर्गांतून करून घेण्यांत यावी, म्हणजे वरच्या वर्गांतून इंग्रजी हें माध्यम म्हणून स्वीकारण्यास अडचण पडणार नाहीं.

(एफ) माध्यमिक शाळांवर उत्तमप्रकारें देखरेख व्हावी यासाठीं अधिक इन्स्पेक्टर नेमिले, त्यांना चांगले पगार देण्यांत आले व ते अधिक कार्यक्षम होतील असे प्रयत्न करण्यांत आले. कर्झनसाहेबांचे कारकीर्दीनंतरही हें धोरण चालूं ठेवण्यांत आलें. त्याविषयीं अधिक परीक्षण पुढील प्रकरणांत आपण करूं.

७. प्राथमिक शिक्षण:—उच्च शिक्षण व माध्यमिक शिक्षण याबाबतींत लॉर्ड कर्झन यांनीं जें धोरण स्वीकारलें होतें, त्याला लोकांनीं जोराचा विरोध केला, हें आपण पाहिलें आहे. परंतु प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत त्यांनीं अंगिकारिलेल्या धोरणाचा स्वीकार मोठ्या प्रमाणांत झाला. सातव्या प्रकरणांत दाखविल्याप्रमाणें, पैशाच्या अभावीं

प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होऊं शकला नाहीं. लॉर्ड कर्झन साहेबांनीं रोगाचें निदान बरोबर करून' प्रांतिक सरकारांना अधिक प्रमाणांत प्राथमिक शिक्षणावर खर्च करण्यास सूचना दिल्या. ११ मार्च १९०४ च्या शैक्षणिक धोरणासंबंधीचे ठरावांत त्यांनीं खालील विचार मांडले आहेत.

" १८, सर्वसाधारण विचार करतां असें दिसून येतें कीं आजपर्यंत प्राथमिक शिक्षणाची बरीच हेळसांड झाली असून त्याला योग्य तो पैशाचा पुरवठा झाला नाहीं. मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार या दोघांनीं प्राथमिक शिक्षणाचे प्रश्नाकडे लक्ष दिलें पाहिजे. ज्या प्रांतांत हें शिक्षण मागासलें आहे, त्याठिकाणीं तर त्याला अधिक प्रोत्साहन मिळालें पाहिजे. मध्यवर्ती सरकारचे या धोरणास प्रांतिक सरकारचा पूर्ण पाठिंबा राहील असा विश्वास वाटतो व प्रत्येक प्रांतांत आर्थिक स्थितीचे मानानें जेवढे प्रयत्न होणें शक्य आहे तेवढे प्रयत्न होतील, अशी आशा वाटते."

प्राथमिक शिक्षण क्षेत्रांत या धोरणानें एक प्रकारची क्रांति निर्माण झाली. प्राथमिक शिक्षणासाठीं सरकारी मदत अधिक प्रमाणांत होऊं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, ज्या इतर साधनांनीं प्राथमिक शिक्षणावर खर्च होत होता, त्यांचेंहीं पर्यायानें खर्च वाढला. प्राथमिक शाळांतून मुलांची संख्या वाढली. १८८१-२, १९०१-२ व १९११-१२ सालांतील आंकड्यावरून ही कल्पना सहज येईल.

	१८८१–२	१९०१–२	१९११–१२
१ सरकारी मान्य शाळा	८२,९१६	९३,६०४	१,१८,२६२
२ वरील शाळांतून मुलांची संख्या	२०,६१,५४१	३०,७६,६७१	४८,०६,७३६

सूचना:–या आकड्यामध्यें ब्रह्मदेशाचे आकडे नाहींत. कांहीं संस्थानचे आकडे मात्र आहेत.

यावरून असें दिसून येईल कीं १८८२ च्या इंडियन एज्यू. कमिशनचे रिपोर्टानंतरचे वीस वर्षांचे काळांत जेवढी प्राथमिक शाळांची वाढ झाली, त्याचे दुप्पट १९०१–२ ते १९११–२ पर्यंतच्या १० वर्षांचे काळांत झाली.

(ब) लॉर्ड कर्झन यांनीं दुसरा महत्त्वाचा बदल घडवून आणिला तो हा कीं, परीक्षांचे निकालावर जी मदत देण्यांत येत असे, ती पद्धत बंद केली. १८८२ ते १९०२ पर्यंत हें धोरण प्राथमिक शाळांना मदत देण्याचे बाबतींत स्वीकारण्यांत आलें होतें. मद्रास व मुंबई या ठिकाणच्या चांगल्या शाळांना ठराविक मदत दिली जात असे. परंतु अशा शाळा फारच थोड्या होत्या. बंगालमध्यें बहुतेक मदत परीक्षांचें निकालावर दिली जात असे. संयुक्त प्रांत, पंजाब, मध्यप्रांत आणि आसाम या प्रांतांतून शाळांना देण्यांत येणाऱ्या मदतीमध्यें परीक्षांचे निकालावर मिळणारी ग्रँट कांहीं प्रमाणांत दिली जात असे. लॉर्ड कर्झननीं परीक्षांचे निकालावर मदत देण्याचें धोरण बंद करून त्याऐवजीं अधिक शास्त्रीय व सुधारलेल्या पद्धतीनें मदत देण्याच सुरू केलें.

त्याचप्रमाणें माध्यमिक शाळेंतील शिक्षणाप्रमाणें प्राथमिक शाळेंतील शिक्षण सुधारण्याचा लॉर्ड कर्झन यांनीं प्रयत्न केला. या बाबतींत खालील गोष्टींचा अवलंब केला.

(१) लोकल फंडाला द्यावयाची मदत वाढविली. इंडियन एज्यू. कमिशननें खर्चाचे $\frac{1}{3}$ सरकारी मदत देण्याचें ठरविलें होतें. लॉर्ड कर्झन यांनीं ही मदत $\frac{1}{2}$ केली. या जादा मदतीचा उपयोग शिक्षणाचा प्रसार व दर्जा वाढविण्याकरतां व्हावा, हा उद्देश होता.

(२) प्राथमिक शिक्षकांना जास्त प्रमाणांत ट्रेनिंग मिळूं लागलें व त्यांच्या पगाराचें प्रमाण सुधारलें.

(३) परिस्थितीप्रमाणें अभ्यासक्रम असावा म्हणून शहरांतील शाळांचा व खेड्यांतील शाळांचा अभ्यासक्रम वेगळा ठेवण्यांत यावा, अशी इच्छा त्यांनीं व्यक्त केली.

(४) विद्यार्थ्यांना शिक्षण अधिक आकर्षक होईल व पालकांना तें आवडेल, अशासाठीं शिक्षण-पद्धति सुधारण्याचे प्रयत्न करण्यांत आले.

८. धंदेशिक्षण:--उद्योगधंद्याचे क्षेत्रामध्यें लॉर्ड कर्झन यांनीं चांगली कामगिरी बजाविली. कला शाळांची सुधारणा, शेतकी शिक्षणाची वाढ त्यांनीं केली आणि परदेशांत जाऊन उद्योगधंद्याचें उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावें म्हणून शिष्यवृत्त्या ठेविल्या. १८९३ पासून कला शाळांचे भवितव्याविषयीं लोकांमध्यें विचार सुरू झाले होते. हिंदी कला व धंदे वाढीस लावण्याचें कार्य या शाळांकडून न झाल्यामुळें त्या बंद करण्यांत याव्यात, असें एका पक्षाचें म्हणणें होतें. दुसऱ्या पक्षाचे मतें या शाळा बंद न करतां त्यांत योग्य त्या सुधारणा कराव्या, असें होतें. हा वाद लॉर्ड कर्झन यांनीं मिटवून टाकला व शाळांमध्यें योग्य त्या सुधारणा घडवून आणून त्या चालू ठेवाव्यात असें ठरविलें.

लॉर्ड कर्झनचे कारकीर्दीपूर्वी शेतकी शिक्षणाची वाढ झाली नव्हती. कांहीं ठिकाणीं शेतकी कॉलेजें स्थापण्यांत आलीं होतीं, परंतु त्यानें फारसें कार्य झालें नव्हतें. शेतकी शास्त्राचे तज्ज्ञ किंवा कर्तबगार शेतकरी व्हावे तसे निर्माण झाले नाहींत. या बाबतींत एक नवीन व धडाडीचें धोरण त्यांनीं अंगिकारिलें. **पहिली गोष्ट:**--त्यांच्या कारकीर्दींतच शेतकी खात्याची स्थापना झाली. व उच्च प्रकारचें शेती-शिक्षण देणारी पुसा येथील मध्यवर्ती संशोधन संस्था अस्तित्वांत आली. **दुसरी गोष्ट:**--हिंदुस्थानच्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रांतामध्यें एक एक शेतकी कॉलेज असावयास पाहिजे व त्या कॉलेजास लागणारें साहित्य व लोक पुरविले जावेत, असें त्यांनीं ठरविलें. **तिसरी गोष्ट:**--माध्यमिक शाळा व मिडलस्कूल यामध्यें

शेतकी शिक्षण ठेवून शेतकऱ्यांना ट्रेनिंग देण्यासाठीं स्वतंत्र वर्ग चालवून शेतकी शिक्षणाचा प्रसार करावा, असें सुचविण्यांत आलें.

लॉर्ड कर्झनचें तिसरें साध्य म्हणजे उद्योगधंद्याचे शिक्षणासाठीं परदेशास जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरतां शिष्यवृत्त्या ठेवणें. यांत्रिक शिक्षणाची जरूर बरेच दिवस भासत होती. परंतु हें शिक्षण घेण्यास तयार असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या इतकी अपुरी होती कीं, त्यांच्यासाठीं हिंदुस्थानांत संस्था चालविणें कठीण होतें. यासाठीं शिष्यवृत्त्या देण्याचें ठरवून या विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय परदेशांत करण्याचें ठरविलें. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याचे वाढीस ज्या शिक्षणाचा उपयोग होईल असेच शिक्षणक्रम निवडण्यांत आले.

९. **लॉर्ड कर्झन यांनीं हिंदी शिक्षणक्षेत्रांत केलेलें कार्य:—** कर्झन हे आपल्या हयातींत अत्यंत नावडते होते. सर्वसाधारण लोकांचा समज असा कीं, त्यांनीं हिंदुस्थानच्या शिक्षणाचें नुकसान केल. त्यांच्या काळीं जे वादविवाद माजून राहिले होते ते आज संपले आहेत व आज त्यांनीं केलेल्या कामगिरीचें निःपक्षपातीपणानें अवलोकन करणें शक्य आहे.

त्यावेळचे वाद हे प्रामुख्यानें राजकीय होते व अंशतः शैक्षणिक होते. कर्झन साहेबांचें व्यक्तिमत्त्व आणि हिंदुस्थानविषयींचा त्यांचा दृष्टिकोन असा होता कीं त्यायोगें ते लोकप्रिय होण्यासारखे नव्हते. आपल्या कारकीर्दीस सुरवात करतांच त्यांनीं हिंदुस्थानविषयक जें वक्तव्य केलें, त्यावरून त्यांनीं लोकांची सहानुभूति गमाविली. शिक्षणविषयक सुधारणा करतांना हिंदी पुढाऱ्यांना विश्वासांत घेण्याचें नाकारल्यामुळें, लोकांचें प्रेम ते संपादूं शकले नाहींत; व या कारणामुळें त्यांचे कार्यास लोकांकडून विरोध झाला.

परंतु आजच्या भूमिकेवरून लॉर्ड कर्झनचे कारकीर्दीकडे पाहिलें तर, त्यांनीं हिंदी शिक्षणाचे बाबतींत मोठी कामगिरी केली, असें

म्हटल्याविना रहावत नाहीं. त्यांनीं जे नियम केले, त्यायोगें लोकांचे शिक्षणविषयक खाजगी प्रयत्नास कोणतीच अडचण झाली नाहीं किंवा शिक्षण-प्रसार थांबला नाहीं, ही गोष्ट भावी काळानें सिद्ध केली आहे. उलट, विश्वविद्यालयाचा कारभार सुधारला, माध्यामिक शिक्षणास वरिष्ट दर्जा प्राप्त झाला, प्राथमिक शिक्षणाचा जोरानें प्रसार झाला व धंदेशिक्षणाची सर्व बाजूंनीं उन्नति झाली. लॉर्ड कर्झनबद्दल असें म्हणतां येईल कीं, त्यानें शिक्षणाचे प्रत्येक अंगाचा विचार केला व त्याची सुधारणा केली. हिंदी शिक्षणाशीं ज्यांचा निकटचा संबंध आला असे तीन गव्हर्नर जनरल होऊन गेले, बेंटिंक, रिपन आणि कर्झन. यांपैकीं बेंटिंक आणि रिपन यांची कारकीर्द अशा वेळीं सुरू झाली कीं, त्यावेळीं शिक्षणाला नुकताच कोठें प्रारंभ झाला होता व सरकार शिक्षणाचे बाबतींत जे प्रयत्न करीत होते त्यांतील बरेंवाईट हिंदी नागरिक पाहूं शकत नव्हते. लॉर्ड कर्झनची परिस्थिति मात्र अगदीं भिन्न होती. सरकारचें प्रत्येक कार्य डोळ्यांत तेल घालून पाहावयाला लोक शिकले होते व जे दोष त्यांना दिसले ते उघड बोलून दाखवूं लागले. अशा विरोधी परिस्थितींत राहूनही लॉर्ड कर्झन यांनीं यश मिळविलें हें निर्विवाद आहे. ज्या पद्धतीनें त्यांनीं इतर कार्य केलें त्यांत चुका झाल्या असतील. परंतु हिंदी शिक्षणाचे बाबतींत त्यांनीं मोठी कामगिरी बजाविली आहे व त्यांची कारकीर्द म्हणजे हिंदी शिक्षणाचे इतिहासांतील एक महत्त्वाचा काल आहे, हें नाकारून चालणार नाहीं.

प्रकरण नववें

द्विदल राज्यपद्धतीचा प्रारंभ

लॉर्ड कर्झन यांची कारकीर्द संपल्यापासून व शिक्षणखातें हिंदी मंत्र्यांकडे जाईपर्यंतच्या काळांत शैक्षणिक क्षेत्रांत विशेष घडामोडी झाल्या नाहींत. लॉर्ड कर्झननें घालून दिलेल्या धोपट मार्गानें प्रांतिक सरकारांनीं आपला गाडा चालविला. त्यांनीं केलेलें कार्य उच्च शिक्षण, माध्यमिक शिक्षण व प्राथमिक शिक्षण या तीन क्षेत्रांत आपणांस मोजतां येईल.

२. विश्वविद्यालयीन व कॉलेजचें शिक्षण:—१९०४ पंजाब विश्वविद्यालयाशिवाय कोणत्याही विश्वविद्यालयास मदत दिली जात नसे. पंजाबमध्यें प्राच्य महाविद्यालय व कायद्याचें महाविद्यालय चालविण्यांत येत असल्यानें, त्या विद्यापीठास तीस हजारांची मदत दिली जात असे. विश्वविद्यालयाचा खर्च ऑफिस चालविणें व परीक्षा घेणें एवढ्यापुरतांच मर्यादित असल्यानें, त्यांना मदतीची फारशी जरूरही भासली नाहीं. सिनेटची सभा होई, त्यास फेलो स्वतःचे खर्चानें येत. यामुळें फीच्या उत्पन्नांतून सर्व खर्च भागत असे. कधीं कधीं पैसा शिल्लकही राही.

१९०४ च्या कायद्यानें परिस्थिति बदलली. सिनेटच्या व सिंडिकेटच्या सभा वारंवार भरूं लागल्या. विश्वविद्यालयास जोडून घेतलेल्या कॉलेजांची तपासणी नियमानें होऊं लागली. कायदे व नियम यांनीं आखून दिल्याप्रमाणें कार्य उरकण्यास, जादा अधिकाऱ्यांना नेमणें भाग पडलें. या सर्व कारणामुळें अधिक खर्च येऊं लागला व ही गोष्ट नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनीं आपले बिलावर केलेल्या भाषणांत सूचित केली होती. मध्यवर्ती सरकारनें विश्वविद्यालयाचे व कॉलेजांचे सुधारणेसाठीं पांच वर्षां-

करतां म्हणून पांच लाखाची मदत देण्याचें जाहीर केलें. पहिली मदत लॉर्ड कर्झन यांनीं १९०४–५ सालीं मंजूर केली. ही मदत पांच वर्षें द्यावयाची म्हणून ठरलें असलें तरी, ती पुढें कायम देण्याचें ठरविण्यांत आलें. हें धोरण पुढेंहो अनुसरण्यांत आलें. विश्वविद्यालयांना प्रत्यक्ष शिक्षणाचें काम हातीं घेण्यास व पुस्तकालयास आणि प्रयोगशाळा सज-विण्यास यायोगें मदत झाली.

(ब) २१ फेब्रुवारी १९१३ चा शैक्षणिक धोरणाविषयींचा सरकारी ठराव:—विसाव्या शतकांतील पहिली वीस वर्षांतील एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे विश्वविद्यालयीन शिक्षणयोजनेमध्यें सुधारणा ही होय. १९०३–१२ हा काळ ब्रिटिश विश्वविद्यालयांचे इतिहासांत महत्त्वाचा आहे. या काळांत इंग्लंडमध्यें विश्वविद्यालयाच्या घटनेसंबंधीं महत्त्वाचे प्रश्न चर्चिले गेले. विद्वानांचे मतें असें ठरलें कीं विश्वविद्यालयाचें संयुक्त (Federal) स्वरूप असणें समाधानकारक नाहीं, कारण त्यायोगें कोणतेंच काम नीट होत नाहीं, प्रगति थांबते. १९१३ मध्यें विश्वविद्यालयाचें हें स्वरूप नष्ट झालें व बहुतेक ब्रिटिश विश्वविद्यालयें स्वयंपूर्ण (Unitary) व वसतिगृहाची जोड असणाऱ्या अशा पुनर्घटित झाल्या.

या सुधारणांचा प्रतिध्वनि हिंदुस्थानांत उमटला आणि सरकारला १९०४ च्या विश्वविद्यालयाच्या कायद्यानंतरचा १० वर्षांच्या काळांतच या सुधारणांचा विचार करणें भाग पडलें. १९१३ मध्यें खालीलप्रमाणें शिक्षण धोरण निश्चित करणारा सरकारी ठराव पास झाला. प्रत्येक प्रांताकरतां एक विश्वविद्यालय स्थापण्यांत यावें, विद्यालयानें प्रत्यक्ष शिक्षणाचें कार्य हातीं द्यावें व शहरापासून दूर असणाऱ्या कॉलेजांमध्यें योग्य ती वाढ करण्यांत येऊन त्यांचीं विश्वविद्यालयें ठराविक वेळांत बनवावींत. परंतु या धोरणाप्रमाणें सरकारनें कार्य हातीं घेतलें नाहीं. या

प्रश्नांचा पुनःविचार तज्ज्ञांकडून होणें जरूर आहे असें अधिकाऱ्यांना वाटलें, हें एक कारण; व दुसरें कारण, महायुद्धाची सुरवात.

(क) कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशनः—१९१७ सालीं सरकारनें कलकत्ता विश्वविद्यालयाचे बाबतींत रिपोर्ट करण्यासाठीं एक समिति नेमिली. या कमिटीचे प्रमुख डॉ. (आतां सर) एम्. ई. सॅडलर, लीडस युव्हर्सिटीचे उपकुलगुरु, असल्यानें या कमिशनला **सॅडलर कमिशन** असेंही म्हणतात. या कमिशनचे दुसरे सभासद डॉ. ग्रेगरी, सर फिलिप हारटॉग, प्रो. रॅम्से मूर, सर अशुतोष मुकरजी, बंगालचे डी. पी. आय., आणि डॉ. (आतां सर) झियाउद्दीन अहमद, हे होते. कलकत्ता विश्वविद्यालयाची सद्यःस्थिति पाहून पुढील रूपरेषा ठरविणें व हें साध्य होण्यासाठीं ज्या अडचणी उत्पन्न होतील त्या दूर करण्याचे मार्ग सुचविणें, एवढें कार्य या कमिशनकडे सोंपाविण्यांत आलें होतें. हें कार्यव्य वास्थितरीतीनें पार पाडतां यावें यासाठीं कलकत्त्याशिवाय इतर हिंदी विश्वविद्यालयांच्या घटनेचा तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करावा, असेंहि सुचविण्यांत आलें होतें. तुलनात्मक दृष्टीनें अभ्यास करण्याची जरूर कमिशनलाही वाटली व त्यांनीं इतर विद्यालयांचें कामकाज पाहण्यासाठीं त्यांना भेटी दिल्या.

या कमिशननें आपला अहवाल १९१९ सालीं प्रसिद्ध केला. या अहवालास आंतरप्रांतीय महत्त्व प्राप्त झालें आहे. हा अहवाल कलकत्ता विश्वविद्यालयापुरतां जरी विचार करीत असला तरी त्यामध्यें उत्पन्न झालेल्या प्रश्नांशीं इतर विश्वविद्यालयांचाही संबंध येतो; व म्हणून हिंदी विश्वविद्यालयीन शिक्षणावर या अहवालाचे दूरगामी परिणाम झाले आहेत.

कमिशननें केलेल्या मुख्य शिफारशी खालीलप्रमाणें आहेत.

(I) १८८२ व १९०२ च्या कमिशनांना उच्च शिक्षणाचे प्रश्नांकडे जेवढें लक्ष द्यावयास पाहिजे होतें, तेवढें लक्ष पुरवितां आलें नाहीं. कारण, १८८२ च्या कमिशनकडे उच्च शिक्षणाचा प्रश्नच

सोंपविला नव्हता व १९०२ च्या दुसऱ्या कमिशनचे कक्षेमधून माध्यमिक शिक्षणाचा प्रश्न वगळला होता. कलकत्ता विश्वविद्यालयानें मात्र माध्यमिक शिक्षणाचा तसाच उच्च शिक्षणाचा पूर्णत्त्वानें विचार केला, कारण त्यांच्यामतें माध्यमिक शिक्षणाची सुधारणा केल्याशिवाय उच्च शिक्षणाचे बाबतींत सुधारणा घडवून आणणें अशक्य होतें. कमिशननें या कारणास्तव माध्यमिक शिक्षणाचें पुनरुज्जीवन व्हावें म्हणून कांहीं महत्त्वाच्या सूचना केल्या. त्या खालीलप्रमाणें आहेत.

(१) माध्यमिक शाळा व उच्च शिक्षणाची कॉलेजें यांत विभागणारी रेषा मारावयाची झाल्यास ती मॅट्रिक्युलेशन परीक्षेनंतर न मारतां इंटरमिजीएट परीक्षेनंतर मारावी लागेल.

(२) यासाठीं सरकारनें यापुढें 'इंटरमिजीएट कॉलेजेस' म्हणजे सध्यांच्या माध्यमिक शाळा व उच्च शिक्षणाचीं कॉलेजें यांमध्यें मोडणारीं द्वय्यम कॉलेजें—निर्माण करावींत. या कॉलेजांतून सांस्कृतिक (Arts), शास्त्र, वैद्यकीय, स्थापत्य व अध्यापन वगैरेचें शिक्षण दिलें जावें. या संस्था स्वतंत्र म्हणून चालविण्यांत याव्यात किंवा कांहीं निवडक माध्यमिक शाळांना जोडण्यांत याव्यात.

(३) या इंटरमिजिएट कॉलेजच्या परीक्षा पास झाल्यावर विद्यार्थ्यांना उच्च कॉलेजांत प्रवेश मिळेल.

(४) सरकार, विश्वविद्यालय, इंटरमिजिएट कॉलेजेस व माध्यमिक शाळा यांच्या प्रतिनिधींचें एक बोर्ड—सेकंडरी व इंटरमिजिएट एज्यूकेशन बोर्ड—नेमण्यांत यावें, व त्या बोर्डाकडे माध्यमिक शिक्षणाचा प्रश्न सोंपवावा.

(II) कलकत्ता विश्वविद्यालयामध्यें एवढ्या कॉलेजांचा व विद्यार्थ्यांचा समावेश होतो कीं एकुलत्या एका संस्थेला एवढा भार वाहणें कठीण जातें. यासाठीं कमिशननें सुचविलें कीं—

(१) ढाक्का एथें शिक्षण देणारें एक स्वतंत्र विश्वविद्यालय स्थापण्यांत यावें.

(२) कलकत्ता विश्वविद्यालयामध्यें शिक्षण देण्याचें कार्य सुरू व्हावें. यासाठीं कलकत्त्यांत असलेली अध्यापनविषयक सर्व साधनसामुग्री एकत्र करण्यांत यावी.

(३) मुख्य शहरापासून दूर असणाऱ्या कॉलेजांची वाढ करून हळू हळू त्यांचें रूपांतर स्वतंत्र अशा विश्वविद्यालयामध्यें करण्यांत यावें व त्या ठिकाणीं कांहीं विषयांचें शिक्षण देण्यांत यावें.

पहिल्या शिफारशीप्रमाणें १९२० सालीं गोष्टी घडल्या. दुसरी व तिसरी शिफारस अजून सत्य सृष्टींत उतरवितां आली नाहीं.

(IIi) उच्च शिक्षणाविषयीं कमिशननें सर्वसाधारण खालील सूचना केल्या आहेत.

(१) विश्वविद्यालयाचे बाबतींत केलेले नियम सैल करण्यांत यावेत.

(२) परीक्षेचा अभ्यासक्रम एकाच स्वरूपाचा आहे. यापुढें साधारण मुलांसाठीं साधा व हुशार मुलांसोठीं 'ऑनर्स' असे दोन वेगवेगळे अभ्यास क्रम ठेवण्यांत यावेत. यायोगें हुषार मुलांची सोय केल्यासारखें होणार आहे.

(३) इंटरमिजिएट कॉलेजनंतर 'पदवी' परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करावा.

(४) प्रोफेसर किंवा रीडर यांची नेमणूक करण्यासाठीं, बाहेरचे तज्ज्ञ धरून, एक ' स्वतंत्र निवडणूक मंडळ ' नेमण्यांत यावें.

(५) मुसलमान समाज हा विद्येंत मागासलेला असल्यानें या समाजांतील विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यांत यावें व त्यांचे हिताची जपणूक करावी.

(६) आरोग्य व शारीरिक स्वास्थ्याकडे लक्ष देण्याची जरूर जास्त भासत असल्यानें प्रत्येक विश्वविद्यालयामध्यें शारीरिक शिक्षणाचा शास्ता (डायरेक्टर) नेमण्यांत यावा व त्याचा दर्जा प्रोफेसराचे दर्जासारखा असावा. विद्यार्थ्यांचे सुस्थितीकडे पाहणारें एक मंडळ असावें व त्यावर कांहीं डॉक्टरांची निवड व्हावी. या मंडळानें विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाची वेळोवेळीं पाहाणी करावी.

(IV) दुसऱ्या कांहीं सर्वसाधारण प्रश्नांनंतर कमिशननें खालील-प्रमाणें शिफारशी केल्या आहेत.

(१) **स्त्री-शिक्षणः**—ज्या मुलांचे पालक मुलींना १६, किंवा १७ वर्षेपर्यंत शिक्षण देण्यास तयार असतील अशा हिंदु व मुस्लीम मुलींकरतां पडद्या-शाळा स्थापण्यांत याव्यात. स्त्री-शिक्षणासाठीं स्वतंत्र बोर्ड निवडण्यांत यावें व त्यानें स्त्रियांना उपयुक्त होईल असा, स्त्रियांसाठीं वेगळा अभ्यासक्रम कोणता असावा, हें ठरवावें. स्त्रियांच्या कॉलेजांतून, सहकारी तत्त्वाचा अवलंब करून, अध्यापनकलेचें व वैद्यकीय ज्ञान देण्याची व्यवस्था करावी.

(२) **शिक्षकांचें ट्रेनिंगः**—ट्रेन्ड शिक्षकांची संख्या वाढावयास पाहिजे यासाठीं कलकत्ता व डाक्का विश्वविद्यालयांमध्यें स्वतंत्र 'अध्यापन विभाग' स्थापण्यांत यावेत; त्याचप्रमाणें इंटरमिजिएट व बी. ए. परीक्षेसाठीं 'अध्यापन' हा विषय ठेवण्यांत यावा.

(३) **उद्योगधंद्याचें शिक्षणः**—देशाची औद्योगिक उन्नति होण्यासाठीं लागणाऱ्या कारागिरांची पैदास व्हावी यासाठीं, विश्वविद्यालयांनीं उद्योगधंद्याचें शिक्षणाची सोय करावी.

(ड) **नवीन विश्वविद्यालयांची स्थापनाः**—१८८७ सालीं अलाहाबाद विश्वविद्यालय स्थापन झालें. त्यानंतर १९१६ पर्यंत हिंदुस्थानांत एकही नवीन विश्वविद्यालय स्थापन झालें नाहीं. या तीस वर्षांत कॉलेजांची व त्यांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच वाढली

होती. व म्हणून (थोडा उशीर झाला असला तरी) नवीन विश्वविद्यालयें स्थापन व्हावींत म्हणून जो सरकारनें निर्णय घेतला तो वाजवीच होता. खरें पाहातां हा निर्णय या पूर्वीच घ्यावयास पाहिजे होता. या निर्णयास जनतेचेही पाठबळ होतें. शिक्षण देणारीं व वसतिगृहाचीं जोड असणारीं विश्वविद्यालयें आज पाहिजे आहेत, असें लोक बोलूं लागले. याचा परिणाम असा झाला कीं, १९१६ मध्यें जीं पांच विश्वविद्यालयें होतीं त्याचीं १९२१–२२ सालीं बारा झालीं. नवीन विश्वविद्यालयांसंबंधीं खालीं थोडक्यांत माहिती दिली आहे.

(१) **म्हैसूरः**— स्वीकारी स्वरूपाचें (affiliating) विश्वविद्यालय १९१६ मध्यें संस्थानापुरतें स्थापन करण्यांत आलें; या योगें मद्रास विश्वविद्यालयावर पडणारा कामाचा बोजा कमी झाला.

(२) **पाटणाः**—बिहार–ओरिसा प्रांतामध्यें पाटणा येथें १९१७ सालीं विश्वविद्यालय स्थापन झालें. इतर विश्वविद्यालयासारखीच या विश्वविद्यालयाची रचना होती; परंतु १९०४ च्या विश्वविद्यालयापासून तें थोडें भिन्न होतें. ही भिन्नता सरकारास, लोकमतास मान देऊन, निर्माण करावी लागली.

(३) **बनारसः**—१९१५ च्या कायद्यानें अध्यापि (Teaching) व वसतिगृहांची सोय असणारें विश्वविद्यालय बनारस येथें आस्तित्वांत आलें व प्रत्यक्ष कार्यास १९१७ पासून सुरवात झाली. हें विद्यालय बनारस हिंदु युनिव्हर्सिटी या नांवानें ओळखिलें जातें. तिचें आस्तित्वास **पंडित मदन मोहन मालवीय** यांचे श्रम कारणीभूत झाले आहेत.

(४) **अलिगड**—वरील प्रमाणें उद्देश असणारें मुस्लीम विश्वविद्यालय अलिगड येथें १९२० सालीं स्थापन झालें. बनारस विश्वविद्यालयाचा जो हिंदूंशीं संबंध आहे, तोच अलिगड विद्यालयाचा मुस्लीमांशीं आहे. हें विश्वविद्यालय अलिगड येथें काम करीत असलेल्या अँग्लो ओरिएंटल–

कॉलेज या संस्थेंतून उदयास आलें आहे. सर सय्यद अहमद यांच्या महान् उद्योगाचें अलिगड विद्यालय हें जीवंत स्मारक आहे.

हीं दोन्हीं विश्वविद्यालयें मध्यवर्ती सरकारच्या नियंत्रणाखालीं आहेत. या दोन्ही संस्था हिंदु व मुस्लीम नांवानें ओळखल्या जात असल्या तरी, त्यांमध्यें सर्व जातीचे विद्यार्थी घेण्यांत येतात.

(५) **डाक्का:**—१९२० सालीं डाक्का येथें स्वतंत्र, अध्यापि व वसतिगृहाची जोड असणारें विश्वविद्यालय स्थापन झालें. कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशनचे सूचनेप्रमाणें अस्तित्वांत येणारें हें पहिलें विद्यालय होय.

(६) **लखनौ:**—लखनौ येथें १९२० मध्यें विश्वविद्यालय स्थापन झालें. डाक्का विद्यालयाप्रमाणेंच या विद्यालयाची घटना होती.

(७) **उस्मानिया:**—हैद्राबाद (दाक्षिण) येथें १९१८ सालीं निजाम साहेबांनीं विश्वविद्यालयाची स्थापना केली. हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयांमध्यें या विद्यालयाचें एक वैशिष्ट्य आहे व तें हें कीं या ठिकाणीं शिक्षणाचें माध्यम इंग्रजी नसून उर्दू आहे.

वर उल्लेखिलेल्या सात विश्वविद्यालयांशिवाय सरकारनें अलाहाबादचें विद्यालय, १९२१ च्या डाक्का विद्यालयाचे नमुन्याप्रमाणें, पुनर्घटित केलें. या विद्यालयाचें अध्यापि स्वरूप असून त्यास जोडून वसतिगृहाचीही सोय होती. त्याचप्रमाणें संयुक्त प्रांत, मध्यप्रांत, मध्य हिंदुस्थान व राजपुताना येथील कॉलेजांना जोडून घेण्याचीही व्यवस्था केली होती.

(ई) विश्वविद्यालयांनीं केलेलें अध्यापनाचें कार्य (१९०५–२१) सरकारकडून चांगली मदत मिळाल्यामुळें व इतर साधनांनींही ती मिळूं लागल्यानें, विश्वविद्यालयांना इमारती बांधतां आल्या, पुस्तकालयें विस्तृत करतां आलीं, प्रयोगशाळा सुधारतां आल्या व प्रत्यक्ष शिकविण्याचें कामही हातीं घेतां आलें. १९२१ सालीं जीं १२ विद्यापीठें होतीं, त्यांपैकीं

पांच अध्यापि स्वरूपाचीं होतीं. अलाहाबाद विद्यापीठ, मागें सांगितल्याप्रमाणें, अध्यापि व स्वीकारी विद्यालय होतें. बाकी राहिलेलीं सहा मुख्यतः स्वीकारी होतीं. शिकाविण्याचें काम फारच थोडें केलें जात असे.

स्वीकारी विश्वविद्यालयानें जें शिकाविण्याचें कार्य हातीं घेतलें, त्याचें स्वरूप खालीलपैकीं एक किंवा अनेक प्रकारचें होतें.

(अ) हिंदुस्थानच्या इतर भागांतून किंवा परदेशांतून आमंत्रित ख्यातनाम विद्वानांकडून व्याख्यानें करविणें

(ब) कांहीं विषयांमध्यें अध्यासनाची (chairs) योजना करणें.

(क) विश्वविद्यालयानें स्वतः सन्मान पदवीक (honours) किंवा प्रपदवीक (post-graduate) अभ्यास घेणें.

आतां सर्वांना कळून चुकलें होतें कीं, उत्तम प्रकारचें विद्यापीठ म्हणजे स्वयंपूर्ण स्वरूपाचें, अध्यापि व वसतिगृहाची सोय असणारें. अशीं विद्यापीठें निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारनें व लोकांनीं करावयास हवा. परंतु हिंदुस्थानसारख्या गरीब व विस्तृत देशांत, अशा प्रकारचीं शिकविणारीं व वसतिगृहांनीं युक्त विद्यालयें भराभर जन्मास येणें कठीण व कांहीं काळ स्वीकारी पद्धतीच्या विश्वविद्यालयाशिवाय भागणें अपरिहार्य आहे. अशा विचाराचीं बरीचशीं माणसें असतां विश्वविद्यालयानें शिकाविण्याचें काम हातीं घ्यावें, हें एक सुचिन्हच होय. यायोगें स्वयंपूर्ण विद्यालयाचें स्थान या संयुक्त विद्यालयांना प्राप्त होणारें नसलें तरी, त्यायोगें शिक्षणाचा दर्जा सुधारण्यास एक प्रकारचीं मदत होते, हें निश्चित.

३. (अ) **माध्यमिक शिक्षण:**—ज्या काळासंबंधीं आपण विचार करतों आहोंत, त्या काळांत शिक्षण स्वात्याचें मुख्य लक्ष शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकडे होतें. हा हेतु १९१३ च्या सरकारचे ठरावांत व्यक्त केला गेला आहे:—

"परिस्थित्यनुरूप माध्यमिक शाळांचे बाबतींत सरकारी धोरण खालील प्रकारचें राहील.

(१) सध्यांच्या सरकारी शाळा खालील पद्धतीनें सुधारणें.

(अ) केवळ पदवीधर शिक्षक किंवा ट्रेंड शिक्षक नेमून,

(ब) इंग्रजी शिकविण्याऱ्या शिक्षकास कमीत कमी रु. ४० व जास्तीत जास्त रु. ४०० पगार देऊन,

(क) वसतिगृहाची सोय करून,

(ड) शाळेंतील अभ्यासक्रम पूर्ण स्वरूपाचा ठेवून व ऐतिहासिक व भौगोलिक दृष्टि मुलांना प्राप्त होईल असें आधुनिकत्व त्या अभ्यासक्रमास देऊन,

(इ) शास्त्रीय व हस्तव्यवसायांचें शिक्षणाचा शिक्षणक्रमांत अंतर्भाव करून.

(२) सरकारी शाळांतून वरप्रमाणें सुधारणा होत असतां, खाजगी शाळांना त्यांचे बरोबर आपली सुधारणा घडवून आणणें शक्य व्हावें, यासाठीं आहेत त्या शाळांना सरकारी मदत वाढविणें, व जेथें शाळा नाहींत तेथें त्या स्थापन व्हाव्यात यासाठीं प्रोत्साहन देणें.

(३) ट्रेनिंग कॉलेजांची संख्या वाढविणें. अशायोगें सरकारी व खाजगी शाळांना लागणारे ट्रेन्ड शिक्षक मिळणें शक्य होईल.

(४) ज्या ठिकाणीं शाळा असणें आवश्यक वाटेल अशा ठिकाणीं त्या स्थापणें."

स्वीकारण्यांत आलेल्या या धोरणाचे चार भाग पडतात. दुसऱ्या व तिसऱ्या भागांत, इंडियन एज्युकेशन कमिशननें घालून दिलेलें धोरण पुढें चालूं करण्यांत आलें होतें. सरकारनें शिक्षणसंस्था चालवावयाच्या नाहींत, असें जरी सर्वसाधारण धोरण असलें तरी, अपवाद म्हणून कधीं कधीं शिक्षणसंस्था सरकारनें चालवाव्यात, हें चवथ्या विभागांत पुनः स्पष्ट केलें होतें. हें धोरण कमिशननेंही मान्य केलें होतें. पहिल्या विभागांत मात्र, कमिशननें घालून दिलेलें धोरण सर्वस्वी त्याज्य ठरविण्यांत आलें होतें. सातव्या प्रकरणामध्यें आपण पाहिलें आहे कीं, शिक्षण-

क्षेत्रांतून सरकारनें माघार घेऊन प्रत्यक्ष शिक्षण संस्था चालवू नयेत असें कमिशननें ठरविलें होतें. परंतु या सूचनेप्रमाणें गोष्टी घडल्या नाहींत व सरकारनें शाळा चालविण्याचें आपलें कार्य तसेंच पुढें चालूं ठेविलें. १९१२ च्या ठरावानें कमिशननें पूर्वी सुचविलेलें तत्त्व पूर्ण अमान्य केलें व असें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं खाजगी संस्थांना मार्गदर्शन व्हावें यासाठीं शाळा चालविणें हें सरकारचें कर्तव्य आहे.

पूर्वीचें धोरण बदलण्याची जरूर काय होती, हा एक वादाचा विषय होता. खाजगी शाळांना मार्गदर्शन करतां यावें, या सबबीमुळें थोड्या संस्थेवर विपुल पैसा खर्च करण्यास सरकारास अनायासें संधि प्राप्त होणार आहे, व सरकारच्या ठरावाच्या २२ (२) कलमान्वयें खाजगी शाळांना पुरेशी मदत देणें सरकारास शक्य होणार नाहीं, अशी भीति लोकांना वाटली. शिवाय नमुनेदार शाळा चालविण्याची जरूरी काय, ही दुसरी शंका लोकांना आली. खाजगी शाळांची उन्नति होत नाहीं, यास मुख्य कारण पैशाचा अभाव हें आहे; मार्गदर्शन करण्यासाठीं किंवा स्फूर्ति देण्यासाठीं एखादी नमुनेदार शाळा नाहीं, हें नव्हे. म्हणून पुन्हा लोकांनीं सरकारकडे अशी मागणी केली कीं सरकारनें आपल्या शाळा बंद कराव्यात व अशारीतीनें बचत झालेला पैसा खाजगी शाळांमध्यें, त्यांची सुधारणा व्हावी यासाठीं, वाटण्यांत यावा.

(ब) **माध्यमिक शाळांच्या शिक्षकांचें ट्रेनिंग:**—१९१२ च्या ठरावानें ट्रेनिंगच्या बाबतींत आपले विचार प्रकट करून एक पाऊल पुढें टाकिलें. सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्यें ज्या लोकांजवळ आपण शिकविण्यास लायक असल्याबद्दल प्रमाणपत्र नाहीं, त्या लोकांना शिकविण्याची परवानगी देऊं नये, असें स्पष्ट बजाविलें आहे. सरकारी व खाजगी शाळांना ट्रेन्ड शिक्षकांचा पुरवठा व्हावा म्हणून ट्रेनिंग कॉलेजांची वाढ करण्यांत येईल असेंही म्हटलें आहे. यामुळें १९०४ ते १९२१ या काळांत माध्यमिक शाळांतील शिक्षकांची

ट्रेनिंगचे बाबतींतील अडचण दूर झाली. १९०४ मध्यें ट्रेनिंग कॉलेजें ६ होतीं, १९२१-२२ मध्यें तीं १३ झालीं व ट्रेन्ड शिक्षकांचें प्रमाणही वाढलें.

(क) **शैक्षणिक माध्यम:**—मिडल स्कूलमध्यें देशी भाषा माध्यम म्हणून वापरण्यास, लॉर्ड कर्झननें आखलेल्या धोरणामुळें, परवानगी मिळाली होती. वरच्या वर्गांतून इंग्रजी माध्यम सोडून देण्यांत यावें म्हणून अनेक वेळां चर्चा झाली, परंतु तो प्रश्न अनिश्चितच राहिला.

(ड) **धंदे शिक्षण:**—पूर्वीप्रमाणें या काळांतही माध्यमिक शिक्षण-क्रमांत शालान्त परीक्षेच्या द्वारें धंदे शिक्षण पुढें चालविण्याचे प्रयत्न झाले. माध्यमिक शाळांचा अभ्यासक्रम व परीक्षा पद्धती, यांमध्यें या प्रयत्नामुळें जरी सुधारणा घडून आली तरी, या प्रयत्नास यावें तसें यश आलें नाहीं.

४ प्राथमिक शिक्षण:—(अ) नामदार गोखले यांचे सक्तीचे शिक्षणाबद्दल प्रयत्न:—लॉर्ड कर्झननें अवलंबिलेल्या धोरणामुळें प्राथमिक शिक्षणाचा प्रसार जरी झपाट्यानें झाला, तरी त्यायोगें लोकांचें समाधान झाल नाहीं. त्यांना सक्तीचें सार्वत्रिक शिक्षण पाहिजे होतें. १९११-२ मध्यें देखील साक्षरतेचें प्रमाण शेंकडा ६ चे पुढें गेलें नव्हतें. शाळेंत जावयास योग्य अशा मुलांपैकीं फक्त २३·८ शेकडा मुलें शाळेंत जात होतीं. म्हणजे जेथें १०० मुलें शाळेस जावयास पाहिजे होतीं तेथें फक्त २४ मुलें शाळेंत जात होतीं. जेथें १०० मुली शाळेंत जावयास पाहिजे होत्या, तेथें पुऱ्या तीनही मुली येत नसत. शाळेंतील मुलांची संख्या जरी वाढत होती तरी ती फार जोरानें वाढत नव्हती. जो पल्ला आपणास गाठावयाचा आहे त्या मानानें हें पाऊल फारच मंदगतीचें होतें. वाढत्या लोकसंख्येचा विचार न करतां मुलांची संख्या वाढत होती, परंतु या पाऊलानें चालल्यास सर्व प्रजा साक्षर होण्यास अनेक पिढ्या लागतील, असें लोकांना वाटावयास लागलें होतें. सक्तीनें शिक्षण दिल्याशिवाय

थोड्या वेळांत सार्वत्रिक शिक्षण प्रसार होणार नाहीं अशी त्यांची ठाम समजूत होती. बडोद्यामध्यें श्रीमंत गायकवाड सरकारनें १९०६ मध्यें हें सक्तीचें तत्त्व अमलांत आणिलें होतें, हें लोक पहात होते; व जें बडोद्यामध्यें करतां आलें तें ब्रिटिश हद्दीमध्यें कां करतां येऊं नये, असा प्रश्न सरकारास विचारावयास लोक तयार झाले होते.

नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनीं सक्तीचें शिक्षणाचे बाबतींत पुढाकार घेतला. ते मध्यवर्ती कायदेमंडळाचे सभासद होते. त्यांनीं सक्तीचे तत्त्वाचा स्वीकार करण्याबद्दल सरकारचें मन वळविण्याचा प्रयत्न केला.

मार्च १९१० मध्यें त्यांनीं एक **ठराव** विचाराकरतां व एक वर्षानंतर "प्राथमिक शिक्षणाचा प्रसार चांगल्याप्रकारें व्हावा यासाठीं" एक बिल मांडलें. लोकांचें मत अजमावण्यासाठीं तें सर्वत्र पाठविण्यांत आलें व विचाराकरतां १९१२ मध्यें तें विधिमंडळांत मांडलें गेलें. या बिलावर झालेल्या चर्चेवरून असें दिसून येतें कीं मामुली स्वरूपाचें देखील बिल मान्य करण्यास सरकारची तयारी नव्हती. मध्यवर्ती कायदेमंडळामध्यें सरकारचें बहुमत असल्यानें व बिनसरकारी कांहीं लोकही या बिलास अनुकूल नसल्यानें, हें बिल विचारासाठीं सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याची सूचनाही, ३८ विरुद्ध १२ मतांनीं फेटाळली गेली. हिंदुस्थानांतील सक्तीच्या शिक्षणाचा पहिला अंक अशारीतीनें संपला, व ज्या ध्येयासाठीं **नामदार गोखले** राबले तें ध्येय साध्य होऊं शकलें नाहीं. परंतु गोखल्यांचे प्रयत्न निष्फळ ठरले नाहींत. हिंदुस्थान सरकारचें शिक्षण-खातें म्हणून नवीन खातें अस्तित्वांत आलें; सार्वत्रिक शिक्षणाबद्दल चळवळ फोंफावली; बहुजनसमाजाचे शिक्षणाबद्दल आपलें कर्तव्य काय आहे याविषयीं सरकार जागें होऊन विचार करूं लागलें. १९१२-१७ या पांच वर्षांचे काळांत प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत सरकारनें केलेली प्रगति, ही गोखल्यांचे प्रयत्नास अप्रत्यक्षपणें मिळालेलें फळच होय.

(ब) १९१३ चा सरकारी ठराव:—सरकारनें गोखल्यांचें बिल जरी फेंटाळलें तरी लोकांची बहुजनसमाजाचे शिक्षणाविषयींची वाढती मागणी सरकारास दृष्टीआड करतां येणें शक्य नव्हतें. त्या बाबतींत कांहींतरी करणें अवश्य होतें व हें करण्याची संधि, राजे पांचवे जार्ज १९११–१२ मध्यें हिंदुस्थानांत आल्यानें, सरकारास मिळाली. सार्वभौम बादशहांचे दरबारचे वेळीं लोकशिक्षणासाठीं दर वर्षास चालू मदत म्हणून ५० लक्ष रुपये देण्याचें जाहीर करण्यांत आलें. यानंतर १९१३ सालीं सरकारचा ठराव बाहेर पडला. पैशाचे अभावीं व शासनिक (Administrative) अडचणीमुळें सक्तीचें शिक्षण हातीं घेण्याचें सरकारनें नाकारलें व स्वखुशीनें शिक्षण घेण्यास जे तयार असतील त्यांना तें देऊन शिक्षण प्रसार करण्याची इच्छा व्यक्त केली. ही इच्छा व्यक्त करतांना प्राथमिक शिक्षणाचे प्रसारासाठीं कांहीं शिफारशीही केल्या.

वरील धोरणासंबंधीं विशेष लिहिण्याचें कारण नाहीं, शिक्षणाचे प्रसारास महत्त्व द्यावयाचें कीं प्रथम शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा, हा वाद आजवर माध्यमिक व उच्च शिक्षणक्षेत्रांतच दिसून येत होता, तो प्राथमिक शिक्षणाचे बाबतींतही उत्पन्न झाला. या ठरावामध्यें सरकारनें आपलें धोरण स्पष्ट केलें आहे कीं, दर्जा वाढविण्याचा सरकारचा मानस असला तरी प्रसारास कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाहीं. शाळा व मुलें दुप्पटीनें वाढावींत, यासाठीं सरकार योग्य ते उपाय योजील. हें आश्वासन जरी दिलें गेलें तरी, प्रत्यक्ष कृति त्याबाबतींत कांहींच झाली नाहीं.

(क) १९१७–२२ मधील प्राथमिक शिक्षणाची प्रगति:—गोखल्यानंतर त्यांचें काम विठ्ठलभाई पटेल यांनीं पुढें चालूं केलें. त्यांचेच प्रयत्नानें मुंबईचा १९१८ चा बॉंबे एज्युकेशन ॲक्ट (मुंबईचा शिक्षणाचा कायदा) पास झाला. या कायद्यानें म्युनिसिपालिट्यांना आपल्या

हद्दीमध्यें सक्तीचें शिक्षण सुरू करण्यास परवानगी देण्यांत आली. या कायद्यानें बरीच लोकजागृति झाली व पुढें सक्तीचे शिक्षणाचे बाबतींत लोकांची आतुरता जास्त जास्त दिसून येऊ लागली. १९१९ सालीं सक्तीचे शिक्षणाचे संबंधी चार कायदे पंजाब, संयुक्त प्रांत, बंगाल व बिहार-ओरिसा या प्रांतांत पास झाले. १९२० मध्यें आणखी तीन कायदे मुंबई-शहर, मध्यप्रांत व मद्रास या प्रांतांतून पसार झाले. या व इतर प्रांतांतून पास झालेल्या या कायद्यांचा विचार दहाव्या प्रकरणामध्यें करण्यांत येईल. एथें एवढेंच म्हणावेसें वाटतें कीं, गोखल्यांचे प्रयत्नास यावेळीं फळ आलें. १९१७–२२ हीं पांच वर्षें प्राथमिक शिक्षण-प्रसाराचे बाबतींत बरींच धामधुमींचीं गेलीं.

५. हिंदी मंत्र्याकडे शिक्षण खातें:—मागील दोन प्रकरणांत सरकारी अधिकारी व जनता, यांमध्यें फूट कशी निर्माण झाली, हें दाखविण्यांत आलें आहे. उच्च शिक्षणाचे बाबतींत १९०२ मध्यें जी तेढ निर्माण झाली, ती पुढें नाहींशी झाली नाहीं. १९०४ ते १९०८ या काळांत जी तेढ माध्यमिक शिक्षण सुधारण्याचे प्रयत्नाविषयीं दिसून येते, तींच १९१०–१२ मध्यें प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्याबाबत दिसून येते. १९१९ सालच्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्याचा विचार चालू होता, त्यावेळीं शिक्षण खातें लोकांकडे सोपविण्यांत यावें किंवा येऊं नये याविषयीं कडाक्याचे वाद झाले.

त्यावेळचे स्टेट सेक्रेटरी **मॉंटेग्यूसाहेब** व गव्हर्नर जनरल **लॉर्ड चेल्मस्फोर्ड** यांच्या संयुक्त अहवालावर १९१८ च्या सुधारणा कायद्याची उभारणी झाली. ज्या खात्याचे योगें स्थानिक ज्ञान करून घेण्याची लोकांना संधि मिळेल व त्यांना समाजसेवा करतां येईल, ज्यामध्यें लोक अधिक लक्ष घालतात, ज्यामध्यें चुका झाल्या असतां त्या सुधारतां येण्यासारख्या आहेत व जीं खातीं सुधारणें जास्त जरूर आहे, अशीं खातीं लोकांचे स्वाधीन करण्यांत यावींत, असें एक तत्त्व या अहवालांत

प्रतिपादण्यांत आलें. या तत्त्वाप्रमाणें शिक्षण हें सोंपीव (transferred) खातें बनेल अशी अपेक्षा होती. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं हें खातें पूर्णत्वानें लोकांकडे सोंपविण्यास बराच विरोध दिसून आला. खातें लोकांकडे सोंपाविल्यास अनेक अडचणी उत्पन्न होतील असें सांगण्यांत येऊं लागलें. हें खातें लोकांकडे गेलें म्हणजे आमच्या शिक्षणाचें काय होईल, ही भीति युरोपियन व अँग्लो–इंडियन लोकांना पडली. आमचे शिक्षणाचा ताबा मध्यवर्ती सरकारकडे जावा, म्हणजेच शिक्षण राखीव (reserve) असावें, असें त्यांचें म्हणणें होतें. या बाबतींत प्रांतिक सरकारचीं भिन्न मतें होतीं. बंगाल सरकारनें युरोपियनांच्या व कॉलेजच्या शिक्षणास संरक्षण देण्याचें ठरविलें; संयुक्त प्रांतानें सर्व शिक्षण खातें लोकांकडे द्यावें असा निर्णय घेतला; पंजाब सरकारनें उच्च शिक्षण सोंपीव असावें कीं नसावें यावर कांहींच मत दिलें नाहीं; बिहार–ओरिसा सरकारनें माध्यमिक, यांत्रिक व कॉलेजचें शिक्षण लोकांकडे सोंपविण्यास आपला विरोध दर्शविला; आसामचे कमिशनरनें फक्त कॉलेजचें शिक्षण सोंपीव करण्यास विरोध दर्शविला; तर शिक्षण–खातेंच लोकांकडे नसावें, असें मद्रास सरकारचें म्हणणें होतें. यावर मध्यवर्ती सरकारनें खालीलप्रमाणें आपलें मत व्यक्त केलें.

" प्राथमिक शिक्षणाचा ताबा लोकांकडे देण्याची वेळ आली आहे, असें आम्हांस वाटतें. यायोगें जबाबदारी म्हणजे काय व ती कशी पार पाडावी, हें लोकांना समजेल. राष्ट्रप्रेमी लोकांचे कर्तबगारीस यानें वाव मिळणार आहे. ज्यांचेवर देशाचें भवितव्य अवलंबून आहे अशा मतदारांना सुसंस्कृत करण्याच्या कार्यास अशारीतीनें प्रारंभ होणार आहे. प्राथमिक शिक्षणास योग्य दर्जा प्राप्त करून देणें व तें प्रथम मोफत व नंतर सक्तीचें करून त्याचा सर्वत्र प्रसार करणें—यांसारखे कठीण प्रश्न सोडविण्यास मंत्र्यांची सर्व शक्ति व बुद्धिमत्ता कमी पडणार आहे...

माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षण मात्र प्रांतिक सरकारच्या अनुभविक अधिकाऱ्यांकडे रहावें, असेंही आम्हांस वाटते. हिंदुस्थानची आजची स्थिति अडचणीची आहे. राजकारणांतील मंद गतीचा विचार जरी थोडा बाजूला ठेविला तरी, तिचे सामाजिक, आर्थिक व उद्योगधंद्याचे प्रश्न कसे काय सोडविले जातील, यांवर तिचा भावी काळ अवलंबून आहे. हे प्रश्न सोडविण्यास माध्यमिक शिक्षणाचा चांगला उपयोग होणार आहे. अशावेळीं हें शिक्षण अननुभविक लोकांचे हातांत आम्ही दिलें तर आम्ही आमच्या कर्तव्याला चुकलों, असें होणार आहे."

देशाचे सुदैवानें सर्व शिक्षण-खातें लोकांचेकडे सोंपाविण्यांत आलें; खालील बाबी सरकारनें आपल्याकडे **राखीव** म्हणून ठेविल्या.

(१) बनारस हिंदु विश्वविद्यालय व त्यासारख्या ज्या संस्था, अखिल-हिंदुस्थानच्या म्हणून, गव्हर्नर जनरल ठरवतील त्या संस्था वगळण्यांत आल्या. या संस्था अखिल भारतीय स्वरूपाच्या असल्यानें त्या मध्यवर्ती सरकारचे ताब्यांत असणें श्रेयस्कर असा सरकारचा दावा होता.

(२) हिंदी संस्थानिकांना शिक्षण देणारीं कॉलेजें; व बादशहाच्या फौजी किंवा इतर सरकारी नोकर व त्यांचीं मुलें यासाठीं गव्हर्नर जनरल यांनीं चालविलेल्या शिक्षण-संस्था-त्यावर सरकारची हुकमत असणें श्रेयस्कर म्हणून—वगळण्यांत आल्या.

(३) युरोपिअन व अँग्लो-इंडियन लोकांचें शिक्षण प्रांतिक सरकाराकडेच ठेवण्यांत आलें, परंतु तें राखीव म्हणून ठरविण्यांत आलें. कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशननें केलेल्या शिफारशीप्रमाणें कार्य हातीं घेणें सोयीचें व्हावें म्हणून, खालील प्रश्नांसंबंधीं कायदेकानू करण्याचा अधिकार मध्यवर्ती सरकारकडे ठेवण्यांत आला.

(१) नवीन विश्वविद्यालयांची स्थापना, घटना व कार्यें याविषयींचे **प्रश्न.**

(२) विश्वविद्यालयाचें कक्षेबाहेर असणाऱ्या विद्यापीठांसंबंधीं उत्पन्न होणारे प्रश्न.


(३) सुधारणा कायदा पास झाल्यानंतरच्या पांच वर्षांच्या काळांतील कलकत्ता विश्वविद्यालय व बंगालमधील माध्यमिक शिक्षण यासंबंधींचे प्रश्न.

यावरून असें दिसून येईल कीं, या कायद्यामुळें विचित्र घटना घडून आली. कांहीं अधिकार मध्य-सरकारकडे राहिले, कांहीं राखीव झाले व कांहीं मर्यादित किंवा अमर्यादित सोंपीव म्हणून ठरले. अनेक मतमतांच्या गलबल्यामुळें, कार्यास सोयीची अशी तडजोड कशी घडवून आणावी, ही एक मोठी अडचण पडल्याचें यावरून दिसून येतें.

प्रकरण दहावें

हिंदी लोकांकडे सत्ता

१९२१–३७



हिंदुस्थान सरकारनें १९१९ च्या कायद्यानें जी घटना पास केली तीस ' द्विदल राजपद्धति ' किंवा ' दोहाती कारभार ' असें म्हणतात. या पद्धतीनें प्रांतिक सरकारचा कारभार दोन ठिकाणीं वाटला गेला–एक राखीव खातीं व दुसरें–सोपीव खातीं. प्रांताचे गव्हर्नर हे राखीव खात्यांचा कारभार कांहीं कार्यकारी मंडळाचे सभासदांचे (Executive Councillors) मदतीनें पहात असत. ते गव्हर्नर जनरलतर्फे स्टेट सेक्रेटरी यांना जबाबदार असत. या शिवाय सोपीव खात्यांची व्यवस्था पाहण्याचें कामही त्यांचेकडे सोपविलेलें होतें. या कामीं त्यांना मंत्र्यांची मदत होत असे. हे मंत्री स्टेट सेक्रेटरी यांना जबाबदार नसत, तर लोकांनीं निवडलेल्या प्रांतिक कायदे मंडळाला ते जबाबदार असत. कामाच्या या वांटणीमुळें या राजेपद्धतीस ' द्विदल ' अशी संज्ञा पात्र झाली आहे. या अशा व्यवस्थेखालीं हिंदी लोकांना शिक्षण खात्याचा ताबा मिळाला. या राज्यव्यवस्थेचें गुणदोष पाहण्याचें काम या पुस्तकाचें नाहीं, परंतु कोणत्या परिस्थितीमध्यें हिंदी मंत्र्यांना काम करावें लागे, हें खालील विवेचनावरून स्पष्ट होईल.

२. **पैशाची व्यवस्था**:–लोक मंत्र्याची मुख्य अडचण म्हणजे पैशाची; व म्हणून या १९१९ कायद्यानें पैशाची व्यवस्था काय केली हें पाहणें जरूर आहे. यापूर्वी प्रांताचा वसूल तीन ठिकाणीं विभागला जात असे. मध्यवर्ती सरकारचा, प्रांतिक सरकारचा व विभागित उत्पन्नाच्या कांहीं बाबी, उदाहरणार्थ कस्टम्स् (बाहेरून येणाऱ्या मालावरील जकात),

रेल्वे, पोस्ट व टेलीग्राफ यांचें उत्पन्न मध्यवर्ती सरकारला मिळत असें; जंगलाचें उत्पन्न प्रांताकडे जात असें; कांहीं खात्यांचें उत्पन्न ठराविक प्रमाणांत मध्यवर्ती सरकार व प्रांतिक सरकार यांमध्यें वाटलें जात असें. १९१९ च्या कायद्यानें 'विभागित' हें सदर नाहींसें होऊन उत्पन्नाचे दोन स्पष्ट असें भाग करण्यांत आले.

जमिनीचा महसूल, प्राप्तीवरील कर, एक्साइज (उत्पादन कर), स्टँप आणि इरिगेशन किंवा क्षेत्रपायन हीं उत्पन्नाचीं मुख्य खातीं होतीं. प्राप्तीवरील कराशिवाय बाकीचीं खातीं प्रांतिक सरकारकडे सोंपविण्यांत आलीं. यामुळें मध्यवर्ती सरकारचें मोठें नुकसान झालें. मध्यवर्ती सरकारला आपल्या अंदाजपत्रकाप्रमाणें खर्च करतां यावा, यासाठीं कांहीं वर्षें तरी प्रांतिक सरकारनें मध्यवर्ती सरकारास कांहीं खंडणी द्यावी, असें ठरविण्यांत आलें. अशारीतीनें उत्पन्नांतून मध्यवर्ती सरकारचा वाटा काढून ठेविल्यावर बाकीच्या उत्पन्नांतून राखीव व सोंपीव खात्यांचा खर्च भागविला जात असें.

हा खर्च वेगवेगळ्या खात्यांमध्यें कसा वाटावयाचा, हा वादाचा प्रश्न होऊन बसला. एका पक्षाचें असें म्हणणें होतें कीं गव्हर्नरचे अध्यक्षतेखालीं राखीव खात्यांचे कार्यकारी मंडळाचे सभासद व सोपीव खात्यांचे मंत्री यांनीं एकत्र जमावें व आपआपल्या गरजेप्रमाणें पैशाची वांटणी करावी. या पद्धतीस 'समाईक कोष पद्धती' म्हणतां येईल. दुसऱ्या पक्षांचें म्हणणें असें होतें कीं पैशाची वांटणी सारखी करावी; अर्धा भाग राखीव खात्यांकरतां व अर्धा भाग सोंपीव खात्यांकरतां. एकाद्या खात्याला पैशाची तूट पडली तरी त्यानें जादा कर बसवून पैसा वसूल करावा. या पद्धतीस 'स्वतंत्र कोष पद्धति' म्हणतां येईल. पहिल्या मताचा शेवटीं विजय होऊन 'समाईक कोष पद्धति' अमलांत आली. पुढें ज्या गोष्टी घडून आल्या त्यावरून या पद्धतिमुळें सोंपीव खात्याचे वाट्यास पुरेसा पैसा आला नाहीं व त्यामुळें शिक्षणाचें ध्येय सफल झालें नाहीं. अगोदर

मध्यवर्ती सरकारच्या खंडणीमुळें प्रांतिक सरकारच्या वसुलास मोठी कातरी लागली. मुंबईसारख्या उद्योगधंद्याच्या शहरांमधून प्राप्तिवरील कर मोठ्या प्रमाणांत जमा होत असें. परंतु हा कर मध्यवर्ती सरकारचे तिजोरींत जात असल्यानें प्रांतिक सरकारचें मोठें नुकसान झालें. उत्पन्नाचें खातें हें राखीव खातें असल्यानें तें कार्यकारी सभासदाचे ताब्यांत असें. या व अन्य कारणामुळें हिंदी मंत्र्यांना मोठ्या प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार व शिक्षणाची पुनर्रचना करण्यास पुरेसा पैसा मिळत नसे.

३. नोकऱ्यांचें नियंत्रण:—या द्विदल पद्धतीचा विशेष म्हणजे हिंदी मंत्र्यांना शिक्षण खात्यांतील नोकर वर्गावर फारच थोडा अधिकार चालवितां येत असे, हा होय. १९२१ सालीं शिक्षण खात्यांतील महत्वाच्या जागा सनदी नोकरांनीं (I. E. S.) पटकाविल्या होत्या; व ज्या कालखंडाचा आपण विचार करीत आहोंत त्या कालखंडांत, ते सनदी नोकर म्हणून राहिले. या लोकांचे अधिकार व हक्क भावी काळांत कसें रक्षण करावयाचें, हा वाद शिक्षण खातें लोकांकडे सोंपवितांना निर्माण झाला. हिंदी मंत्र्यांना या मोठ्या नोकरांवर फारच थोडा अधिकार चालवितां येत असे.

ही विचित्र परिस्थिति प्राप्त झाल्यानें दोन्ही बाजूंचे लोकांमध्यें किल्मिष निर्माण झालें. एका बाजूनें असें म्हटलें जात असें कीं बिनसरकारी हिंदी मतानें निर्माण केलेल्या शिक्षण विषयक पुनर्रचनेच्या प्रश्नास या अखिल भारतीय नोकरवर्गाकडून कोणतीच सहानुभूति मिळत नाहीं; जेथें अधिकारीच सहमत होत नाहींत तेथें कोणतीही योजना कशी पुरी करतां येणार ? इकडे सनदी नोकरांचे अधिकारास हात लावावयाचा नाहीं व तिकडे कायदे मंडळास जबाबदार रहावयाचें, हा तारेवरचा खेळ मंत्र्यांना खेळतां येईना. दुसऱ्या बाजूनें अधिकाऱ्यांची अशी तक्रार होती कीं, धोरणामध्यें वेळोवेळीं फरक होत राहिल्यानें राज्यकारभारामध्यें रोज अडचणी निर्माण होतात. प्रत्येक प्रांतांत परिस्थिति थोडी बहुत वेगवेगळी

असल्यानें सर्व ठिकाणास सारखाच लागू होईल असा निर्णय घेणें कठीण झालें. सरकारी कार्यकारी मंडळाचे अधिकारी व लोक मंत्री यांचे सहकार्याचा अभाव दिसून आल्यामुळें, हा प्रयोग यशस्वी झाला नाहीं.

हा नोकर वर्गाचा प्रश्न वरिष्ठ नोकरांचा विचार करण्याकरतां नेमलेल्या रॉयल कमिशननें हाताळला. त्यानें अशी शिफारस केली कीं 'सौंपीव खात्यामध्यें यापुढें सनदी नोकर नेमले जाऊं नयेत. या खात्यांकरतां लागणारे नोकर प्रांतिक सरकारनेंच निवडावेत.' ही शिफारस सरकारनें मान्य केली व १९४४ पासून सनदी नोकर घेण्याची पद्धत बंद केली. याचा अर्थ असा कीं मंत्र्यांची सत्ता आपल्या नोकरांवर चालली पाहिजे, हें तत्त्व मान्य करण्यांत आलें. जे वरिष्ठ अधिकारी (आय. ई. एस्.) पूर्वीं नेमले गेले होते अशा अधिकाऱ्यांवर मात्र मंत्र्यांना सत्ता गाजवितां येत नसे. सरकारासही अशा अधिकाऱ्यांचे अधिकार कमी करणें, ही गोष्ट श्रेयस्कर वाटली नाहीं.

४. दुसऱ्या अडचणी:—वरील विवेचनावरून हिंदी लोकांकडे शिक्षण खातें देतांना राज्यकारभारांत जी व्यवस्था करावी लागलीं तींत मूलतःच दोष कसे होते, हें दिसून येईल. बाहेरील परिस्थितीमुळेंही कांहीं अडचणी निर्माण झाल्या. उदाहरणार्थ, देशांतील राजकीय मोठी संस्था, म्हणजे हिंदी राष्ट्रीय काँग्रेस. हिनें १९१९ चा सुधारणा कायदा असमाधानकारक असल्याचें ठरविलें; कायदेमंडळावर बहिष्कार घातला व असहकार चळवळ सुरू केली. त्याचप्रमाणें १९३०–३२ मध्यें सविनय कायदेभंगाची (civil disobedience) चळवळ निघाली. या दोन्ही चळवळींमुळें या काळांत राष्ट्रीय जीवनामध्यें बरीच खळबळ उत्पन्न झाली व लोकांचें लक्ष शैक्षणिक बाबीकडून राजकीय बाबीकडे वळलें.

या राजकीय अडचणींच्या घडामोडींत दुसरें विघ्न उत्पन्न झालें. जगाची आर्थिक स्थिति खालावण्यास १९३० पासून सुरवात झाली. या

आर्थिक परिस्थितीचा कोणताही परिणाम शिक्षण कार्यावर होऊं नये अशीच कोणीही इच्छा केली असती. आजवर शिक्षणाची हेळसांड पुष्कळ झाली आहे, तेव्हां काटकसरीची कुऱ्हाड, या अडचणीच्या दिवसांतही, शिक्षण खात्यावर पडूं नये असेंच प्रत्येकाला वाटलें. परंतु दुर्दैवानें राष्ट्रसंवर्धन करणाऱ्या खात्यांना व विशेषतः शिक्षणखात्यालाच जबर मार सहन करावा लागला.

५. या काळांतील साध्यः—एकूण घडामोडी लक्षांत घेतां या काळांत काय साध्य झालें, हें आपण आतां पाहूं. १९२१–२२ व १९३६–३७ या काळांतील आकड्यांवरून शैक्षणिक परिस्थितीची कल्पना येईल.

संस्थेचा प्रकार	संस्थांची संख्या		संस्थांची संख्या	
	१९२१–२२	१९३६–३७	१९२१–२२	१९३६–३७
			आंकडे मिळत !	
१ विश्वविद्यालय	१०	१५	नाहींत	९,६९७
२ आर्टस् कॉलेजें	१६५	२७१	४५,४१८	८६,२७३
३ उच्च धंद्यांचीं • कॉलेजें	६४	७५	१३,६६२	२०,६४५
४ माध्यमिक शाळा	७,५३०	१३,०५६	११,०६,८०३	२२,८७,८७२
५ प्राथमिक शाळा	१,५५,०१७	१,९२,२४४	६१,०९,७५२	१,०२,२४,२८८
स्पेशल स्कूल्स्	३,३४४	५,३४७	१,२०,९२५	२,५९,२६९
मान्य शाळांची एकूण संख्या	१,६६,१३०	२,११,३०८	७३,९६,५६०	१,२८,८८,०४४
अमान्य शाळा	१६,३२२	१६,६४७	४,२२,१६५	५,०१,५३०
एकूण	१,८२,४५२	२,२७,९५५	७८,१८,७२५	१,३३,८९,५७४

टीपः—वरील आंकड्यांत ब्रह्मदेशाचे आंकडे समाविष्ट केले नाहीत.

या आंकडचांवरून असें दिसून येईल कीं, जरी अनंत अडचणी निर्माण झाल्या तरी शिक्षणामध्यें प्रगति इतकी चांगली झाली कीं तिची कल्पनाही कोणास नव्हती. हा सुपरिणाम कशामुळें झाला ? शाळा व मुलें यांची पूर्वी कधीं झाली नव्हती एवढी अकल्पित अशी वाढ पैशाच्या टंचाईमुळें सरकारी मदत थंडावली असतांही कशानें झाली. ?

६. झपाट्यानें झालेल्या शिक्षण प्रसाराचीं कारणें:—या काळामध्यें लोकांमध्यें राजकीय आणि सामाजिक जागृति निर्माण झाली त्याचाच हा परिणाम होता. खालील दोन उताऱ्यांवरून प्रगतीचीं कारणें काय होतीं हें समजून येईल,

" लोकांचा उत्साह एवढा वाढला कीं शाळेंतील मुलांची संख्या भराभर वाढू लागली. शिक्षण हेंच प्रगतीचें साधन, हा विश्वास लोकांमध्यें जागृत झाला. मुलाचे शिक्षणासाठीं वाटेल तो त्याग करण्यास पालकवर्ग तयार झाला. गरिबांकरतां सहानुभूति लोकांत दिसूं लागली. साक्षर हिंदुस्थानचीं स्वप्नें सत्यसृष्टींत उतरविण्यासाठीं नाना योजना पुढें येऊं लागल्या. विद्येंत मागासलेला असा मुसलमान समाज आपलें दौर्बल्य, कमीपणा नाहींसा करण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें पुढें सरसावला. मुलींना शिक्षण देण्याचे बाबतींत ज्या जुन्या पुराण्या वेडगळ कल्पना होत्या त्या झुगारून देण्यास स्त्रीवर्ग तयार झाला. कायदे मंडळाच्या सहकार्यानें सरकारनें शिक्षणासाठीं पैसा इतका ओतला कीं, दहा वर्षांपूर्वी ही गोष्ट शक्य कोटींतील आहे, असें कोणासही वाटलें नाहीं."

शिक्षणप्रसाराचीं कारणें या उताऱ्यावरून स्पष्ट होत असलीं तरी 'शिक्षणावर सरकारनें पैसा ओतला' हें जें सरकारनें आपलें मत पंचवार्षिक अहवालांत प्रसिद्ध केलें आहे त्याशीं सर्व लोक सहमत होतील, असें वाटत नाहीं. खर्चाचे आंकडे पाहिले तर ही गोष्ट सिद्ध होत नाहीं. उलट यापूर्वीचे काळीं जास्त पैसा खर्च होत असे, असें दिसून येईल.

पैशाचा उगम	१९०१-२	१९१६-१७	१९२१-२	१९३१-२	१९३६-७
	(हे आंकडे लाखाचे आहेत.)				
सरकारी	१०३	३९२	९०२	१२४६	१२३६
बिनसरकारी					
(१) जिल्हाबोर्डें	५९	१७४	१६८	२८०	२५७
(२) म्युनसीपालिट्या	१५	४९	७९	१६८	१७८
(३) फीं	१२७	३१९	३८०	६२३	७१९
(४) इतर साधनें	९७	१९५	३०८	४१२	४२४
एकूण	४०१	९१२९	१८३७	२७१९	२८०६

(टीपः—ब्रिटिश हिंदुस्थानचे हे आकडे असून त्यांत ब्रह्मदेशाचे आकडे आले नाहींत.)

१९१६-७ ते १९२१-२ या पांच वर्षांत शिक्षणावरील खर्चांत १९२१-२ ते १९३१-२ या दहा वर्षांचे खर्चापेक्षां ५१० लाखांची वाढ झाली आहे. असें दिसून येईल. तसेंच १९०१-२ मध्यें खर्च १०३ लाख होता, तो १९२१-२ मध्यें ९०२ लाख झाला, म्हणजे ८०० लाखांनीं वाढला. परंतु १९२६-७ ते १९३१-२ या काळांत मात्र ३३४ लाखांचीच वाढ झाली आहे. बिनसरकारीं साधनें पाहतां १९०१-२ सालापेक्षां १९२१-२२ चा खर्च ६३७ लाखानें वाढला. अशाच प्रकारची म्हणजे ६३५ लाखाची वाढ, १९२१-२२ ते १९३६-७ या काळांत झालेली आहे. अन्य शब्दांत बोलावयाचें म्हणजे, बिनसरकारी खर्चाची वाढ कायम राहिली, परंतु सरकारी वाढ ७९९ लाखांवरून ३३४ लाखांवर आली. १९२१-२ ते १९३६-७ या

काळांत लोकलबोर्डे व जनता यांनीं खर्चाच्या वाढीचा ६० टक्के खर्च स्वतः भागविला आहे.

१९०१–२ ते १९२१–२२ व १९२१–२२ ते १९३६–७ या दोन काळाची तुलना करतांना ही गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं पहिला काळ हा जगाच्या आर्थिक सुबत्तेचा काळ होता, तर त्याचे उलट दुसऱ्या काळांत आर्थिक परिस्थिति खालावलेली होती. यावरून स्पष्ट होईल कीं सरकार पहिल्या काळांत पुरेशी मदत कां करूं शकलें व दुसऱ्या काळांत त्यानें हात आखडता कां घेतला ? या अडचणीच्या काळांतही लोक पैसा खर्चण्यास तयार झाले, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ही त्यांची तयारी स्पृहणीय आहे. लोकांची शिक्षणाविषयीची कळकळ ही मनापासूनची आहे, हें त्यांनीं कृतीनें दाखवून दिल. या दुसऱ्या काळांतील प्रगतीचें सर्व श्रेय लोकांनाच दिलें पाहिजे.

७. हरटॉग कमिटी:—१९२१–२२ पासून १९३६–७ पर्यंतच्या पंधरा वर्षांच्या काळांत जी झपाट्यानें प्रगति झाली तीमुळें शिक्षणांतील कांहीं दोष उघड दिसूं लागले व नवीन प्रश्न उद्भवूं लागले. यामुळें शिक्षणपद्धतीसंबंधीं एक प्रकारचा असंतोष सरकारी व बिनसरकारी गटांमध्यें निर्माण झाला. सरकारी गटाला असें वाटलें कीं शिक्षणाचे वाढीमुळें शिक्षणाचा दर्जा फारच कमी झाला आहे व त्यामुळें शिक्षणपद्धति ही सुपरिणामी नसून नाहक खर्चाची झाली आहे. हें मत हरटॉग कमिटीनें दिलें आहे. (इंडियन स्टॅट्युटरी कमिशननें नेमलेल्या ऑक्झिलिअरी कमिटीचे अध्यक्ष सर फिलिप हरटॉग होते. त्या वरून या कमिटीस हरटॉग–कमिटी असें म्हणतात.) हरटॉग कमिटीचा अहवाल हा महत्त्वाचा असून त्यांचें बारकाईनें वाचन केलें पाहिजे. या अहवालांत प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत ज्या शिफारशी केल्या आहेत, त्या आपण पुढील प्रकरणांत पाहूं. इतर बाबतींत ज्या सूचना दिल्या आहेत, त्या खालीलप्रमाणें आहेत.

" माध्यमिक शिक्षणाचे बाबतींत कांहीं प्रगति झाली आहे; विशेषतः शिक्षकांमध्यें कार्यक्षमता वाढली आहे. त्यांना ट्रेनिंग अधिक प्रमाणांत दिलें जात असून नोकर म्हणून त्यांची स्थिति सुधारली आहे. परंतु शिक्षण योजनेंत मोठे दोष दिसून येत आहेत. माध्यमिक शाळेंत येणारा प्रत्येक विद्यार्थी विश्वविद्यालयांत गेला पाहिजे या भावनेनें माध्यमिक शिक्षणपद्धति भारावलेली आहे. मॅट्रिक्युलेशन परीक्षेमध्यें आणि विश्व-विद्यालयांच्या परीक्षेमध्यें जे असंख्य विद्यार्थी नापास होतात, त्यावरून लोकांच्या शक्तीचा अपव्यय होतो आहे, असें दिसून येत आहे. उद्योग-धंद्याचे शिक्षणाबाबत जे प्रयत्न होत आहेत त्यांचा माध्यमिक शिक्षणाशीं कोणत्याही प्रकारचा संबंध घडवून न आणल्यामुळें, धंद्याचं शिक्षणाला यावें तसें फळ येत नाहीं. पुष्कळ कॉलेजांमध्यें व विश्वविद्यालयांमध्यें अध्यापन पद्धतीमध्यें सुधारणा दिसून येत आहे. व कांहीं ठिकाणीं तर नाविन्यपूर्ण अशी कामगिरी झाली आहे. त्याचप्रमाणें कांहीं संस्थांमध्यें तरी सामुदायिक जीवनाचें पूर्वीपेक्षां बरें शिक्षण दिलें जात आहे. परंतु येथेही परीक्षा पास होणें, हेंच तत्त्व लोकांनीं स्वीकारल्याचें दिसून येतें. विश्वविद्यालयाचें शिक्षण हें माणसाची सहिष्णुता वाढविण्यासाठीं, त्याला स्वावलंबी बनविण्यासाठीं व त्याचे अंतःकरणामध्यें उदारता निर्माण करण्यासाठीं मुख्यतः आहे, ही गोष्ट लोकांना समजावी अशी आमची इच्छा आहे. उच्च शिक्षणाकरतां जे विद्यार्थी ना-लायक आहेत व इतर शिक्षणासाठीं जे अधिक लायक ठरूं शकतील, अशा विद्यार्थ्यांनीं विश्वविद्यालयामध्यें व कॉलेजामध्यें गर्दी केल्यामुळें त्या संस्थांना आपलें कार्य योग्यप्रकारें करतां येत नाहीं. मध्यवर्ती सरकारनें आपलें अंग शिक्षण विषयांतून काढून घेतलें, ही गोष्ट आमच्या दृष्टीनें चुकीची झाली. शिक्षण कार्य मुख्यतः राष्ट्रीय सेवा असली तरी मध्यवर्ती सरकारचा शिक्षणाशीं काय संबंध असावा हें ठरविण्याची वेळ आतां आली आहे, असें आम्हांस वाटतें.

प्रांताचे मंत्र्यांची जबाबदारी कमी करावी असें आम्ही सुचविलें नाहीं व सुचवीतही नाहीं. उलट आमचें मत असें आहे कीं त्यांनीं आपलें काम लोकल बोर्डावर सोपविल्यामुळें व लोकल बोर्डासही तें काम समाधान-कारक रीतीनें करतां न आल्यामुळें त्यांनीं आपलें महत्त्व कमी करून घेतलें आहे. प्रांतिक सरकार व लोकल बोर्ड यांचे संबंध काय असावेत याचा विचार होऊन ते निश्चित करण्याची वेळ आली आहे. शिक्षण खात्याचे मुख्य अधिकारी, डायरेक्टर्स ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन, यांनीं प्रामाणिकपणानें व उत्साहानें आपलें कार्य चालविलें आहे, परंतु लोकांच्या मदतीवाचून अनंत अडचणींशीं त्यांना झगडावें लागत आहे. त्यांच्या हाताखालीं काम करीत असलेला नोकरवर्ग वाढविला पाहिजे. म्हणजे शिक्षणवाढीच्या महत्त्वाच्या योजना अधिक काळजीपूर्वक हाताळल्या जातील व सर्व साधारण शिक्षण कार्यावर अधिक चांगल्या रीतीनें देखरेख केली जाईल. शिक्षणकार्यावर नियंत्रण व देखरेख रहावी या करतां अशा प्रकारचा जादा नोकरवर्ग नेमणें ही उधळपट्टी नसून त्यायोगें खर्चाची खऱ्या अर्थानें, काटकसरच होणार आहे. यापुढें प्रांतिक सरकारनें योग्य नोकरवर्ग वाढविण्याचे कामीं दिरंगाई करूं नये.

८. **लोकांचें मत:**—शिक्षण पद्धतीविषयीं अधिकारीवर्ग जसा असंतुष्ट होता, त्याप्रमाणें जनताही असंतुष्ट होती. मात्र असंतोषाची दोघांचीं कारणें भिन्न होतीं. प्राथमिक शिक्षण फार झपाट्यानें वाढल्यामुळें शिक्षणाचा दर्जा कमी झाला असें अधिकाऱ्यांना वाटत होतें; तर बहुजनसमाजाची निरक्षरता घालविण्याकरतां पडत असलेलें शिक्षणाचें पाऊल फार मंद गतीनें पडत आहे, अशी लोकांची तक्रार होती. निरक्षरता टप्याटप्यानें कांहीं काळांत समूळ नाहींशी करतां येईल, अशी योजना सरकारनें आंखावी, अशी त्यांची मागणी होती. माध्यमिक शाळांमधुन व कॉलेजांमधून इंग्रजी विषय हा कच्चा राहतो, अशी अधिकाऱ्यांची ओरड; तर या संस्थांमधून इंग्रजी विषयाचें फाजील

स्तोम माजविलें जात असून इंग्रजी दुय्यम विषय म्हणून शिकविला जावा व इंग्रजीचे ऐवजां हिंदुस्थानी राष्ट्रभाषा समजली जावी, असा लोकांचा आग्रह. शिक्षणयोजनेंतील दोष काय आहेत व शिक्षण कोणत्या उपायांनीं सुधारेल याची चिकित्सा आम्ही येथें करीत नाहीं; एवढेंच सांगवेसें वाटतें कीं पाश्चिमात्य बौद्धिक शिक्षणाचें वर्चस्व लोकांना पटेनासें झाल्यानें त्यांचा विरोध जेथें तेथें दिसून येत होता. पाश्चिमात्यांचें केवळ अनुकरण न करतां राष्ट्राच्या आकांक्षा लक्षांत घेऊन शिक्षणाचीं नवीन ध्येयें निर्माण व्हावींत, अशी त्यांची इच्छा होती. चांगलें शिक्षण हें नेहमीं महागच रहाणार, ही विचार-सरणी त्यांना कबूल नव्हती, व हिंदुस्थानसारख्या गरीब देशामध्यें देखील चांगल्याप्रकारचें शिक्षण देतां येणें शक्य आहे, हें दाखविण्याची त्यांची सारखी धडपड सुरू होती.

अधिकारी आणि जनता यांचे विचारामध्यें अशा तऱ्हेची तफावत दिसून येत होती. दोघांनीं सहकार्यानें काम केलें असतें तर हा भेद नाहींसा झाला असतां. परंतु दुर्दैवानें राजकीय वातावरण यावेळीं तंग असल्यानें हा दिलजमाईचा प्रयोग यशस्वी होऊं शकला नाहीं व यामुळें ही तेढ कमी न होतां उलट वाढत राहिली.

या काळचा मुख्य वाद 'शिक्षणाचा प्रसार' व 'शिक्षणाचा दर्जा' यांमध्यें होता. एकाला दर्जा वाढवावयाचा होता तर दुसऱ्याला प्रसार करावयाचा होता. हा वाद उच्च शिक्षण, माध्यमिक शिक्षण व प्राथमिक शिक्षण या क्षेत्रांमधून दिसून येऊं लागला. या तिन्ही क्षेत्रांमध्यें चाललेल्या घडामोडी आतां आपण पाहूं.

९. विश्वविद्यालयीन आणि कॉलेजचें शिक्षण:—१९२१ ते १९३६ या सोळा वर्षांत उच्च शिक्षणाची बरीच प्रगति झाली. खालील गोष्टींचा प्रामुख्यानें निर्देश करतां येईल.

(अ) **आंतर-विश्वविद्यालयीन समितिः**—कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशननें हिंदी विश्वविद्यालयांमध्यें सहकारिता निर्माण होण्याची जरूर आहे हें दाखविलें. १९२१ सालीं साम्राज्यांतर्गत विश्वविद्यालयीन कॉंग्रेस-नेंही हीच शिफारस केली. इंग्लंडमधील हिंदी विद्यार्थ्यांच्या लिटन कमिटीनेंही शक्य तितक्या लवकर अभ्यासक्रमांत एकवाक्यता निर्माण व्हावी यासाठीं आंतर-विश्वविद्यालयीन समिति स्थापण्यांत यावी, अशी इच्छा प्रदर्शित केली. या सर्व सूचनांचा परिणाम असा झाला कीं सिमला येथें १९२४ सालीं हिंदी विश्वविद्यालयांची अखिल भारतीय परिषद भरविण्यांत आली व तीमध्यें आंतर–विश्वविद्यालय समिति स्थापन करण्यांत आली. या समितीमध्यें प्रत्येक विश्वविद्यालयाचे प्रतिनिधी घेण्यांत येत असून १९२५ पासून या समितीच्या वेगवेगळ्या ठिकाणीं, जेथें विद्यापीठें आहेत तेथें, बैठका होतात.

(ब) **नवीन विद्यापीठांचा समावेशः**— प्रत्येक प्रांतांत एक तरी विद्यापीठ असावें व शक्य तितकीं, शिक्षण देणारीं विद्यापीठें इतर ठिकाणीं स्थापण्यांत यावींत, हें धोरण सरकारनें २१ फेब्रुवारी १९१३ ला ठराव करून जाहीर केल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. या धोरणाप्रमाणें शिक्षणप्रसार होऊन पांच नवीं विद्यापीठें अस्तित्वांत आलीं. दिल्ली प्रांतांत दिल्ली येथें; मध्यप्रांत व वऱ्हाड यांसाठीं नागपूर येथें; मद्रास प्रांतांतील तेलगू भाषा बोलणाऱ्या लोकांकरतां आंध्र विश्व-विद्यालय, संयुक्तप्रांत, मध्यहिंदुस्थान व ग्वाल्हेर या भागाकरतां संयुक्त स्वरूपाचें आग्रा विद्यापीठ व मद्रास प्रांताकरतां, राजा सर अन्नामली चेटीयर यांचे उदार देणगीमुळें अस्तित्वांत आलेलें व स्वयंपूर्ण, अध्यापि व वसतिगृहयुक्त असें चिदंबरम् विद्यापीठ.

(क) **संयुक्त स्वरूपाच्या विश्वविद्यालयामध्यें बदलः**—या काळांत जुन्या हिंदी विश्वविद्यालयामध्यें देखील महत्त्वाचे फरक घडून आले. १९२३ व १९२९ च्या कायद्यानें मद्रास, १९२८ च्या कायद्यानें

मुंबई, १९३२ च्या कायद्यानें पाटणा, येथील विश्वविद्यालयाच्या घटनेमध्यें बदल घडून आले. विद्यालयाचे कारभारांत सुधारणा व्हावी व उच्च शिक्षण आणि संशोधन या कामीं विद्यार्थ्यांना ज़ास्त सवलती देण्यास विद्यापीठांना समर्थ करावें, हा सुधारणा घडवून आणण्याचा मुख्य हेतु होता. अलाहाबाद विश्वविद्यालय पूर्णत्वानें शिक्षण देणारें विद्यालय बनलें, व कलकत्ता आणि पंजाब विद्यालयांमध्यें शिक्षणाचें कार्य अधिक प्रमाणांत होऊं लागलें.

(ड) **विश्वविद्यालयीन शिक्षणाचा प्रसार:**—विश्वविद्यालयाच्या शिक्षण देणाऱ्या शाखा व त्यामध्यें समाविष्ट केलेलीं कॉलेजें यांची संख्या १९२१-२२ सालीं २०७ होती, ती १९३६-७ सालीं ४४६ झाली. त्याचप्रमाणें मुलांची संख्या या १५ वर्षांत ६६२५८ वरून १२६२२८ वर गेली. शिवाय अभ्यासक्रमांत नवीन विषय घेऊन ते शिकविण्याची तरतूद करण्यांत आली.

(ई) **संशोधन कार्य:**—या काळांत बहुतेक सर्व विश्वविद्यालयांमधून संशोधन कार्य सुरूं झालें. १८५४ ते १९०२ पर्यंतच्या काळांतील विश्वविद्यालयापुढें जें कार्य येऊन पडलें होतें तें योग्य शिक्षण देण्याचे ऐवजी, हिंदी मनावर झालेले पूर्वापार संस्कार काढून टाकून पाश्चिमात्य जीवनांतील सर्वोत्कृष्ट विचाराशीं व संस्कृतीशीं त्यास समरस करणें हें होतें. १९०२ ते १९२१ चे काळांत मात्र विश्वविद्यालयानें आपलें लक्ष शिक्षण व संशोधन यांकडे लाविलें, परंतु त्यामध्यें त्यांनीं म्हणण्यासारखी प्रगति केली नाहीं. १९२१-३७ चे काळांत पूर्वी केलें नव्हतें एवढें संशोधन क्षेत्रांत कार्य करण्याचें त्यांनीं ठरविलें. हें कार्य (१) पुस्तकालय व संशोधन यांकरतां स्वतंत्र शाखा उघडणें, (२) संशोधन कार्यासाठीं पदव्या निर्माण करणें, (३) संशोधनासाठीं शिष्यवृत्त्या ठेवणें, आणि (४) विद्यालयांमार्फत पत्रिका प्रसिद्ध करणें, या साधनांनीं होऊं लागलें. हिंदी विश्वविद्यालयांनीं अशारीतीनें ज्ञानसागरामध्यें अव-

गाहन करण्यास प्रारंभ केला आहे व तीं आपल्या पूर्व संस्कृतीस अनुलक्षून लोभनीय अशी थोर कामगिरी करून दाखवितील अशी आशा वाटते.

(फ) कॉलेज व विश्वविद्यालय अंतर्गत वाढः—विश्वविद्यालयांमध्यें समाविष्ट असलेल्या कॉलेजाकॉलेजांमध्यें खेळाचे सामने होऊं लागले, व ही प्रथा सर्व विद्यालयांमध्यें रूढ झाली. विश्वविद्यालयाचे समितीनें देखील विश्वविद्यालयांतर्गत खेळ सुरू केले. या योगें देशांतील विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा जास्त संबंध येऊं लागला व हिंदी राष्ट्रीय जीवनाचे वाढीस यानें मदत होऊं लागली.

(जी) लष्करी शिक्षणाची सोयः—लष्करी शिक्षण देण्यासाठीं युनिव्हर्सिटी ट्रेनिंग कोभरची स्थापना झाली. ही संस्था लोकप्रिय झाली व अशा कोअरस्—किंवा लष्करी तुकड्या—अधिक ठिकाणीं उघडण्यांत याव्यात, इतकेंच नव्हे तर, सक्तीचें लष्करी शिक्षण सुरू करावें, अशी इच्छा लोक प्रदर्शित करूं लागले. कांहीं विश्वविद्यालयांनीं ' लष्करी शिक्षण ' हा एक विषय कल्पून तो शिकविण्यास सुरवातही केली.

(एच्) विद्यार्थ्यांचें, वास्तव्य व आरोग्यः—विद्यार्थ्यांचें आरोग्य कसें सुधारेल व त्यांची राहण्याची सोय कशी करतां येईल, या प्रश्नाचा सर्व विश्वविद्यालयांनीं काळजीपूर्वक विचार केला, आणि ज्या गोष्टी करणें शक्य होतें त्या केल्या. बऱ्याच विद्यालयांनीं विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी घेण्यास व कांहींनीं सक्तीनें शारीरिक शिक्षण देण्यास सुरवात केली. वसतिगृहाची व्यवस्था, नियंत्रण यांसंबंधीचे नियम तयार करण्यांत आले. अजून या बाबतींत जरी बरेचसें कर्तव्य राहिलें असले तरी, या गोष्टींकडे सर्व विद्यालयांनीं पूर्ण लक्ष दिलें.

१० माध्यमिक शिक्षणः—

(अ) वाढः—या काळांत महत्वाची गोष्ट म्हणजे माध्यमिक शाळांची वाढ. ही वाढ कशी झाली हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

	१९२१–२२	१९३६–७
मान्य शाळांची संख्या	७,५३०	१३,०५६
या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या	११,७६,८०३	२२,८७,८७२

टीपः—आंकडयामध्यें ब्रह्मदेशाचा समावेश होत नाहीं.

ही वाढ होण्यास अनेक कारणें झालीं. बहुजन समाजामध्यें शिक्षणाविषयीं जागृति हें त्यांपैकीं प्रमुख कारण आहे. खेडयाचे हद्दींतून व लहान शहरांतून माध्यमिक शाळा निघूं लागल्या. शिक्षणांत मागासलेल्या वर्गांत या शिक्षणाचा फैलाव व्हावा, म्हणूनही प्रयत्न झाले. जे लोक या शाळांकडे पूर्वी ढुंकूनही पहात नव्हते ते आपलीं मुलें शाळेंत पाठवूं लागले.

दुसरेः—कांहीं व्यक्तींनीं व संस्थांनीं लहान मोठ्या खेडयांतून माध्यमिक शाळा उघडिल्या. यास अनेक कारणें झालीं. आपल्या गांवांत आपण कांहीं तरी अधिक करून दाखविलें पाहिजे, असा गांवाबद्दल लोकांचे ठिकाणीं अभिमान निर्माण झाला. लहान वयांत दूर मुलें पाठविण्यापेक्षां त्यांचे शिक्षणाची सोय गांवांतच झाली तर उत्तम, ही लोकांची इच्छा. मुलांना शिक्षणाकरतां पाठविणें ही खर्चाची बाब असते. शिवाय कोवळया वयांत मुलें बाहेर राहूं लागलीं म्हणजे शहरी मोहाला तीं बळी पडतात कीं काय, हीहि भीति पालकांना वाटते. लहान मोठ्या खेडयांतून शाळा झाल्यानें अशा पालकांची मोठी सोय झाली. कांहीं ठिकाणीं समाज सुधारकांनीं आपण होऊन हें कार्य हातीं घेतलें. कांहीं ठिकाणीं एका शिक्षण संस्थेंतील कार्यकर्त्यांमध्यें भांडणें होऊन त्यांतून दुसऱ्या संस्था जन्मास आल्या. कधीं कधीं तर सुशिक्षित बेकारीही या शाळा वाढीस कारण झाली आहे. दुसऱ्यास शिकविण्याशिवाय ज्याला पोट भरण्याचें कोणतेंच साधन नव्हतें, त्यांनीं आपल्या

पोट्टासाठीं शाळा उघडल्या. या सर्व कारणांमध्यें पहिलीं दोन कारणें विशेष महत्वाचीं आहेत.

स्त्रियांना उच्च शिक्षण देण्याकरतां जे प्रयत्न झाले त्यायोगेहीं अधिक माध्यमिक शाळा वाढल्या.

या सर्व प्रयत्नांचे तीन गट पाडतां येतील.

(१) सरकारी प्रयत्न—सरकारनें नवीन शाळा स्थापिल्या, सरकारी शाळांमधून कांहीं वर्गांकरितां जागा राखून ठेविल्या, विद्यार्थ्यांना नादाऱ्या व शिष्यवृत्त्या दिल्या व विशिष्ट वर्गांना सरकारी नोकऱ्या देण्यास सुरवात केली.

(२) खाजगी संस्था—खाजगी संस्थांनी फंड जमा केले. आपल्या जातीकरतां शिष्यवृत्त्या ठेविल्या व मुलांकरतां वसतिगृहांची सोय केली.

(३) व्यक्ति—कांहीं श्रीमंत दात्यांनीं व समाज कार्यकर्त्यांनीं स्वतः होऊन शाळा उघडल्या.

शाळा वाढीस विशेषतः खाजगी प्रयत्न जास्त कारणीभूत झाले. ही गोष्ट खालील आंकड्यावरून स्पष्ट होईल.

	१९२१–२	१९३६–७
मुलांच्या शाळा		
सरकारी	३७९	४३६
बोर्डाच्या	२,२७३	५,६४९
खाजगी—मदतीच्या	२,८८३	४,०७३
विगरमदतीच्या	१,३२०	१,५७३
एकूण मुलांच्या शाळा	६,८५५	११,७३१

	१९२१–२	१९३७–७
मुलींच्या शाळा		
सरकारी	११५	२०७
बोर्डाच्या	७०	२३५
खाजगी —मदतीच्या	४६८	७९९
बिगरमदतीच्या	२२	८४
एकूण मुलींच्या शाळा	६७५	१,३२५

वरील तक्त्यावरून असें दिसेल कीं सरकारी शाळा फक्त १४९ नीं वाढल्या, परंतु खाजगी शाळा मात्र १८३६ नीं (१५२१ मदतीच्या व ३१५ बिनमदतीच्या) वाढल्या. मुलांची संख्या या वेगवेगळ्या शाळांतून कशी होती हें देतां येत नाहीं; तरी त्यांचें प्रमाण शाळेच्या प्रमाणांत होतें, असें गृहीत धरावयास कांहींच हरकत नाहीं.

(ब) **शिक्षणाचें माध्यम:**—बहुतेक माध्यमिक शाळांमधून मातृ-भाषा हें माध्यम बनू लागलें, हें या काळाचें वैशिष्ट्य आहे. कागदावर नमूद केलेले सरकारी हुकूम पाहिले तर, मातृभाषा पूर्णत्वानें माध्यम होण्यास कोणताच प्रत्यवाय नव्हता. परंतु नियम व त्यांची अंमलबजा-वणी यामध्यें नेहमीच कांहीं काळाचें अंतर पडतें. ज्या अनेक कारणां-मुळें इंग्रजी हें माध्यम नष्ट होऊं शकलें नाहीं तीं कारणें अशीं.

(१) माध्यमिक शाळा म्हणजे विश्वविद्यालयीन उच्च शिक्षणाकडे नेणारा मार्ग असल्यानें व उच्च शिक्षणाचें माध्यम इंग्रजी असल्यानें, माध्यमिक शाळेंतही तेंच माध्यम ठेवण्याकडे अनेक शाळाचालकांची प्रवृत्ति दिसून आली.

(२) सरकारी नौकरीकरतां ज्या स्पर्धा–परीक्षा घेण्यांत येतात, त्या इंग्रजींतून घेण्यांत येत असल्यानें व सरकारी नौकरी हेंच ध्येय राहिल्यानें, विद्यार्थ्यांनीं व पालकांनीं इंग्रजी–माध्यमच अधिक पसंत केलें.

(३) ज्या ठिकाणीं अनेक भाषा बोलल्या जातात, त्या ठिकाणीं प्रत्येक भाषेची माध्यमिक शाळा चालविणें खर्चाचें असल्यानें, सर्वांकरतां स्थापिलेल्या शाळेंत इंग्रजी भाषा माध्यम ठेवणें भाग पडलें.

(४) मातृभाषा माध्यम करण्याच्या या प्रायोगिक काळांत, शास्त्रीय विषयाचा पारिभाषिक शब्द–संग्रह, योग्य क्रमिक पुस्तकें व लायक शिक्षक, यांचा अभाव दिसून येत असे. परंतु या अडचणींना फाजील महत्त्व दिलें जात असे कित्येक वेळां व्यवहारांत या अडचणी दूर झाल्या तरी मुळच्या सबबी पुढें करून इंग्रजी माध्यम हेंच चालूं ठेवण्यांत येत असे.

(५) **हिंदी–उर्दूचे प्रदेशः**—संयुक्त प्रांतासारख्या ठिकाणीं भाषेपेक्षां लिपीची अडचण जास्त दिसून येई. उदाहरणार्थ, त्या प्रांतांत असा सरकारी हुकूम असें कीं शिक्षण देण्यासाठीं जी भाषा वापरावयाची ती हिंदी आणि उर्दू भाषा बोलणाऱ्या मुलांना समजावी, अशी असावी. या नियमाची बजावणी करतांना फळ्यावर देवनागरी आणि उर्दू लिपीमध्यें किंवा रोमन लिपीमध्यें लिहावें लागे. दोन्ही जमातींना समजेल अशी भाषा वापरण्यानें व्यावहारिक फायदा होता. दोन्ही भाषांच्या संघर्षानें एक संमिश्र भाषा निर्माण होईल व ती संस्कृतप्रचुर हिंदी किंवा पर्शियनप्रचुर उर्दू पेक्षां चांगली ठरेल, असा कांहींचा विश्वास होता. धड उर्दूही नाहीं व धड हिंदीही नाहीं, अशी मोडतोडकी धेडगुजरी भाषा बोलण्यापेक्षां दोन्ही भाषांच्या संमीलनानें सुटसुटीत व जोरदार भाषा निर्माण होऊं शकते असेंही कांहीं ठिकाणीं प्रतिपादिलें जात होतें.

१९३७ पर्यंत माध्यमिक शाळांतून माध्यम काय असावें हा प्रश्नच राहिला नाहीं. या कामीं पूर्ण विजय संपादण्यास अजून थोड्या अडचणी होत्या. परंतु त्या अडचणी दुर्गम अशा नव्हत्या. उच्च शिक्षणामध्यें इंग्रजी माध्यमाविषयींचीच काय ती अडचण राहिली होती व ती दूर करण्यासारखी नव्हती. यामुळें आतां शिक्षणतज्ज्ञांपुढें तीन प्रश्न उभे होते. उच्च शिक्षणाचें माध्यम, हिंदुस्थानासाठीं राष्ट्रीय भाषेची वाढ व सर्व ठिकाणीं सारखे उपयोगिले जातील अशा शास्त्रीय पारिभाषिक शब्दांची निर्मिती.

(क) **माध्यमिक शाळेंतील शिक्षकांचे प्रश्नः**—शिक्षकांना ट्रेनिंग देण्याचे बाबतींत जी सुरवात झाली होती, ती या काळांत दुणावली. १९३६-७ माध्यमिक शाळांतील शिक्षकांना ट्रेन्ड करण्यासाठीं १५ ट्रेनिंग संस्था होत्या, व त्यांमध्यें १४८८ विद्यार्थी—१४७ स्त्री शिक्षिका धरून—शिक्षण घेत होते. माध्यमिक शाळांमध्यें ट्रेंड शिक्षकांचें प्रमाण खालील प्रमाणें होते.

मद्रास	८४·७	मुंबई	२२·८
बंगाल	२०·७	संयुक्तप्रांत	६७·२
पंजाब	८९·७	बिहार	५४·४
मध्यप्रांत	७०·२	आसाम	३९·०
सरहद्द प्रांत	८०·३	सिंध	१६·५
ओरिसा	७०·८	दिल्ली	८२·८

परंतु या काळांत विशेष लक्ष शिक्षकांचें ट्रेनिंग कसें सुधारावें या गोष्टीकडे नसून, सर्वत्र पसरलेल्या खाजगी शाळांतून काम करीत असलेल्या शिक्षकांचे पगाराचें प्रमाण काय असावें व नोकरीच्या अटी कोणत्या असाव्या याकडे होतें. खाजगी शाळांचें उत्पन्न फार थोडें असल्यानें शिक्षकांचा पगार फार अपुरा होता. कांहीं अपवाद सोडल्यास नोकरीच्या अटी जबरदस्त जबळ नव्हत्याच. त्यामुळें नोकरीची

शाश्वति व वृद्धपणासाठीं कांहीं तरतूद नसे. आजवर दुर्लक्षिलेल्या या प्रश्नाकडे आतां सरकारचें लक्ष लागलें. शिक्षकांना योग्य पगार मिळाल्याशिवाय व त्यांच्या नोकरीच्या अटी सुधारल्याशिवाय माध्यमिक शाळेंतील शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा नाहीं, अशी सरकारची खात्री झाली. आणि म्हणून या शाळांतील शिक्षकांसाठा प्राव्हिडंट फंडाची योजना प्रांतिक सरकारनं हातीं घेतली; शिक्षकांना चांगला पगार देतां यावा यासाठीं शाळांची मदत वाढविण्याचें ठरविलें व शिक्षकांना नोकरीची शाश्वती असावी यासाठीं शाळांवर अधिक कडक नियंत्रण ठेवण्यांत येऊं लागलें.

(ड) **धंदे शिक्षणाची सोय:**—माध्यमिक शिक्षणामध्यें धंदे शिक्षणाची काय सोय करावी, हा प्रश्न पूर्वापेक्षां अधिक कठीण व गुंतागुंतीचा होऊन बसला. याला तीन कारणें झालीं. पहिलें—माध्यमिक शिक्षणाचा प्रसार इतक्या झपाट्यानें झाला कीं, वाङ्मयीन शिक्षणापेक्षां ज्यांचा कल औद्योगिक शिक्षणाकडे विशेष आहे, असे विद्यार्थीही माध्यमिक शाळांत गुरफटून गेले. दुसरें—खेड्यांतून माध्यमिक शाळा सुरू झाल्या. खेड्यांतील परिस्थितीप्रमाणें त्यांत काय फरक करावा, हा प्रश्न नव्यानें उत्पन्न झाला. तिसरें—मुलींची संख्या माध्यमिक शाळांतून वाढल्यामुळें त्यांच्या गरजा लक्षांत घेऊन अभ्यासक्रमांत कोणता बदल करावा, ही नवी अडचण उद्भवली. दुर्दैवानें या अडचणींतून कसें बाहेर पडावें, हें समजेना. यासाठीं मध्यवर्ती सरकारनें सार्वभौम सरकारला अशी विनंति केली कीं हिंदुस्थानांतील शैक्षणिक परिस्थिति पाहून योग्य मार्ग दाखविण्यासाठीं तज्ज्ञांना पाठविण्यांत यावें. या विनंतीस मान देऊन सार्वभौम सरकारनें वुड व ॲबट या गृहस्थांना हिंदुस्थानांत पाठविलें, व त्यांनीं धंदेशिक्षणाची योजना कशी आखावी यावर आपला अहवाल तयार केला.

११. प्राथमिक शिक्षण:—द्विदल राजव्यवस्थेमध्यें घडलेली महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्राथमिक शिक्षणाचा प्रसार. हिंदी शिक्षण पद्धतीमध्यें प्राथमिक शिक्षणाची फार आबाळ झाली होती व त्याबद्दल सरकारचर नेहमी टीकाही होत असे. बहुजनसमाजांत शिक्षणप्रसार व्हावा व निरक्षरतेचें निर्मूलन व्हावें, अशी जनतेची तीव्रतर इच्छा असल्यानें, हिंदी मंत्री हा प्रश्न हातीं घेऊन प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक, मोफत व सक्तीचें करतील, अशी जनतेची अपेक्षा होती. या अपेक्षेप्रमाणें मंत्र्यांनीं कार्य केलें. निरक्षरतेविरूद्ध त्यांनीं मोहीम कशी सुरू केली, हें खालील विवेचनावरून दिसून येईल.

(ब) प्राथमिक शिक्षणाचे कायदे:—१९१७-२८ च्या काळांत ब्रिटिश इंडियामधील बहुतेक प्रांतांमध्यें सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचे कायदे पास झाले. कांहीं ठिकाणीं शिक्षण खातें लोकांकडे सोपविण्यापूर्वीच हे कायदे पास करण्यांत आले होते. परंतु त्यांची अंमलबजावणी ज्याअर्थी या काळांत होऊ लागली, त्याअर्थी द्विदल राज्यकारभारामध्येंच त्यांचाही अंतर्भाव करण्यांत आला आहे.

सक्तीचे शिक्षणाचा कायदा प्रांतावार कसा पास झाला हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

वर्ष	प्रांत	कायद्याचें नांव	सक्ती मुलग्यांकरितां कीं मुलींकरतां	शहरांमध्यें कीं खेडे विभागांत
१९१९	पंजाब	प्रायमरी एज्यु. ॲक्ट	मुलगे	दोन्ही
,,	संयुक्त प्रांत	,,	दोन्ही	म्युनिसिपल हद्द
,,	बंगाल	,,	मुलगे (१९३२ मध्यें मुली)	,,
,,	बिहार व ओरिसा	,,	मुलगे	दोन्ही

वर्ष	प्रांत	कायद्याचें नांव	सक्ती मुलग्यांकरितां कीं मुलींकरितां	शहरांमध्यें कीं खेडे विभागांत
१९२०	मुंबई	सिटिझन ऑफ बॉंबे पी. ई. ॲक्ट	दोन्ही	मुंबई शहर फक्त
,,	मध्यप्रांत	पी. ई. ॲक्ट	,,	दोन्ही
,,	मद्रास	इलिमेंटरी एज्यु. ॲक्ट	,,	,,
१९२३	मुंबई	पी. ई. ॲक्ट	,,	मुंबई शहर सोडून सर्व प्रांत
१९२६	आसाम	पी. ई. ॲक्ट	दोन्ही	दोन्ही
,,	संयुक्त प्रांत	डिस्ट्रिक्ट बोर्डस् पी. ई. ॲक्ट	,,	खेडेविभागांत फक्त
१९३०	बंगाल	बंगाल (रूरल) पी. ई. ॲक्ट	,,	,,

प्रत्येक कायद्याचा अभ्यास करून विवेचन करणें, हें या पुस्तकाच्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे. परंतु त्यांतील सर्व साधारण मुद्यांकडे लक्ष देणें अत्यंत जरूर आहे.

(१) या कायद्यानें प्राथमिक शिक्षणाचा कारभार स्थानिक स्वराज्य संस्थेकडे (म्युनासिपालिटचा व लोकलबोर्डे) सोपविण्यांत आला. आप-आपल्या विभागांत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यांत आली.

(२) आपल्या कक्षेंतील लोकांच्या गरजा काय आहेत, तें लक्षांत घेऊन शिक्षण-प्रसाराची योजना आखण्याचें कर्तव्य स्थानिक स्वराज्य संस्थेचें आहे, हें ठरविण्यांत आलें.

(३) शिक्षणाचे बाबतींत सक्ति करण्याचें कार्य स्थानिक सरकारकडे सोंपविण्यांत आलें. मुंबई सारख्या कांहीं प्रांतांमधून हा अधिकार, कांहीं विशिष्ट परिस्थितीमध्यें, सरकारनें आपल्याकडे राखून ठेविला.

(४) सक्तीच्या किंवा खुशीच्या शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची भरपाई करण्यासाठीं, शिक्षण–कर बसविण्याचा अधिकार सर्व प्रांतांतून स्थानिक सरकारास देण्यांत आला.

(५) स्थानिक स्वराज्य संस्थेस सक्तीचे शिक्षणाचे कामीं मदत देण्याची जबाबदारी, सर्व प्रांतांमधून प्रांतिक सरकारनें स्वीकारली.

(६) कोणत्या वयापासून सक्ति करावयाची, याविषयीं प्रांताप्रातांमधून एकवाक्यता नाहीं. ज्या ठिकाणीं प्राथमिक शिक्षण फक्त चार वर्षाचें आहे, तेथें साधारणतः ६ ते १० वर्षाचें वय निश्चित करण्यांत आलें. यास अपवाद फक्त पंजाब आहे. तेथें ७ ते ११ वर्षाचा विकल्प ठेवण्यांत आला आहे. जेथें अभ्यासक्रम ५ वर्षाचा आहे, तेथें वयोमर्यादा ६ तें ११ ची ठेवण्यांत आली आहे.

(७) आपलीं मुलें शाळेंत न पाठविल्यास सर्व कायद्याप्रमाणें, पालकावर फिर्याद करतां येते. मद्रासशिवाय सर्व ठिकाणच्या कायद्यानें, सक्तीच्या वयोमर्यादेंत असणाऱ्या मुलांना कामावर लावणें हा गुन्हा ठरविण्यांत आला आहे.

वरील मुद्दे लक्षांत घेतले म्हणजे असें दिसून येईल कीं प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी सर्व प्रांतांत स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सोंपविण्यांत आली. प्रांतिक सरकारनें स्थानिक सरकारच्या घटना अधिक व्यापक बनविल्या, कर बसविण्याचा आणि सक्ति करण्याचा अधिकारही त्यांना देण्यांत आला.

या काळांत प्राथमिक शिक्षणाचें बाबतींत प्रांतिक सरकारनें स्थानिक स्वराज्य संस्थेस जादा अधिकार देऊन तिचे वाढीस मोठें सहाय्य केलें, असें म्हणावयास हरकत नाहीं.

(क) १९२२-२७ मधील कार्यनिष्पत्तिः—हिंदी मंत्र्यांकडे शिक्षणाचा ताबा आल्यावरोबर त्यांनीं योजना आंखण्यास व कार्यक्रम तयार करण्यास सुरवात केली; व प्रांतिक सरकारनेंही जादा पैसा पुरविला. यामुळें १९२२ ते १९२७ मध्यें प्राथमिक शिक्षणाचा बराच प्रसार झाला. ही गोष्ट खालील तक्त्यांवरून दिसून येईल.

तक्ता १.

	१९२१-२२	१९२६-२७
१ प्राथमिक शाळांची संख्या	१,५५,०१७	१,८४,८२९
२ या शाळांतील मुलांची संख्या	६१,०९,७५२	८०,१७,९२३
३ यावर झालेला सरकारचा प्रत्यक्ष खर्च	४,९४,६९,०८०	६,७५,१४,८०२

तक्ता २

सक्तीचें क्षेत्र.

प्रांत		शहरें व म्युनिसिपालिट्या	डिस्ट्रक्ट बोर्डे व खेडे विभाग
मद्रास	...	२१	३
मुंबई	...	६	...
संयुक्त प्रांत	...	२५	...
पंजाब	...	५७	१,४९९
बिहार, ओरिसा	...	१	३
मध्यप्रांत	...	३	६६
दिल्ली	...	१	...
एकूण	...	११४	१,५७१

(ड) १९२७ ते १९३७ काळांतील घडामोडी:—पुढील दहा वर्षांत मात्र शिक्षण प्रसाराचें काम मंदावलें. त्याला दोन कारणें झालीं. पहिलें—आर्थिक मंदी. या योगें आखलेल्या योजना पाडून ठेवाव्या लागल्या, इतकेंच नव्हें तर, चालू खर्चामध्यें देखील काट करावी लागली. दुसरें—हरटॉग कमिटीचा अहवाल. या कमिटीनें सरकारास अशी शिफारस केली कीं, सरकारनें शिक्षण प्रसार करण्याचे ऐवजीं, आहे त्या शिक्षणाचा दर्जा वाढविण्याचा प्रयत्न करावा. सरकारी अधिकाऱ्यांच्या धोरणावर या शिफारशीचा परिणाम झाला.

हरटॉग कमिटीनें प्राथमिक शिक्षणाकडे मात्र अधिक लक्ष पुरविण्याची शिफारस केली. तिचें असें मत होतें कीं सरकारचे लक्ष उच्च शिक्षणाकडे बरेंच गुंतल्यामुळें प्राथमिक शिक्षणाचें प्रश्नाकडे जावें तसें लक्ष दिलें गेलें नाहीं. ही सूचना प्रथमच हरटॉग कमिटीनें केली नाहीं. त्यापूर्वी १८५४ च्या खलित्यानें, १८६६–७० च्या काळांत मध्यवर्ती सरकारनें प्रसिद्ध केलेल्या आपल्या लेखानें, १८८२ च्या इंडियन एज्यु. कमिशननें व ११ मार्च १९०४ च्या, शिक्षण विषयक धोरण निश्चित करणाऱ्या सरकारचे ठरावानें, अशाच प्रकारची सूचना केली होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. याचा अर्थ असा कीं, गेल्या शंभर वर्षांत प्राथमिक शिक्षणासंबंधीं अनेक शिफारशी, ठराव, योजना झाल्या असतांही, हा प्रश्न मनावर घेऊन कोणीच सोडविण्याचा प्रयत्न केला नाहीं.

गळती व कुचंबणा हीं कोणत्या दोषांमुळें घडून येतात हें कमिटीनें दाखविलें व ते दोष सुधारण्यासाठीं खालीलप्रमाणें शिफारशी केल्या.

(१) शिक्षणाचा प्रसार करण्याऐवजी, त्याचें दृढीकरण करण्याचे प्रयत्न करावेत.

(२) प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम कमीत कमी चार वर्षांचा असावा.

(३) प्राथमिक शाळांतील शिक्षकाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यांत यावा. ट्रेनिंगची मुदत लांबविण्यांत यावी. ट्रेनिंग संस्थेमध्यें योग्य शिक्षकांची नेमणूक करून त्या कार्यक्षम करण्यांत याव्यात. शिक्षकांचीं संमेलनें व परिष्कार सत्रें (Refresher courses) वारंवार भरविण्यांत यावींत. प्राथमिक शिक्षकाचें पगाराचें प्रमाण असें असावें कीं त्यायोगें लायक माणसें या धंद्याकडे आकर्षिलीं जातील.

(४) प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व्यापक करण्यांत यावा.

(५) ऋतुमानाप्रमाणें व स्थानिक परिस्थितीप्रमाणें शाळांच्या वेळा ठेवण्यांत याव्यात.

(६) प्राथमिक शाळांतील खालचे वर्गांकडे अधिक लक्ष पुरविण्यांत यावें व अशारीतीनें या शाळांतून चालू असलेली गळती व कुचंबणा कमी करण्यांत यावी.

(७) खेड्यांची सुधारणा करण्याचे प्रयत्न व्हावेत व ते प्रयत्न शाळेशीं केंद्रित व्हावेत.

(८) प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत मर्यादेपेक्षां अधिक सत्ता स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सोपविण्यांत आली आहे. प्राथमिक शिक्षण हें राष्ट्रीय दृष्ट्या महत्वाचें असल्यानें सरकारनें अधिक नियंत्रण आपल्याकडे घ्यावें व शाळांची स्थिति सुधारावी.

(९) सरकारनीं तपासणी अमंलदार जास्त प्रमाणांत नेमावेत.

(१०) सक्ति जारी करण्याचे प्रयत्न घाईघाईनें होऊं नयेत. अगोदर भूमि काळजीपूर्वक तयार करण्याकडे अधिक लक्ष पुरविण्यांत यावें.

या अहवालाचें स्वागत अधिकारी वर्गानें मोठ्या आनंदानें केलें. या काल-खंडांत या तत्त्वप्रणालीचा पगडा त्यांचे विचारावर बसला.

या काळांत प्रसिद्ध झालेले, वेगवेगळ्या प्रांतांतील शिक्षण खात्याच्या डायरेक्टरांचे अहवाल पाहतां असें दिसून येईल कीं, सर्वांचे विचार एकाच नमुन्याचे होते. कुचंबणा व गळती होत आहे, लोकलबोर्डाकडे जास्त सत्ता गेली आहे, तपासणी अंमलदार कमी पडतात, वगैरे दोष बहुतेकांनीं दाखविले आहेत. १९१२ च्या सरकारी ठरावांत, आहे तें शिक्षण सुधारण्याचें जें धोरण स्वीकारण्यांत आलें होतें, त्याच धोरणाकडे आजही अधिकाऱ्यांचा कल होता. लोकांची जोराची मागणी होती म्हणून कांहीं काळपर्यंत, १९२२-२७ चे काळांत शिक्षण प्रसारास पाठिंबा देण्यांत आला होता. हरटॉग रिपोर्ट म्हणजे सरकारी विचाराचा विजय होता, कारण 'शिक्षण प्रसार परिणामकारक होत नसून खर्चाचा अपव्यय होतो, यासाठीं विस्तार धोरण न स्वीकारतां शिक्षणाचें दृढीकरण करण्यांत यावें' हें जें अधिकाऱ्यांचें धोरण होतें, तेंच रिपोर्टानें उचलून धरिलें होतें.

प्रांतांचें धोरण या काळांत कोणत्या प्रकारचें होतें हें पाहणं थोडें मनोरंजक आहे. उदाहरणार्थ, कांहीं ठिकाणीं घुमघडाक्यानें सुरू केलेल्या प्राथमिक शाळांविरुद्ध ओरड ऐकूं येते. मध्य-प्रांताचा १९२७-३२ चा अहवाल म्हणतो 'कमी प्रतीच्या शाळा व ज्या शाळांतून मुलांची संख्या कमी आहे त्या बंद करण्यांत आल्या आहेत.' बिहार ओरिसाच्या पंचवार्षिक (१९२७-३२) च्या अहवालांत म्हटलें आहे कीं, या काळाचे सुरवातीस 'पुष्कळ बोर्डांनीं विनाकारण घाई करून जादा शाळा उघडल्या.' खर्च कमी केला त्याचा परिणाम इष्टच झाला, कारण बिनमदतीच्या शाळा त्यायोगें बंद झाल्या. मुंबईमध्यें या पांच वर्षांत फक्त ७९७ शाळांची वाढ झाली. तरी एज्युकेशनल कमिशनरानें असे उद्गार काढले आहेत कीं आर्थिक स्थिती असमाधानकारक असतां व शिक्षणाच्या दुसऱ्या अंगाकडे लक्ष देणें जरूर असतां तिकडे दुर्लक्ष करून शिक्षण प्रसार इतक्या झपाट्यानें करणें हें शहाणपणाचें आहे कीं कसें याबद्दल मात्र शंका वाटते.' मद्रास प्रांतामध्यें तर शाळांची एकूण संख्या

१९२७ सालीं ४६,३८९ होती ती १९३७ सालीं ४१,१२१ वर आली. त्या प्रांताचे डायरेक्टरानें असें म्हटलें आहे कीं १९२० ते १९३० चे काळांत शिक्षण प्रसार जोरानें करण्यांत आला व त्यामुळें ज्यांची सांपत्तिक स्थिति वाईट आहे व ज्या शाळा अस्तित्वांत येण्याचीच जरूर नव्हती, अशा अत्यंत कमी मगदुराच्या शाळा जन्मास आल्या. या विस्तार धोरणास दृढीकरणाची प्रतिक्रिया निर्माण झाली व त्यामुळें बऱ्याच शाळा बंद झाल्या.'' आणखी उतारे घेण्याची जरूर नाहीं. वरील उताऱ्यांवरून हरटॉग रिपोर्टाचे विचाराचा पगडा अधिकारी वर्गावर किती पडला होता, हें दिसून येईल.

या उलट, लोकांना हा हरटॉग साहेबांचा रिपोर्ट आवडला नाहीं. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें होतें—

(१) शिक्षण प्रसार व्हावा, अधिक जोरानें व्हावा, असें त्यांना वाटत होतें. बहुजनसमाजामध्यें शिक्षणप्रसार मंदगतीनें होत आहे. १८८१ मध्यें साक्षरतेचें प्रमाण २·५ होते तें १९३१ मध्यें फक्त ८ झालें आहे; म्हणजे प्रत्येक दहा वर्षांत एक टक्क्यानेंही वाढ झालेली नाहीं. लोकसंख्येच्या प्रमाणांतही साक्षरतेची वाढ दिसून येत नाहीं. लोकसंख्या प्रत्येक वर्षाला एका टक्क्यानें वाढते आहे. साक्षरतेच्या वाढीपेक्षां निरक्षरतेची वाढ अधिक आहे. शिक्षण नुसतें झिरपून उपयोग नाहीं. तर त्याचे पाट वाहिले पाहिजेत, निरक्षरता नाहींशी करण्याची निश्चित योजना आखून त्याप्रमाणें प्रयत्न झाल्याशिवाय, बहुजनसमाजाचे शिक्षणाचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं.

(२) 'प्रथम शिक्षणाचा दर्जा व नंतर प्रसार' हें सरकारी धोरण लोकांना मान्य नव्हतें. कदाचित् हें धोरण माध्यमिक व उच्च शिक्षणाचे बाबतींत योग्य असेल, परंतु ज्या ठिकाणीं ९२ टक्के लोक निरक्षर आहेत, तेथें तें अयोग्य आहे. निरक्षरता प्रथम घालवून टाकणें हा मुख्य

हेतु सरकारनें आपल्या डोळ्यापुढें ठेविला पाहिजे. जनता साक्षर झाली म्हणजे हळू हळू शिक्षणाचा दर्जा सुधारतां येईल.

(३) हरटॉग कमिटीनें जे निर्णय घेतले होते त्यांसही विरोध दाखविण्यांत आला. पैशाचा अपव्यय होतो ही कमिटीची ओरड खरी नसून, अपव्यय मोजण्याचें जें माप कमिटीनें लाविलें आहे तें शास्त्रशुद्ध नाहीं. साक्षर झाल्यापैकीं पुष्कळ लोक पुढें निरक्षर होतात हें कमिटीचें म्हणणें बरोबर नाहीं, असा लोकांचा दावा होता.

लोकांची विरुद्ध बाजूनें जी टीका होत होती तिची कल्पना यावरून येईल. सरकार आणि जनता यांच्या विचारामध्यें बरेंच अंतर पडलें होतें, इतकें कीं १९२७ मध्यें प्रत्येकानें आपआपला मार्ग वेगवेगळा आखण्यापर्यंत पाळी आली होती. शिक्षणाचा दर्जा कमी झाला तरी हरकत नाहीं, परंतु शिक्षणप्रसार जोरानें सुरू ठेवावयाचा, कीं शिक्षणप्रसार थांबवून शिक्षणाचा मगदूर वाढवावयाचा, हे दोन प्रश्न देशापुढें उभे होते, व यांतून कोणता तरी एक मार्ग स्वीकारण्याची वेळ आली होती.

हरटॉग कमिटीचा रिपोर्ट व आर्थिक मंदी या दोन कारणांचा परिणाम असा झाला कीं १९२७ ते १९३७ चे काळांत प्राथमिक शिक्षणाची प्रगति झाली नाहीं. खालील कोष्टक पाहा.

	१९२१-२	१९३६-७	१९३१-२	१९३६-७
१ मान्य झालेल्या शा. शाळांची संख्या	१,५५,०१७	१,८४,८२९	१,१६,७०८	१,९२,२४४
२ वरील शाळांतील मुलांची संख्या	६१,०९,७५२	८०,१७,९२३	९१,६२,४५०	१,०२,२४,२८८
३ प्राथमिक शिक्षणावर झालेला प्रत्यक्ष रु. खर्च	४,९४,६९,०८०	६,७५,१४,८०२	७,८७,९५,२३६	८,१३,३८,०१५

यावरून असें दिसून येईल कीं १९२२–७ या पांच वर्षांतील मुलांची वाढ व १९२७–३७ या दहा वर्षांतील मुलांची वाढ जवळ जवळ सारखीच आहे. शाळांच्या संख्येची वाढ पाहिल्यास १९२७–३७ या दहा वर्षांत ७४१५ ची वाढ असून त्यापूर्वीच्या पांच वर्षांत २९,८१२ ची वाढ आहे. १९२७ व १९३७ या दोन्ही वर्षांचे खर्चाचे आकड्यांत फरक फक्त १३८ लाखांचा आहे; तर १९२२ व १९२७ या वर्षांतील खर्चामध्यें फरक १८० लाखांचा आहे.

त्याचप्रमाणें सक्तीचा अंमल सुरू करण्याचे कोणतेही प्रयत्न झाले नाहींत. १९३६–७ सालांत कोणत्या भागांत सक्ति सुरू होती, हें खालील तक्त्यावरून दिसून येईल.

प्रांत	शहर विभाग	खेडे विभाग	सक्ति सुरू असलेलीं खेडीं
मद्रास	२७	७	१०४
मुंबई	९	१	१४३
बंगाल	१	०	०
संयुक्त प्रांत	३६	२५	१,२२४
पंजाब	६३	२९८१	१०,४५०
बिहार	१	१	१
मध्यप्रांत व वऱ्हाड	२७	८	५०८
सिंध	१	१	६१३
ओरिसा	१	१	१४
दिल्ली प्रांत	१	९	१५
एकूण	१६७	३०३४	१३०७२

या काळांतील विशेष गोष्टी खालीलप्रमाणें दाखवितां येतील.

(१) खेडे विभागापेक्षां शहर विभागामध्यें विशेष प्रगति घडून आली. याला कारणें दोन. एक—सक्ति लागू करण्यास अनकूल परिस्थिति शहर विभागांत होती. दुसरें—या विभागांत सक्तीचे शिक्षणाचा खर्च खेडेविभागांत येणाऱ्या खर्चाचे मानानें कमी असल्यानें प्रांतिक सरकार व स्थानिक सरकार सक्तीची योजना स्वीकारण्यास तयार असत.

(२) पंजाबप्रांत सोडला तर इतर प्रांतांत सक्तीचे शिक्षणाची प्रगति अत्यंत अल्प झाली. हिंदुस्थानांतील ५ लाख खेड्यांपैकीं, फक्त १३०७२ खेड्यांमध्यें सक्तीचा अंमल सुरू होता. या १३०७२ खेड्यांपैकीं १०४५० खेडीं खुद्द पंजाब प्रांतांतील होतीं. सक्ति करण्याचा प्रश्न खेडे विभागांत प्रामुख्यानें उत्पन्न होतो व त्या दृष्टीनें पाहतां हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला नाहीं, असेंच दिसून येईल.

(३) मुलग्यापेक्षां मुलींनाच सक्तीची जास्त जरूर आहे. पंजाबसारख्या कांहीं प्रांतांतून सक्ति मुलग्यांनाच लागू करतां येते. इतर प्रांतांतून कायद्याप्रमाणें मुलींना सक्ति करतां येत असली तरी प्रत्यक्ष सक्तीची योजना मुलग्यांचे बाबतींतच लागू करण्यांत आली आहे.

(४) सक्तीचे शिक्षणाचा प्रसार मंदगतीचा आहे. या गतीनें जाव-ण्याचें झाल्यास सर्वत्र सक्ति होण्यास पांचशें वर्षें लागतील. दहा वर्षांत सक्तीनें सर्वत्र शिक्षण–प्रसार व्हावा म्हणून १९२३ सालीं कायदा पास झाला. परंतु १४ वर्षांनंतर म्हणजे १९३७ सालीं शेकडा ३ टक्के लोक-वस्तीमध्येंच सक्ति लागू करण्यांत आली. (मुंबई शहराकरतां निराळा कायदा असल्यानें वरील हिशेबांत मुंबई शहर धरलें नाहीं.

(५) ज्या विभागांत सक्ति लागू केली होती तेथें प्रत्यक्ष सक्तीचा अंमल समाधानकारकरीत्या सुरू झाला नाहीं. शाळेंत कायद्यानें जेवढी मुलें शाळेंत येणें आवश्यक होतें अशा मुलांपैकीं ६० ते ८० टक्के मुलें शाळेंत आलीं. या मुलांची हजेरी इतर शाळांतील मुलांच्या

हजेरीप्रमाणें अनियमित होतीं. बिनसक्तीचे शाळेप्रमाणेंच सक्तीचे शाळेमध्यें गळतीचें प्रमाण होतें. पालक आपलीं मुलें शाळेंत पाठवींत नसत अशा पालकांना शिक्षा करण्यास स्थानिक सरकार धजत नसत, व त्यामुळें सक्तीच्या कायद्याखालीं लोकांवर फारच थोडे खटले भरले आहेत. थोडक्यांत सारांश असा कीं, सक्तीचा कायदा हा फक्त कागदावर राहिला; त्याचा अंमल व्हावा तसा झाला नाहीं.

अधिकाऱ्यांचें लक्ष, या काळांत, प्रसाराचे ऐवजीं शिक्षण सुधारण्याकडे होतं. याही बाबतींत विशेष समाधानकारक कार्य झालें असें म्हणतां येणार नाहीं. शिक्षकांना ट्रेनिंग देण्याचं कार्य थोडें झाल्याचें दिसून येतें. १९२७ सालीं ट्रेन्ड शिक्षकांचें प्रमाण ४४ होतें, तें १९६७ सालीं ५७ झालें. ट्रेनिंग कॉलेजच्या अभ्यासक्रमांतही बरेच फेरफार झाले. खेड्यांतील जीवनाशीं शिक्षण समरस कसें करतां येईल या दृष्टीनें हे फेरफार करण्यांत आले आहेत. जास्त लायक उमेदवार ट्रेनिंग संस्थांमध्यें यावेत असे प्रयत्न कांहीं प्रांतांतून विशेष झाल्याचें दिसून येतात.

कार्यनिष्पत्ति झाली ती एवढीच. इतर बाबतींत अपयशच पदरीं आलें आहे. या काळाच्या शेवटच्या वर्षांत देखील शाळांतून कुचंबणा व गळती होत असल्याचीं तक्रार सरकारी रिपोर्टांमधून दिसून येते. साक्षर लोक पुनः निरक्षर होऊं नयेत, यासाठीं वाचनालयें किंवा पुस्तकालयें स्थापण्याचा कोणताच प्रयत्न झाल्याचें दिसून येत नाहीं. तपासणी अंमलदाराची संख्या जरी वाढविली होती तरी मुलींमध्यें शिक्षणप्रसार अधिक झपाट्यानें झाल्यानें ही संख्या अखेर कमीच पडली. एक शिक्षकी शाळांचें प्रमाण पूर्वीप्रमाणेंच मोठें होतें. मुंबई प्रांतांत—जेथें शिक्षकांना बरा पगार मिळतो तेथें—शिक्षकाचे पगार घसरले व इतर प्रांतांतूनही ते सुधारले नाहींत. या सर्व गोष्टींवरून असें अनुमान काढतां येईल कीं, शिक्षणांत म्हणण्यासारखी सुधारणा घडून आली नाहीं व शिक्षणाचा प्रसार थांबविल्यानें विशेष कांहीं साध्य झालें, असें म्हणतां येत नाहीं.

प्रकरण अकरावें

प्रान्तिक स्वायत्तता

१९३५ चा कायदा हा हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणेचा पुढील टप्पा होय. त्यायोगें १९३७ सालीं प्रांतिक स्वायत्तता अस्तित्वांत येऊन, आजपर्यंतच्या द्विदल राज्यव्यवस्थेंत जे अधिकार नव्हते, त्याहीपेक्षां अधिक अधिकार हिंदी शिक्षणमंत्र्यांना लाभले. उदाहरणार्थ, त्रास-दायक अर्शी राखीव व सोपीव खातीं बंद झालीं; सनदी नोकरवर्ग संपुष्टांत आला; आणि मंत्र्याच्या हातीं शिक्षण खात्यांतील नोकर-वर्गाचा पूर्ण ताबा आला. देशांतील राजकीय व सामाजिक चळ-वळीमुळें शैक्षणिक पुनर्घटनेच्या योजनांना लोकांकडून चांगलीच पुष्टी मिळूं लागली. लॉर्ड कर्झनच्या वेळेपासून निर्माण झालेली शैक्षणिक बाबीसंबंधींची उत्सुकता वाढीला लागली. परिस्थितीचें आकलन असणारी, देशाच्या भवितव्याची कल्पना असणारी, आणि शक्य तितक्या कमी वेळांत यश संपादण्यासाठीं लागणाऱ्या विविध पद्धतींची संपूर्णतया जाणीव असणारी, उत्साही शिक्षणतज्ज्ञ हिंदी मंडळी लाभूं लागली. अतएव स्वतंत्र देशी शिक्षण-पद्धत सुरू करण्यासाठीं लागणाऱ्या साधनांची जुळवाजुळव झाली, म्हणूनच प्रांतिक स्वायत्ततेंत शिक्षण-मंत्र्यांना राष्ट्रीय पुनर्घटनेसाठीं योजना आखण्यास व त्या पार पाडण्यास हुरूप वाटूं लागला. प्रमुखतः या उत्साहानें हिंदुस्थानांतील अकरा लोकनियुक्त मंत्रिमंडळांनीं कामास सुरवात केली. या अकरा प्रांतांपैकीं सात प्रांतांमध्यें कॉंग्रेस अधिकारारूढ होती.

२. कार्याची रूपरेषा:— प्रांतिक स्वायत्ततेंतील शिक्षणमंत्र्यांची साधन-सामुग्री पुरेशी होती. परंतु हें कार्य एवढें व्यापक, विविध स्वरूपाचें

आणि बिकट होतें कीं, मी मी म्हणणाऱ्यांची सुद्धां छाती दडपून जावी. शिक्षणाचा इतिहास देतांना शैक्षणिक प्रश्नांचा विचार वेळोवेळीं करण्यांत आला आहे. तथापि सोयीसाठीं व या प्रश्नांचें आकलन नीट व्हावें म्हणून त्यांचा त्रोटक उल्लेख आम्ही पुनः येथें करीत आहोंत.

(अ) **प्राथमिक शिक्षण**:—(१) प्राथमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठीं तें सार्वत्रिक, सक्तीचें व मोफत करावयाचें, हा मुख्य प्रश्न होता. नामदार गोखल्यांच्या काळापासून हा प्रश्न चर्चिला जात होता; परंतु आर्थिक व शासनिक अडचणींना तोंड देऊन तो सोडविण्याचा प्रयत्न कधींच झाला नाहीं.

(२) सध्यांचे शिक्षण–पद्धतींत जी मोठ्या प्रमाणावर गळती होत असे ती कशी थांबवावी, हा दुसरा महत्त्वाचा प्रश्न होता. सक्तीच्या अभावामुळें पालक आपलीं मुलें वाटेल त्या वेळीं शाळेंतून काढीत असल्यामुळें, कमी पगाराच्या, अविनीत किंवा अर्धवट विनीत शिक्षकांकडून मिळालेल्या कुचकामी शिक्षणामुळें आणि शिक्षण कार्यावर योग्य प्रकारची देखरेख नसल्यामुळें, ही गळती होते आहे, हें हरटॉग कमिटीनें यापूर्वीच—थोड्या अतिशयोक्तीनें—दाखवून दिलें होतें.

(३) प्राथमिक शिक्षणामध्यें कोणत्या विषयांचा अंतर्भाव व्हावा, हाही महत्त्वाचा प्रश्न होता. देशी किंवा खाजगी पंतोजीच्या शाळा होत्या त्यावेळीं प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम अगदींच मर्यादित व निरस होता. जेव्हां शिक्षण खातें अस्तित्वांत आलें त्यावेळीं हा अभ्यासक्रम भरगच्च झाला, कारण पाश्चिमात्य ज्ञान बहुजनसमाजाला द्यावें हा विचार जागृत झाला होता. १८७० पासून हा अभ्यासक्रम सोपा करण्याचें हिंदी शिक्षण समितीनें सुचविलें. या शतकाचे प्रारंभीं, कर्झन साहेबांची कारकीर्द सुरू झाल्यापासून, प्रतिक्रिया म्हणून या अभ्यासक्रमामध्यें पुन्हा नवीन विषय घुसडण्यास सुरवात झाली, व ही प्रथा आजही सुरूच आहे. परंतु प्रथमपासून

प्राथमिक शिक्षणाचा स्वतंत्रपणें कधीं विचारच झाला नाहीं. प्राथमिक शिक्षण म्हणजे दुय्यम शिक्षणाची तयारी, एवढाच त्याला अर्थ होता. मुलाच्या आजूबाजूच्या परिस्थितीशीं अभ्यासक्रमाची योग्य सांगड घालावयाची व मुलाच्या ठिकाणीं असलेले सुप्त गुण जागृत करून जीवनामध्यें त्याचें योग्य स्थान त्याला प्राप्त करून द्यावयाचें, या हेतूनें प्राथमिक शिक्षणाकडे अजून कोणी पाहिलें नव्हतें.

(ब) दुय्यम शिक्षण:—गेल्या शंभर वर्षांचा माध्यमिक शिक्षणाचा इतिहास पाहतां या क्षेत्रांत शिक्षणाच्या प्रसाराशिवाय विशेष असें कांहीं साध्य झालें नव्हतें. माध्यमिक शिक्षण हें शहरांपुरतें व समाजांतील वरच्या वर्गापुरतें मर्यादित राहिलें नव्हतें. खेड्यापाड्यांतून तें पसरलें होतें. मुलीही शिकूं लागल्या होत्या व ज्यांना बरेंच दिवस या शिक्षणाचा फायदा घेतां आला नाहीं, तेही त्याचीं गोड फळें चाखूं लागले होते. मातृभाषा ही बोधभाषा समजण्यांत येऊं लागली, परंतु मोठ्या अभिमानानें सांगण्यासारखें यांत काय होतें? उलट १८३५ सालीं झालेली चूक दुरुस्त होण्यास शंभर वर्षें लागलीं, एवढेंच त्या बाबतींत फार तर म्हणतां येईल.

दुय्यम शिक्षणाचा प्रसार बरा झाला असें कांहींना वाटतें, तर कित्येकांना तो फार झाल्यासारखा वाटतो. परंतु हा प्रसार लोकसंख्येच्या एक दशांश भागांमध्येंच दिसून येत होता, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे वरील विधान बरोबर आहे असें म्हणतां येत नाहीं. हिंदुस्थानांतील आखिल लोकसंख्येचा विचार केला व प्राथमिक शिक्षणाप्रमाणें माध्यमिक शिक्षण सार्वत्रिक व सक्तीचें व्हावयास पाहिजे, ही गोष्ट ध्यानांत ठेविली, म्हणजे आणखी हजारों माध्यमिक शाळांची गरज आहे असें दिसून येईल. प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हा जसा आज राष्ट्राचा प्रश्न आहे त्याप्रमाणें माध्यमिक शिक्षणाचा प्रसार हाही राष्ट्राचा प्रश्न आहे.

प्रसाराबरोबर खालील प्रश्नांचाही विचार होणें जरूर आहे. पुष्कळ मुली माध्यमिक शिक्षण घेऊं लागल्या आहेत. त्यांचा अभ्यासक्रम मुलांच्या

अभ्यासक्रमापेक्षां वेगळा असावयास पाहिजे कीं नको ? त्याचप्रमाणें मुलगे व मुली यांनीं एकत्र सह-शिक्षण घ्यावें किंवा कसें ? मुलींकरतां स्वतंत्र शाळा असाव्यात काय ? मुलामुलींच्या मिश्र शाळेंत स्त्री-शिक्षकांच्या नेमणुका कशा व्हाव्यात व त्यांचें ट्रेनिंग कसें असावें ?

(२) खेड्यांमध्यें माध्यमिक शाळा सुरू झाल्या त्यांचा अभ्यासक्रम खेड्याचे परिस्थितीला जुळेल असा असावा किंवा शहरी अभ्यासक्रमा-सारखाच असावा ?

(३) जीवनामध्यें उपयुक्त होतील अशा धंद्याच्या शाळा नसल्यानें सर्व विद्यार्थ्यांचा ओघ माध्यमिक शाळांकडे वळला व साहजिकच मॅट्रि-कयुलेशनच्या परीक्षेस व कॉलेजांत जाणाऱ्या मुलांची संख्या प्रमाणाबाहेर वाढली. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमापासून ज्यांना काडीचाही फायदा होणार नाहीं, असे विद्यार्थी विद्यापीठांत दाखल झाल्यानें विद्यापीठाचे कार्यास एक प्रकारचा अडथळा उत्पन्न झाला नाहीं काय ?

(४) माध्यमिक शाळांतून मुलांची संख्या वाढल्यानें माध्यमिक शिक्षणाचा दर्जा कमी झाला आहे, अशी कांहीं लोकांची तक्रार आहे. माध्यमिक शाळांची व त्यांतील विद्यार्थ्यांची भरमसाट वाढ झाल्यानें हा माध्यमिक शिक्षणाचा डोलारा केव्हां उन्मळून पडेल अशी साधार भीति कित्येकांना वाटत आहे.

(५) सुशिक्षितांमध्यें बेकारी वाढूं लागली आहे आणि वाङ्मयीन शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या पदवीधरांना वरिष्ट प्रकारच्या धंद्यांमध्यें जागा मिळणें अशक्य झालें आहे.

(६) माध्यमिक शाळांचा प्रश्न म्हणजे मदतीच्या माध्यमिक शाळांचा प्रश्न झाला आहे. शाळांना मदत किती द्यावी, शिक्षकांचे पगार

काय असावेत व कोणत्या शर्तींवर त्यांच्या नेमणुका व्हाव्यात, या प्रश्नांकडे आतां सर्वांचें लक्ष लागून राहिलें आहे.

(७) शेवटीं बऱ्याच शाळा जातीविशिष्ट व पक्षविशिष्ट तत्त्वावर चालविल्या जात आहेत. अशा शाळांपासून कांहीं फायदे आहेत; विशेषतः विशिष्ट प्रकारचें धर्म–शिक्षण देणें येथें सोयीचें होतें. परंतु या शाळांपासून तोटेही पुष्कळ आहेत. अशा शाळा चालविणें खर्चाचें होतें, जातीजातीमधील वितुष्ट वाढतें व दुसऱ्या जातींच्या मुलांशीं संबंध न आल्यामुळें राष्ट्रीय वृत्तीच निर्माण होत नाहीं.

(क) **विश्वविद्यालयीन शिक्षण**:—विश्वविद्यालयाचे शिक्षणाचे बाबतींतही बरेच प्रश्न सोडवावयाचे राहिले आहेत. उदाहरणार्थः—

(१) विश्वविद्यालयीन शिक्षणाचे योगें ज्यांना कोणताच फायदा मिळणार नाहीं, असे पुष्कळसे विद्यार्थी विद्यापीठांत दाखल होतात. अशा विद्यार्थ्यांमुळें पैशाचा आणि काळाचा अपव्यय होतो व शिक्षणाचा दर्जाही खालावतो. म्हणून योग्य विद्यार्थ्यांचीच निवड विश्वविद्यालयीन शिक्षणासाठीं झाली पाहिजे, हा आजचा महत्त्वाचा प्रश्न होऊन बसला आहे.

(२) स्वीकारी किंवा स्वयंपूर्ण विद्यापीठें नवीन स्थापन करण्याची शिफारस जेव्हां करण्यांत आली, त्यावेळीं असा समज झाला होता कीं, पूर्वीच्या स्वीकारी विद्यापीठाचें काम थोडें कमी होऊन विद्यार्थ्यांची संख्या कमी होईल. परंतु बरींच नवीन स्वीकारी व स्वयंपूर्ण विद्यापीठें जन्मास येऊनही पूर्वीच्या स्वीकारी विद्यापीठांवरील ताण यत्किंचितही कमी झाला नाहीं. १९१७ व १९३७ च्या खालील आकड्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होईल.

विश्वविद्यालय		विद्यार्थ्यांची संख्या	
		१९१७	१९३७
१ कलकत्ता	...	२८,६१८	३५,३५७
२ मुंबई	...	८,००१	१७,५७५
३ मद्रास	...	१०,२१६	१७,४५४
४ पंजाब	...	६,५५८	१९,८४१

विद्यापीठांतील मुलांच्या वाढत्या संख्येबरोबर विद्यापीठांची वाढ झाली नाहीं व याला कारण पैशाचा अभाव.

(३) मुलांची वाढ झाली ती सांस्कृतिक किंवा भाषिक शिक्षणाकडे; स्थापत्य, वैद्यकी, कायदा यांसारख्या उच्च व्यावसायिक शिक्षणाकडे नव्हे. उदाहरणार्थ खालील आकडे पहा:—

	१९२१-२	१९३६-७
१ सांस्कृतिक व शास्त्रीय कॉलेजें (पौर्वात्य महाविद्यालयें धरून)	२०७	३६६
२ शिक्षक, डॉक्टर व वकील या पांढऱ्यापेशासाठीं असणारीं उच्च व्यावसायिक कॉलेजें	३२	५५
३ दुसऱ्या व्यवसायाचीं कॉलेजें	१२	२५
४ सांस्कृतिक व शास्त्रीय (पौर्वात्य महाविद्यालयें धरून) कॉलेजांतील विद्यार्थी	५४,४७३	१,०४,९२३
५ पांढरपेशासाठीं असणाऱ्या व्यावसायिक कॉलेजांतील विद्यार्थी	१०,२७७	१५,८४६
६ दुसऱ्या व्यवसायाच्या कॉलेजांतील विद्यार्थी	१,६०८	५,४५९

सूचना:—कॉलेज या शब्दामध्यें विश्वविद्यालयीन शाखेचा किंवा वर्गाचा अंतर्भाव होतो.

(४) विद्यापीठांमध्यें मुलांची संख्या ज्या प्रमाणांत वाढूं लागली त्या प्रमाणांत सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न प्रामुख्यानें डोकावूं लागला. विद्यापीठाच्या बहुतेक पदवीधरांचें ध्येय सरकारी नोकरी; परंतु सरकारी नोकऱ्या या मर्यादित असल्यानें विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येबरोबर त्या वाढणाऱ्या नाहींत. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांची वाढ झाली नसल्यामुळें उद्योगधंदे, व्यापार यांविषयींचें शिक्षण मोठ्या प्रमाणांत दिलें जात नाहीं; व म्हणून विश्वविद्यालयीन शिक्षणाचा विचार करतांना, उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या पदवीधरांना योग्य असा कोणता व्यवसाय द्यावयाचा, हा बिकट प्रश्न उभा राहतो.

(५) ज्ञानाच्या विविध शाखांचें शिक्षण देण्याची महत्त्वाकांक्षा बहुतेक विश्वविद्यालयांमध्यें दिसून येतें; परंतु पैशाचा पुरवठा बेताचा असल्यानें हा पैसा सर्व शाखांसाठीं थोडा थोडा खर्चावा लागतो. या पद्धतीमुळें विद्यापीठांवर आर्थिक ताण पडत असल्यामुळें ही प्रवृत्ति जितकी कमी होईल तेवढें बरें. विद्यापीठांना पैसा तीन मार्गांनीं मिळतो—लोकांची मदत, सरकारी मदत व फी. लोकांकडून मदत बेताचीच मिळते. प्राथमिक शिक्षण प्रसाराची जड जोखीम सरकारचे माथीं असल्यानें सरकारासही विद्यापीठांसाठीं जास्त पैसा देतां येणें शक्य नाहीं. फीचें उत्पन्न आज जरी बरें असलें, तरी उद्यां विद्यापीठांची संख्या वाढली म्हणजे हें उत्पन्न कमी होणार आहे. म्हणून सर्व विद्यापीठांमध्यें समन्वय ठेवून आणि पुनरावृत्तीचा व अतिव्याप्तीचा दोष टाळून, आहे त्या पैशाचा शक्य तितका चांगला उपयोग कसा करावयाचा, हा आज मोठा प्रश्न होऊन बसला आहे. अन्तर-विद्यापीठ-समितीनें या प्रश्नाचा अजून निकाल लावलेला नाहीं व तो निकाल लागेल, असा संभव दिसत नाहीं; कारण विद्यापीठांपासून मिळालेल्या सत्तेचा आधार घेऊन समिति विद्यापीठांवर कांहीं हुकमत गाजवूं शकणार नाहीं.

(६) माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम कोठें संपला व विद्यापीठाचा अभ्यासक्रम कोठें सुरूं झाला, हें ठरविणें महत्त्वाचे आहे. इंटरमिजिएट परीक्षेनंतर विश्वविद्यालयीन शिक्षणास प्रारंभ होतो, असें कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशननें ठरविलें आहे. शिक्षणाच्या मध्यवर्ति समितीनें कॉलेजच्या पहिल्या वर्षानंतर कॉलेजच्या शिक्षणास प्रारंभ होतो, असें ठरविलें आहे. हा प्रश्न अजून अनिर्णीत राहिलेला आहे.

(७) विद्यापीठांमध्यें बोधभाषा कोणती असावी या प्रश्नाकडे जावें एवढें लक्ष गेलेलें नाहीं.

(ड) **कारभारविषयक व सर्वसाधारण प्रश्नः—** या सदरास्वालीं खालील प्रश्नांचा अंतर्भाव होतो.

(१) राष्ट्राच्या महत्त्वाच्या उत्पन्नाच्या बाबी ज्यांचे स्वाधीन आहेत, अशा मध्यवर्ती हिंदुस्थान सरकारवर शिक्षणविषयक कोणती जबाबदारी आहे, हें निश्चित झालेलें नाहीं. शिक्षणाच्या इतिहासावरून असें दिसतें कीं मध्यवर्ती सरकारनें शैक्षणिक जबाबदारी प्रांतिक सरकारावर सोंपविली आहे व प्रांतिक सरकारनें पुन्हां आपली जबाबदारी, ज्यांची उत्पन्नाचीं साधनें फार अपुरीं आहेत अशा स्थानिक स्वराज्य संस्थांवर—लोकल बोर्ड, म्युनिसिपालिट्या यांवर—टाकिली आहे. मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या उत्पन्नाचा विचार करून प्रत्येकानें शिक्षणाचे कार्यांत किती वाटा उचलावा हें अजून ठरविलेलें नाहीं.

(२) प्रांतिक शिक्षण खात्याच्या अंतरीक्षक मंडळाची (Inspecting Staff) वाढ होऊन त्याची पुनर्व्यवस्थिति होणें जरूर आहे.

(३) मुलांच्या वैद्यकीय तपासणीविषयीं व वैद्यकीय मदतीसंबंधीं कांहींच व्यवस्था नसून ज्यांचें पोषण बरोबर होत नाहीं अशा गरीब विद्यार्थ्यांना दुपारीं खाण्यास देण्याची सोय करण्यांत आलेली नाहीं.

(४) शाळेंत येणाऱ्या मुलांना शारीरिक शिक्षण देण्याचा प्रश्न व्यापक दृष्टीनें सोडविण्याचा प्रयत्न झालेला नाहीं.

(५) शिक्षकांना नोकरी मिळवून देण्याचे बाबतींत व त्यांचे व्यवसायांत योग्य मार्गदर्शन करण्याचे बाबतींत कांहींच करण्यांत आलेलें नाहीं.

(६) निरक्षरतेचा मोठा प्रश्न अजून तसाच पडून आहे.

(७) बालमंदिरांची व शिशुमंदिरांची स्थापना फारच थोड्या प्रमाणांत होऊ लागली आहे. अफाट लोकसंख्येच्या मानानें हें काम कितीतरी भोऱ्या प्रमाणांत व्हावयास पाहिजे.

(८) जे मागासलेले आहेत किंवा शारीरिक अथवा मानसिक दृष्ट्या ज्यांचे ठिकाणीं कांहीं व्यंग आहे, त्यांचेकडे तर अजून कोणी पाहिलेही नाहीं.

(९) शैक्षणिक संशोधनाचे बाबतींत कांहींच व्यवस्था झालेली नाहीं.

(१०) वाचनालयाची व्यवस्था व अशाच प्रकारच्या प्रौढ शिक्षणाच्या सोयी सर्व देशभर निर्माण करण्याचा प्रयत्न झाला नाहीं.

वर दिलेले प्रश्न अनेक प्रश्नांपैकीं कांहीं म्हणून दिलेले आहेत. परंतु त्यावरून भारतीय शिक्षणाचा प्रश्न किती विचित्र, गुंतागुंतीचा व कठीण आहे हें सहज दिसून येणार आहे. शिक्षणाचें कार्य, आहे त्यापेक्षां अधिक खडतर, खालील कारणांमुळें झालें आहे.

(अ) **स्थूल अडचणी:**—विरल व पांगलेली लोकसंख्या, रहदारीचे मार्गांचा अभाव व वाईट हवेचीं ठिकाणें.

(ब) **सामाजिक अडचणी:**—धर्म, जात व भाषा यांनीं समाजा-समाजांमध्यें घातलेले निर्बंध; पडदा व बालविवाह.

(क) **आर्थिक अडचणी:**—पालकांचें सर्वसाधारण दारिद्र्य, सरकारची तुटपुंजी साधनसामुग्री व शेती, उद्योगधंदे आणि व्यापार यांची असमाधानकारक परिस्थिति.

३. प्रांतिक स्वायत्ततेच्या काळांत शिक्षणाची पुनर्घटना:—वर दाखविलेल्या शैक्षणिक बिकट परिस्थितींमध्यें प्रांतिक मंत्र्यांना आपला कारभार स्वीकारावा लागला. हे सर्व प्रश्न एकदम सोडविणें त्यांना शक्य नव्हतें व म्हणून त्यांनीं कांहीं योजना हातीं घेतल्या. त्यांचे प्रामुख्यानें तीन भाग पाडतां येतील.

(अ) संशोधनात्मक किंवा अन्वेषक योजना.
(ब) विधायक योजना.
(क) प्रायोगिक योजना.

यांचा आतां आपण क्रमशः विचार करूं.

(अ) **संशोधनात्मक कार्य:**— भारतीय शिक्षणाच्या प्रश्नाचा राष्ट्रीय दृष्टीनें यापूर्वी कधीं विचार झाला नाहीं व म्हणून कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्याचें प्रथम ठरविण्यांत आलें. उदाहरणार्थ मुंबई सरकारनें प्रौढ शिक्षण, शारीरिक शिक्षण, शिक्षकांचें ट्रेनिंग व धंदे शिक्षण यांचा विचार करण्याकरतां स्वतंत्र कमिट्या स्थापन केल्या. संयुक्तप्रांत व बिहार सरकारांनीं आपापल्या प्रांतांमध्यें शैक्षणिक पुनर्घटना करण्याचे हेतूनें समित्या नेमिल्या. बंगाल सरकारनें प्राथमिक आणि प्रौढ शिक्षणाविषयीं आपले रिपोर्ट तयार करण्यासाठीं कमिट्या नेमिल्या. अशाच तऱ्हेनें इतर प्रांतांनींही व्यवस्था केली. १९३५ सालीं पुनरुज्जीवित झालेल्या मध्यवर्ती शिक्षण-सल्लागार-मंडळानेंही भारतीय शिक्षणाचे कांहीं प्रश्न हातीं घेतले. प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, बेसिक किंवा मूलोद्योग शिक्षण यांवर सखोल विचार करून आपले अहवाल सादर करण्याकरतां कमिट्या नेमिल्या. थोडक्यांत सांगावयाचें

म्हणजे, १९३७ ते १९४० या तीन वर्षांत संशोधनात्मक कार्य इतकें झालें कीं पूर्वी एवढ्या थोड्या कालावधींत एवढें मोठें कार्य कधींच झालें नव्हतें.

दुसरें असें कीं, हें संशोधनात्मक कार्य विपुल झालें, ही एकच गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे, असें नाहीं. तर जें कार्य झालें त्या कार्याचें स्वरूपही पूर्वीच्या कार्यापासून अगदीं भिन्न होतें. याला कारण एकच, व तें हें कीं, या सर्व कमिट्यांमध्यें काम करणारी मंडळी परदेशांतून आलेले 'तज्ज्ञ' नसून, उत्साही हिंदी शिक्षण–तज्ज्ञ होते.

(ब) **विधायक कार्य:**—वर सांगितल्याप्रमाणें एकीकडे संशोधन कार्य चालूं असतां, प्रांतिक मंत्र्यांनीं कांहीं योजना जरूरीच्या म्हणून हातीं घेतल्या. पूर्वीच्या सरकारांनीं लोकांची मागणी असतांही ज्या योजनांकडे दुर्लक्ष केलें होतें त्याही योजना हातीं घेण्यांत आल्या. मुंबई सरकारनें हातीं घेतलेली शारीरिक शिक्षणाची योजना ही पहिल्या स्वरूपाची असून वेगवेगळ्या प्रांतांनीं स्वीकारलेली प्रौढ शिक्षणाची योजना ही दुसऱ्या स्वरूपामध्यें मोडू शकेल.

ठोकळ मानानें पाहतां प्रांतिक सरकारनें ज्या योजना हातीं घेतल्या होत्या, त्यांत प्राथमिक शिक्षणाकरतां लोकल बोर्ड व म्युनसिपालिट्या यांना जादा मदत मंजूर करणें, सक्तीच्या शिक्षणाचें क्षेत्र वाढविणें, ज्या ठिकाणीं शाळा नाहींत त्या ठिकाणीं नवीन शाळा स्थापन करणें व प्रौढांचे शिक्षणासाठीं नवे कार्यक्रम मंजूर करून त्यांना पैसा पुरविणें, यांचा अंतर्भाव होतो. प्रौढ शिक्षणाकडे बहुतेक प्रांतिक सरकारचें लक्ष गेलें. प्रांतिक स्वायत्ततेच्या काळांत बहुजनसमाजाची निरक्षरता नाहींशी करण्याचे जे प्रयत्न सर्व सरकारांनीं केले, त्याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत. बिहार प्रांतांत आणि मुंबई शहरामध्यें जें कार्य झालें, त्याकडे विशेष लक्ष देणें जरूर आहे. १९३७ ते १९४०, या तीन वर्षांत प्रौढ

साक्षरतेच्या बाबतींत पूर्वतयारीचें असें बरेचसें कार्य करण्यांत आलें. ज्यावेळीं मोठ्या प्रमाणावर प्रौढ साक्षरता वाढविण्याचा प्रयत्न होईल, त्यावेळीं या कार्याचा उपयोग विशेष होणार आहे.

(क) प्रायोगिक कार्य:—या वेळच्या प्रांतिक सरकारांनीं घिटाईनें कांहीं कांहीं प्रयोग हातीं घेतले. यांपैकीं महत्त्वाचा म्हणजे 'मूलोद्योग शिक्षण' किंवा 'वर्धा योजना.' या योजनेचा उगम महात्मा गांधी यांचेकडून झाल्यामुळें, सर्व काँग्रेस मंत्रिमंडळांनीं तावडतोब तिचा स्वीकार केला. इतर कोणत्याही प्रयोगाकडे गेलें नाहीं एवढें लक्ष या प्रयोगानें आपल्याकडे खेचून घेतलें.

मूलतः वर्धा योजनेचा हेतु कोणताही खर्च न करतां—किंवा फार तर अल्प खर्च करून–शिक्षणदानाचें कार्य करावयाचें; एका विशिष्ट व्यवसायाशीं किंवा उद्योगाशीं सर्व शिक्षणाचा संबंध आणावयाचा किंवा सर्व शिक्षण गुंतवावयाचें, हा होता. उदाहरणार्थ सूत काम किंवा वीण काम हा उद्योग द्यावयाचा व त्याकरवीं सर्व शिक्षण द्यावयाचें.

'हातानें उद्योग करतां करतां शिक्षण द्यावयाचें' हें ध्येय. काढलेल्या सुतामुळें किंवा विणलेल्या कापडामुळें एवढी आर्थिक निष्पत्ति होईल कीं त्यांतून पूर्णतः किंवा अंशतः शिक्षकाचा पगार भागविला जाईल, अशी आशा कित्येकांना वाटू लागली. कांहींना ही आशा भोळी आशा वाटू लागली व त्यांनीं या योजनेवर टीका करण्यास सुरवात केली. याचा परिणाम असा झाला कीं, टीकाकारांचें म्हणणें लक्षांत घेऊन मूलोद्योगाच्या प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम ठरविण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली व तिचे अध्यक्ष जमिया मिलिया संस्थेचे डॉ. झकीर हुसेन यांना करण्यांत आलें.

या कमिटीचे अहवालाचा परिणाम असा झाला कीं, मूळ योजनेमध्यें बदल होऊन मूलोद्योग शिक्षणापासून निर्माण होणारा

पैसा मूलोद्योग शिक्षणाचा सर्व खर्च भागवू शकेल हा विचारच बाजूला ठेवण्यांत आला. त्याचप्रमाणें एका मूलोद्योगांतून सर्व शिक्षण द्यावयाचें याही मुद्यावरचा जोर कमी झाला. शिक्षणाच्या शक्य तितक्या जास्त भागाचा मूलोद्योगाशीं समन्वय घडवून आणून विद्यार्थ्यांच्या पूर्वानुभवाचा शिक्षणकार्यासाठीं उपयोग करण्यास हरकत नाहीं; सूतकताई व वीणकाम म्हणजेच मूलोद्योग असा मूलोद्योग शब्दाचा अकुंचित अर्थ करण्यांत येऊ नये, असेही निर्णय घेण्यांत आले. इतकेंच नव्हे तर अनेक प्रयोग करून प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

मूलोद्योग शिक्षणाचा, थोड्या बदललेल्या स्वरूपांत जरी विचार केला तरी, हिंदुस्थानांत प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत हा एक धाडशी प्रयोगच आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. सध्यांचें प्राथमिक शिक्षण पुस्तकी आहे, आजूबाजूच्या परिस्थितीचा या शिक्षणाशीं कोणताच संबंध दिसून येत नाहीं व सृजनात्मक क्रियेचा या शिक्षणांत कोठेंच अंतर्भाव केलेला नाहीं. हे तीनही दोष या नवीन शिक्षण पद्धतीनें नाहींसे केले आहेत. हातानें काम करण्यामध्यें भूषण आहे, हा धडा नवीन पद्धति मुलांना शिकविते. 'हातानें उद्योग करतां करतां शिकावयाचें' हें तत्त्व जुनेंच असलें तरी, ज्ञान देण्याचा हा सुलभ आणि परिणामकारक मार्ग आहे. हें या पद्धतीनें नव्यानें लोकांना शिकविलें, असें म्हणावयास हरकत नाहीं. सर्व बाजूंनीं विचार केल्यास आपणांस कबूल करावें लागेल कीं, 'मूलोद्योग शिक्षण पद्धति' ही काँग्रेस सरकारची भारतीय शिक्षणास थोर देणगी होय.

४. कांहीं शिक्षणाविषयक माहिती:—१९३७-३८ ते १९३९-४० या तीन वर्षांत काय साध्य करतां आलें, हें खालील आंकड्यांवरून समजण्यासारखें आहे:—

		१९३७-३८	१९३९-४०
१. विद्यापीठांची संख्या	...	१५	१५
२. आर्टस् कॉलेजांची संख्या			
(१) पुरुषांकरतां	...	२४६	२६६
(२) स्त्रियांसाठीं	...	३३	३८
३. उच्च व्यवसायाचीं कॉलेजें			
(१) पुरुषांकरतां	...	६७	७३
(२) स्त्रियांकरतां	...	७	८
४. माध्यमिक शाळा			
(१) पुरुषांकरतां	...	३०१८	३२४६
(२) स्त्रियांकरतां	...	३९८	४६५
५. इंग्लिश मिडल स्कूलस			
(१) पुरुषांसाठीं	...	४१३४	४६००
(२) स्त्रियांसाठीं	...	५७६	६३१
६. उच्च प्राथमिक शाळा	...		
(१) मुलग्यांसाठीं	...	४७५०	४७३५
(२) मुलींसाठीं	...	५७६	६३१
७. प्राथमिक शाळा			
(१) मुलग्यांसाठीं	...	१,५८,६०२	१,६१,८१०
(२) मुलींसाठीं	...	३०,९९९	२७,९४१
८. विशेष प्रकारच्या शाळा			
(१) मुलग्यांसाठीं	...	५,५०८	१०,४०२
(२) मुलींसाठीं	...	४३२	६८५

९. विद्यार्थी	१९३७-३८		१९३९-४०	
	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री
(१) आर्ट कॉलेजें	९४,३३९	६,७९३	१,०९,९२१	९.६१५
(२) उच्च व्यावसायिक कॉलेजें	२१,२७३	७३४	२४,३८२	१,०८६
(३) माध्यमिक शाळा	९,९६,१३१	१,२१,८६०	११,०८,५०९	१,४७,३७९
(४) इंग्रजी मिडल किंवा पूर्व-माध्यमिक शाळा	४,७१,५००	७१,५१२	५,४५,०२३	९२,२४२
(५) उच्च प्राथमिक शाळा	६,१८,७०७	१,१४,१७८	६,३१,९०५	१,३४,१४३
(६) प्राथमिक शाळा	७९,७४,७०३	२५,४१,६५०	८५,९५,६४२	२८,४९,७३०
(७) विशेष प्रकारच्या शाळा	२,५३,१६२	२०,०५७	४,१८,८३८	३५,९७९
एकूण	१,०४,२८,८१५	२८,८१,५३४	१,१४,३४,१२०	३२,७०,१७४

खर्च	१९३७-३८	१९३९-४०
	रुपये	रुपये
(१) सरकारी उत्पन्नांतून	११,४१,१४,०००	१३,०३,८०,०००
(२) लोकल फंडाचे उत्पन्नांतून	२,५३,८०,०००	२,४२,९४,०००
(३) म्युनिसिपल उत्पन्नांतून	१ ,७३,२९,०००	१,७६,२०,०००
(४) फीचे उत्पन्नांतून	७,०७,६५,०००	७,७८,५५,०००
(५) इतर बाबींमधून	४,२०,३४,०००	४,०७,२७,०००
एकूण	२६,९६,२२,०००	२९,०८,७६,०००

यावरून असें दिसून येईल कीं, शाळेंत नांव घालणाऱ्या मुलांची संख्या दोन वर्षांत अंदाजें शेंकडा १० नें वाढली, किंवा दरवर्षीं ७½ लाख विद्यार्थी वाढले. शिक्षणावरील सरकारी खर्चही १·६ कोटींनीं वाढला. हिंदुस्थानच्या शैक्षणिक इतिहासांत वाढीचा एवढा आंकडा प्रथमच पाहावयास सांपडतो.

५. **जनतेचे विचारप्रवाह:**—ब्रिटिश हिंदुस्थानच्या प्रांतांत लोकनियुक्त मंत्रिमंडळांनीं जें काम केलें, त्याचा जनतेवर मोठा परिणाम झाला. हिंदी संस्थानांत शैक्षणिक चळवळी सुरू झाल्या व शिक्षणप्रसाराच्या व पुनर्वटनेच्या नवीन नवीन योजना जन्मास येऊं लागल्या. दुसरें शैक्षणिक बाबींविषयीं जनतेमध्यें जास्त उत्साह दिसूं लागला व शिक्षण-कार्य करूं इच्छिणाऱ्या सार्वजनिक संस्था वाढूं लागल्या. जनतेच्या देणग्यामुळें व सरकारच्या मदतीमुळें त्यांची आर्थिक बाजू सुधारली. यामुळें त्यांना आपल्या कामाचा पसारा वाढवितां आला, व आजवर जीं कामें त्यांना हातीं घेतां आलीं नव्हतीं तीं हातीं घेऊन चालवितां आलीं. तिसरें—शैक्षणिक पुनर्घटनेच्या बाबतींत बरेच वाद निर्माण झाले. उदाहरणार्थ—मूलोद्योग शिक्षण आणि विद्यामंदिर योजना, यांना मुसलमानांनीं जोराचा विरोध केला. हा विरोध जरी थोडा फार राजकीय स्वरूपाचा होता, तरी त्यांत कांहीं अर्थ होता. आपल्या पुरातन सांस्कृतिक परंपरेकडे मुसलमान जमातीचें लक्ष आहे, ही गोष्ट या विरोधानें सिद्ध झाली. कॉंग्रेस योजनेच्या प्रतिक्रियेमुळें अखिल भारतीय मुस्लीम शिक्षण परिषदेनें मुसलमानांच्या हिताचे दृष्टीनें शिक्षणाचा विचार करण्यासाठीं **कमाल यारजंग** कमिटीची स्थापना केली. या कमिटीनें दोन वर्षें काम केलें, व परिषदेकडे आपल्या शिफारशी पाठविल्या. यासारख्या प्रसंगांनीं जनतेचें लक्ष शिक्षण कार्याकडे वरेंच लागलें. आज ज्याप्रमाणें शिक्षणविषयक बाबींची चर्चा होत होती, त्याप्रमाणें ती पूर्वीं कधींच झाली नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

६. युद्धः—लोकनियुक्त मंत्रिमंडळांनीं शैक्षणिक पुनर्रचनेचें जें कार्य हातीं घेतलें, तें १९३९ सालीं उद्भवलेल्या युद्धानें नामशेष झालें. लवकरच काँग्रेस मंत्र्यांनीं राजीनामे दिले. युद्धाच्या अधिक महत्त्वाच्या गरजा उत्पन्न झाल्यामुळें कोणत्याही प्रांतांत कोणतीच योजना आखण्यांत आल्याचें दिसून येत नाहीं.

१९४३ पर्यंत ही परिस्थिति राहिली. युद्धाचा निकाल संयुक्त राष्ट्रांच्या बाजूनें लागेल, असें सुचिन्ह दिसूं लागलें. यशाची आशा दिसूं लागल्याबरोबर युद्धोत्तर काळांत हातीं घ्यावयाच्या योजनांचा हिंदुस्थान सरकार विचार करूं लागलें. १९४४ च्या पूर्व काळांत, मध्यवर्ती शैक्षणिक सल्लागार मंडळानें शैक्षणिक पुनर्घटनेची योजना, जिला 'सार्जंट रिपोर्ट' असें संबोधलें जातें ती, राष्ट्रापुढें मांडली.

७. सार्जंट रिपोर्टः—मध्यवर्ती शैक्षणिक सल्लागार मंडळाचे योजनेस 'सार्जंट रिपोर्ट' असें नांव दिलें आहे, कारण मध्यवर्ती सरकारचे शिक्षण खात्याचे कमिशनर मिस्टर **जॉन सार्जंट** यांनीं या रिपोर्टांतील महत्त्वाचीं टांचणें केलीं आहेत. मध्यवर्ती सरकारनें युद्धोत्तर पुनर्घटनेसाठीं ज्या अनेक योजना केल्या, त्यांपैकीं 'सार्जंट रिपोर्ट' ही एक योजना आहे. या योजनेस अजून कायदेशीर मान्यता मिळावयाची आहे.

इंग्लंडचा आज जो शैक्षणिक दर्जा आहे तो, कमींत कमी चाळीस वर्षांचे अवधींत, हिंदुस्थानाला प्राप्त करून द्यावयाचा, हा या योजनेचा हेतु आहे. हा हेतु डोळ्यापुढें ठेवून खालील गोष्टींचा यांत अंतर्भाव केलेला आहे.

(१) ३ ते ६ वर्षाचे मुलांना पूर्व-प्राथमिक शिक्षण देणें.

(२) ६ ते १४ वर्षें वयाच्या सर्व मुलांना प्राथमिक किंवा बेसिक शिक्षण, सार्वत्रिक सक्तीचें व मोफत, देणें. ६ ते ११ वर्षें वयाचे मुलांना प्राथमिक किंवा ज्युनिअर बेसिक व ११ ते १४ वर्षें वयाच्या मुलांना उच्च प्राथमिक किंवा सेनिअर बेसिक.

(३) ११ ते १७ वर्षें वयाच्या निवडक मुलांना सहा वर्षेंपर्यंत माध्यमिक शाळेचें शिक्षण देणें.

(४) कांहीं ठराविक विद्यार्थ्यांकरतां सध्यांच्या इंटरमिजिएट परीक्षेनंतर तीन वर्षांचा विद्यापीठाचा अभ्यासक्रम.

(५) विद्यार्थ्यांना योग्य प्रमाणांत यांत्रिक, व्यापारी किंवा कलात्मक शिक्षण, पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ, देणें.

(६) प्रौढांची निरक्षरता घालविणें व वीस वर्षांचे काळांत 'सार्वजनिक ग्रंथालयें' सुरूं करणें.

(७) ही योजना अमलांत आणण्यासाठीं व ती चालूं ठेवण्यासाठीं योग्यप्रकारें ट्रेनिंग देण्याची व्यवस्था करणें.

(८) सक्तीच्या शारीरिक शिक्षणाची व्यवस्था, वैद्यकीय तपासणी व जोपासना, व अर्धपोटी असणाऱ्या मुलांसाठीं दुधाची व दुपारच्या जेवणाची सोय.

(९) नोकऱ्या मिळवून देण्यासाठीं व्यवसायखातें (employment bureau) उघडणें.

(१०) शारीरिक किंवा मानसिक दृष्ट्या व्यंग असणाऱ्या मुलांना शिक्षण देणें.

(११) मोठ्या प्रमाणावर सामाजिक व करमणुकीच्या कार्यक्रमाची योजना.

रिपोर्ट म्हणतो:—

कोणत्याही राष्ट्रीय शिक्षण योजनेमध्यें बालक मंदिरचे रूपानें पूर्व प्राथमिक शिक्षणाची सोय करणें अगत्याचें आहे. ... या बालक मंदिरामध्यें ज्यांना विशेष प्रकारचें शिक्षण मिळालें आहे अशा स्त्री-शिक्षकांची नेमणूक होणें जरूर आहे. पूर्व प्राथमिक शिक्षण मोफत दिलें गेलें पाहिजे. हजेरीचे बाबतींत सक्ति करणें शक्य नाहीं, म्हणून पालकांनीं मुलांना स्वखुषीनें शाळेंत पाठवावें, यासाठीं पालकांचें मन वळविण्याचे शक्य ते प्रयत्न करण्यांत यावेत. विशेषतः जेथें घरें आरोग्यदृष्ट्या सोयीचीं नसतात व आयांना कामाकरतां बाहेर जावें लागतें, त्या ठिकाणीं तर असे प्रयत्न जरूर व्हावयास पाहिजेत. प्रत्यक्ष लिहिण्यावाचण्यापेक्षां समाजामध्यें कसें वसावें व कसें उठावें हें शिकविणें, हाच केवळ या शिक्षणाचा मुख्य हेतु आहे.

प्राथमिक शिक्षणासाठीं रिपोर्टामध्यें बेसिक शिक्षण योजनेचा, थोडा फरक करून, स्वीकार केलेला आहे.

" मध्यवर्ती सल्लागार मंडळानें ज्याला बेसिक (प्राथमिक आणि माध्यमिक) शिक्षण म्हटलें आहे, तें वर्धा योजनेपासून कांहीं बाबतींत जरी भिन्न असलें तरी त्यामध्यें मऊ वर्धा योजनेंतील शैक्षणिक कल्पनांचा अंतर्भाव केलेला आहे. सर्व जगांतील शिक्षणतज्ज्ञांनीं ' हातांनीं उद्योग करतां करतां शिकावयाचें ' हें तत्त्व मान्य केलें आहे. खालचे वर्गांतून हे उद्योग अनेक प्रकारचे होऊं शकतील, परंतु पुढें पुढें स्थानिक परिस्थितीस अनुलक्षून त्यांचें रूपांतर कांहीं ठराविक व्यवसायांमध्यें होऊं शकेल. सर्व अभ्यासक्रम या सर्वसाधारण तत्त्वाला धरूनच तयार करण्यांत येईल. लिहिणें, वाचणें व हिशेब करणें, एवढ्या शिक्षणानें खरा नागरिक तयार होत नाहीं. मुलांनीं केलेल्या वस्तू विकून शिक्षणाचा खर्च भागविण्याचा विचार, कोणत्याही परिस्थितीमध्यें, सल्लागार मंडळास मान्य नाहीं. फार फार तर हस्तव्यवसायासाठीं ज्या पदार्थांचा उपयोग केला जातो, त्या पदार्थांवर होणारा खर्च भागवितां येईल.... शाळा सोडल्यानंतर विद्यार्थ्यानें समाजामध्यें भावी नागरिक व कामकरी म्हणून भाग घेतला पाहिजे. मात्र आजवर आपण जसें शिक्षण घेतलें तसेंच पुढेंही, राष्ट्रीय योजनेप्रमाणें, आपलें शिक्षण चालूं रहावें अशी उत्कट इच्छा त्यांचे ठिकाणीं निर्माण झाली पाहिजे. याच हेतूनें सेनीअर बेसिक स्कूलनें (वरिष्ठ प्राथमिक शाळेनें) वर्ग शिक्षणाला पूरक होणाऱ्या शारीरिक शिक्षणाच्या किंवा खेळांच्या सहाय्यानें या प्रौढ विद्यार्थ्याला सामाजिक जीवन जगण्यास भरपूर वाव द्यावा. "

" सर्वसाधारण बुद्धिमत्तेपेक्षां जे सरस आहेत, अशा विद्यार्थ्यांकरतां ' माध्यमिक शाळा ' आहेत. म्हणून जे विद्यार्थी बुद्धिमत्तेमध्यें श्रेष्ठ आहेत, ज्यांचे ठिकाणीं कर्तबगारी दिसून येते व जे पुढें आपलें नशीब काढतील अशी आशा वाटते, असेच विद्यार्थी माध्यमिक शाळेंत घेण्यांत यावेत. आकरा वर्षें पूर्ण होऊन ज्यांनी प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम संपविला आहे, अशींच मुलें निवडण्यांत यावींत. प्राथमिक शाळेंत (जुनिअर बेसिक शाळेंत) अभ्यास करणाऱ्या मुलांपैकीं शेकडा २० टक्के मुलें साधारणतः माध्यमिक शाळेंत येऊं शकतील. हायस्कूलमध्यें आलेला

मुलगा वयाला १४ वर्षें पूर्ण होईपर्यंत हायस्कूलमध्यें सक्तीनें राहिला पाहिजे. या वयोमर्यादेनंतरही माध्यमिक शाळेचा सर्व अभ्यासक्रम पुरा करण्यापूर्वी कोणीही विद्यार्थी सहसा जाणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत यावी.

माध्यमिक शाळेमध्यें योग्य ती फी आकारण्यांत येईल. शेकडा ५० मुलांना नादाऱ्या किंवा इतर सवलती मिळतील. केवळ गरीब म्हणून कोणाही हुशार मुलाचे अभ्यासास अडथळा येऊं नये. ज्या मुलाची निवड रीतसर झाली नाहीं, असा मुलगा माध्यमिक शाळेंत दाखल होतां कामा नये. परंतु पालकांनीं शिक्षणाप्रीत्यर्थ होणारा सर्व खर्च दिल्यास अशीं कांहीं मुलें जादा म्हणून घेण्यास मंडळाची संमति आहे. शिक्षणापासून स्वतःचा पूर्ण फायदा करून घेण्याइतकी ज्यांचे ठिकाणीं पात्रता नाहीं, त्यांचेसाठीं सरकारनें पैसा खर्च करणें बरोबर होणार नाहीं."

रिपोर्टामध्यें माध्यमिक शिक्षणाचें ध्येय खालीलप्रमाणें दर्शित केलें आहे.

" विश्वविद्यालयाचे शिक्षणाची पूर्वतयारी म्हणून माध्यमिक शिक्षण समजण्यांत येऊं नये. तें स्वयंपूर्ण आहे. माध्यमिक शाळेंतून पास झालेल्या मुलांपैकीं कांहीं मुलें जरी विद्यापीठामध्यें जाणार असलीं, तरी बराचशा मुलांना, त्यांना उद्योग-धंद्यामध्यें लायक बनविण्यासाठीं, शिक्षण द्यावें लागेल. कांहीं विद्यार्थ्यांना एक ते तीन वर्षेपर्यंत पूर्ण वेळ किंवा अर्ध वेळ, शिक्षण देऊन एकादी कला किंवा हुन्नर शिकविणें भाग पडेल."

सरकारनें मंजूर केलेल्या माध्यमिक शाळांचे दोन वर्ग असतील.

"(१) भाषिक किंवा सांस्कृतिक शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा. (२) यांत्रिक शिक्षण देणाऱ्या माध्यमिक शाळा. पहिल्या प्रकारचे शाळेमध्यें सांस्कृतिक शिक्षण आणि केवळ शास्त्रीय शिक्षण दिलें जाईल. दुसऱ्या प्रकारचे शाळेमध्यें प्रायोगिक शास्त्र, धंदा व व्यापार यासंबंधीचें विषय ठेविले जातील. दोन्ही प्रकारच्या शाळांमध्यें कनिष्ठ व वरिष्ठ, किंवा ज्युनिअर व सीनिअर, असें दोन विभाग राहतील. या दोन्ही शाळेंत ज्युनिअर विभागाचे

अभ्यासक्रमांत फारसा फरक रहाणार नाहीं. सर्व समाजामध्यें मानवता कशी निर्माण करतां येईल, हें सर्व विषयांचें अंतिम ध्येय राहील. कला आणि संगीत हे विषय दोन्ही प्रकारचे शाळेच्या अभ्यासक्रमांत ठेविले जातील, आणि सर्व मुलींना ' गृहशास्त्र ' हा विषय घ्यावा लागेल. ज्युनिअर विभागांत एका प्रकारचे शाळेंतून दुसऱ्या प्रकारचे शाळेंत जाण्यास कोणतीच आडकाठी रहाणार नाही. ज्या विभागांत एकच माध्यमिक शाळा आहे, त्या ठिकाणीं मुलांना निवडतां यावेत म्हणून, वेगवेगळे अभ्यासक्रम शिकविण्याची सोय असावी. खेडेविभागांत शेतकी शिक्षणाची जोड देण्यांत यावी..."

सर्व माध्यमिक शाळांतून मुलांची मातृभाषा ही बोधभाषा असावी. इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून, आवश्यक विषय समजून, शिकविण्यांत यावी.

दोन्ही प्रकारच्या शाळांमध्यें कोणते विषय शिकविले जावे यांची याद दिली आहे. याद ही केवळ विषयांची सूचक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यास सर्व विषय शिकविले जावेत असा हेतु नाहीं. दोन्ही शाखांमध्यें सारखे असणारे विषय. (१) मातृभाषा. (२) इंग्रजी. (३) चालू भाषा. (४) इतिहास–हिंदुस्थानचा आणि जगाचा. (५) भूगोल–हिंदुस्थानचा आणि जगाचा. (६) गणित. (७) शास्त्र. (८) अर्थशास्त्र. (९) शेतकी. (१०) कला. (११) संगीत (१२) शारीरिक शिक्षण. भाषिक माध्यमिक शाळांमध्यें माहित भाषा व नागरिक शास्त्र या विषयांचा, जादा विषय म्हणून, समावेश करण्यांत आला आहे. यांत्रिक माध्यमिक शाळेमध्यें शास्त्रीय विषयांचा सखोल अभ्यास करावयाचा आहे. लाकूडकाम किंवा धातूकाम, स्थापत्य विषयाचें प्रारंभिक ज्ञान, मोजमापाचें ड्राईंग, यांसारखे कलात्मक विषय; जमाखर्च, लघुलेखन, टंक–लेखन (टाईप–रायटिंग), गणना–शास्त्र, व्यापारी व्यवहार, यांसारखे व्यापारी विषय; यांचाही समावेश विषयांचे सर्वसाधारण यादीमध्यें करण्यांत आला आहे. मुलींना इतर विषयांबरोबर गृहशास्त्र हा एक विषय आहे.

हिंदी विश्वविद्यालयांचे बाबतींतही रिपोर्टांमध्यें बऱ्याच उणीवा दाखविण्यांत आल्या आहेत. सर्वसाधारण समाजाच्या गरजा आणि कॉलेजमध्यें शिकविल्या जाणाऱ्या गोष्टी यांमध्यें कोणत्याच प्रकारचा संबंध नाहीं, ही मोठी उणीव होय. जेवढे पदवीधर बाहेर पडतात, त्या सर्वांना नोकऱ्या मिळतात कीं नाहीं, या प्रश्नाचा विचारच केला जात नाहीं. परीक्षांना वाजवीपेक्षां फाजील महत्त्व दिलें जातें. परीक्षा या नियमित पुस्तकी ज्ञानावर आधारलेल्या आहेत. स्वतंत्र विचाराच्या प्रवृत्तीला किंवा खऱ्या हुशारीला कोठें वावच नाहीं. थोड्या कसोशीनें चाचणी घेतली असतां जीं मुलें विद्यापीठांत प्रवेश मिळवूं शकलीं नसतीं, अशीं मुलें, मॅट्रिक्युलेशनसारख्या सोप्या परीक्षेशिवाय इतर निवडीचें साधन नसल्यानें, विद्यापीठांत घेतलीं जात आहेत. ज्यांना गरिबीमुळें विद्यापीठाचा फायदा घेतां येत नाहीं, अशा विद्यार्थ्यांना उदारहस्तें मदत देण्याची कोणतीच योजना नसल्यानें, ही परिस्थिति आधिकच गढूळ झाली आहे. हिंदी विश्वविद्यालयांतून जेवढीं मुलें नापास होतात, तेवढीं जगाच्या पाठीवर असणाऱ्या इतर कोणत्याही विश्वविद्यालयांमध्यें होत नाहींत.

विद्यापीठांतील शिक्षणासंबंधीं रिपोर्टांमध्यें खालीलप्रमाणें थोडक्यांत सूचना दिल्या आहेत.

" आज भारतीय विद्यापीठांमध्यें जरी कांहीं चांगल्या गोष्टी असल्या तरी, राष्ट्रीय शिक्षणाच्या गरजा लक्षांत घेतां, त्या सर्व सध्यांच्या विद्यापीठाकडून पुऱ्या पाडल्या जातील, असें दिसत नाहीं. सर्वत्र शिक्षणाचा दर्जा वाढावा यासाठीं ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठांतील अभ्यासक्रमापासून स्वतःचा फायदा करून घेतां येईल अशाच विद्यार्थ्यांना विद्यापीठांत प्रवेश दिला पाहिजे. माध्यमिक शाळांची पुनर्व्यवस्थिति करण्याचें जें घाटत आहे त्यायोगें हें कार्य सुलभ होणार आहे. गरीब विद्यार्थ्यांना योग्य ती आर्थिक मदत देण्यांत यावी. सध्यांचा विद्यापीठाची इंटरमीजिएटची परीक्षा रद्द करण्यांत यावी. इंटरमीजिएटचा सर्व अभ्यासक्रम शेवटीं माध्यमिक शाळेंतील मॅट्रिक्युलेशनचे अभ्यासक्रमास जोडण्यांत यावा. आज ही

उडी कदाचित् मोठी होईल, म्हणून आज कॉलेजच्या पहिल्या वर्षांचा अभ्यास माध्यमिक शाळेस जोडण्यांत यावा व इंटरमीजिएटचा अभ्यासक्रम हा कॉलेजांतील पहिल्या वर्षाचा अभ्यासक्रम समजण्यांत यावा. विश्वविद्यालयाचा अभ्यासक्रम कमीत कमी तीन वर्षांचा असावा. कांहीं विषयांकरतां जास्त वेळ द्यावा लागेल. स्वाध्याय पद्धतीचा सर्वत्र प्रसार केला जावा; व विद्यार्थी आणि शिक्षक यांचा जास्त वैयक्तिक संबंध येईल, असें प्रयत्न केले पाहिजेत. प्रपद्वीक अभ्यास-क्रमाचा दर्जा, विशेषतः तात्विक व प्रायोगिक संशोधन कार्यामध्यें, वाढणें किती महत्त्वाचें आहे, हें पटवून दिलें पाहिजे. नोकरीच्या अटी नोकर लोकांना जास्त सोयीच्या होतील असे प्रयत्न व्हावयास पाहिजेत, त्याचप्रमाणें विद्यापीठ व कॉलेज यांतील शिक्षकांचे पगार वाढले पाहिजेत. सध्यांचे नियमानें योग्य प्रकारचे स्त्री व पुरुष शिक्षकाचे धंद्याकडे आकर्शिले जात नाहींत. यासाठीं इंडियन युनि-व्हर्सिटी ग्रँटस् कमिटी नेमण्यांत यावी..."

माध्यमिक अभ्यासक्रम पुरा करून बाहेर पडलेल्या पंधरा मुलांपैकीं फक्त एक मुलगा विद्यापीठांत जाण्यास योग्य ठरेल, असें मंडळानें रिपोर्टांत आपलें मत दिलें आहे. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना विद्यापीठांचा अभ्यासक्रम पुरा करतां यावा यासाठीं कमीत कमी एक तृतीयांश मुलांना आर्थिक मदत दिली पाहिजे.

हस्तव्यवसायाचें व उद्योगधंद्याचें शिक्षण.

हिंदी कलेच्या व उद्योगधंद्याच्या कारागीरांचें रिपोर्टानें चार विभाग पाडलेले आहेत.

(१) वरिष्ठ दर्जाचे कारागीरः—यांत मुख्य कारागिरांचा व भावी संशोधकांचा अंतर्भाव होतो. या लोकांना हस्तव्यवसायाच्या माध्यमिक शाळांमधून प्राथमिक शिक्षण मिळेल व नंतर विद्यापीठाच्या धंदेशिक्षणाच्या खात्यामध्यें किंवा व्यावसा-यिक शिक्षण देणाऱ्या राष्ट्रीय शिक्षणसंस्थेमध्यें त्यांचा प्रवेश होईल. फार कसोशीनें विद्यार्थी निवडून या शाळेंत पाठविलें जातील. त्यांची संख्या फार थोडी राहील.

(२) कुशल कारागीरः—यांत फोअरमनच्या दर्जाचे लोक राहतील. हे लोक हस्तव्यवसायाच्या माध्यमिक शाळांमधून शिकून तयार होतील. परंतु या विद्या-र्थ्यांना या शाखेंतील राष्ट्रीय प्रमाणपत्र मिळविण्यासाठीं किंवा वरिष्ठ प्रतीचें शिक्षण घेण्यासाठीं कांहीं दिवस हा व्यावसायिक अभ्यासक्रम चालू ठेविला पाहिजे.

(३) साधे पण कुशल कारागीरः--सेनीअर बेसिक शाळेतून बाहेर पडल्यानंतर दोन किंवा तीन वर्षेपर्यंत धंदेशिक्षणाचे शाळेंत यांचा अभ्यास होईल.

(४) थोडी फार कुशलता मिळविलेला किंवा कौशल्यहीन असा कामकरी वर्गः--सेनिअर बेसिक स्कूलमध्यें ज्यांनी थोडें हस्तव्यवसायाचें काम केलें आहे, असा हा वर्ग राहील. या लोकांना सर्व साधारण शिक्षण देऊन आपल्या अंगीं कौशल्य निर्माण करण्याची संधी देण्यांत आली पाहिजे.

या सर्व कारागिरांना उत्तम प्रकारचें ट्रेनिंग देण्याची व्यवस्था करण्यांत येईल. याशिवाय हिंदुस्थानांत ज्याला अर्ध–वेळ योजना म्हणतात अशा योजनेची फार जरुर आहे. आधुनिक काळांत धंदेशिक्षणाच्या कोणत्याही योजनेंत दिवसाच्या अर्ध-वेळ चालू असणाऱ्या वर्गाची जास्त जरूर आहे. या वर्गांतील विद्यार्थी पगारी नोकर म्हणून फॅक्टरींत, धंद्यांत किंवा व्यापारांत काम करतील. या कामावरोवर आपलें ज्ञान व कौशल्य वाढविण्याची त्यांना संधि देण्यांत येईल. या अर्ध-वेळ योजनेचे फायदे पुष्कळ आहेत. अर्ध–वेळ योजनेमुळें जें शिक्षण मिळणार आहे, तें प्रौढ शिक्षणाचे योजनेनेंही मिळणार आहे. एकाच शिक्षणाची पुनरावृत्ति दोन्ही ठिकाणीं होणार नाहीं ही गोष्ट जवाबदार अधिकारी पाहतील.

" प्रौढ शिक्षणाचा उद्देश प्रत्येक मनुष्यास कर्तव्यगार नागरिक वनवून लोकशाहीचें ध्येय प्रत्यक्ष सृष्टींत उतरविणें, हा आहे... हिंदुस्थानांत प्रौढ शिक्षणाच अर्थ प्रौढ साक्षरता एवढाच आज मर्यादित केलेला आहे. कारण उघड आहे. या देशाचा प्रश्न पाश्चिमात्य देशांपेक्षां अगदींच वेगळा आहे. मुलाला पळण्यापूर्वी चालण्यास शिकलें पाहिजे; त्याचप्रमाणें प्रौढ शिक्षणापासून प्राप्त होणारे फायदे मिळविण्यासाठीं प्रौढांना अगोदर साक्षर झाले पाहिजे. कांहीं दिवस तरी या देशांत साक्षरतेवर जास्त भर दिला पाहिजे. साक्षर झालेल्यांना आपलें शिक्षण पुढें चालू ठेवण्यास प्रोत्साहन व संधि मिळावी, यासाठीं प्रौढ शिक्षणाची कांहीं योजना हातीं घेण्यास लागलें पाहिजे."

प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रमाविषयीं रिपोर्टांत खालीलप्रमाणें सूचना केल्या आहेतः--

ज्यांचें वय १० ते ४० वर्षांचे आहे, अशा प्रौढांना सर्वसाधारणपणें प्रौढ शिक्षणाचे वर्गांत दाखल होता येईल. शक्यतोंवर १० ते १६ वर्षें वयांच्या मुलांचे वेगळे वर्ग व तेही, होताहोईतों दिवसाचे, भरविण्यांत यावेत. सर्व वयाचे प्रौढ एकत्र आणणें बरोबर नाहीं. त्याचप्रमाणें शक्य तर तरुण मुलींचेंही वर्ग घेण्यांत यावेत आर्थिक दृष्ट्या किंवा इतर व्यावहारिक अडचणीमुळें हें करणें शक्य न झाल्यास सर्व स्त्रियांना एकत्र शिक्षण देण्यास हरकत नाहीं.

प्रौढ शिक्षण परिणामकारक व आकर्षक व्हावें यासाठीं चित्रें, तक्ते, मॅजिक लॅन्टर्न, सिनेमा, ग्रामोफोन, रेडिओ वगैरे साधनांचा शक्य तितका उपयोग करावा. संगीत–गायन व वादन, नृत्य–विशेषतः स्थानिक पद्धतीचे–व नाट्य, यांचीही मदत घ्यावी.

चांगल्या व पुरेशा पुस्तकालयांचीही तरतूद व्हावयास पाहिजे. हिंदुस्थानसारख्या देशांत पुस्तकालयांची मोठी योजना अस्तित्वांत येणें जरूर आहे; ही खर्चाची बाब आहे, परंतु फिरत्या पुस्तकालयाच्या व्यवस्थेमुळें फारसा खर्च येईल, असें वाटत नाहीं.

प्रौढ शिक्षणाचे बाबतींत खाजगी संस्थेकडून बरीचशी मदत होण्यासारखी असली तरी हें कार्य कोणतीही मदत न घेतां लोकांना करतां येणार नाहीं. यासाठीं सरकारनें प्रौढ–शिक्षण ही आपली मुख्य जबाबदारी आहे, असें समजून मदत करावी.

स्त्रियांमध्यें प्रौढ शिक्षणाचा प्रसार करावयाचा प्रश्न थोडा कठीण आहे. प्रौढ शिक्षणाचे वर्गांत २५ पेक्षां जास्त लोक नसावेत. सर्व योजना एकदम हातीं घेतां येणार नाहींत. पहिली पांच वर्षें योजना तयार करणें, शिक्षकांची जमवाजमव करणें, त्यांना विनीत करणें वगैरे जरूर त्या गोष्टी करण्याकडे खर्च होतील.

शिक्षकांच्या नेमणुका व ट्रेनिंग:–

पूर्वबेसिक व ज्युनिअर बेसिक शाळेंत प्रत्येक ३० मुलांमागें एक शिक्षक, सीनिअर बेसिक शाळेंत प्रत्येक २५ मुलांमागें एक शिक्षक व माध्यमिक शाळेंत प्रत्येक २० मुलांमागें एक शिक्षक लागेल. पूर्व बेसिक, ज्युनिअर व सीनिअर बेसिक शाळेंतील शिक्षक माध्यमिक शिक्षणक्रम पुरा करून दोन वर्षांचें ट्रेनिंग घेतलेले असतील. माध्यमिक

शाळेंतील पदवीधर शिक्षकांना एका वर्षाचें व इतर शिक्षकांना दोन वर्षाचें ट्रेनिंग घ्यावें लागेल.

शिक्षकांची निवड इंग्लंडमधील कांहीं भागांत जशी करतात तशी करण्यांत यावी. "ज्यांना शिक्षक होण्याची इच्छा आहे अशा योग्य विद्यार्थ्यांची निवड, माध्यमिक अभ्यासक्रमाच्या शेवटच्या दोन वर्षांत, केली जाते. शाळेचे प्रमुख व इन्स्पेक्टर हे त्यांचेवर लक्ष ठेवतात व त्यांना इतर शाळांना भेटी देण्याची व प्रत्यक्ष शिकविण्याचें काम करण्याची संधि देण्यांत येते. शिक्षकाचे धंद्यास अयोग्य वाटणारीं मुलें आपोआपच गळतात. या मुलांना बहुधा शिष्यवृत्त्या दिल्या जातात."

यांत्रिक किंवा व्यापारी शाळेंतील शिक्षकांच्या ट्रेनिंगचें पुस्तकी शिक्षण हस्तव्यवसायाचे संस्थेमधून दिलें जाईल व धंद्यामध्यें प्रत्यक्ष अनुभव मिळेल. यांचेकारतां स्वतंत्र ट्रेनिंग स्कूलस् किंवा कॉलेजें असणार नाहींत.

विनीत शिक्षकांचें ज्ञान अद्यावत रहावें यासाठीं मधून मधून परिष्कार सत्रांची (Refresher Courses) योजना करण्यांत यावी.

पूर्ण शिक्षित व विनीत अशा शिक्षकांशिवाय कोणताही शिक्षक शाळेंत लावून घ्यावयाचा नाहीं, असें सल्लागार मंडळानें आपलें मत जोरानें प्रतिपादन केलें आहे. हे शिक्षक ज्या प्रमाणांत बाहेर पडतील त्या प्रमाणांत रिपोर्टांत दिलेली योजना अमलांत यावयाची आहे.

शिक्षकाचे धंद्यांत त्या व्यवसायास लायक अशींच माणसें आकर्षिलीं जावींत, यासाठीं शिक्षकांना--विशेषतः प्राथमिक शाळेंत काम करणाऱ्या ज्या शिक्षकांना कमी पगार देण्यांत येतो त्यांना—वाढवून पगार देण्याची शिफारस करण्यांत आली आहे. प्रांतिक सरकारच्या विचारासाठीं, नवीन व कोणासही पटतील असें पगाराचें तात्पुरतें प्रमाण रिपोर्टांत सुचविण्यांत आलें आहे.

मुलांच्या आरोग्यासंबंधीं रिपोर्टीनें खालील सूचना केल्या आहेत:--

नेहमीची शारीरिक तपासणी (अ) सहाव्या वर्षी, बेसिक किंवा प्राथमिक शाळेंत प्रवेश करतांना, (ब) आकराव्या वर्षी (क) व चवदाव्या वर्षी, शाळा सोडतांना, घेण्यांत यावी. माध्यमिक शाळांतील मुलांची शेवटची तपासणी, सोळाव्या किंवा सतराव्या वर्षी घेण्यांत यावी. प्रत्येक मुलासाठीं तपासणीचें नोंदणी-कार्ड ठेवण्यांत यावें व तें त्या मुलाबरोबर, तो एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत जातांना, देण्यांत यावें. दोन तपासणींमध्यें जर कांहीं शारीरिक दोष शिक्षकाचें निदर्शनास आलें, तर त्यानें ते डॉक्टरांचे नजरेस आणावेत. शिक्षकानेंहीं वर्षांतून दोनदां मुलांच्या वजनाची व उंचीची नोंद करावी व विशेष कांहीं दिसून आल्यास डॉक्टरांना कळवावें.

वैद्यकीय तपासणी लायक व विशेष शिक्षण मिळालेल्या डॉक्टराकडून घेण्यांत यावी. ही तपासणी शाळेच्या आवारांत, व शक्यतर, पालकांचे समोर व्हावी. नोंदणी पत्रकाचा विचार डॉक्टरांनीं हेडमास्तरबरोबर करावा.

वैद्यकीय तपासणींमध्यें दाखविलेले दोष जर दूर केले नाहींत, तर त्या तपासणीचा कांहीं उपयोग नाहीं. लहान दोष असतांच ते शाळेंतच सुधारले जावेत व त्यासाठी कांहीं स्वतंत्र व्यवस्था केली जावी. मुलांचें योग्य पोषण होत नाहीं. या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरविण्यांत यावें.

शारीरिक शिक्षण सक्तीचें असावें. हें शिक्षण शाळांतून व कॉलेजांतून दिलें जावें, यासाठीं शिक्षणखात्याच्या मुख्य ठिकाणीं, शारीरिक-शिक्षणयोजनेप्रमाणें व्यवस्था करणारा सुशिक्षित व अनुभवी अधिकारी असावा. त्याचे हाताखालीं लायक डुय्यम अधिकारी असावेत. शिक्षकांना योग्य ट्रेनिंग देण्याची व्यवस्था करण्यांत यावी. वैद्यकीय मदत व जेवण याकरतां खर्च, शाळेच्या एकूण खर्चाच्या एक दशांश होईल, असा अंदाज आहे.

पुनर्व्यवस्थितीसंबंधीच्या इतर बाबींविषयीं रिपोर्टांत सल्लागार मंडळानें खालील सूचना केल्या आहेत:--

(अ) **नोकरीची व्यवस्था** करणें हें शिक्षणखात्याच्या कारभाराचें महत्वाचें अंग आहे. या कार्यासाठीं व्यवसाय खातें (Employment Bureau) उघडण्याची हिंदुस्थानांत फार जरूर आहे, कारण वाढत्या पगाराच्या जागा आज फार थोड्या आहेत. या खात्यांकडून योग्य प्रकारचें काम व्हावें, यासाठीं, शाळांचा कारभार कसा चालतो व औद्योगिक परिस्थिति काय आहे, याची प्रत्यक्ष माहिती असणाऱ्या तज्ज्ञांची त्या ठिकाणीं नेमणूक झाली पाहिजे.

सीनीअर बेसिक, ज्युनियर यांत्रिक व माध्यमिक शाळांमधून बाहेर पडलेल्या सर्व मुलांची दखलगिरी या खात्यानें घ्यावी. विद्यापीठांसाठीं वेगळ्या कचेऱ्या असाव्यात. सर्व मोठ्या शाळांतून व कॉलेजांतून, विद्यार्थ्यांनीं भावी काळांत, कोणत्या खात्यांमध्यें किंवा धंद्यामध्यें काम करावें, हें ठरविणारे कांहीं वृत्ति–शिक्षक (career masters) असणें श्रेयस्कर आहे. या शिक्षकांचा, नोकऱ्या मिळवून देण्यासाठीं अस्तित्वांत आलेल्या व्यवसाय खात्याशीं संबंध असावा.

(ब) पंगू मुलांचें शिक्षण:––पंगू मुलांचे दोन मुख्य भाग पाडतां येतील. (१) बौद्धिक दृष्टीनें पंगू, व (२) शारीरिक दृष्ट्या पंगू. जे बुद्धीनें मंद, अभ्यासांत मागासलेले, मनानें भिन्ने किंवा दुबळे आहेत, ते पहिल्या वर्गांत मोडतील. आंधळे, बहिरे, बहिरे-मुके, लंगडे किंवा तोतरे दुसऱ्या वर्गांत मोडतील.

राष्ट्रीय–शिक्षण योजनेमध्यें अशा पंगू मुलांच्या शिक्षणाची कांहीं तरतूद शिक्षण खात्यामार्फत केली गेली पाहिजे. या बाबतींत आजपर्यंत जे प्रयत्न झाले आहेत ते खाजगी स्वरूपाचेच आहेत.

या दुबळ्या मुलांना शक्य–तोंवर असें शिक्षण द्यावें कीं, त्यायोगें ते आपल्या निर्वाहाचें साधन तयार करूं शकतील. अशा मुलांना उद्योग–धंदा पाहून देण्याची, व त्यानंतर त्यांची सुस्थिति राहील, हें पाहण्याची, विशेष काळजी घेतली पाहिजे.

(क) करमणुकीच्या व सामुदायिक खेळांची फार जरूरी आहे. " शिक्षण म्हणजे बौद्धिक, नैतिक किंवा शारीरिक शिक्षणरूपी औषधाचा घोट घेणें नव्हे, तर समाजामध्यें मिसळून वागतांना मिळणारें ज्ञान किंवा अनुभव आहे. "

आकरा किंवा बारा वर्षांचे मुलांना बाग काम, लोक नृत्य, कवाइंत, नाट्य, बैठे किंवा मैदानी खेळ, धांवणें, उड्यामारणें, सहली व करमणुकीचे कांहीं हस्तव्यवसाय, वगैरे उद्योग हितकारक ठरतील. बारा किंवा बारा वर्षांपेक्षां जास्त वयाच्या मुलांसाठीं सामुदायिक करमणुकीचे खेळ असावेत. या खेळांत वक्तृत्त्वाचे संघ, नियमबद्ध तयार केलेले खेळ, अंतर-शालेय खेळाचे सामने, वगैरेंचा अंतर्भाव होतो. खेड्यापाड्यांमधून **तरूण शेतकऱ्यांचे-संघ** बनविल्यास या कार्यासाठीं योग्य तो उत्साह निर्माण करतां येईल.

हे खेळ योग्यरीतीनें खेळले जावेत, यासाठीं प्रशस्त क्रीडांगणाची जरूरी आहे.

शाळेंत जाणाऱ्या मुलामुलींशिवाय, १४ ते २० वय वयाचीं जीं मुलें शाळेंत जात नाहींत, त्यांचेकडेही लक्ष पुरविलें पाहिजे. या वयाचे मुलांमुलींसाठीं सर्व हिंदु-

स्थानभर **तरुणांचे-संघ** तयार झालें पाहिजेत. या संघाकरतां-मग ते मुलग्याचे असोत कीं मुलींचे असोत-योग्य ते संघनायक शिकवून तयार करणें अगत्याचें आहे. लढाईच्या कामामधून मोकळ्या झालेल्या लष्करी शिपायांमधून कदाचित् असे नायक मिळूं शकतील; प्रौढांकरतां सामाजिक आणि करमणुकीच्या कामाची तरतूद करून ठेवणें, हें कोणत्याही समाज-सेवा-योजनेचें प्रमुख अंग आहे.

(ड) **राज्यव्यवस्था किंवा कारभार**:-शैक्षणिक कारभाराचे दृष्टीनें प्रांत हा विभाग मान्य केला जावा. विद्यापीठें किंवा उच्च यांत्रिक शिक्षण-संस्था अखिल भारतीय म्हणून समजण्यांत याव्यात; व त्यांचा संबंध मध्यवर्ती सरकारशीं असावा.

अखिल भारतीय शैक्षणिक सुधारणेसाठीं लहान लहान हिंदी संस्थानांचा एक संघ करण्यांत यावा, किंवा कांहीं लहान संस्थानें जवळच्या प्रांतांशीं जोडण्यांत यावीत.

राष्ट्रीय शिक्षण योजना यशस्वी करण्यासाठीं, प्रांतिक सरकार व मध्यवर्ती सरकार यांचे आर्थिक व इतर बाबतींत, पूर्ण सहकार्य झालें पाहिजे.

ठरविल्याप्रमाणें शिक्षणाची प्रगति व्हावी यासाठीं आपल्या कार्य क्रमामध्यें योग्य ते फरक करण्याचा अधिकार प्रांतिक सरकारांना असावा. जें कार्य स्थानिक स्वराज्य संस्थेस चांगल्या प्रकारें करतां येत आहे, तेवढें वगळून, बाकीच्या शैक्षणिक बाबतींत सर्व कारभार प्रांतानें स्थानिक स्वराज्य संस्थेकडून काढून आपल्या हातीं घेणें अधिक श्रेयस्कर आहे, असा अनुभव येऊ लागला आहे.

स्थानिक लोकांचें लक्ष शिक्षणविषयक बाबींकडे लागावें, यासाठीं, शाळेची व्यवस्थापक मंडळें, स्कूल-बोर्डें, आणि जिल्हा शिक्षण समित्या नेमण्यांत याव्यांत; मात्र हें करण्यापूर्वी या समित्या मधून काम करण्यास योग्य माणसें मिळणें शक्य आहे किंवा कसें, याचा प्रथम विचार केला जावा. सर्व प्रांतांकरतां शैक्षणिक सल्लागार मंडळ नेमल्यास बरें.

शिक्षण खात्याचे कारभारांत जी आबाळ दिसते आहे, ती थांबविण्यासाठीं, ज्यास शैक्षणिक योजना यशस्वी तऱ्हेनें पार पाडतां येतील असे, अधिकारी नेमणें अगत्याचें आहे.

(इ) कर्ज काढून शाळेच्या इमारती बांधण्यांत याव्यात, असें रिपोर्टांत मंडळानें सुचविलें आहे.

(**एफ**) संशोधनासाठीं भरपूर संधि देण्यांत यावी. "याचें कारण सहज लक्षांत येणार आहे. शिक्षणाचा प्रसार चालू असतां, शिक्षणाचे कामीं उपयोगांत आणिलेल्या पद्धति अद्यावत् आहेत कीं नाहींत, व हिंदुस्थानच्या गरजा लक्षांत घेऊन त्या बसाविण्यांत आल्या आहेत किंवा कसें, हें पाहणें जरूर आहे."

ब्रिटिश हिंदुस्थानाला राष्ट्रीय-शिक्षण-योजना लाविल्यास वार्षिक खर्च काय येईल हें दाखविणारा तक्ता

खातीं किंवा विभाग	वर्षाला किती मुलांची सोय करावी लागेल?	रकाना नं. २ यामध्यें दाखविलेली संख्या कशी काढली? व अभ्याक्रमाची मर्यादा	प्रत्येक मुलामागें येणारा वार्षिक खर्च	अंदाजे वार्षिक खर्च	सरकारी उत्पन्नाशिवाय इतर उत्पन्न अंदाजें	कराचे रूपानें वसूल होणाऱ्या रकमेतून होणारा खर्च-अंदाजे
१	२	३	४	५	६	७
			रुपये	रुपये (लक्षांमध्यें)	रुपये (लक्षांमध्यें)	रुपये (लक्षांमध्यें)
१ पूर्व-प्राथमिक किंवा पूर्व-बेसिक शिक्षण (बाल किंवा शिशुमंदिरें)	१०,००,०००	३ ते ६ वर्षें वयाच्या मुलांच्या एक एकवीसांश	३१·८	३२०	... ...	३२०
२ ज्युनिअर बेसिक (प्राथमिक) शिक्षण	३,५९,००,०००	६ ते ११ वर्षांचीं मुलें पांच वर्षांचा अभ्यासक्रम	३१·८	११,४००	... ...	११,४०० } २०,०००
३ सीनीअर बेसिक (वरिष्ठ प्राथमिक किंवा पूर्व-माध्यमिक) शिक्षण.	१,५६,००,०००	११ ते १४ वर्षांचीं मुलें (माध्यमिक शाळेंत न जाणारीं) ३ वर्षांचा अभ्यासक्रम	५५ ३	८,६००	... ...	८,६०० }
४ माध्यमिक शिक्षण	७३,००,०००	ज्युनिअर बेसिक शाळांतील प्रत्येक पांच मुलांमागें एक मुलगा, ६ वर्षांचा अभ्यासक्रम	१०८·७	७,९००	२,९००	५,०००

५ विश्वविद्यालयीन शिक्षण	२,४०,०००	माध्यमिक शाळांतून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक १५ पैकीं १ मुलगा, ३ वर्षांचा अभ्यासक्रम माध्यमिक शाळांतून बाहेर पडणाऱ्या मुलांच्या शेकडा ४ टक्के, ३ वर्षांचा अभ्यासक्रम सीनीअर बेसिक शिक्षण पुरें करून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांपैकीं शेकडा ४. २ वर्षांचा अभ्यासक्रम	४००	९६०	२१०	६७०
६ उद्योगधंदा, व्यापार व कला शिक्षण-पूर्ण वेळ (अ)	७५,०००		५००	३७५		
,, (ब)	२,००,०००		१५०	३००	९७१	१७५	८००
अर्ध-वेळ (क)	... ...	... ...	...	३००			
७ प्रौढ शिक्षण	... ...	... ...	...	३००	...	३००	
८ शिक्षकांचें ट्रेनिंग	... ...	... ...	...	६२०	१७०	४५०	
९ करमणुकीचे आणि सामुदायिक खेळ	... ...	... ...	...	१००	...	१००	
१० नोकऱ्या मिळवून देण्यासाठीं तरतूद	... ...	... ...	...	६०	...	६०	
११ शालेय वैद्यकीय तपासणी वगैरे १२ पंगू मुलांचें शिक्षण १३ कारभार	योग्य स्थळीं यांसाठीं झालेला खर्च धरण्यांत आला आहे.						

या योजनेचा विचार करतांना खालील मुद्दे लक्षांत ठेवावेत:

(१) युद्धपूर्व रहाणीचें मान लक्षांत घेऊन खर्चाचा अंदाज केला आहे.

(२) योजनेस प्रथमपासून सुरवात करावयाची, असें समजून, खर्चाचे आंकडे काढले आहेत. ब्रिटिश हिंदुस्थानमध्यें आज शिक्षणावर जो २० कोटी रुपये खर्च होतो (यांपैकीं सरकारास फक्त १७॥ कोटी खर्च करावे लागतात) तो, ही नवीन शिक्षण-योजना पूर्णपणें अमलांत येईपर्यंत वाढणाऱ्या लोकसंख्येच्या शिक्षणासाठीं, अंशत: खर्च होणार आहे.

(३) शाळांना लागणाऱ्या जागा खरेदी करण्यासाठीं व त्यावर इमारती बांधण्यासाठीं पैसा कर्जरूपानें उभा करण्यांत येणार आहे. या पैशावर द्यावें लागणारें व्याज व घसारा फक्त हिशेबांत धरलीं आहेत.

(४) पहिलीं पांच वर्षें, शिक्षणाची योजना आखण्यांत, तिचेविषयीं माहिती लोकांना देण्यांत व शिक्षक निवडून त्यांना ट्रेनिंग देण्यांत खर्च होणार आहेत. त्यानंतर योजना अमलांत आणण्यासाठीं पंच-वार्षिक सात योजना आखल्या जातील. प्रत्येक पंच-वार्षिक योजनेमध्यें ठराविक भागाचा किंवा भागांचा विचार केला जाईल.

(५) येणारा खर्च प्रांतिक व मध्यवर्ती सरकारांमध्यें वांटून घेणें जरूर आहे. आज प्रांतामध्यें शिक्षणासाठीं जो खर्च येतो तो सर्व प्रांतिक सरकार सोसतें. योजना सुरू होण्यापूर्वीं या प्रश्नाचा कायमचा निर्णय लावण्यांत यावा; " कारण एकदा कार्य सुरूं झाल्यावर तें कोणत्याहि निमित्तानें बंद पडतां कामा नये. "

८ सार्जंट रिपोर्टाचे गुण-दोष:—मध्यवर्ती सरकारच्या सल्लागार मंडळानें तयार केलेल्या शिक्षण-योजनेची रूपरेषा थोडक्यांत वरीलप्रमाणें आहे. जगांतील शिक्षण तज्ज्ञांपुढें ती आज कांहीं दिवस आहे व सर्व बाजूंनीं तीवर विचार होत आहे. आजवर ज्या सरकारी योजना तयार

झाल्या त्यांमध्यें सार्जंट योजनेस बरेंच वरचें स्थान द्यावें लागेल; कारण तीमध्यें कांहीं गोष्टी मोठ्या धिटाईनें पुढें मांडल्या आहेत. ही योजना व्यापक स्वरूपाची असून सर्व प्रकारच्या शिक्षणाचा तीमध्यें विचार केला आहे. शिक्षकाचे धंद्यांत चांगले लोक यावेत म्हणून आकर्षक असे पगार देण्याबद्दल मंडळानें सुचविलें आहे. याशिवाय शिक्षकांचा सामाजिक दर्जा वाढणार नाहीं अशी मंडळाची खात्री आहे. या रिपोर्टाचे योगानें आजवर चालू असणारे वाद, उदाहरणार्थ—प्रथम शिक्षणाचा दर्जा वाढवावा कीं त्याचा प्रसार करावा, सध्यांच्या समाजाच्या आर्थिक हलाकीच्या स्थितींत सक्तीचें शिक्षण सुरूं करणें हितावह होईल किंवा नाहीं, वगैरे वगैरे, मिटले आहेत. शिक्षण—विषयक प्रश्न लोकांसमोर मांडले गेल्यामुळें या रिपोर्टानें लोकांना विचार करावयास लाविलें आहे.

इतकें रिपोर्टाच्या चांगुलपणासंबंधीं म्हणतां येईल. उलटपक्षीं रिपोर्टांत पुष्कळ उणीवा असून, त्या महत्त्वाच्या असल्यानें कांहीं शिक्षणतज्ज्ञांचें समाधान या रिपोर्टामुळें झालें नाहीं. कारणमीमांसा खालीलप्रमाणें करतां येईल.

पहिलें:—राष्ट्रापुढें जें ध्येय ठेवण्यांत आलें आहे, तें अगदींच मिळमिळीत आहे; १९३९ सालीं इंग्लंडचा जो शैक्षणिक दर्जा आहे, तो हिंदुस्थानला चाळीस वर्षांनंतर प्राप्त होणार आहे, म्हणजे योजनेप्रमाणें सर्व गोष्टी घडवून आणिल्या तरी १९८४ मध्यें हिंदुस्थान इंग्लंडच्यामागें ५० वर्षें रहणार. हें ध्येय कोणाही शिक्षणतज्ज्ञाला मान्य होण्यासारखें नाहीं.

दुसरें:—ही योजना पूर्ण होण्यास चाळीस वर्षें लागणार आहेत. ही कालमर्यादा फार मोठी वाटते. शक्य तर, ही कालमर्यादा १५ वर्षांपेक्षां जास्त नसावी. एवढा कालावधि लावण्यास कारण, योजनेसाठीं लागणारे पुरेसे विनीत शिक्षक थोड्या वेळांत मिळणें शक्य नाहीं, हें दाखविण्यांत आलें आहे. शिक्षकाच्या धंद्याचें व इतर सर्वसाधारण शिक्षण, ठराविक

प्रमाणांत, मिळाल्याशिवाय कोणाही माणसाची शिक्षक म्हणून नेमणूक केली जाऊं नये, असा मंडळाचा दावा आहे. हें धोरण अत्यंत प्रतिगामी स्वरूपाचें असून जागांतील कोणत्याही देशाला, आणि इंग्लंडलाही, त्यांनीं आपल्या पूर्व अनुभावाकडे दृष्टि दिल्यास, तें विसंगत वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

शिक्षकाला योग्य दर्जा प्राप्त होण्यासाठीं, कमींत कमी किती शिक्षण असावें, ह जें रिपोर्टांत दिलें आहे, तें ध्येय म्हणून मान्य करण्यास हरकत नाहीं; परंतु असें शिक्षक मिळेपर्यंत शिक्षण–प्रसार थांबविणें कधींही इष्ट होणार नाहीं. दुसऱ्या देशांनीं शिक्षणाचा प्रसार कसा केला हें पाहून हिंदुस्थाननें आपल्या देशांत शिक्षण–प्रसाराचें कार्य आपल्या हातीं घेतलें पाहिजे. एकीकडे जे मिळतील ते लोक घेऊन शिक्षण–प्रसार सुरूं केला पाहिजे व दुसरीकडे शिक्षकांना विनीत करण्याची योजना आंखली पाहिजे. जे मॅट्रिक्युलेशनचे परीक्षेंत नापास झाले आहेत, किंवा ज्यांनीं सीनियर बेसिक शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा केला आहे, असे लोक पूर्व–प्राथमिक किंवा ज्युनियर–बेसिक शाळेंत शिक्षक म्हणून नेमण्यास कोणतीच हरकत नाहीं. या शिक्षकांचे मदतीनेंच योजनेचें पहिलें पाऊल आपण टाकिलें पाहिजे. शिक्षकाचें काम करतां करतां परिष्कार सत्राचे साधनानें किंवा अन्य उपायांनीं या शिक्षकांना थोडें ट्रेनिंग देण्याची व्यवस्था केली तर, हेंच शिक्षक ज्युनिअर बेसिक शाळांतील कांहीं वरच्या यत्तांची जबाबदारी घेण्यास पात्र ठरतील, अशी खात्री वाटते.

स्वत: होऊन हें शिक्षकाचें कार्य करण्यास लोक जर पुढें आले नाहींत, तर शिक्षित पुरुष व स्त्रिया यांना जबरीनें हें कार्य स्वीकारावयास आपण लाविलें पाहिजे. युद्धाचि वेळीं अज्ञातरहेनें सक्ति करून माणसें मिळवावीं लागतात. आपणासही अज्ञान व निरक्षरता यांविरुद्ध युद्ध पुकारावयाचें आहे. या युद्धासाठीं सक्तीनें माणसें मिळविलीं तर त्यांत वावगें काय आहे ?

तिसरें:—या योजनेस लागणाऱ्या खर्चाविषयींही बरीच टीका झाली आहे. १९४० ची लोकसंख्या गृहीत धरून, या योजनेसाठीं खर्चाचा अंदाज ३१३ कोटींचा धरण्यांत आला आहे. १९४० पासून योजना पूर्ण होण्याकरितां जो काळ लागेल, त्या काळांत लोकसंख्येची वाढ होणार, त्याचप्रमाणें युद्धोत्तर काळांत राहणींचें मानही वाढणार. या दोन्ही गोष्टी जमेस धरल्यास, वार्षिक खर्च ६०० कोटी रुपयांवर गेल्याशिवाय राहणार नाहीं. हिंदुस्थानसारख्या गरीब देशाला एवढा खर्च करतां येईल, हें शक्य दिसत नाहीं. शेतीची आणि उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ होऊन, लोकांचें उत्पन्नाचें प्रमाण वाढलें, असें गृहीत धरलें, तरी एवढा खर्च हिंदुस्थानाला झेपेल किंवा नाहीं, हा प्रश्न आहे. आणि म्हणून आर्थिकदृष्ट्या विचार करतां ही योजना अव्यवहार्य वाटते.

चवथें:—योजनेमध्यें ध्येय कोणतें गाठावयाचें, हेंच फक्त दिलें जाहे. तिचा हळू हळू विस्तार कसा करावयाचा हें दाखविलेलें नाहीं. शैक्षणिक बाबतींत कांहीं योजना आखतांना ध्येय कोणतें साध्य करावयाचें, हें सांगणें फार सोपें आहे. तसेंच, आखलेल्या ध्येयापेक्षां मोठें ध्येय पुढें ठेवून त्याला लागणाऱ्या खर्चाचा अंदाज करणें व त्या योजनेचा आराखडा जनतेपुढें मांडणें, हीही बाब फारशी कठीण नाहीं. परंतु एवढ्यानें कार्य भागणार नाहीं. गरज कशाची असेल तर सविस्तर कार्यक्रमाची. ध्येय गांठण्यासाठीं कोणत्या मार्गाचा अवलंब करावयाचा, कोणते टप्पे ध्यावयाचें, हें ठरविणें जरूर आहे. हीच गोष्ट नेमकी रिपोर्टांत गाळण्यांत आली आहे. या योजनेकरतां पुरेसा पैसा उभा करतां आला नाहीं तर सर्व देशभर ही योजना अमलांत न आणतां फक्त कांहीं भागांतच आणावी, एवढीच सूचना रिपोर्टांत केली आहे. अशा योजनेचा स्वीकार, विचारी माणसांकडून झाला नाहीं, तर आश्चर्य कसलें ?

पांचवें:—इंग्लंडमधील शिक्षणाची पद्धत हेंच ध्येय रिपोर्टांत स्वीकारण्यांत आलें आहे. इंग्लंड हा असा एक देश आहे कीं, तो नमुना म्हणून

हिंदुस्थानला ठेवतां येणार नाहीं, कारण सामाजिक, राजकीय व आर्थिक दृष्ट्या दोन्ही देशांमध्यें महदंतर आहे. नमुनाच जर शोधावयाचा असेल तर तो चीन, इजिप्त किंवा टर्की यांसारख्या पौर्वात्य देशांमधून, अथवा ज्या देशांमध्यें हिंदूस्थानसारखी परिस्थिति आहे व ज्यांनीं थोड्या अवधींत उत्तम कार्य करून दाखविलें आहे, अशा डेन्मार्क, सोव्हिएट रशिया यांसारख्या पाश्चिमात्य शेतकीप्रधान देशांमधून मिळवितां येईल.

एकच उदाहरण आपण घेऊं. रशियानें आपले शैक्षणिक प्रश्न कसे सोडविले? १९१४ सालीं रशियाची लोकसंख्या १४ कोटी होती व शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या ७० लक्ष होती. रशियाच्या पूर्व भागांत तर शिक्षणाची कोणतीच सोय नव्हती. साक्षरतेचें प्रमाण शेकडा एकापेक्षांही कमी होतें. तेथें दीडशे भाषा बोलणारीं दोनशें अल्पसंख्यांक राष्ट्रें होतीं. यांपैकीं कांहीं राष्ट्रांना वाङ्मयच नव्हतें; कांहींची भाषा म्हणजे फक्त बोली होती, परंतु त्यांना लिपी नव्हती. अशा प्रकारच्या अडचणी असतांही सोव्हिएट रशियानें आश्चर्यकारक अशी प्रगति घडवून आणिली. पंधरा वर्षांत कांहीं भागांत शेकडा ९० व इतर भागांत शेकडा ७० पेक्षां जास्त साक्षरता पसरवितां आली. बऱ्याच भाषांच्या मूळ लिपीच्या ऐवजी लॅटीन् लिपीचा उपयोग करण्यांत येऊ लागला. चाळीसपेक्षां अधिक बोलींमध्यें तर लॅटीन् लिपीच्या मुळाक्षरांमध्येंही कांहीं सुधारणा कराव्या लागल्या. सर्व देशांत सात वर्षांचें सक्तीचें शिक्षण सुरू केलें. या सर्व प्रयत्नांचा परिणाम असा झाला कीं अर्धवट रानटी समजल्या जाणाऱ्या रशियाला जगांतील सुधारलेल्या सामर्थ्यवान् राष्ट्राचा दर्जा प्राप्त झाला.

१९१४ सालचा रशिया व आजचा हिंदुस्थान, यांची तुलना केल्यास हिंदुस्थानची स्थिति कितीतरी समाधानकारक असल्याचें दिसून येईल. केवळ पंधरा वर्षांत जर रशियाला आपल्या जनतेची सुधारणा करतां आली, तर तेवढ्या वेळांत किंवा त्यापेक्षांही कमी वेळांत, हिंदुस्थानला आपली प्रगति कां करतां येऊ नये? म्हणून देशाच्या भवितव्याबद्दल

ज्यांना तळमळ आहे अशा हिंदवासियांना सार्जंट रिपोर्टीतील चाळीस वर्षांचें कालमान अग्राह्य वाटतें.

सार्जंट रिपोर्टीतील इतर उणीवा दाखविण्याचें कारण दिसत नाहीं. योजना मुख्यतः कशी टाकाऊ आहे याची पुरेशीं कारणें आम्ही वर दिली आहेत. आतां साहाजिकच असा प्रश्न उत्पन्न होणार कीं 'यापुढें हिंदुस्थाननें काय करावें?' हा खरोखरच मोठा प्रश्न आहे. पंतु हिंदी शिक्षणतज्ज्ञांना नामोहरम् करण्याइतका हा प्रश्न बिकट आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. सार्जंट योजनेप्रमाणें दुसरी एकादी योजना-जी हिंदी जनतेला ग्राह्य होईल अशी-शिक्षणतज्ज्ञांनीं तयार करावी व सरकारनें तिला पाठिंबा देऊन ती अमलांत आणावी. आज सरकार व जनता हीं भिन्न नाहींत. उभयतांच्या सहकार्यानें आज-वर अवघड होऊन बसलेला शिक्षणाचा प्रश्न सुटेल, अशी आशा वाटते.

शेवट

१७८१ मध्यें कलकत्ता-मद्रासा स्थापिल्यापासून ते १९४४ च्या सार्जंट रिपोर्टापर्यंत, हिंदुस्थानांत शैक्षणिक सुधारणा कसकशा होत गेल्या, याचा विचार येथपर्यंत या पुस्तकांत आम्ही केला आहे. या दिलेल्या इतिहासावरून असें दिसून येईल कीं, जो हिंदुस्थान, केवळ शंभर वर्षांपूर्वी युरोपांतील कांहीं देशांचे पुढें होता, तो हिंदुस्थान आज मागासलेला म्हणून समजण्यांत येत आहे. हिंदुस्थानच्या मागें जे कांहीं युरोपिअन देश होते, ते आज हिंदुस्थानच्या पुढें गेले आहेत. आशियांतील कांहीं देशहां जे हिंदुस्थानच्या कितीतरी मागें होते ते झपाट्यानें पुढें गेले असून, आज त्यांची गणना पुढारलेल्या देशांमध्यें होत आहे. प्रश्न असा उत्पन्न होतो कीं हिंदुस्थान इतका मागें कां राहिला? या पुस्तकांत या प्रश्नाचें उत्तर आपणांस सांपडेल, परंतु सोयीसाठीं म्हणून हिंदुस्थानच्या मागासलेपणाचीं दोन मुख्य कारणें आम्ही येथें देत आहोंत.

(अ) देशी शिक्षणं-पद्धतीकडे दुर्लक्ष झाल्यामुळें तिचा नाश झाला.

(ब) वाढत्या लोकसंख्येच्या मानानें व आधुनिक काळांतील गरजा लक्षांत घेतां, शैक्षणिक क्षेत्रामध्यें प्रगतीचें पाऊल फार मंद पडलें.

गेल्या दीडशें वर्षांचा इतिहास पाहतां असें दिसून येईल कीं, वाऱ्याच्या झोताबरोबर बिनसुकाणूची नौका ज्याप्रमाणें इतस्ततः भटकत रहावी, त्याप्रमाणें शिक्षणाचें झालें आहे. ठराविक योजना आखून त्याप्रमाणें कार्य चाललें आहे, असें दिसून येत नाहीं. शिक्षण कार्याची आखणी केली असेल तर ती प्रथम सार्जंट रिपोर्टानें, परंतु त्यांतील दोषांमुळें ती हिंदी नागरिकांना स्वागतार्ह वाटत नाहीं. सर्वांना मान्य होईल अशी युद्धोत्तर शिक्षण-योजना हिंदुस्थानकरतां तयार होणें आज इष्ट वाटतें.

अशा तऱ्हेच्या योजनेची रूपरेषा देणें हें या पुस्तकाच्या आटोक्याच्या बाहेरचें आहे, परंतु ही योजना ज्या तत्वांवर आखतां येईल अशीं कांहीं थोडीं तत्त्वें आम्ही येथें देत आहोंत. राष्ट्रीय शिक्षणाच्या पुनर्घटनेचे सात टप्पे होऊ शकतील.

पहिला:—गत इतिहासाची योग्य तऱ्हेनें पाहणी करण्यांत यावी. या योगें चालू व भावी परिस्थितीचें आकलन होऊन चुकांची पुनरावृत्ति होणार नाहीं.

दुसरा:—आजच्या परिस्थितीची छाननी करून तींतील गुण-दोष. निश्चित करणें.

तिसरा:—ध्येय निश्चित करणें.

चवथा:—कार्यक्रम तयार करून त्याची सुरवात कोठें करावयाची, साधनें कोणतीं उपयोगांत आणावयाचीं, मध्यंतरीं दृढीकरणासाठीं कोठें थांबावयाचें, वगैरे ठरविणें.

पांचवा:—योजनेसाठीं पैशाचा पुरवठा करणें.

सहावा:—योजना पार पाडण्यासाठीं जरूर ते कायदे, कार्यकर्त्यांची निवड व त्यांचें ट्रेनिंग, वगैरे साधनांची जमवाजमव.

सातवा—प्रत्यक्ष कार्यास सुरवात. लोकमत बनाविणें, लोकांचें पाठबळ मिळविणें, वेळोवेळीं कार्याचा आढावा घेणें वगैरे कार्यांचा समावेश यांत होऊ शकतो.

कोणत्याही योजनेमध्यें वर दिलेल्या सात गोष्टींचा अवलंब करावा लागतो. हिंदुस्थानांतील शिक्षणविषयक योजना तयार करतांना ऑणखी कांहीं गोष्टींचा किंवा तत्त्वांचा विचार करावयास हवा.

(१) हिंदुस्थाननें इंग्लंडचें अनुकरण करण्याचा प्रयत्न केला म्हणून त्याचें नुकसान झालें. हिंदुस्थान हा खेड्यांचा देश आहे; एकूण वस्तीच्या शेंकडा ८७ टक्के वस्ती खेड्यांत आहे. इंग्लंड हा शहरांचा देश आहे; एकूण वस्तीच्या शेंकडा ८० टक्के लोक शहरांत राहतात. हिंदुस्थान शेती-प्रधान आहे, तर इंग्लंड हा औद्योगिक आहे. हिंदुस्थान हा जगांतील देशांमध्यें एक गरीब देश आहे, तर इंग्लंड हा श्रीमंत देश आहे. सामाजिक आणि आर्थिक भिन्नतेमुळें ज्या संस्था व जीं साधनें इंग्लंडमध्यें उपयुक्त ठरतील, तीं हिंदुस्थानांत ठरणार नाहींत. यासाठीं हिंदुस्थानासाठीं शैक्षणिक योजना तयार करणारांनीं इंग्लंडकडे न पाहतां, हिंदुस्थानसारखी ज्यांची सामाजिक व आर्थिक स्थिति आहे, अशा देशांकडे पाहावें व योजना आखावी.

(२) योजना जी आखावयाची ती पंधरा वर्षांपेक्षां जास्त नाहीं अशा कालमर्यादेपुरतीच आखावी. शिक्षणाची वाढ ही शांततेच्या काळांतच होत असते व हा शांततेचा काळ दोन युद्धांमध्यें येत असतो. कांहींचे मतें दुसरें महायुद्ध हें शेवटचेंच युद्ध आहे. पहिलें महायुद्ध झाल्यावर देखील कांहीं लोकांना असेंच वाटत होतें कीं पहिलें युद्ध हें शेवटचें युद्ध ठरेल. कांहींही असो तिसऱ्या महायुद्धापूर्वी आपली शैक्षणिक योजना पुरी होईल अशा तऱ्हेनें ती आखली पाहिजे.


(३) युद्धाचा आराखडा जसा आखला जातो तसाच शिक्षणाचाही आखला गेला पाहिजे. दोन्हीकडे उपयोगांत आणावयाची पद्धत एकच.

शिक्षण हें तरी अज्ञानाविरुद्ध उभारलेलें युद्धच आहे. लढाईमध्यें ज्याप्रमाणें कांहीं गोष्टी यदृच्छेनें घडतील असें आपण समजून चालत नाहीं, त्याचप्रमाणें शिक्षणाचे बाबतींतही केवळ लोकांच्या आवडी-निवडीवर किंवा खुशीवर अवलंबून राहणें अयस्कर होणार नाहीं.

(४) आर्थिक परिस्थितीचा विचार करून योजना आखण्यांत आली पाहिजे, म्हणजे ती अमलांत आणणें सोयीचें होईल. हिंदुस्थानांत योजना आखणारे शिक्षणतज्ज्ञ व याजनस लागणाऱ्या पैशाचा पुरवठा करणारे धनिक यांची एकत्र गांठ कधींच पडत नाहीं. शिक्षणतज्ज्ञाला असें वाटतें कीं केवळ योजना करणें एवढेंच आपलें काम आहे. पैसा आपोआप उभा राहील अशी त्यांची कल्पना. व्यवहारिक प्रशासकास (Administrator) शिक्षणतज्ज्ञ हा केवळ कल्पनेशीं खेळणारा एक अव्यवहारिक ध्येयवादी असा वाटतो. याचा परिणाम असा झाला कीं खर्च झेपत नाहीं म्हणून हिंदुस्थानाला चांगलें शिक्षण मिळत नाहीं व चांगलें शिक्षण मिळत नाहीं म्हणून हिंदुस्थानची आर्थिक स्थिति सुधारत नाहीं. या विचित्र फेऱ्यांत आज हिंदुस्थान सापडलेला आहे. यांतून मार्ग एकच. हिंदुस्थानला झेपेल असें उत्तमांत उत्तम शिक्षण देतां येईल अशी योजना तयार करणें. हें करणें कठीण नाहीं. स्विस शिक्षणतज्ज्ञानें म्हटल्याप्रमाणें आपण वागलें पाहिजे. 'परमेश्वरानें आपणास गरिबी दिली आहे, परंतु आपल्या मुलाबाळांना चांगलें शिक्षण दिल्याशिवाय आपण रहातां कामा नये.'

(५) शिक्षण हें सामाजिक व आर्थिक परिस्थितीशीं निगडित झालेलें आहे. यासाठीं प्रथम आर्थिक व सामाजिक स्थिति कशी सुधारेल याचा विचार झाला पाहिजे. शिक्षण सुधारणा हें आर्थिक व सामाजिक सुधारणेचें एक अंग आहे. शैक्षणिक योजना यशस्वी व्हावयाची असेल तर शिक्षण, अर्थ व समाज या तिन्ही अंगांचा, एकसमयावच्छेदेंकरून,

विचार व्हावयास पाहिजे. अशा योजनेची आज हिंदुस्थानाला गरज आहे. कार्य कठीण आहे, परंतु अशक्य नाहीं. हें कार्य परक्यांवर—मग ते कितीही सहानुभूति दाखवोत—टाकण्यासारखें नाहीं. हिंदी शिक्षणतज्ज्ञांना हें एक परिस्थितीनें दिलेलें आव्हान आहे. या आव्हानाचा त्यांचेकडून लवकर स्वीकार होईल व हिंदुस्थान हा सुखी देश केला जाईल, अशी आपण आशा करूं या!



REFBK-0006549



परिशिष्ट

पुस्तकांत वापरलेले पारिभाषिक शब्द

(1) Abnormal (child) -- विकृत
(2) Academic -- भाषिक, विद्यालयीन
(3) Accountancy -- गणनाशास्त्र
(4) Administrative -- शासनिक
(5) Administrator — प्रशासक
(6) Affiliating (University) — स्वीकारी
(7) Anglicist -- आंग्लभाषानिष्ठ
(8) Arts (college) -- सांस्कृतिक
(9) Black-Coated (profession) -- पांढरपेशा
(10) Career master — वृत्ति-शिक्षक
(11) Chairs (in subjects) — अध्यासन
(12) Classical (language) — महित भाषा
(13) Classicist -- महितभाषानिष्ठ
(14) College -- महाविद्यालय
(15) Competitive examination — स्पर्धा-परीक्षा
(16) Consolidation -- दृढीकरण
(17) Coordination — समन्वय
(18) Creative action -- सृजनात्मक कार्य
(19) Employment bureau -- व्यवसाय खातें
(20) Experimental scheme — प्रायोगिक योजना
(21) Exploratory scheme -- संशोधनात्मक योजना
(22) Excise -- उत्पादन कर
(23) Executive scheme — विधायक योजना
(24) Fellowship -- विद्यावृत्ति

(25) Filtration theory -- अंतरझर तत्त्व (सिद्धांत)
(26) Folk dance -- लोकनृत्य
(27) High school -- माध्यमिक शाळा
(28) Indian civil (education) Service–सनदी नोकर
(29) Medium -- बोधभाषा, माध्यम
(30) Middle school -- पूर्व–माध्यमिक शाळा
(31) Organisation -- व्यवस्थिति
(32) Orientalist -- प्राच्यविद्यानिष्ठ
(33) Physical science -- भौतिकशास्त्र
(34) Post-graduate (course) -- प्रपदवीक
(35) Professional (college) -- व्यावसायिक
(36) Refresher course -- परिष्कार सत्र
(37) Renaissance -- पुनरुज्जीवन
(38) Reorganisation -- पुनर्व्यवस्थिति
(39) S. L. C. (examination)–शालान्त
(40) Stagnation -- कुचंबणा
(41) Teaching (University) -- अध्यापि
(42) Technical -- यांत्रिक
(43) Technology -- उद्योगशास्त्र
(44) Tutorial system -- स्वाध्याय पद्धति
(45) Unitary (university) -- स्वयंपूर्ण
(46) University -- विद्यापीठ, विश्वविद्यालय
(47) Vocational -- औद्योगिक

"A Students' History of Education in India." (1800–1944)

Marāthi

by Syed Nurullah and J. P. Naik

—1948—

Price Rs. 3–14